**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>विशेष मा.महापालिका सभा</u>**
**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ४५</u>**
**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक – ०१.०६.२०२०</u> <u>वेळ – दुपारी २.३० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष मा. महापालिका सभा सोमवार दिनांक ०१.०६.२०२० रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | महापौर |
| २) | मा.तुषार रघुनाथ हिंगे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ८) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ११) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १२) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १३) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १४) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२) मा.लांडगे सारिका संतोष

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.गीता सुशिल मंचरकर

३३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३६) मा.अनुराधा गणपत गोरखे

३७) मा.केशव हनुमंत घोळवे

३८) मा.मंगला अशोक कदम

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.प्रमोद कुटे

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा.शैलजा अविनाश मोरे

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६६) मा.भोईर सुरेश शिवाजी

६७) मा.अपर्णा निलेश डोके

६८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.सुजाता सुनिल पालांडे

७५) मा.योगेश मंगलसेन बहल

७६) मा.कदम निकीता अर्जुन

७७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.काळे उषा दिलीप

८३) मा.कोकणे संतोष अंकुश

८४) मा.पवार मनिषा प्रमोद

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.ममता विनायक गायकवाड

९६) मा.कामठे तुषार गजानन

९७) मा.चोंधे आरती सुरेश

९८) मा.कस्पटे संदिप अरुण

९९) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१००) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०१) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०४) मा.कुटे निर्मला संजय

१०५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०८) मा.मुंढे उषा अंकुश

१०९) मा.कदम शशिकांत गणपत

११०) मा.लोखंडे चंदा राजू

१११) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११२) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११३) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११४) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११८) मा.नवनाथ दत्तू जगताप

११९) मा.संतोष बबन कांबळे

१२०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२२) मा.संजय मल्हारराव वाबळे

१२३) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२६) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त,मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, सभागृहात कोरम नाही कोरम मोजावा अशी मी मागणी करतो, नाहीतर आम्ही कोर्टात जाणार.

**मा.महापौर-** कोरम मोजावा.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, आजची सभा गुरुवार दिनांक ४/६/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकुब करणेत यावी. अशी सूचना मी मांडतो.

**मा. केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, तहकुबी सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन गुरुवार दि.४/६/२०२० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

----

**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**विशेष मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ४५**

**( दि. १/०६/२०२० ची तहकुब सभा )**

**सभावृत्तांत**

**दिनांक – ०४/०६/२०२०** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. ०१/०६/२०२० ची तहकुब विशेष मा. महापालिका सभा गुरुवार दिनांक ०४/०६/२०२० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर
२) मा.तुषार रघुनाथ हिंगे उपमहापौर
३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४) मा.साधना अंकुश मळेकर
५) मा.दत्तात्रय बाबूराव साने
६) मा.अश्विनी संतोष जाधव
७) मा.राहुल गुलाब जाधव
८) मा.वसंत प्रभाकर बोराटे
९) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१०) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
११) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१२) मा.गायकवाड निर्मला मनोज
१३) मा.सागर बाळासाहेब गवळी
१४) मा.गोफणे अनुराधा देविदास
१५) मा.बारसे प्रियांका प्रविण

१६) मा.अजित दामोदर गव्हाणे

१७) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

१८) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२०) मा.फुगे भिमाबाई पोपट

२१) मा.सावळे सिमा रविंद्र

२२) मा.लांडे विक्रांत विलास

२३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२५) मा.अनुराधा गणपत गोरखे

२६) मा.केशव हनुमंत घोळवे

२७) मा.मंगला अशोक कदम

२८) मा.अश्विनी भिमा बोबडे

२९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३०) मा.संजय बबन नेवाळे

३१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३२) मा.भालेकर प्रविण महादेव

३३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३६) मा.घोलप कमल अनिल

३७) मा.पवळे सुमनताई मधुकर

३८) मा.यादव मीनल विशाल

३९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४०) मा.प्रमोद कुटे

४१) मा.राजू मिसाळ

४२) मा.शैलजा अविनाश मोरे

४३) मा.बाबर शर्मिला राजू

४४) मा.अमित राजेंद्र गावडे

४५) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४६) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

४७) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४८) मा.ढाके नामदेव जनार्दन

४९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५०) मा.करुणा शेखर चिंचवडे

५१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५२) मा.अपर्णा निलेश डोके

५३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५४) मा.गावडे राजेंद्र तानाजी

५५) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

५६) मा.जयश्री वसंत गावडे

५७) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

५८) मा.सुलक्षणा राजू धर

५९) मा.शाम गणपतराव लांडे

६०) मा.सुजाता सुनिल पालांडे

६१) मा.योगेश मंगलसेन बहल

६२) मा.कदम निकीता अर्जुन

६३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६५) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६६) मा.पाडाळे निता विलास

६७) मा.काळे उषा दिलीप

६८) मा.पवार मनिषा प्रमोद

६९) मा.बारणे अर्चना तानाजी

७०) मा.अभिषेक गोविंद बारणे

७१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३) मा.बारणे माया संतोष

७४) मा.निलेश हिरामण बारणे

७५) मा.कलाटे राहुल तानाजी

७६) मा.ममता विनायक गायकवाड

७७) मा.कामठे तुषार गजानन

७८) मा.चोंधे आरती सुरेश

७९) मा.कस्पटे संदिप अरुण

८०) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८१) मा.सुनिता हेमंत तापकीर

८२) मा.चंद्रकांत बारकु नखाते

८३) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८४) मा.कुटे निर्मला संजय

८५) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

८६) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

८७) मा.आंगोळकर सागर सुनिल

८८) मा.मुंढे उषा अंकुश

८९) मा.कदम शशिकांत गणपत

९०) मा.लोखंडे चंदा राजू

९१) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

९३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

९४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

९५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

९६) मा.नवनाथ दत्तू जगताप

९७) मा.संतोष बबन कांबळे

९८) मा.सोनवणे शारदा हिरेन

९९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१००) मा. वाबळे संजय मल्हारराव

१०१) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१०२) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१०३) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१०४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर - आयुक्त,मा.संतोष पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.पवार- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----

**मा. महापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.अंबरनाथ कांबळे** – मा.महापौर साहेब, पिंपळेगुरव येथील माजी नगरसेवक मा.राजेंद्र राजापुरे यांच्या मातोश्री सुशिला राजापुरे यांचे निधन झाले आहे त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

**मा.सागर आंगोळकर** – मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.केशव घोळवे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिका म्हणजे लोकशाहीचं मंदीर आहे आणि या मंदीरामध्ये आपण गुण्यागोविंदाने काम करणं अभिप्रेत असतं मतभेद असावेत परंतु मनभेद असु नयेत. परवा जी घटना घडली ती या शहराला गालबोट लागणारी घडलेली आहे. आणि कुठे तरी मानवीय दृष्टीकोन कमी होत चालला आहे का हा ही प्रश्न याठिकाणी निर्माण होतो. जी घटना घडली ती चांगली घडलेली नाही. म्हणुन त्या घटनेचा आम्ही याठिकाणी निषेध व्यक्त करतो. आणि पुन्हा अशी घटना घडू नये याबाबत सभागृहातील सर्व सदस्यांनी याठिकाणी सभागृहाचं पावित्र्य राखावे आणि पुन्हा जर अशी घटना घडलीच तर संबंधित नगरसेवकांवर कारवाई करावी. अशी मी सुचना मांडतो आणि आपल्याला विनंती करतो.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, सन्मा.सदस्य केशव घोळवे यांनी मांडलेल्या सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं तर केशवरावांनी जो विषय मांडला आहे त्याबद्दल मी ही जी घटना घडलेली आहे. ठिक आहे, काय झालं,कसं झालं कोणाची चुक होती, कोण बरोबर होतं जे काही घडलेलं आहे ते बंद कॅबीनमध्ये घडलेलं आहे. परंतु अशी घटना घडू नये या मताशी आम्ही सहमत आहोत. ज्यादिवशी ही घटना घडलेली आहे त्याची शहानिशा चारही पक्षाचे गटनेते किंवा अजुन काही नगरसेवक त्यामध्ये घेऊन जे काही घडलेलं असेल, सभागृहाचा गैरसमज असेल किंवा पेपरच्या माध्यमातून बातम्या आलेल्या आहेत याची मा.महापौर आपण आणि गटनेते यांनी एकत्रित बसुन निर्णय घेण्याचा प्रयत्न करु जेणेकरुन पुढं महानगरपालिकेच्या माध्यमातून अशा घटना घडु नये असे आमचे पण म्हणणं आहे.येथून पुढे अशा घटना घडणार असतील तर महापौर साहेब आपण एक कमिटी तयार करावी त्यामध्ये जे काही घडले असेल त्याबाबतीत आपण योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता केशवराव घोळवेंनी याठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. अशा घटनेचं कोणीही समर्थन करणार नाही. सभागृह हे पवित्र मंदीर आहे हा जो शब्दप्रयोग केला

पण तो  या घटनेपुरतं मर्यादीत नसावं. कोणतीही घटना घडते त्यावेळेस आपण त्याचा साक्षीदार त्याठिकाणी नसतो. आणि स्टँडींगमध्ये अनेक वेळा चांगलं असतं पण अंडरस्टँडीग झालेलं दिसत नाही. परंतु हे अंडरस्टँडींग व्हावं म्हणुन पाच जणांची कमीटी तयार करावी. मी या सभागृहात नेहमी सांगत असतो की, या कमीटीमध्ये एक शिवसेनेचा असावा,राष्ट्रवादीचे गटनेते असावेत,पक्षनेते असावेत आणि कोणाचा तरी कोणावर अंकुश असावा. सभागृह हे पवित्र मंदीर आहे असे म्हणता मग या मंदिराचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. ही घटना का घडली,कशासाठी घडली यासाठी एक कमिटी बसवा नां जे चुकीचे असेल त्याचा या कमिटीतील पाच जणांनी निर्णय घ्यावा. हे काही कुख्यात गुंड वगैरे नाहीत, भारताच्या सिमेवरुन पकडुन आणलेत हे का घडतंय आणि हे घडु नये यासाठी प्रयत्न करणं हे मा.महापौर साहेब, ही आपली जबाबदारी आहे.अशा ज्या घटना घडतात त्याचा कोणाला आनंद वाटेल. कोणताही वाद न होता गुण्यागोविंदाने अधिकारी राहतात आणि झाला तर ते आपल्याला सांगत नाहीत. आपण मात्र या गोष्टी मंदिरातून आंगणात आणतो. मी सभागृहाला नम्र विनंती करतो की, यापुढे अशा घडू नये आणि घडलं असेल,नसेल आणि ती घटना का घडली याची शहानिशा या पाच जणांच्या कमिटीतील सदस्यांनी करावी आणि त्यांना समज देण्यात यावी. सगळे समजदार नगरसेवक आहेत,मडिगेरी सुध्दा समजदार आहेत राहुल कलाटे हे हे एका पक्षाच्या गटनेत्याची जबाबदारी स्विकारतात अशा काही घटना घडत असतील तर त्यावर मार्ग काढू नां याठिकाणी आम्ही बोलायचं,त्यांनी बोलायचं हे कसे योग्य होते आणि हे कसे अयोग्य आहेत यावर बोलायचं. या मंदिराचं पावित्र्य राखायचं का, मंदिराची विकृती करुन टाकायची म्हणुन मी मा.महापौर आणि सभागृहातील सर्व सभासदांना  विनंती करतो की, सभागृहामध्ये कोणत्या विषयावर किती वेळ बोलावे याची एक मिटींग घेत जावा ज्यावेळेस आपण या शहराचे विश्वस्त म्हणुन कोणती जबाबदारी स्विकारतो. आता आम्ही यावर्षीच्या बजेटवर अभ्यास करुन शिल्लकी अंदाजपत्रक पुढच्या वर्षी कसे करतो, यासंदर्भात मी आपल्याला एक पत्र पण दिलेलं आहे त्यावर पण चर्चा व्हावी. आणि मी पक्षनेत्यांना विनंती करतो की, यामध्ये कोणाचं चुकलं, का चुकलं आणि चुकलं असलं तर याठिकाणी समज देण्यासाठी कार्यकर्ते आहेत नां आपण यामधुन एक मार्ग  काढा आणि कोणीही आकसाने किंवा सुडबुध्दीने काही करु नका नाही तर हीच परंपरा पडेल

आणि ही परंपरा इथंच खंडीत करावी आणि हा विषय इथंच संपुन टाकावा अशी भावना व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच भाऊसाहेबांनी जी सूचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे. मा.महापौर साहेब, माझं एका विषयावर लक्ष वेधायचं आहे आपल्याकडे निसर्ग वादळ येणार आहे हे आपल्याला माहित होतं तर प्रशासनाची त्यासाठी तयारी का नव्हती. माई मी फक्त माझ्या वॉर्डापुरतंच बोलणार आहे. माझ्या वॉर्डामध्ये जवळपास २५ ठिकाणी झाडे कोसळली आहेत आणि ती झाडे काढण्यासाठी एक झाड ५०० रु. नी काढली आहेत आणि ती स्वत:च्या खर्चानी काढली आहेत रस्त्यावरची ही सगळी झाडं काढण्यासाठी आमचे कार्यकर्ते होते आणि आपल्या उदयान विभागाचे अधिका-यांचे फोन बंद होते आणि फोन का बंद होते. निसर्ग वादळ येणार हे माहित असताना सुध्दा आपले प्रशासन जागरुक का नव्हते. हा आम्हांला सर्वात मोठा प्रश्न आहे. प्रत्येक नगरसेवक रस्त्यावर आलेला आहे. आमच्या कार्यकर्त्यानी झाडं काढलेली आहेत परंतु प्रशासनाने आम्हांला मदत केलेली नाही. प्रशासन या गोष्टीवर का झोपलेलं आहे. एका घरावरती झाडं कोसळंल त्यांच नशिब की त्यामध्ये जिवीत हानी झालेली नाही. पण त्या लोकांच्या मदतीसाठी सुध्दा महापालिकेचे कर्मचारी कोणी आलेले नाही. माझे खोत साहेबांशी आणि डीएन गायकवाड यांच्याशी बोलून झालं आज सगळया रस्त्यावर पाहिलं तर फक्त झाडंच झाडं आहेत पण ती अजुनही उचलली जात नाहीत प्रशासन आम्हांला मदत का करीत नाही मोठमोठी झाडं कोसळली आहेत आम्ही स्वत: झाडं काढलेली आहेत मी अग्निशामक दलाचे आभार मानते त्यांनी आम्हांला थोडया प्रमाणात का होईना मदत केलेली आहे. पण उदयान विभागाचा एकही अधिकारी त्याठिकाणी आलेला नाही. मा.आयुक्त साहेब,तुम्हांला याचं उत्तर द्यावं लागेल कारण याच्यापुढे अशीच आपत्ती येत असेल तर तुम्ही आम्हांला सांगा आम्ही आमच्या पध्दतीने तयार आहोत आम्हांला जसं वाटेल तसं करतो. तुमचं अभिनंदन करताना मंगलाताई बोलल्या प्रशासन कशा पध्दतीने चालतं आमच्या प्रभागात २/२ दिवस लाईट नाही ठिक आहे एमएसईबीची लाईट गेली असेल पण उदयान विभागाकडुन आम्हांला मदत का मिळाली नाही आणि अजुनही रस्त्यावर कोसळलेली झाडे तशीच आहेत आज सकाळपासून मी फोन करीत

आहे तरी पण उदयान विभागाचे लोक आलेली नाहीत. याचं उत्तर मा.आयुक्त साहेबांनी द्यावं अशी विनंती करते.

**मा.हर्षल ढोरे** -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच सुजाताताईंनी जो विषय घेतला आहे निसर्ग वादळ येणार आहे हे आपल्याला ४/५ दिवस आगोदर सगळयांना ज्ञात होतं. मी प्रभाग क्रमांक ३२ मध्ये त्याचं नेतृत्व मा.महापौर माई करतात आम्ही सर्वजण नगरसदस्य म्हणुन काम करतो. मा.आयुक्त साहेब, आपले कोरोनाविषयी केलेल्या उपाययोजनेच्या संदर्भात आपले सर्व सदस्यांनी कौतूक केलं आहे. खरोखरचं चांगल्या कामासाठी कौतुक केलं आहे. पण लगेचच हे वादळ आलं आणि यामध्ये प्रभाग क्रमांक ३२ मध्ये जवळ जवळ १७ ते १८ ठिकाणी आपल्या इथं झाडं कोसळली स्वत: माई सर्व अधिका-यांच्या संपर्कात होत्या. परंतु उदयान विभागाचे जे कर्मचारी आहेत त्या सर्वांनी आपआपले फोन स्वीच ऑफ करुन ठेवलेले होते. अक्षरशा आम्ही रात्री पावसामध्ये १२ ते १२.३० पर्यंत ज्या ज्या लोकवस्तीमध्ये झाडं कोसळली होती तिथं जाऊन आम्ही प्रायव्हेट क्रेन घेऊन जेवढी झाडं हटवता येईल तेवढी हटवली आहेत स्वत: माई आमच्या संपर्कात होत्या कोणाचंही नुकसान झालं नाही पाहिजे. महापौर या नात्यांनी त्यांनी प्रभागातील बरीच झाडे काढण्याचं काम त्यांनी केलेलं आहे. तरीही प्रशासन आतापर्यंत त्याठिकाणी पोहचलेलं नाही. मी पाटील साहेबांकडे याबाबतीत खंत व्यक्त केली. मी पवार साहेबांना देखील फोन केला होता परंतु ते मिटींगमध्ये व्यस्त होते. नंतर मी पाटील साहेबांना फोन केला त्यांना सांगितलं की, आमच्या प्रभागामध्ये खुप वाईट अवस्था आहे, मोठमोठी झाडे कोसळली आहेत रस्ते बंद झालेले आहेत  याचं उत्तर मा.महापौर साहेब, आयुक्तांनी द्यावं ही माझी विनंती. धन्यवाद.

**मा.राजु मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  सन्मा.सदस्या सुजाताताईंनी जो विषय मांडला आहे. मा.आयुक्त साहेब, माझ्या प्रभागामध्ये जवळ,जवळ ५० झाडं वादळामुळे पडलेली आहेत. मी म्हणेन की, काही प्रभागामध्ये उदयान विभागाचे कर्मचारी पोहचू शकली नसतील  किंवा प्रशासनाचे याची काळजी घ्यायला पाहिजे होती. पण मी सांगु इच्छितो की, अग्निशामक दल हे सकाळी ८ पासून  ते रात्री १२.३० पर्यंत काम करीत होते. त्यामध्ये दोन्ही  गायकवाडची टीम असेल त्यातील  जागीर म्हणुन कर्मचारी होता त्याला जेवायला सुध्दा फुरसत नव्हती.

तो चक्कर येऊन पडला त्याची शुगर लो झाली आणि तो हायटेक झाला स्थापत्य विभागाने आम्हांला जेसीबी दिले. मा.आयुक्त साहेब, याच्या पाठीमागचं गौडबंगाल सांगु का काही लोकांनी यापुर्वी झाडाच्या फांदया सुध्दा कट करु दिलेल्या नव्हत्या आमच्याकडे ४०/४० वर्षापुर्वीची झाडं आहेत या झाडाच्या फांदयामुळे लाईटचा प्रकाश सुध्दा व्यवस्थित पडत नाही. लोकांच्या एवढया तक्रारी असताना सुध्दा ज्यावेळेस ट्री कटींग व्हायला पाहिजे त्यावेळेला होत नाही. फायर विभागाकडील कटर आणि ठेकेदाराकडे असलेला कटर याच्यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे अग्निशामक दलामध्ये मानधनावर जी मुलं कामावर घेतलेली आहेत ती खरचं चांगली काम करतात,त्या मुलांच मी कौतुक करतो की,त्यांनी खुपच चांगल काम केलेलं आहे. निसर्ग वादळ येणार होतं हे आपल्याला माहित होत परंतु परिस्थितीच अशी निर्माण झाली की. त्याला आवश्यक असणारी साधनसामुग्री गोळा करणं गरजेचं होतं. आमच्याकडे ४० वर्षाची झाडं झालेली आहेत. मुळासगट आजही ५ झाडं उखडुन आलेली आहेत. काल ते खोडं कापून घेत होते. या निसर्ग वादळामुळे फार मोठी हानी झालेली आहे. अजुन काही झाडं हे लोकांच्या घरावर पडू शकतात या कर्मचा-यांनी चांगली कामे केलेली आहेत आणि जी झाडं अजुनही धोकादायक आहेत ती काढणेत यावी अशी विनंती करतो.धन्यवाद.

**मा.प्रियंका बारसे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं तर सुजाताताईंनी याठिकाणी चांगला विषय मांडलेला आहे. आपल्याला निसर्ग वादळ येणार आहे हे माहित असुन सुध्दा आपण पुर्वतयारी केलेली नाही. टीव्ही वर सांगितलं होतं की, या वादळामुळे झाडं कोसळू शकतात, लाईचे खांब कोसळू शकतात अशा बातम्या आपल्याला दिलेल्या होत्या. मी मा.आयुक्त साहेबांना फोन केलेला होता की, माझ्याकडे घरावर झाड पडलेलं आहे ते काढण्यात यावं असं मी टीएन गायकवाड यांना सांगितलं होतं परंतु त्यांनी मला सांगितलं की, ते झाड तोडण्यासाठी मला परवानगी काढावी लागेल असे सांगितले होते याचे माझ्याकडे कॉल रेकार्डीग आहे शिवाय माझ्याकडे कर्मचारी सुध्दा उपलब्ध नाही. या शब्दामध्ये मला टीएन गायकवाड यांनी उत्तर दिलेलं आहे. हे पुर्णपणे चुकीचं आहे. झाडं तोडण्यासाठी परवानगी लागते हे आम्ही सुध्दा मान्य करतो परंतु झाड खुपच पसरलेलं असेल आणि फांदयाची छाटणी करावयाची असेल तर आपल्याला वृक्ष प्राधिकरण समितीमध्ये परवानगी घेऊन त्या फांदया कट

करायच्या हा जो नियम आहे त्या नियमामध्ये आपण बदल करावा. त्याच बरोबर प्रभागामध्ये ब-याच ठिकाणी लाईट नाही या वादळाच्या परिणामुळे झालेलं आहे हे आम्ही मान्य करतो.प्रभागामध्ये ३/४ मजली इमारती आहेत त्या इमारतीमध्ये पाणी हे मोटरनीच जाते. आपल्याकडे अजुनही दिवसाआड पाणी येते ज्यादिवशी पाणी येते त्यादिवशी जर लाईट नसेल तर त्या लोकांना दोन दिवसांनी पाणी मिळते. आता पावसाळा सुरु झालेला आहे तरी दिवसाआड पाणी का येते यावर सुध्दा आपण लक्ष द्यावे आणि दररोज पाणी द्यावे तसेच ड्रेनेजचे काम करायचे म्हणले तर कर्मचारी सांगतात की, हे पावसाचे पाणी आहे ते थांबल्याशिवाय काम करु शकत नाही. आणि मग या ड्रेनेजच्या चेंबरमधील पाणी लोकांच्या घरामध्ये घुसलेले आहे. यावर आपण मार्ग काढणं खुप गरजेचे आहे. दिवसाआड जो पाणीपुरवठा चालू आहे त्याऐवजी दररोज करणेत यावा कारण पावसाळा हा आता दररोज सुरु आहे आणि आम्ही आमच्या प्रभागातील केलेली कामे ही फेसबुकच्याद्वारे व्हॉटसअपच्या  माध्यमातुन व्हीडीओ शुटींग करुन दाखवित असतो.आणि आम्ही तिथं हतबल आहोत हे आम्हांला त्याठिकाणी जाणवतं कारण माझ्या प्रभागामध्ये असे जर पाणी आलं तर मी सहन करु शकत नाही. धन्यवाद.

**मा.शितल शिंदे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह कालची नैसर्गीक आपत्ती येणार होती हे आपल्याला माहित होतं आणि काल ती आली आणि त्याचा एवढा मोठा फटका आपल्याला पिंपरी चिंचवड शहराला बसेल आणि झाडं उन्मळुन पडतील हे कोणाला ज्ञात नव्हतं  सर्व सदस्यांच्या याच तक्रारी असतील परंतु माझं याठिकाणी एका गोष्टीकडे लक्ष वेधायचं आहे की, आपल्याकडे यंत्रणा कमी असल्यामुळे सगळीकडे कामे होऊ शकली नाहीत. परंतु या कर्मचा-यांची अशी भावना नव्हती की, हे काम करायचं नाही किंवा कुठल्या सदस्यांना त्रास द्यायचा आहे म्हणुन काल ब-याच ठिकाणी झाडं पडली होती मा.नामदेव लांडगे यांच्या वॉर्डात गेलो होतो अधिका-यांनी प्रथम रस्त्यावर  वादळामुळे जी झाडं पडली होती ती काढण्यासाठी प्राधान्य दिलेले होते. ज्याठिकाणी अपघात होण्याची शक्यता होती त्याठिकाणची झाडं काढुन घेतली आणि जी वैयक्तीक झाडं होती ती काढण्यासाठी  आजचा आणि उद्याचा दिवस ठेवलेला आहे. मला प्रशासनाला एवढंच सांगायचे आहे की, ही नैसर्गीक आपत्ती होती त्यामुळे या विषयावर जास्त चर्चा न करता यावर एक उपाय काढणेत यावा

आणि प्रत्येक प्रभागस्तरावर मानधनावर काही लोक घेण्यात यावे कारण पुढील ८/१० दिवसामध्ये आपल्याला या गोष्टीला सामोरे जायचे आहे. मॅनपॉवर कमी पडत असल्यामुळे कामे होत नाहीत. त्यामुळे मानधनावर लोकांची नेमणुक करावी आणि सदस्यांच्या प्रभागातील रस्त्यावर पडलेली झाडे काढण्यात यावी अशी विनंती करतो. धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.महापौर साहेब, आपल्याकडे पुर्वीपासून प्रथा आहे की, पावसाळयापुर्वी आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेतो. निसर्ग वादळाचा विषय हा त्यामध्ये ॲडीशनल झाला. मग आपल्याकडे पावसाळयापुर्वीची आपत्ती व्यवस्थापनाची मिटींग झाली का, तुम्ही त्या नगरसेवकांना कळवलं का, आपत्ती व्यवस्थापन जर तयार असतं तर यामध्ये कोणत्याही गोष्टीला अडचण यायला नाही पाहिजे होती. उदयान अधिक्षक हे पद तुमच्या कागदावर बदल झाला किंवा तुम्ही त्यांना २ महिन्यापुर्वी चार्ज दिला असेल, तर इथल्या कित्येक नगरसेवकांना माहिती आहे की, आपले उदयान अधिक्षक कोण आहेत. ब-याच लोकांनी साळुंके साहेबांना फोन लावलेला आहे. मला माहिती आहे किती लोकांनी साळुंकेला फोन लावला आहे. मग आम्हांला अजुन उदयान अधिक्षक कोण आहेत हेच जर का आम्हांला माहित नसेल तर मग आम्ही कोणाला फोन करायचे पीएम ला करायचे का टीएन ला करायचे हाच मोठा प्रश्न आहे इथे. मी अति.आयुक्तांना काल दुपारी फोन केला होता शहरामध्ये कॉर्पोरेशनच्या प्रॉपर्टीचं सुध्दा भरपुर नुकसान झालेलं आहे. मी तिथल्या कर्मचा-याला स्पीकरवरती घेतलं आणि कमिशनरसाहेबांशी बोलणं करुन दिलं. म्हणजे इथे जबाबदारी फक्त नगरसेवकांचीच आहे का? झाडं कुठे,कुठे पडली हे बघायचं,नगरसेवकांनीच त्या कटींगवाल्याला बोलवायचं, झाडं कटींगवाल्याला आम्ही कुठून तरी ठेकेदारांकडुन उपलब्ध करुन आणतो. पण खरंच अशी परिस्थिती निर्माण झाली तर या दोन्ही गायकवाडांनी जुने नवीन नाही आज यांच्याकडे जरी चार्ज आला असला तरी सुध्दा या दोन्ही व्यक्ती जुन्या आहेत. यांना या शहरातील सगळया गोष्टी माहिती आहेत. यांनी राजुकडंच काम कसं काय केलं हे पण मला माहिती आहे. मग असेच काम सगळया प्रभागात व्हायला पाहिजे. राजुच्या प्रभागात काम झालं पण त्याच्या जवळच असलेल्या बाबरताईच्या प्रभागात काम झालं नाही.बाबरताई ज्याठिकाणी राहतात त्या दोन लाईनमधुन मी आले तिथं दोन झाडं पडलेली आहेत.

माझं पण तिथं घर आहे सकाळ/संध्याकाळ मी तिथे जातेचं त्यामुळे तिथे दोन लेनमधील किती झाडं पडलेली आहेत ती झाडं उचलली नाहीत. तेथुन पुढे आल्यानंतर प्रदीप स्वीट मार्टच्या समोरचं झाडाचं सुध्दा असं धारदार टोक पुढे आलेले आहे. ते सुध्दा अजुन काढलेले नाही. पावसाळा येणार आहे, धोकादायक झाडं पडणार आहेत,झाडाच्या फांदया तोडायच्या असतील तर त्या तोडायला नको का ही सगळी कामं व्हायला पाहिजे. आज ४ तारीख आहे आमच्याकडे आज पाणी आलेलं आहे. कमिशनर साहेब आपण याबाबतीत अपयशी ठरलेले आहात. संभाजीनगरमध्ये ३१ तारखेला पाणी आलेलं आहे. २ तारखेला मेसेज आला की, आज पाणी विस्कळीत आहे.सेक्टर २३ चा फिडर खराब झालेला आहे. पाणीपुरवठा होईल की नाही हे सांगता येणार नाही. आज तरी आम्हांला पाणी मिळेल की नाही हे सांगता येत नाही. मागच्या मिटींगमध्ये ५ टक्के वाढीव दर पाणी देण्याचा विषय आणला होता. कोरोनाच्या जाहीरातीमध्ये सारखं दाखवतात हात असा धुवा, तसा धुवा परंतु याठिकाणी ४/४ दिवस पाणीच येत नाही कुठून धुवा १ तारखेला जर पाणी आले असेल आणि आज ४ तारीख आहे कोठुन पाणी आणणार लोकांना आंघोळीला पाणी नाही,बाथरुमला पाणी नाही. आपलं धरण ४० टक्के भरलेलं आहे त्या धरणांत पाणी साठवुन काय उपयोग होणार आहे साहेब,आपल्याला काय गोल्ड मेडल मिळणार आहे का, विचार करा आत्मपरिक्षण करा आणि आज आपण पिंपरी चिंचवड शहरवासियांना ५ टक्के रेट वाढवलेला आहे आणि त्यांना पुरेसे पाणी देवु शकत नाही. मागच्या जीबी मध्ये तुम्ही विषय केला ही दुर्देवाची गोष्ट आहे. मी दोन्ही गायकवाडांना फोन केले दोन्ही गायकवाड मला हो,हो म्हणले आणि दोन्ही गायकवाडांनी मला लोकं पाठवली नाहीत. मी तुम्हांला संभाजीनगर, शाहुनगरचे किती झाडे काढली आहेत याचे व्हीडीओ पाठवून देते आम्ही ५० मुलांची टिम तयार केली होती त्यांनी संभाजीनगर,शाहूनगर मधील पडलेली झाडे काढली आहेत मी तुमच्याशी, अति.आयुक्त यांच्याशी बोलले आम्ही कामं तरी कशी करायची योगायोगाने मी अजुन एक सभागृहात सांगते, कमिशनरसाहेब काल रात्री मी तुमच्याशी बोलले, सिमाताई म्हणाल्या तुम्ही खरंच उत्कृष्ठ काम करता आणि म्हणुन मी कमिशनरसाहेब तुम्हांला सांगते की, माझ्या प्रभागातील एक महिला आहे तिचा नवरा पॉझिटीव्ह आहे आज तो वायसीएमएच मध्ये ॲडमीट आहे दोन लहान मुलं आहेत ते निगेटीव्ह आलेले आहेत ते त्यांच्या घरात सोसायटीमध्ये आहेत सोसायटीवाले त्यांच जेवण,चहा सगळं करता पाहुणे,नातेवाईक यांना आताच्या

परिस्थितीत येता येत नाही. आणि त्या बाईला कॅन्सर पण आहे आणि तिला खुप त्रास होत होता आणि ती एकटीच आहे. आपल्या वायसीएमएच मधल्या डॉ.नी तिला बघीतलंच नाही मी इंगळे साहेबांशी पहिल्यांदा बोलले आणि नंतर म्हणले चला आपण कमिशनरसाहेबांशी सुध्दा बघु या बोलू या कारण सिमाताईंनी कमिशनरसाहेबांच एवढं चांगल कौतुक केलं आहे हे सभागृहातील सगळया लोकांना कळायला पाहिजे. तुम्ही सांगा ना आम्ही सगळे पेशंट दवाखान्यामध्ये पाठवतो. मी कमिशनरसाहेबांना म्हणलं की, मला बिर्लाचं रेफरशिट द्या कारण त्यांनी बिर्लाचीच रेफरशिट दिली होती. साहेब म्हणले ठिक आहे मी  डॉ.वाबळेशी बोलतो त्यांनी सांगितल्यानंतर बिर्लाची रेफरशिट दिली तो पेशंट बिर्लामध्ये नेला त्यांनी सांगितलं की, ४० हजार रु.भरा नाही तर आम्ही घेणार नाही. कॉर्पोरेशनची रेफरशिट असेल तर त्यांनी ४० हजार रु. मागायला नाही पाहिजे. त्यांनी स्पष्ट सांगितले दररोजचे ६ हजार रु. आणि इतर बाकीचा खर्च दिला तरच आम्ही पेशंट आत मध्ये घेऊ अन्यथा पेशंट आत मध्ये घेणार नाही. आणि मग कमिशनरसाहेबांना रात्री ११.०० वा.कसा फोन करायचा म्हणुन तेथून आम्ही डॉ.वाबळेंना फोन केला त्यांनी म्हणले की, मी बिर्ला हॉस्पिटल नाही, डी.वाय.पाटील हॉस्पिटल द्या. मला याठिकाणी सांगायच आहे की, जर आपण बिर्लाला पेशंट रेफर केल्यानंतर बिल भरायचं नाही असं आपलं सभागृहात ठरलेलं आहे म्हणुन मी बिर्ला मागीतलं होतं जर आपल्याकडे पेशंट ठेवता येत नाही  डीवाय पाटील मध्ये सुध्दा रात्री दोन वाजता साधा श्वासाचा त्रास होत असताना त्या बाईला परत डीवायमधनं परत  वायसीएमएच ला पाठवा. म्हणजे या ज्या प्रॅक्टीकली गोष्टी घडतात. पुन्हा अस म्हणायचं यासाठी एक कमिटी लावा कशा,कशासाठी  कमिटी लावायची. सक्षमता आहे की नाही त्याच्यात सक्षमतेने कोणी काम करतं की नाही, का प्रत्येक गोष्टीत कमिटी मग याला काही अर्थ नाही नां, आणि शेवटी तो पेशंट रात्री १ ते १.३० वा. डीवायला  नेला आणि डीवाय वाल्यांनी पण मला स्पष्ट सांगितलं आहे की, या पेशंटच्या बरोबर कोण तरी एकजण असलंच पाहिजे. नाही तर तुम्ही प्रायव्हेट बाई ठेवा. आता नातेवाईकांकडे पैसेच नसतील आणि प्रायव्हेट बाई ठेवायची म्हणले तर रोजचे तीन शिफ्टचे  २००० रु. तरी घेतील  कोठुन आणणार हे पैसे मग याच्यावर कुठं तरी उपाययोजना झाली पाहिजे. मी तुम्हांला सांगते झाडं आपतकालीन व्यवस्था शुन्य, पाण्याचं नियोजन शुन्य तुम्हांला लडकत, तांबे भेटलेत नां त्यांचा काही उपयोग होत नाही. लोकांना फक्त होडीतून फिरवून आणतात तिथं किती घाण आहे आणि मी हे करतो, ते करतो असं

सांगत असतात. या चार वर्षामध्ये त्यांचा काहीही उपयोग झालेला नाही. मी तुम्हांला सांगितलं होतं की, जी रिटायर्ड मंडळी आहे त्यामध्ये एमटी कांबळे असतील, साळवी असतील या सगळयांना बोलवा ते या शहराला कसे पाणी देत होते तरी सुध्दा आपली मानसिकता नाही. आणि अशा दृष्टीकोनातून आपतकालीन व्यवस्थेमध्ये जसं सुजाताताईंनी सांगितलं आम्ही आमच्या  स्कीलवर कामे केली मग महापालिकेच्या कर्मचा-यांनी पगार कशाला घ्यायचे या कर्मचा-यांना ३०,४०,५०,१ लाख असे पगार आहेत ड्रायव्हर असेल तर ७० हजार रु.पगार आहे एवढा जर त्यांना पगार मिळत असेल तर या नगरसेवकांनी त्यांना मतं मिळण्यासाठी नागरीक त्यांच्यावर नाराज होऊ नये  नागरीक त्यांना म्हणायला नको की, काय झालं एमएसईबीच्या लोकांना धरुन आणुन आम्ही लाईट चालू करुन घेतलेल्या आहेत ही काय योग्य गोष्ट नाही. म्हणुन प्रत्येक गोष्टीवर चर्चा झाली पाहिजे. तुम्ही चर्चाच होऊ देत नाही तर तुमची आपतकालीन व्यवस्थापनाची चर्चा कशी होईल. यावर चर्चा झाली असती तर आपल्याला तयारी करता आली नसती का ४०/५० मुले मानधनावर घेतली असती आपल्याला फक्त रस्ता मोकळा करुन घ्यायचा होता कोणाच्या घरावर झाडं पडलेली आहेत, लोक घाबरत होती. एवढं वादळ जोरात होतं यासाठी आपली आपतकालीन व्यवस्था ही कायमस्वरुपी सक्षम असली पाहिजे. जुन्या इमारतीचे आपण ऑडीट केलेलं आहे का त्या लोकांना आपण इमारत पाडणार आहे म्हणुन सांगितले आहे का नाशिकला जसा वाडा पडला तसे आपल्याकडे किती तरी जुने वाडे आहेत की जे पडु शकतात त्याठिकाणची माणसे निघत नाहीत कित्येक  इमारतीही अशा आहेत की त्या पडू शकतात. तसेच ड्रेनेजचं पाणी काही लोकांच्या घरामध्ये येतं कोणाला सांगणार आणि त्यावेळेला कोणाचेही फोन चालू नसतात यंगेज टोन लावून ठेवतात अशा परिस्थितीत आपलं काम चालू आहे. २००४ साली जेंव्हा पुर आला होता त्यावेळेस पासून आपण आपतकालीन व्यवस्थापन हा विभाग चालू केला होता आणि तो सक्षम आहे . प्रत्येक पावसाळयामध्ये वादळ येऊ अथवा ना येऊ पण त्यासाठी आवश्यक तयारी केलीच पाहिजे.नागरीकांच्या तक्रारी  येता कामा नये, आणि नगरसेवकांना बोलायची कशाला संधी देता आणि मग यावर चर्चा झाल्याशिवाय तुम्हांला कळणार आहे का आम्ही परवाच्या दिवशी इतक्या चांगल्या भाषेत सांगितलं की, माई आणि तुम्ही बाप आहात तर या आई-बापा पर्यंत समस्याच गेल्या नाही तर तुम्हांला कळणार कुठून आज रस्त्यावर झाडांचा कचरा तसाच आहे किती वाईट परिस्थिती आहे हे तुम्ही

जाऊन बघा आणि माई तुम्ही जाताना इकडून न जाता इकडून असं गोल,गोल फिरुन जात जा. महापौर या सगळया वॉर्डाच्या नगरसेविका आहात त्यामुळे तुम्ही सगळीकडे बघीतलं गेलं पाहिजे. तुम्हांला ज्याठिकाणी काही समस्या दिसली तर त्याठिकाणाहून फोन केला पाहिजे. या निसर्ग वादळामुळे शहरामध्ये कुठे,कुठे नुकसान झालेलं आहे त्याची माहिती मागवली आहे का, शहरामध्ये किती ठिकाणी आपत्ती आली याचे नियोजन केलं आहे का या जीबीच्या मिटींगऐवजी मा.आयुक्त साहेब तुम्ही आपतकालीन व्यवस्थापनाची मिटींग घेणे गरजेचं होतं. आणि त्यामध्ये आपतकालीन व्यवस्थापनाची अशी तयारी केलेली आहे. नाही तर शाळेप्रमाणे तुम्ही एक तासाचा व्हीडीओ कॉलींग सर्वांना करा. १५ मिनीटं संध्याकाळी दिलं तर ते स्पीच म्हणुन पाठवायला पाहिजे सगळयाला आपल्या सगळयांना महापालिकेमध्ये यायचं नसेल तर तेवढं तरी आपल्याला करावेच लागेल. आता जसं माझं ऐकल तसच विषयाच्या बाबतीत चर्चा करताना ऐकावे अशी विनंती करते आणि थांबते.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मा.आयुक्त साहेब, आम्हांला कळतंय एकीकडे कोरोनाची लढाई आणि एका साईडला आलेली ही आपत्ती याच्यामध्ये तुमची नक्कीच दमछाक होत आहे परंतु आमच्या सगळयाकडनं एवढीच अपेक्षा आहे की, प्रशासनाला येणा-या नक्की अडचणी काय आहेत कारण काल मी देखील गावडेसाहेबांशी बोलले,गायकवाडांशी बोलले त्यांना येणारी अडचण म्हणजे त्यांना कमी पडणारं मनुष्यबळ हे तुम्ही त्यांना देत नाही त्यामुळे त्यांना अडचणी येत आहेत तुम्ही त्यांना ठेकेदार पध्दतीने का होईना त्यांना मनुष्यबळ पुरवलं पाहिजे. परंतु मंगलाताईंनी जी वस्तुस्थिती आता सांगितली आहे ती अतिशय भयानक आहे परंतु मंगलाताईंना सांगते की, प्रशासनावर अंकुश ठेवण्याचं काम हे सत्ताधारी पक्षाचं आहे. मग सत्ताधारी असो की प्रशासन यांनी काय तयारी केली होती. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनाची मिटींग घेतली होती का एकीकडे आपण कोरोनाची लढाई लढतो आहे आणि एकीकडे चक्रीवादळाची लढाई चक्रीवादळ येणार आहे हे सगळयांना माहित होतं याबद्दल तुमची काय तयारी झाली आहे. प्रशासनाकडे मनुष्यबळ आहे की नाही याची माहिती देण्याचा कोणी प्रयत्न केला आहे का तशी आम्ही आमच्या वॉर्डामध्ये तयारी ठेवली होती. माझ्याही वॉर्डामध्ये झाडं पडली होती ती आम्ही उचलली परंतु प्रशासनाने ब-यापैकी आम्हांला चांगली मदत केली. मी ख-या अर्थाने अग्निशामक आणि उदयान

विभागाचे अभिनंदन करते. त्यांची  जेवढी कॅपॅसिटी आहे तेवढी त्यांनी आम्हांला मदत केली आहे. परंतु त्यांना जे मनुष्यबळ कमी पडते आहे ते देण्यासाठी प्रशासन आणि सत्ताधा-यांनी केला का मंगलाताई तुम्ही जेंव्हा महापौर होता त्यावेळेस तुम्ही अशी आपत्ती आली होती त्यावेळेस तुम्ही स्वत: पाण्यात उतरलेले आहात.  जेथे पावसाळयात पाणी तुंबलेले आहे त्यावेळेस आम्ही पावसाळयामध्ये काही आपत्ती आली तर त्यासाठी काय तयारी केलेली आहे यासंदर्भात आम्ही मिटींग घेत होतो. त्यांना काय अडचणी येतात हे सगळं आम्ही बघत होतो. आणि त्याठिकाणी तशी तजवीज करुन ठेवत होतो. असं प्रशासनाने केलं का, मग याठिकाणी सत्ताधा-याच कुठं तरी अपयश आहे आणि याबाबतीत ख-या अर्थानं निषेध करायचा असेल तर याठिकाणी सत्ताधा-यांचा निषेध करते. आजची जी परिस्थिती आहे ती हाताळण्यासाठी प्रशासन आणि सत्ताधारी कमी पडलेले आहेत पीसीएमसी मध्ये सगळा भोंगळ कारभार चालू आहे. कोणाचा ताळमेळ कोणाला नाही, कोणाला काही कळत नाही एकजण बोलतो दुस-याला माहित नाही सत्ताधारी पक्षनेते, महापौर आणि प्रशासन यांच्यामध्ये ताळमेळ दिसत नाही. मा.महापौर साहेब, आपला प्रशासनावर वचक बसविण्यात आपण कुठं तरी कमी पडत आहात ही वस्तुस्थिती आहे. कोरोनाची परिस्थिती चांगल्यापैकी सुधारलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. परंतु त्यामध्ये मला एक सुचना करावयाची आहे की,वायसीएममध्ये प्लाझमा थेरपी जी आहे ती सुध्दा आपण सुरु केली तर जे गंभीर पेशंट आहेत त्याच्यामध्ये नक्कीच उपयोगात येईल. ससुन मध्ये ही प्लाझमा थेरपी चालू आहे. प्लाझमा थेरपी वायसीएम मध्ये सुरु केली तर त्याचा नक्कीच उपयोग होईल. कमिशनरसाहेब आपण एक मिटींग घ्या, कारण आता पावसाळा सुरु होणार आहे त्यामुळे नाले तुंबणार आहेत, गटर तुंबणार आहेत सोसायटयामध्ये पाणी जाणार आहे, झोपडपट्टयामध्ये पाणी साचणार आहे याबाबतीत तुम्ही एक मिटींग घेवुन मनुष्यबळ वाढवलं पाहिजे. सत्ताधा-यांकडनं आम्हांला अपेक्षा नाही परंतु कमिशनरसाहेब आपण स्वत: मिटींग घेवुन मनुष्यबळ वाढवावे अशी विनंती करते आपल्याला जी मदत पाहिजे ती विरोधी पक्ष म्हणुन नक्की  करु असे आश्वासन मी आपल्याला देते. मंगलाताई म्हणाल्या पाण्याच्या बाबतीत आपण अपयशी ठरलेलो आहात आमच्या काळात नागरीकांना भरपूर पाणी मिळत होतं आता धरणं भरलेली असताना सुध्दा लोकांना पाणी मिळत नाही. आणि आता यांच्याच नगरसेवकांच्या वॉर्डात ४/५ दिवस पाणी येत नाही.  कमिशनर साहेब, पावसाळयात सुध्दा दिवसाआड

पाणी कशासाठी देत आहात आता लाईट गेली तर नागरीकांना २/२ दिवस पाणी येत नाही. पावसाळयाच्या दिवसामध्ये लाईटचा खुप प्रश्न निर्माण होणार आहे तर या मध्ये आपल्याला कसे नियोजन करता येईल कमिशनरसाहेब आमची तुमच्याकडनं अपेक्षा आहे मा.महापौर साहेब,आपण सुध्दा या पाण्याच्या प्रश्नावर लक्ष घातलं पाहिजे. एक महिला म्हणुन आपण त्या समस्यांकडे बघीतलं पाहिजे. आज दिवसाआड पाणी येते त्यामध्ये लाईट गेली की, ४/४ दिवस पाणी येत नाही. अशा वेळेस आम्हांला वॉर्डात टँकर पाठवावे लागतात. आमच्या वॉर्डातील लोकांनी आम्हांला आमच्याकडे बघुन मतदान केलेले आहे त्यामुळे पाणी द्या अथवा ना द्या परंतु नागरीकांना आम्हांला पाणी द्यावं लागतं त्यामुळे तो विषय येत नाही. आपण याठिकाणी पाण्याचं नियोजन केलं पाहिजे एक महिला म्हणुन आपण याठिकाणी महिलांचे प्रश्न घेतले पाहिजेत. याठिकाणी दररोज तरी पाणी मिळालं पाहिजे. मंगलाताई म्हणाल्या लडकतांना काही कळत नाही तर मग लडकतांना कळत नसेल तर प्रशासकीय अधिका-याची नेमणुक करावी. जेणेकरुन ते आम्हांला मदत करतील २४ तास पाण्याच्या योजनेचे अजुनही काही निर्णय झालेला नाही. म्हणजे असे किती तरी प्रश्नांचा आपण बोजा उडालेला आहे. या शहरातील पाण्याचा,कच-याचा प्रश्न असेल ,आता आलेल्या नैसर्गीक आपत्तीचा प्रश्न असेल यावर सत्ताधा-यांनी प्रशासनावर वचक ठेवलेला नाही आणि नियोजन तर शुन्यच आहे हे मला याठिकाणी खेदाने सांगावे वाटते की, सत्ताधारी निष्काम झालेले आहेत तरी मा. आयुक्त साहेब या शहराच्या खरंच तुमच्याकडनं अपेक्षा आहेत की, यावर काही तरी पर्याय काढावा आणि या ज्या ३/४ समस्या आहेत त्यावर एक मिटींग घ्यावी आणि आपल्याला जर का मनुष्यबळ कमी पडत असेल तर मनुष्यबळ घ्यावं एवढीच मी आपल्याला विनंती करते आणि थांबते धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच वैशालीताई म्हणाल्या की,सत्ताधारी निष्काम आहेत ३ वर्ष झाली सत्ता आलेली आहे. आणि मलाही ३ वर्ष झाली निवडुन आलेलो आहे. आणि आयुक्तांना पण ३ वर्ष झालेली आहेत. मग नेमकं सत्ताधारी अपयशी ठरले का आयुक्त साहेब अपयशी ठरले. दुसरी गोष्ट मा.आयुक्त साहेब मी आपल्याला आपत्ती व्यवस्थापनसाठी पुर्वी १४ मे रोजी पत्र दिलेलं आहे. आपण जेई डेप्युटी इंजि. यांना आपण नागरीकांना धान्य वगैरे पुरविण्याचे आणि इतर काम लावलं आहे मी आपल्याला कल्पना दिलेली होती की,

शिक्षक वर्ग जर शाळेमध्ये काम करीत नसेल तर त्यांना हे काम लावावे त्यानंतर आपण आपत्ती व्यवस्थापनाचे काम २० दिवसापुर्वीच करायला पाहिजे होतं आज सगळीकडे स्ट्रॉम वॉटर तुंबलेले आहेत कालच्या पावसामध्ये कैलासनगरमधील सगळया नागरीकांच्या घरामध्ये पाणी घुसलं आहे. पुढे गेल्यानंतर एक नाला येतो त्या नाल्याचं पाणी सगळया झोपडपट्टीत घुसलं आज ती लोकं गरीब आहेत स्ट्रॉम वॉटर लाईन क्लीअर नसल्यामुळे पाणी तुंबलं त्यानंतर आम्ही कसं तरी करुन ते क्लीअर केलं सुषमा सोसायटीमध्ये सुध्दा पाणी घुसलं अनेक ठिकाणी झाडं पडली आहेत अग्निशामकची गाडी आली त्यांनी सांगितलं की, झाड जिवंत आहे त्यामुळे ते पुर्ण झाड काढलं नाही ते म्हणले आम्हांला हे झाड काढण्याची परमिशन नाही. त्यानंतर उदयान विभागाचे लोक थेरगांवमधुन आली आणि त्यांच्याकडनं झाड काढून घेतलं. मा.आयुक्त साहेब, कुठलंही काम करताना नियोजन पाहिजे. आता मंगलाताईंनी सांगितलं की, बाबरताईंच्या लाईनमधली झाडं काढलेली नाहीत मा.आयुक्त साहेब, निसर्ग वादळ येणार आहे हे सर्वांना माहित होतं आता परवाच्या दिवशी तुमचं अभिनंदन करण्यासाठी या सभागृहाने ३ तास घालवले आहे. आणि बाकीचे विषय घाई गडबडीत मंजुर केले. आपत्ती व्यवस्थापनावर ३ तास अथवा ६ तास चर्चा झाली तरी चालेल असे नियोजन करावे आणि ते नियोजन मार्गी लागलं पाहिजे. आज तुम्ही काम करण्याचा प्रयत्न करीत आहात परंतु तुमच्या हाताखालचे अधिकारी काम करीत नसतील तर त्यामुळे पक्षाची बदनामी होत आहे. कालच्या निसर्ग वादळाची दिशा बदलली नाही तर ते मुंबई मध्ये घुसलं असतं तर काय झाल असतं आणि मग असं म्हणायचं का देव पाठीशी आहे. ठिक वादळ येथून पुढं गेलं आहे पावसाळा येथून १०/१५ दिवस लेट होणार आहे हवामानाचे अंदाज ९० टक्के चुकतंय १० टक्केच बरोबर असतात यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाची मिटींग लावा त्यामध्ये तुमच्या कर्मचा-यांना स्थापत्य, ड्रेनेज, आणि उदयान,पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचा-यांशी समन्व्य साधुन कुठल्या प्रभागात अत्यावश्यक कामे कोणकोणती आहेत ती करणेत यावी. आणि ही मिटींग आज,उद्याच लावून घ्या आणि हा विषय मार्गी लावणेत यावा. जेणेकरुन सगळे प्रश्न सुटतील आमच्या प्रभागामध्ये अनेक झोपडपट्टया आहेत आणि प्रत्येक झोपडपट्टीमध्ये पिंगळाची झाडे वाढलेली आहेत हे दुस-याच्या जीवावर वाढतं मा.आयुक्त साहेब, तुम्ही या गोष्टी उदयान विभागाकडनं क्लीअर करुन घ्या. एवढं बोलून थांबतो. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं तर एक चांगला विषय या सभागृहासमोर घेतलेला आहे. संपुर्ण देशभरामध्ये गेल्या २/३ दिवस आगोदर हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिला होता परंतु आपली आपतकालीन व्यवस्था ही कुचकामी ठरली असे सदस्यांनी सांगितले आहे. मा.आयुक्त साहेब, प्रत्येक वर्षी उन्हाळा,पावसाळा आणि हिवाळा हे ऋतू येत असतात जात असतात वातावरणात काही बदल होत असतात.पण ज्यावेळेस आपण या शहराचे आयुक्त या नात्याने आपण या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आपतकालीन व्यवस्थापनाच्या संदर्भात भूमिका मांडण्याचं काम करावं. मला वाटतं हवामान खात्याने सांगितलं होत की, निसर्ग वादळ येणार आहे १३२ कि.मी.वेगाने येणार आहे हे सगळं सांगितलं असताना सुध्दा आपली आपतकालीन व्यवस्था त्याप्रमाणे सज्ज झालेली नाही. असे आपल्या सगळयाच नगरसेवकांचा समज झालेला आहे. माझ्या प्रभागामध्ये अनेक ठिकाणी पाणी घुसलेलं आहे. नाले सफाई,ड्रेनेज सफाईचे काम असेल ही कामे कुठल्या प्रभागामध्ये झालेली आहेत का सगळयात वाईट म्हणजे ज्या अमृत योजनेमध्ये ज्या लाईन खोदलेल्या आहेत, ड्रेनेज लाईन खोदलेल्या आहेत त्या तशाच आहेत त्यामुळे आपल्या या शहराची वाईट अवस्था झालेली आहे. संपुर्ण शहराची चाळण झालेली आहे. आपण मे महिन्यामध्ये कुठल्याही रस्त्याची खोदाईची कामे बंद करतो. कोणालाही खोदकाम करु देत नाही. दरवर्षी आपण आपतकालीन व्यवस्थापनाची कामे करतो त्यामध्ये ड्रेनेजलाईन चोकअप काढणे, नाला सफाईचे काम असेल, यापैकी आपण कोणती कामे काढलेली आहेत किती वर्षाचे टेंडर काढलेले आहे. किती नाल्याची साफसफाई केलेली आहे. किती ड्रेनेज लाईनचे चोकअप काढलेले आहे. प्रत्येक प्रभागामधील नागरीक सांगतो की, आमच्या घरामध्ये नाल्याचे पाणी आलेले आहे, कोणी म्हणतो ड्रेनेजलाईनचे पाणी आलेले आहे. आणि आज आपल्याकडे ७० टक्के कामाची कपात केलेली आहे. काय कामं करायची आहेत आणि काय कामं केलेली आहेत याचं नियोजन शुन्य असेल तर या कामाला आपण १०० टक्के अपयशी ठरलेले आहात असं मला वाटतं. साने चौक ते थरमॅक्स चौक यामध्ये १२ झाडं पडलेली आहेत ठिक आहे परंतु जे होणार आहे याचं नियोजन करणं हे काय आमच्या नगरसदस्यांच काम नाही नां या सगळयाची जबाबदारी प्रशासनाची आहे. आयुक्त साहेब,तुम्ही अधिका-यांना जे आदेश देता त्या आदेशाला हे अधिकारी केराची टोपली दाखवतात आणि या प्रशासनाच्या भोंगळ कारभाराला तुम्ही जबाबदार आहात.ज्या ज्या ठिकाणी रस्ते

खोदलेले आहेत ती सुध्दा बुजविलेली नाहीत. प्रशासनाने चांगल्या पध्दतीने कामकाज करावे अशी विनंती करतो.आणि थांबतो.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह सुजाताताईंनी जो विषय सभागृहात मांडला त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. मा.आयुक्त साहेब, आपण आपतकालीन परिस्थितीवर काय उपाययोजना करायला पाहिजे होत्या. याच स्पष्टीकरण खरं तर सर्वप्रथम तुम्ही द्यायला पाहिजे होतं. त्यानंतर नगरसेवकांनी त्यावर चर्चा करायला पाहिजे होती. याठिकाणी प्रत्येक नगरसेवक आपआपल्या वॉर्डातील समस्या सांगत आहेत त्यामध्ये पाणी,ड्रेनेज, उदयान प्रत्येक प्रभागातील नगरसेवक हा ज्यु.अभियंता यांना घेऊन ड्रेनेज लाईन कुठे चोकअप आहे,कुठे पाण्याची समस्या आहे हे बघुन त्या त्या परिसरातील कामे होत असतात आज पक्षाच्या बाजुने ज्यावेळेस योजना आखल्या जातात आमच्या पक्षाच्या वतीने अमृत योजने अंतर्गत काही ठिकाणी कामे झालेली आहेत प्रत्येक नगरसेवक कसे फॉलोप घेतात,अधिकारी कसे घेतात. आमच्या इथं धनगरबाबा मंदीराजवळील जो परिसर होता त्या परिसरामध्ये पावसाळयात खुप पाणी साचायचे त्याठिकाणी मा.आयुक्त साहेबांची व्हीजीट झाली त्यानंतर त्याठिकाणच्या स्टॉर्म वॉटर बदलल्या आहेत आता त्याठिकाणा पाणी साचत नाही. प्रभागातील ज्या समस्या आहेत त्या त्या प्रभागामध्ये मिटवाव्यात आणि त्याठिकाणी सॉलव्ह होत नसतील तर मग आपण मा.आयुक्त साहेबांशी, शासनाशी,पक्षनेत्याशी बोलून हे प्रश्न तिथल्या तिथं सोडवले पाहिजे. आपतकालीन परिस्थिती ही येणार आहे हे माहिती नव्हती पण आली आयुक्त साहेबांनी ज्या पध्दतीने मागच्या वर्षी शासनाच्या गाईडलाईननुसार आपण कोरोनाच्या काळामध्ये जी कामे केलेली आहेत ती आपतकालीन परिस्थितीनुसार यासंदर्भात आपण पहिलं स्पष्टीकरण द्यावे आणि येथून पुढे काय उपाययोजना करणार आहे आणि काय करु शकतो. तुमचे विचार ऐकल्यानंतर ते जर आम्हांला पटले तर आम्ही हा म्हणु नाही तर आमच्यापैकी काही नगरसेवक इथल्या इथं चर्चा करतील. काही नगरसेवकांनी बरोबर बोलले आहेत की, आयुक्त साहेबांच्या अभिनंदनावर ३/४ तास चर्चा झालेली होती आणि आपतकालीन परिस्थितीवर काहीच चर्चा झालेली नाही. त्यामुळे या विषयांवर चर्चा झाली पाहिजे. एका प्रभागामधील चार नगरसेवक धरले तर ३२ प्रभाग आहेत त्या प्रभागातील नांवे सांगायला काय जास्त वेळ लागणार नाही.आपतकालीन परिस्थितीमध्ये जर काही

समस्या निर्माण झाली तर या अधिकारी/कर्मचा-यांशी संपर्क साधावा ते लगेच हजर राहतील त्यांच्या समस्यांच निवारण होईल.त्याठिकाणी तातडीने काही जेसीबी वगैरे लागले असते तर आम्ही ते उपलब्ध करुन दिले असते. परंतु आपल्याकडे त्याठिकाणी यायला माणसे सुध्दा नाहीत म्हणुन माझं म्हणणं आहे की, पहिल्यांदा प्रशासनाकडुन स्पष्टीकरण यावं की, आपतकालीन परिस्थितीमध्ये त्यांनी आतापर्यंत काय उपाययोजना केलेल्या आहेत आणि येथून पुढे काय करणार आहेत आणि त्यानंतर पक्षनेते असतील,गटनेते असतील ते ठरवतील त्यामुळे ते सगळयांसाठी फायदेशिर ठरू शकते. असं मला वाटतं धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह ख-या अर्थांनी काल जे निसर्ग चक्री वादळ होतं याची निश्चितपणे सगळयांना कल्पना होती. काही कारणास्तव पुणे-मुंबई, नाशिक  हायवेवर देखील मोठया प्रमाणावर झाडं पडलेली आपल्याला दिसली आहेत. आपल्या शहराची अशी अवस्था झालेली होती की, काही रस्ते बंद करुन डायव्हर्ट केलेली होती. त्यानंतर पाणीपुरवठा,ड्रेनेजलाईन यावर एक ना अनेक विषयावर चर्चा होत आहेत. खरंतर आपतकालीन परिस्थिती या विषयावर चर्चा केली पण त्यावर काय अंमलबजावणी केली हे निश्चितपणे सांगितले पाहिजे की, आपण हे,हे ठरवलं आहे आणि त्याप्रमाणे काम करणार आहे. कालचं वादळ इतकं जोरात होतं की, त्यामुळे अनेक समस्यांना सामोरं जावं लागल आणि महानगरपालिकेला आमच्या वॉर्डामध्ये चांगल्या प्रकारे काम करता आलं नाही याचं कारण खुप मोठया प्रमाणावर आलेलं चक्री वादळ होतं. अस मला वाटतयं खरं तर अभिषेकच मला कौतुक करावंस वाटतयं की, तो नवीन नगरसेवक असताना सुध्दा त्यांनी आपतकालीन परिस्थितीमध्ये काय करायला हवं होतं जर त्याल कळतंय तर या पवित्र सभागृहाचे भाऊसाहेब भोईर हे या जेष्ठ नगरसेवक आहेत ते ज्या ज्यावेळेस बोलतात त्या त्यावेळेस ते बॅलंन्स बोलतात. नगरसेवक म्हणुन आपण काय कामे केली पाहिजेत. सभागृह हे मंदिर आहे आणि याठिकाणी चर्चा झाली पाहिजे,चर्चेला वाव दिल्यानंतर टिका व्हायला सुरुवात झाली की, निश्चितपणे वादाला सुरुवात होते. या शहरामध्ये सत्ताधारी म्हणुन आयुक्त साहेब, आम्ही कोणत्या गोष्टीत कमी पडलो आहे. ज्या ज्यावेळेला  तुम्हांला हे फळ पाहिजे म्हणुन सांगता त्यावेळेला आम्ही सत्तारुढ पक्षाचे नगरसेवक आणि तत्सम कमिटी मधुन तुम्हांला ते फळ उपलब्ध करुन तुम्हांला तो विषय मंजुर करुन तुमचा

मार्ग मोकळा करुन देणं इतकीच आमची निश्चितपणे जबाबदारी आहे. आणि आम्ही आमची जबाबदारी त्या त्यावेळेला पार पाडतो आणि म्हणुनच प्रशासन आणि महापौर म्हणुन रथाची जी दोन चाके आहेत ती सुरळीत चालण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत असतो. कोणी तरी सहज बोलून गेलं की, पाणी दिलं नाही म्हणुन तुम्ही फेल आहात. अहो तुम्ही पाण्याचे व्यवस्थित नियोजन केलं असतं, कामं जर व्यवस्थित केली असती तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती.आणि तुम्हांला घरचा रस्ता दाखवला नसता स्काडा सिस्टीम हि फेल गेली हे आमचं पाप नाही. हे कोणाचं पाप आहे हे सर्वांना माहिती आहे. मला कोणावरही टिका करायची नाही. त्यामुळे आहे त्या परिस्थितीवर मात करणं,आणि त्यातुन मार्ग काढणं  आणि आपल्याला ज्या ज्या प्रभागातून नागरीकांनी विश्वासानी पाठवलं आहे त्यांना सुविधा देणं एवढीच मला वाटते आपल्या सर्वांची गरज आणि कर्तव्य आहे असे मला वाटते. आपल्या धरणांत पाणी साठा किती आहे आणि पाणी देणं शक्य असेल तर आमचे महापौर आणि पक्षनेते असतील तर ते पाणी देण्यास नकार देणार नाहीत. परंतु रोज पाणी देण्यापेक्षा तुम्हीच सांगायचं की, आपला जो पाणीपुरवठा विस्कळीत होत होता तो सुरळीत करण्यामध्ये आपली मदत झाली होती. मागच्या तीन वर्षामध्ये आपण ड्रेनेजलाईनवरती किती खर्च केला आणि किती चांगल्या प्रकारच्या लाईन टाकण्यात आल्या काम करुन घेण्याची कुवत जर का आमच्यामध्ये असेल तर  निश्चितपणे आम्ही चांगल्या प्रकारची कामे केल्याशिवाय रहात नाही. मा.महापौर साहेब, आज काही अधिका-यांचे  फोनच लागत नाहीत. मी आज सकाळी १०.१४ मिनिटापासून फोन करतेय फोन कंन्टीन्यु एंगेज  लागत होते. मा.आयुक्त  साहेब या अधिका-यांवर तुमचा वचक असणे गरजेचे आहे. खरंतर आमच्या ह प्रभागामध्ये मी ५.३० वा गेल्यानंतर तिथं कोणीही नव्हतं असं होता कामा नये. प्रशासन म्हणुन तुमचा त्याठिकाणी वचक असणं गरजेचं आहे. आम्ही सर्व नगरसेवक तुमच्या बरोबर असतो तर येथून पुढच्या काळामध्ये अशी आपत्ती येणार नाही आणि आलेल्या आपत्तीला चांगल्या प्रकारे तोंड देण्यासाठी आपण कायम सक्षम असलं पाहिजे. इथचं थांबते जयहिंद,जय महाराष्ट्र.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  कालच्या चक्रीवादळामुळे सगळयांच्याच वॉर्डामध्ये प्रश्न उद्भवलेला आहे. चक्रीवादळ येणार आहे म्हणुन आपल्या सगळयांना माहिती होतं परंतु आपल्या प्रशासनाचा याठिकाणी

हलगर्जीपणा झालेला आहे कारण आपण तेवढे सक्षम रहायला पाहिजे होतं अचानक कुठं काय घडल आणि त्यासाठी आपले कर्मचारी असतील त्यांच त्याठिकाणी लक्ष पाहिजे होतं काही ठिकाणी रस्तेच बंद झालेले आहेत रस्त्यांमध्ये झाडं पडल्यामुळे लोकांना जाण-येणं मुश्किल झालं माझ्या प्रभागामध्ये सुध्दा झाडं पडल्यामुळे संपुर्ण रस्ता बंद झालेला होता आपल्याकडे जरी कर्मचारी कमी असले तरी मला एवढंच सांगायचे आहे की, आपल्या अधिका-यांनी फोन उचलला पाहिजे. आणि त्यांनी सांगितलं पाहिजे की, आमच्याकडे माणसं कमी आहेत आणि आम्ही उद्या येऊ असं काही तरी उत्तर दिले पाहिजे होते. परंतु काही जणांचे फोनच लागत नव्हते. त्यानंतर आमच्या कार्यकर्त्यांनी झाडांच्या फांदया कापून घेतल्या आणि झाडं बाजु केली आणि रस्ता मोकळा करुन घेतला आमच्या भागातील आणखी काही झाडं उचलली नाहीत. आमची स्वत:ची दोन आंब्याची झाडं पडलेली आहेत आणि ते आम्ही काढुन घेणार आहोत आम्ही वैयक्तीक कामे सांगत नाहीत परंतु ज्याठिकाणी रस्त्यावर पडलेल्या झाडांमुळे नागरीकांना अडचण होते आपल्याला त्या त्या भागामध्ये काम करायला पाहिजे. आता पावसाचे दिवस आहेत नाल्यामुळे लोकांच्या घरामध्ये पाणी जाणार आहे. प्रत्येक वर्षी आपल्याला ही कामे करावीच लागतात हे माहिती आहे. ड्रेनेजलाईन चोक झालं की, लोकांच्या घरामध्ये पाणी जाते. परंतु जेवढी आवश्यक कामे प्रभागामध्ये करणे आवश्यक आहेत तेवढी कामे झालेली नाहीत कोरोनाच्या महामारीमुळे आपल्या शहरातील मजुर त्यांच्या गावी गेलेली आहेत आपली कामे जवळ जवळ ३ महिने झाले ठप्प झालेली आहेत. डांबरीकरणाचे कामे थांबलेलीआहेत काही ठिकाणी रस्ते खचलेले आहेत आपण बिर्ला हॉस्पिटलच्या इथं पाण्याची नवीन लाईन टाकलेली आहे त्याठिकाणचा पूर्ण रस्ता खचलेला आहे. ही कामे आपल्याला पावसाळयापुर्वी करुन घ्यावी लागतील. आणि ती चांगल्या पध्दतीने करावीत एवढंच मी सांगु इच्छिते आणि थांबते.

**मा. शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आताच मंगलाताईंनी सांगितलं की, माझ्या प्रभागातील झाडं उचलली नाहीत काल मी संतोष पाटील साहेबांना फोन केल्यानंतर त्यांनी आम्हांला खुप मदत केलेली आहे. गावडे साहेबांनी अग्निशामक विभागाची गाडी पाठवली होती. रात्री १२ ते १२.३० पर्यंत कामकाज करीत होतो. आणि आज सुध्दा ते काम चालूच आहे. आणि माझ्या येथील

झाड पडायलाच आलेलं आहे मी गायकवाडांना सकाळपासून फोन करते परंतु ते फोन उचलत नाहीत. आणि कामही करीत नाहीत आणि दुसरं फांदया छाटणीचं काम सुध्दा करीत नाहीत आज/उद्या करु म्हणुन सांगत असतात माझ्या प्रभागात एक नारळाचं झाडं अर्धे भिंतीवर पडलेलं आहे. त्यासाठी मी फोन करीत होते ते जर झाडं पडलं तर पूर्ण रस्ताच तिथं ब्लॉक होऊन जाईल. त्यामुळं मी सकाळपासून त्यांना फोन करीत आहे. आयुक्त साहेबांनी त्यांना मनुष्यबळ कमी असेल तर त्यांना मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावं गायकवाड साहेबांनी फोन न उचलण्याचं कारण प्रत्येक नगरसेवकांनी सांगितलेलं आहे. त्यांनी फोन न उचलण्याचं कारण सांगावं एवढं मी सांगते.धन्यवाद.

**मा.संतोष लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह कालच्या चक्रीवादळाच्या अनुषंगाने याठिकाणी आपतकालीन परिस्थिती निर्माण होत असताना त्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आलेल्या होत्या. त्याला कुठली सक्षम समिती दोषी नाही. ड्रेनेज,पाणीपुरवठा,आरोग्य विभागाला आपण मदत कार्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावं कारण की, आजची वस्तुस्थिती पाहता पावसाळा चालू झालेला आहे आणि परवा आपल्यावर संकट येऊन गेलंल आहे त्या अनुषंगाने शहरातील जी महत्वाचे रस्ते आहेत त्यामध्ये मुख्यता टेल्को रोड कालच्या स्थायी समितीमध्ये मी आपल्याला सूचना दिलेल्या होत्या की, निसर्ग वादळाची दक्षता घेऊन आपण कामाला लागावे. आपण चांगल्या पध्दतीने काम करता परंतु आपतकालीन परिस्थितीमध्ये आपण मॅन पॉवर वाढविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपण सर्व अधिकारी वर्ग यांनी त्याठिकाणी सहकार्य करणे गरजेचं आहे. हवामान खात्याने अंदाज दिलेला आहे की,यावर्षी १०२ टक्के होणार आहे. त्या अनुषंगानेआपण एक कार्यतत्परता दाखवून आपल्या सर्व विभागाला सूचना देण्यात याव्यात. आणि आयुक्त साहेब, आपल्याला विनंतीआहे की, याठिकाणी धरणामध्ये पाणी साठा भरपूर आहे. आमच्या काही नगरसेवकांनी सांगितलं आहे की, आपल्याला रेग्युलर पाणी देता येईल का कारण पावसाळयामध्ये वारंवार लाईट जाते त्यासाठी आपण एमएसईबीच्या संपर्कात राहून जबाबदारीने काम करायला हवं कारण आपण दिवसाआड पाणी देतो त्यामुळं सोसायटयामध्ये पाण्याची खुप मोठी अडचण होते. एखादया दिवशी लाईट गेली तर त्यांना ३/४ दिवस पाणी मिळत नाही. तर अशा गोष्टीस अनुसरुन आपण त्यांच्या अडीअडचणी मध्ये आपल्याला त्यांना मदत करायला पाहिजे. त्याच बरोबर

भोसरीमधील आदिनाथनगर मधील नाल्याचे जे काम करतात त्याठिकाणी परत कचरा साठलेला आहे आणि पाठीमागे पाण्याचा फुगवटा झाल्यामुळे कालच्या पावसामुळं नागरीकांच्या घरांमध्ये पाणी गेलं आहे. आणि त्याठिकाणच्या महात्मा फुले शाळेमध्ये आम्ही त्या ५० ते ६० कुटूंबाना रात्रीच्या निवा-यासाठी त्यांना जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. तर ते काम तातडीने व्हायला पाहिजे. शहरातील जे अतिमहत्वाचे रस्ते आहेत त्यासाठी कर्मचा-यांची नेमणुक करावी. आणि रस्त्यामध्ये जी झाडं पडतील त्या झाडांच पुर्नरोपण होण्यासाठी आपण तशा त्यांना सूचना देण्यात याव्यात.आणि सालाबाद प्रमाणे याही वर्षी वृषारोपण करणेत यावे अशा सूचना देण्यात याव्यात अशी विनंती करतो जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह काल जे चक्रीवादळ झालं त्यामध्ये कोणाच्या वॉर्डात झाडं पडली, कोणाच्या वॉर्डात काय,काय झालं हे सन्मा.सदस्यांनी सांगितलेलं आहे त्यामुळे मी परत त्या विषयावर जास्त बोलणार नाही. मा.आयुक्त साहेब, झाडांच्या फांदया तोडण्यासाठी वृक्षप्राधिकरण समितीला अर्ज दिल्यानंतर सुध्दा त्याला ५/५ महिने लागतात आणि त्याची अंमलबजावणी वेळेवर होत नाही. आणि ते झाड तोडण्यासाठी परमीशन मिळत नाही. आता काल जे वादळ झालं त्याच्यामध्ये माझ्या वॉर्डातील एक बकरी मेली, ३ गाडयांच नुकसान झालं याला जबाबदार कोण ज्यावेळेस धोकादायक झाडं तोडण्यास परमीशनची आवश्यकता आहे आणि विदाऊट परमीशन झाड तोडलं तर गुन्हे दाखल करता. धोकादायक झाड तोडण्यासाठी अर्ज देवुन सुध्दा ते तोडले नसेल आणि त्या झाडामुळे जे नुकसान झालेले आहे त्याला जबाबदार कोण मा.आयुक्त साहेब., एक झाड असे आहे त्याचं नांव मी तुम्हांला सांगणार नाही पण हे तुम्हालाही माहिती आहे त्या झाडाला लिंबुही येतात,आंबेही येतात असे तीन प्रकारचे झाड आहे. ते झाड कितीही तोडलं तरी ते वाढतचं राहत म्हणुन ते झाड वाढूच देणार आहात का त्या झाडावर काही तरी नियोजन करुन ते झाड वाढणार नाही यासाठी आपण काही तरी हलचाल केली पाहिजे. या झाडामुळे माझ्या वॉर्डामध्ये एक बकरी मेली नसती. आता पावसाळयाचे दिवस आलेले आहेत यापुर्वी पावसाळयामध्ये पुर येऊन किती तरी नागरीकांचे हाल झालेले आहेत ही वेळ येऊ नये यासाठी माझ्या सर्व सहका-यांनी तुम्हांला मार्गदर्शन करुन सांगितलेलं आहे आणि मी ही विनंती करते की, तशी पुन्हा वेळ येऊ नये आणि

वॉर्डामध्ये  रस्त्यावर जी झाडं पडलेली आहेत ती काढून रस्ता मोकळा करावा आमच्या सारख्या नगरसेवकांनी आणि कार्यकर्त्यांनी येऊन ती झाडं काढलेली आहेत. त्यांच्यावर गुन्हे दाखल झालेली आहेत अशी पत्रं यायला नको आहे. तसेच प्रभागामध्ये पाण्याचा प्रॉब्लेम झालेला आहे या कोरोनाच्या परिस्थितीमध्ये आपण नागरीकांना आवाहन करतो की, साबणाने हात धुवावेत परंतु नागरीकांना पाणीच मिळत नाही तर हात कशाने धुवायचे ४/४ दिवस पाणी येत नाही  सुदर्शननगर भाग असा आहे की, त्याठिकाणी पाईपाच्या पाण्याशिवाय पर्याय नाही. एक दिवसाआड पाणी १ ते दिड तास येते आणि हे एक दिवस पाणी नाही आले तर त्या लोकांनी काय करायचं माझ्या सहका-यांनी सांगितले आहे की, या सर्वांला सत्ताधारी पक्ष जबाबदार आहे. माझी मा.आयुक्तांना विनंती आहे की, जे काही करतंय ते प्रशासन करीत आहे आणि संबंधित अधिका-यांकडुन याची माहिती घेणेत यावी. आणि त्याप्रमाणे नियोजन करावं.

**मा.स्वाती काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  आता निसर्ग वादळामुळे झाडे पडलेली आहेत त्यावर खुप चर्चा झालेली आहे. पण माझ्या वॉर्डात असं झालेलं आहे की, काल मी उदयान विभागाच्या संपर्कात ९.०० वाजल्यापासून होते. खोत साहेबांना माझे किमान १०० फोन झालेले असतील माझा प्रभाग झोपडपट्टीचा असल्यामुळे शिवशक्तीच्या ठिकाणी  दोन झाडं पडलेली होती.  आणि त्याला संपुर्ण वायरींगने वेटोळं घातलेलं होतं. त्याठिकाणी लोकं खुप घाबरत होती. मी त्यांना सांगितलं की, पहिलं लाईट बंद करा लाईट बंद केल्यानंतर एक अर्ध्या तासाचं काम होतं. पण ते काम करायला रात्री १० ते १०.३० वाजले. त्यांना फोन केल्यानंतर ते म्हणले आमच्याकडे लोक नाहीत मी त्यांना म्हणलं की, तुमचा फक्त एक माणुस द्या त्यांच्याबरोबर राहून आमची माणसं करुन घेतील. आम्हांला एक माणुस सुध्दा मिळाला नाही. त्यामुळे त्या झाडाच्या फांदया तुटून त्या वायरीवर पडलेल्या होत्या त्यामुळे लाईट आणि लाईट बंद पडल्यामुळे पाणी बंद झालं तसेच आंबेडकर पुतळयासमोर अजुन झाडं पडलेली आहेत ते पण उचललं गेलं नाही कालच्या पावसामुळे संपुर्ण झोपडपट्टीमध्ये पाणी शिरलं होतं आणि ओपन गटर आणि स्ट्रॉम वॉटरची लाईन यामधुन येणारं घाण  पाणी सगळयांच्या घरामध्ये शिरलं होतं. मी आपल्या अधिका-यांना सांगितलं की, तुम्ही लोक वाढवा पण लोक काय वाढवू शकले नाहीत दोन माणसं किती काम करणार तिथं एक बाई आली आणि म्हणाली मी आता

प्रभागात जाऊन गोंधळ घालते  मी त्या बाईला  समजुन सांगितलं ती गाडी आली पण याठिकाणी मनुष्यबळच कमी असल्यामुळे १०० ते १५० तक्रारी कशा सुटणार मी आयुक्तसाहेबांना पत्र दिलं होतं की, चेंबर/गटर हे दुरुस्त करुन घ्या आयुक्त साहेबांकडे मी गेल्यानंतर ते संबंधित अधिका-यांना ताबडतोब फोन करुन काम करुन घेण्यास सांगतात त्यावेळेस ते ऐकतात आणि आम्ही अधिका-यांना फोन केला की,आमचं कोणच ऐकत नाही. माझा प्रभाग हा झोपडपट्टीतील असल्यामुळे एका झोपडीत अक्षरशा ५/६ माणसं असतात त्याच्या घरात पाणी शिरल्यामुळे ते पायावर उभे असतात  त्यासाठी मी आपल्याला वारंवार फोन करीत असते  पण काम काहीच होत नाहीत. आयुक्त साहेब, आणि मा.महापौर साहेब  आपण आणखी थोडं लक्ष दिलं तर बरं होईल. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह  काल जे चक्रीवादळ आलं त्यामुळे झाडं पडली,लाईट बंद  पडली आणि त्यामुळे पाण्याचा प्रॉब्लेम सगळीकडे निर्माण झालेला आहे. प्रत्येक नगरसेवकांनी पाणीपुरवठा,उदयान, ड्रेनेजलाईन,विदयुत विभागाच्या अधिका-यांना फोन केले परंतु महापालिकेची आणि एमएसईबीची यंत्रणा  कमी पडल्यामुळे कालची घटना घडलेली आहे. आणि येथून पुढे असाच प्रश्न निर्माण होणार आहे. मला परवाच्या जनरल बॉडीच्या संदर्भात  काही सूचना करावयाच्या आहेत परवा जनरल बॉडी सुरु होण्याच्या आधी मला पक्षनेत्यांनी फोन केला की, आम्ही कमिशनर साहेबांकडे बसलो आहे आणि तुम्ही या आणि मग मी आणि भाऊसाहेब भोईर आयुक्त साहेबांकडे गेलो त्यांनी सांगितले की, कोरोनामुळे तुम्ही सोशल डिस्टंगशिंग फॉलो करा म्हणजे सभागृह आपल्याला व्यवस्थित चालवता येईल. आणि कमीत कमी लोक सभागृहात कसे उपस्थित रहाता येईल ते बघा पक्षनेत्यांनी तशा सूचना केल्या आणि आम्ही ते मान्य केलं. परंतु आम्ही विनंती केली की, आम्ही सभागृहात आल्यानंतर प्रत्येक विषयावर आम्हांला बोलू द्या बजेटच्या विषयावर आम्हांला बोलायचे होते मी पक्षनेत्यांना सुध्दा सांगितल होतं की, यावर्षी तरी आम्हांला बजेटवर बोलू देणार का तर त्यांनी सांगितलं की, यावर्षी बजेटवर बोला. भाजपची सत्ता आल्यापासून कुठल्याही बजेटवर चर्चा झालेली नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही या सभागृहात माझ्या आगोदर पासून आहात असं कधी झालेलं आहे का बजेटवर चर्चा न करता बजेट मंजुर झालेलं आहे २/३ दिवस बजेटवर चर्चा होत होती

प्रत्येक सभासद बजेटवर बोलायचा आणि त्यानंतर तो प्रशासनाला सुचना करायचा आणि प्रशासन त्यांना योग्य वाटलं असे आंतरभाव करायचं तुम्ही ३/४ वर्षापासून एकही बजेटवर चर्चा करु दिली नाही. हे काय चांगल लक्षण नाही महापौर साहेब, तुमची सत्ता आहे म्हणुन तुमच्या मेजॉरिटीवर सगळे विषय पास करुन घेत आहात परंतु तुम्ही आम्हांला बोलूच देत नाही तर आम्ही या सभागृहात कशासाठी यायचं मी नानांना विचारलं की, तुम्ही सत्तारुढ पक्षनेत्यांना विचारलं का मागच्या जनरल बॉडीमध्ये बजेटवर चर्चा का करु दिली नाही आणि हे जर असंच चालणार असेल तर आम्ही जनरल बॉडीमध्ये येणारचं नाही लोकशाही पध्दतीने जर जनरल बॉडी चालवली तर सगळे लोक येण्यास तयार आहेत आम्ही विरोधाला विरोध कधीच केलेला नाही. सभागृहामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका ही विरोधाला विरोध ही कधीच नव्हती. सत्ता तुम्हांला मिळाली म्हणुन तुम्ही सत्तेत आलेले आहात पण आपण या शहराच्या विकासासाठी एकमेकाला सहकार्य करुन शहराचा विकास केला पाहिजे. मागच्या जीबीमध्ये आम्ही कोरोनावर मात केली म्हणुन प्रशासनाचं कौतुक केलं होतं परंतु दुसरी बाजु आहे ती म्हणजे कालच्या निसर्ग वादळाच्या बाबतीत प्रशासन १०० टक्के कमी पडलेलं आहे आणि आयुक्त साहेब तुम्हांला सुध्दा काही वेळेला योग्य भूमिका घेणं गरजेचं आहे. यापुर्वीचे जे आयुक्त म्हणुन येऊन गेले ते या सभागृहामध्ये मध्यस्थी करायचे आणि मा.महापौर यांना विषय समजुन सांगायचे मागच्या जीबीमध्ये धन्वंतरीचा विषय होता त्यावर आम्हाला बोलायचं होतं आमचा त्यामध्ये वैयक्तीक स्वार्थ काहीच नव्हता आमची भूमिका हीच होती की, धन्वंतरी योजना ही योग्य आहे. सर्व कामगारांच्या हिताची आहे कोरोनामुळे आपण यावर्षी वैदयकीय विभागावर सर्वात जास्त खर्च केलेला आहे. कामगारांसाठी धन्वंतरी योजना आपण आणली होती. त्याची भूमिका हीच होती की, आज आपल्या इथं राहणा-या कामगाराला मोठा आजार झाला तर आपण त्यांना मदत करतो. महापौर साहेब, पिंपरी चिंचवड शहरामध्ये असे अनेक नागरीक आहेत की, ज्यांना कॅन्सर झाला,ब्रेन टयुमर झाला असेल तर त्याला पैशा अभावी त्यांच्यावर उपचार होत नाहीत असे अनेक कुटूंब या सभागृहात तुम्हाला पहायला मिळतील. आणि मग अशा ठिकाणी जी प्रामाणिकपणे काम करणारी लोक आहेत त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कुटूंबियासाठी ही योजना काढलेली आहे. आणि तुम्ही म्हणायला पाहिजे होतं की, तुमचं म्हणणं चुकीचं आहे धन्वंतरीमध्ये जास्त पैसे जातात आणि विमा योजनेमध्ये कमी पैसे जातात प्रशासनाने सुध्दा त्यांनी त्यांची

भूमिका मांडलेली नाही. तरीही तसाच विषय रेटून नेऊन मंजुर करुन घेतात ही पध्दत बदला आता कसं या विषयावर सगळयांना  बोलायला संधी दिली परवा सुध्दा विषयावर आम्हांला बोलू दिलं नाही पण दुस-याच विषयावर ३ तास झालं चर्चा झालेली होती. जे मुळ विषय आहेत त्यावर बोलायला संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक नगरसेवक हा या शहरातील नागरीकांचे जे काही प्रश्न आहेत त्यावर चर्चा करीत असतो. मा.महापौर साहेब, आपण या शहराचे प्रथम नागरीक असुन कोणत्या एका पक्षाचे नाहीत तेंव्हा माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, येथून पुढे आपण लोकशाही पध्दतीने सभागृह चालवावे ज्यावेळेस आमचा  विरोध असेल त्यावेळेस विरोध नोंदवुन घ्या ज्यावेळेस आम्ही चार जण  मतदान घेण्याची विनंती करतो त्यावेळेस आपण मतदान घ्यायला पाहिजे. मतदान घेतल्यामुळे काय फरक पडतो. याठिकाणी योगेश बहल,मंगलाताई कदम आहेत यांनी महापौर पद भूषविलेलं आहे त्यावेळेस अशी परिस्थिती नव्हती.  मा.महापौर साहेब,माझी आपल्याला नम्र विनंती आहे की, विरोधी पक्षनेते आणि ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, मंगलाताई कदम आपण सिनियर नगरसेवक आहात आणि सिमाताई तुम्हां सगळयांना कल्पना आहे की, पुर्वीच्या काळामध्ये या सभागृहामध्ये सिमाताई तुमच्या सारखी भाषणं कोणीच केलेली नाहीत. आणि तुम्ही स्पष्टपणे विरोधात भूमिका घ्यायचे विरोधात बोलायचं आहे परंतु तुम्हांला कोणी बोलण्यावाचुन कोणी अडवलं नाही. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी महापौर आर.एस.कुमार होते हे नेहमी विरोधी भूमिका मांडायचे, भाऊसाहेब भोईर काँग्रेसचे होते ते ही विरोधी भूमिका मांडायचे परंतु याठिकाणी असं कधीच घडलेलं नाही. तेंव्हा माझी आपल्याला विनंती आहे की,ज्यांना विषयावर चर्चा करायची आहे त्यांना चर्चा करु द्या. आणि मा.आयुक्त साहेब, तुम्हांला याठिकाणी येऊन ३ वर्ष झालेली आहे, तुमचं काम चांगलं आहे परंतु याबाबतीत आपण चुकलेले  आहात. सभागृहात जे चुकीचं कामकाज चालतं त्याला  बंद पाडण्याचं काम पण तुमचं आहे  आयुक्त साहेब, तुम्ही फक्त बघ्याची भूमिका घेता हे आम्हांला तुमच्याकडनं अपेक्षीत नाही. अनेक उदा.आम्हांला माहिती आहेत की, ब-याचदा कमिशनरांनी स्वत: हस्तक्षेप करुन सत्ताधा-यांना याठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि याठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणामध्ये हे सभागृह चाललं पाहिजे. आणि आपल्याला येत्या दिड वर्षानी आपल्याला निवडणुकीला सामोरे जायचं आहे. आणि महापौर साहेब, तुमच्या पक्षांनी लोकांना जे काही सांगितलं आणि ते लोकांना पटलं म्हणुन तुमच्या पक्षाची सत्ता

आलेलीआहे. आज आम्ही विरोधी पक्षाच्या भूमिकेमध्ये आहोत. आपण सगळे मिळुन एकत्र काम करण्याचा प्रयत्न करु नाही तर महापौर साहेब, तुम्ही आम्हांला स्पष्टपणे सांगा की, आम्ही आमच्या पध्दतीने सभागृह चालवणार आहे मग आम्ही पण आमच्या पध्दतीने वेगळा विचार करावा लागेल. या सभागृहात चुकीचं काही घडु नये हे जर अपेक्षीत असेल तर आपण लोकशाही पध्दतीनं सभागृह चालवावं अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपत्ती व्यवस्थापन कक्ष आहे की नाही हे मला माहित नाही. कारण पाठीमागच्या वर्षाचं मी आपल्याला सांगतो की, आमच्या बोपखेल गावात रामनगर या स्लम एरियामध्ये पुलाचं पाणी आलं होतं त्यानंतर आयुक्त साहेब जी मिटींग झालेली होती त्यानंतर पालिकेचे कर्मचारी कोणी दिसले नाहीत आणि जेंव्हा,जेंव्हा या आपत्तीचा विषय येतो त्यावेळेस आपले सन्मा.सदस्य त्यांचे कार्यकर्ते यांच्या जवळ हीच मंडळी काम करतात. आता कालचा एक विषय सांगतो आमच्या इथं गजानन महाराज नगर आहे तालेराच्या गोडावून संदर्भात दोन वर्षापुर्वी आम्ही चारही नगरसेवकांनी आपल्याला फोटो काढून अर्ज दिलेला होता की, ही प्रॉपर्टी जवळ जवळ ५० एकरामध्ये आहे आणि त्याच्यामध्ये इंडस्ट्रीयल शेड आहे आणि त्याच्यामध्ये नैसर्गीक नाला आहे आणि हे शेडचं बांधकाम अनधिकृत आहे म्हणुन आम्ही हे फोटोसह आपल्याला दिलं होतं आणि मी बांधकाम परवानगीच्या ब-याच अधिका-यांना बोललो की, तालेरा हा जरा मोठा माणुस आहे त्यामुळे थोडी गडबड होईल. आपली ही गर्व्हमेंटची संस्था आहे आणि एखादी आपल्यावर का करतो हा पहिला प्रश्न आहे. आणि कालच्या विषयाचा अर्थ तुम्हांला समजुन सांगतो त्या तालेरा प्रिमायसेसच्या मधुन गजानन महाराज नगर आहे यामधुन तीन नाले सोडून दिलेले आहेत परवा संध्याकाळी पाऊस चालू झाला आणि जवळ जवळ १०० घरामध्ये आणि बिल्डींगमध्ये जे मीटर आहेत त्या मीटर पर्यंत म्हणजेच जवळपास ३ ते ३.५ फुटापर्यंत पाणी होतं. त्यानंतर आपल्या अधिका-यांना कॉल केला तर ते जागेवरती आलेले नाहीत शेवटी आम्ही आणि आमचे कार्यकर्ते,स्थानिक लोक यांनी प्रथम लाईट बंद केली त्यानंतर चेंबर ओपन केले आणि तिथं स्ट्रॉम वॉटरची लाईन टाकायची म्हणुन गेली २ वर्षापासून सांगत आहे पण लाईन टाकलेली नाही. आणि जी छोटी,छोटी कुत्री होती ती पाण्यामधुन वाहून गेलेली आहे. स्ट्रॉम वॉटरची

लाईन जर आगोदर टाकली असती आणि त्या तालेराच्या विरुध्द जर कारवाई केली असती तर या १०० घरांमध्ये पाणी गेल नसतं आणि आता ब-याच लोकांनी सांगितलं आहे की, आपले आपत्ती व्यवस्थापनाचे लोक नसतात. आपल्या उदयान विभागाचे गायकवाड साहेब आहेत, यांना मी कालपासून १० वेळेस फोन केला असेल, आजही फोन केले तरी सुध्दा त्यांचे फोन वेटींगला येत आहेत.परंतु त्यांचा काही कॉलबॅक आलेला नाही. शेवटी काल आमचे जे जेई आहेत त्यांना फोन करण्यास सांगितलं त्यांनी फोन केल्यानंतर त्यांना सांगितले की, आमच्याकडे लोड जास्त आहे तुम्ही फायरब्रिगेडला फोन करा आणि गावडे साहेबांना फोन केला तर ते म्हणले की, आमच्याकडे जास्त लोक नाहीत तुम्ही त्यांना कॉल करा शेवटी मी फोन घेतलाआणि त्यांना सांगितलं की, माझ्या प्रभागातील कामं झाली पाहिजेत. शेवटी उदयानची माणसं आली नाही की, फायर ब्रिगेडची माणसं आली नाही आमच्याकडे जी ५ झाडं पडली होती ती आम्ही साईडला नेऊन टाकली आता प्रश्न असा आहे की, जी झाडं पडलीत ती तरी आपण उचलणार आहात की नाही हे सांगा मुळात हे जे अधिकारी काम करीत नाहीत त्यांच्यावर आपला वचक नाही या अधिका-यांना माहिती आहे की, हे काय करणार आहेत फक्त एक फोन करतील,सांगतील आणि सोडून देतील. काही गोष्टीमध्ये आपण बोलू पण शकत नाही आणि काम पण सांगू शकत नाही. आम्ही कित्येक वेळा यांच्याविरुध्द कंम्पलेन केलेली आहे हे आमचं ऐकत ना याचा अर्थ असा होतो की, याच्यावरती आपला वचक नाही. जेंव्हा नागरीकांच्या समस्या निर्माण होतात त्यावेळेस एक तर सत्ताधारी तरी बोलणी खातात किंवा विरोधी पक्षाचे नगरसेवक तरी बोलणी खातात शेवटी इथं आल्यानंतर आपण सगळे नगरसेवक आहोत. आपत्ती व्यवस्थापनामध्ये विदयुत, पाणीपुरवठा, उदयान,स्थापत्य, ड्रेनेज विभाग आहे. अहो साध्या,साध्या गोष्टी आहेत त्या यांना समजत नाही. त्यात आपला एक कार्यकारी अभियंता म्हणाले काय करायला लागले साहेब, मी म्हणलं साहेब, तुम्ही घरी जा जेवण करा आणि झोपा आम्ही करतो हे काम या अधिका-यांना पाण्याची वाट कशी काढून दयायची हे समजत नसेल तर हे कशासाठी अधिकारी ठेवले आहेत बरं बाकीची कामे यांची लोक बघतात. आयुक्त साहेब, मी तुम्हांला एक व्हीडीओ दाखवतो डेप्युटी इंजिनियरला घेवुन मी त्या लोकांच्या घरामध्ये गेलो लोकांनी दिवाणवरती एक खाट ठेवली आणि त्याच्यावरती एक खुर्ची ठेवली आणि मग त्याच्यावरती बसला असा फोटो माझ्याकडे आहे. त्या डेप्युटीला मी घरात नेलो होतो आणि दुस-या दिवशी ते

दुपारी १२.०० वा. आले आणि त्याच्यानंतर सांगतात की, सांगा आता करायचं साहेब, संध्याकाळी आम्ही आमच्या स्वत:च्या पैशाने एक जेसीबी लावून त्याठिकाणी असलेल्या पाण्याला वाट काढून दिली त्यावेळेस ते पाणी गेले. त्यानंतर तिथं घुबे साहेब आले आणि त्यांनी आम्हांला सांगितलं की, स्ट्रॉमवॉटरची लाईन काढून देवु. गेल्या दोन वर्षापुर्वीच तुम्ही याबाबतीत निर्णय घेतला असता तर कालचा प्रॉब्लेम निर्माण झाला नसता. अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत सांगायचं झालं तर आपण सामान्य लोकांची बांधकाम पाडतो मग याठिकाणी जे इंडस्ट्रीयल शेड २०/२० हजार स्केअरफुटाचे अनाधिकृत शेड आहेत त्याठिकाणी आपण कोव्हीडच्या पेशंटना क्वारंटाईन करणार आहात या शेडवर यापुर्वीच कारवाई करायला पाहिजे होती. आपण सामान्य लोकांची घरे पाडतो आणि हे काय पालिकेचे जावई नाहीत मुळात यांच्यावर आगोदर कारवाई व्हायला पाहिजे होती. काल निसर्ग वादळामुळे जी परिस्थिती उद्भवली आहे आणि यामध्ये विदयुत, स्थापत्य, पाणीपुरवठा,ड्रेनेज,उदयान, अग्निशामक या विभागातील संबंधित अधिका-यांवर कारवाई व्हायला पाहिजे. आणि १०० टक्के कारवाई व्हायला पाहिजे. आणि एकमुखी सर्व सदस्यांनी मागणी केली पाहिजे. आपत्ती व्यवस्थापन हे कोणत्या एका नगरसेवकाचं काम नाही. फक्त आपतकालीन व्यवस्थापनाला कॉल करा ही शासनाची हेल्पलाईन आहे.कम्पलेन फक्त रजिस्टर होती परंतु काम कोणच करीत नाही. काम नगरसेवक किंवा त्यांचे कार्यकर्ते करीत असतात. या लोकांवर कारवाई करुन उद्या जाहीर करावे. धन्यवाद.

**मा.तुषार हिंगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह मगाशी बाबरताई म्हणाल्या की, उदयान विभागाचे पीएम गायकवाड यांना बोलवून घ्यावं कारण गेली १० दिवसापासून मी त्यांना सांगत आहे की, जी झाडं वाढलेली आहेत, फांदया वाढलेल्या आहेत ती तोडण्यात यावे. असे सांगुनही ते माझं ऐकत नाहीत मग मी त्यांची तकार घेऊन पाटील साहेबांकडे गेलो आणि विचारलं की, शहरामध्ये अशी आपतकालीन परिस्थिती उद्भवली तर त्यावर आपण काय उपाययोजना केलेली आहे. तर पाटील सरांनी पीएम गायकवाडांना फोन लावला पण मला उत्तर काय मिळालंच नाही. त्याचप्रमाणे अग्निशामक विभागाची गाडी माझ्याकडे आली त्यांना मी जी मेन,मेन रस्ते आहेत त्याठिकाणी झाडं पडलेली आहेत ती काढण्यास सांगितले पण ते पण तसेच निघुन गेले. मा.महापौर साहेब, मी आपल्याला सांगु इच्छितो की, असंच

एका नागरीकांने साने चौक ते थरमॅक्स चौकाच्या दरम्यान एक तक्रार उदयान विभागाकडे केली होती त्या तक्रारीवर आपल्या उदयान विभागाने कारवाई केली नाही आणि त्या माणसांचा मृत्यु झाला. मृत्यु झाल्यानंतर मी त्या फाईलचा ४/५ दिवसापासून फॉलोप घेत होतो परंतु प्रशासनाकडुन त्याला मदत झाली की नाही हे माहित नाही. आपण या शहरातील लोकांच्या मरणाची वाट बघणार आहोत का ? आणि दुसरी गोष्ट मी गायकवाड साहेब आणि पाटील साहेबांना सांगु इच्छितो की, येथून पुढे एकही माणुस दगावला तर मी तुमच्यावर ३०२ चा गुन्हा दाखल करीन आणि मी हे स्वत: करीन दुसरी गोष्ट मगाशी मंगलाताईंनी सांगितलं की, आपल्या येथील एक पेशंट त्याला वायसीएम ला सुध्दा घेत नव्हता आणि दुस-या हॉस्पिटलला पण घेत नव्हता त्यासाठी मंगलाताईंनी आपल्याला फोन केला होता की, मी स्वत: त्या पेशंटबरोबर होतो मी त्यांना सांगितलं की, आणि इंगळे साहेबांना सांगितलं की तुम्ही डी वाय पाटील हॉस्पिटलची रेफरशिट द्या. त्यांनी मला असं सांगितलं की, मंगलाताईंनी त्या पेशंटला बिर्ला हॉस्पिटलची रेफर द्या असे सांगितले आहे. त्या पेशंटने ती रेफर घेऊन बिर्ला हॉस्पिटलला गेला त्याठिकाणी त्याला ४० हजार रु. डिपॉझिट भरण्यास सांगितले आहे म्हणुन त्यांनी मला दुपारी १२.०० वा. फोन केला. मी परत वाबळसाहेबांना फोन केला बिर्ला हॉस्पिटलवाले ४० हजार रु.भरण्यास सांगतात मी काय करु तर ते म्हणले मी तरी काय करु मी त्यांना म्हणले की, त्या पेशंटला त्याठिकाणी पैसे भरावे लागतील असं का सांगितलं नाही तर ते म्हणले की, मी त्यांना कस सांगणार मी कसं बोलू त्यांच्याशी नेमकी तुम्ही फसवणुक कोणाची करताय आमची करताय का त्या पेशंटची करताय कुठल्याही नगरसेवकाचा फोन आला तर त्यांना जी काही सत्य परिस्थिती आहे ती त्यांना सांगावी. कारण सर्व नागरीक आमच्या संपर्कातील असतात आयुक्त साहेब, आमची तुम्हांला विनंती आहे की, सर्व वैदयकीय अधिका-यांना यामध्ये डॉ.साळवी असो की, डॉ.वाबळे असो यांना सूचना देण्यात याव्यात की, सर्व सदस्यांना जी सत्य परिस्थती आहे ती सांगणेत यावी आमचे ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांच आम्हांला नेहमीच मार्गदर्शन होत असतं ते आम्हांला नेहमीच सांगत असतात की, आपण या सभागृहात आल्यानंतर पक्ष म्हणुन येत नाही तर सदस्य म्हणुन एकत्र येत असतो. आपण या शहरासाठी काय करु शकतो हे सर्व नागरीकांना समजलं पाहिजे. सत्ता येते,जाते हे तुम्हांला /आम्हांला माहिती आहे. या सभागृहात आपण एकमेकाला दोष देण्यापेक्षा या शहरासाठी कसं चांगल काम करता

येईल हे आपण केलं पाहिजे हे आपल्याला सांगु इच्छितो. आणि मा.महापौर साहेब, आम्हा सर्व सदस्यांना धन्वंतरी योजनाच काय आहे हे आम्हांला कळलेलं नाही. तेंव्हा मा.आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे की, धन्वंतरी योजना आणि विमा योजना यापैकी कोणती योजना कामगारांसाठी चांगली आहे याची माहिती देणेत यावी. अशी विनंती करतो. आणि थांबतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आपत्ती व्यवस्थापन विभागाने २ तारखेला मेसेज टाकला होता की, मुंबईला दुपारी चक्रीवादळ धडकणार आहे आणि याचा प्रभाव पुणे जिल्हा येत असल्याने सरकारी निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन कक्ष सज्ज आहे. नागरीकांना आपण आवाहन केलं होतं की, निसर्ग वादळ येणार आहे, नागरीकांनी घराबाहेर पडू नये, विदयुत पुरवठा खंडीत होणार आहे, झाडं पडणार आहेत त्यामुळे बॅटरी चार्ज करुन ठेवावी अशा सूचना केल्या होत्या. आपल्याला हे माहिती असताना सुध्दा आपण याबाबतीत कमी का पडलो आहोत मी पण प्रभागातील नागरीकांना मेसेज पाठविले होते. आमच्या प्रभागामध्ये अनेक ठिकाणी झाडं पडलेली होती. आम्ही उदयान विभागाला वारंवार फोन करीत होतो. सारखे फोन यंगेज येत होते. प्रशासनाने जर आम्हांला काही माहिती दिली असती तर आम्ही सुध्दा नागरीकांना कल्पना दिली असती. रस्त्यावर झाडं पडलेली असल्यामुळे आम्ही व आमचे कार्यकर्ते मिळून ती झाडं रस्त्याच्या बाजुला केलेली आहेत. आज सकाळी महापालिकेचे फक्त ३ कर्मचारी आलेले होते आणि त्यांनी ती झाडं तोडून त्याच ठिकाणी ठेवलेली आहेत.माझी मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, आम्ही सत्ताधारी पक्षाचे नगरसेक म्हणुन आपल्याला जी,जी मदत लागेल ती नक्की करु आणि रस्त्यावर जी झाडे पडलेली आहेत ती उचलण्यासाठी वेगळी टिम लावावी. आणि लवकरात लवकर ती झाडं उचलून घ्यावीत. एवढं बोलून थांबते.

**मा. सीमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आज दोन तास झाले चर्चा चालू आहे. परत म्हणताय की, महापौरांनी बोलू दिलं नाही विषयावर चर्चा करण्यासाठी, काय होतंय की, परवा आपण प्रशासनाचं अभिनंदन करताना आपण सगळेजण भारावून गेलो होतो आणि ब-यापैकी सदस्य सभागृहा बाहेर गेले होते. तेंव्हा तुम्ही सत्ताधारी असताना आणि आम्ही विरोधी सदस्य असताना त्यावेळेस जसं तुम्ही

संधी साधत होता तशी संधी आम्ही पण साधली. मा.महापौर साहेब, आपण याठिकाणी चर्चेला दोन तास वाव दिलेला आहे,वेळ दिलेला आहे प्रत्येकाला आपण बोलू देता आपला स्वभाव फार भोळा आहे कधी चुकून माकुन एखादा शब्द गेला असेल तर माई म्हणुन आपण सगळयांना सांभाळून घेतोच परवाच कमिशनर साहेब तुम्ही या शहराला कोरोनापासून चांगल सांभाळलं म्हणुन आम्ही सगळेजण ताकदीने तुमच्या पाठीशी उभे राहिलो. आणि इकडं पक्षापेक्षा सगळी लोकं तुमचं अभिनंदन करण्यासाठी सज्ज झाली होती. ज्यादिवशी अभिनंदन झालं त्याच्या दुस-या दिवशी आणि आज चौथा दिवस आज परत सगळे सदस्य विरोधी पक्षाचे असो,सत्ताधारी पक्षाचे असो सगळया सदस्यांच्या ज्या तक्रारी आहेत त्या सिरीएसली घेण्यात याव्यात आणि निसर्ग वादळ येणार आहे म्हणुन तुम्हांला माहित होतं आणि आता आपल्या हाती काही नाही. आयुक्त साहेब आपण जर का मेसेज टाकला असेल तर आपले अधिकारी किती चांगले काम करतात आपले संतोष पाटील साहेब हे चांगलं काम करतात. तुमच्याकडे टिम नाही उदयान विभागाचे पी एम गायकवाड आणि डी एन गायकवाड या दोघांचेही रिटायरमेंटला ६ महिने राहिलेले आहेत साळुंके गेल्यानंतर हे दोघेही त्याठिकाणी आहेत.साळुंके साहेबांचा एकतर्फी कारभार होते साहेबांचे मी बघतो रिटायर झाल्यानंतर त्याला वाईट समजत नाही पण तो कॅपेबल असला पाहिजे आणि ते चांगल सांभाळत होते. आणि आता यांना जबाबदारी दिलेली आहे परंतु यांच प्रभागामध्ये ऐकत नाहीत, साहेब आपण यांची काळजी घ्यायला नको का? इथं काय होतं प्रत्येकजण म्हणतो की, आयुक्तांना बोलवा पण तुमच्याकडे ज्या,ज्या विभागाची जबाबदारी आहे ती कितपत राबवली आहे. आपतकालीन परिस्थितीमध्ये ८ प्रभाग आहेत त्याठिकाणी २/३ कर्मचारी ठेवले पाहिजेत व आणखी कंत्राटी कामगार ठेवले पाहिजेत का नाही केलं असं निसर्ग वादळ येणार आहे म्हणुन तुम्हांला माहिती होतं त्यासाठी आम्ही काय म्हणलो असतो का,मा.आयुक्त साहेब, आपण जर का या शहराचा फेरफटका मारल्यानंतर आपल्याला समजेल की, सगळीकडे जागोजागी झाडाच्या फांदया आणि झाडाचा पालापाचोळा पडलेला दिसेल स्मार्ट सिटीची कामे पावसाळा येत आहे त्यामुळे ही कामे थांबवा आपण काही भागात कामं थांबवली काही भागात काम चालू आहेत. ड्रेनेज, २४ तास पाणी,अमृत योजना अशा वेगवेगळया योजनेमध्ये आपण रस्ते खोदले आहेत आणि मध्ये कोरोना आला आणि त्या कोरोनामध्ये सोशल डिस्टनसिंग पाळायचे असल्यामुळे लोक एकत्रित आले नाही पाहिजे. म्हणुन आपण ती सगळे कामे थांबवली

आहेत  आणि पर्यायाने ऊन्हाळयामध्ये जी कामे करायची होती ते सगळे दिवस वाया गेलेली आहेत. पण ते दिवस जात नाही तोपर्यंत निसर्ग वादळ आला  आता कशा,कशाला तोंड द्यायचं  जुन्या काळी आमची आजी खुप सांगायची पापं जास्त झाले की, आणि १०० वर्ष झाली की, देव उलथा-पालथ करतो म्हणे. मलाही तसंच होतं की काय ? मा.आयुक्त साहेब, या आपतकालीन परिस्थितीमध्ये आपण सक्षम यंत्रणा उभी करायला पाहिजे होती. यासाठी खुप कमी कालावधी होता. कमी कालावधीमुळे आपण फार काही ॲक्शन करु शकलेलो नाही.  आज या शहरामध्ये इकडे झाडं पडं,तिकडे झाडं पड अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पोलीस कमिशनर ऑफिस याठिकाणी सुध्दा झाडं पडलेली होती. मी काल संध्याकाळी इकडं तिकड बघत होते तर सगळीकडे झाडे पडलेली होती. आपल्या गाडया,कर्मचारी होते. संतोष पाटील साहेब, आपण एक अधिकारी म्हणुन  सांगते की, आपणाला त्या विषयाची ग्रॅव्हीटी समजली पाहिजे. मागच्या २०१२ ते २०१६ पर्यंत पावसाचं पाणी नदीमध्ये वाढतय  मगआपण काय करतो ऐनवेळी बोटी घेतो  मग या बोटी याच्या घ्यायच्या का त्याच्या घ्यायच्या , जॅकेट आले नाहीत ही परिस्थिती आज निर्माण होते अशातला भाग नाही. हे नेहमी होतं. युध्द कधी होणार आहे हे माहिती आहे का, तरी सुध्दा आपले जवान सिमेवरती असतात ना  या जवानांकडे दारुगोळा असतो पाऊस पडु दे, बर्फ पडु दे, ऊन पडू दे सगळया  ऋतू मध्ये ते तयार असतात मग आपली यंत्रणा तशी का नाही. आपल्याकडे तहान लागल्यावर विहीर खोदायला सुरुवात करतो. मी दोन्ही गायकवाडांना फोन लावल्यानंतर ते म्हणले की,ताई मी ३०० फोन घेतले आहेत त्यामुळे माझे डोकं बधीर झालेलं आहे आणि त्यांची रिटायरमेंट जवळ आल्यामुळे ते काम करु शकत नाहीत. पण संतोष पाटील साहेब,तुम्ही ॲक्टीव्ह आहात , तरुण आहात तुम्हांला काय झालं, तुम्ही त्याठिकाणी जा आणि रिझल्ट सांगा आज ज्येष्ठ नगरसेविका मंगलाताई, अजित गव्हाणेंनी त्यांची भूमिका मांडली काही नवीन नगरसेवक आहेत त्यांनी त्यांची भूमिका मांडली आणि आमचे स्टँडींग कमिटीचे चेअरमन आहेत आणि चेअरमन तुम्ही या सगळयाची जबाबदारी घ्यायची आणि तुम्ही सांगायचे या संदर्भात मिटींग बोलवतो आणि त्यामध्ये झालेल्या निर्णयाची  त्याची अंमलबजावणी करतो. विषय असा आहे की, आम्हांला तुमच्यावर टिका पण करायची आहे आणि नागरीकांचे पण प्रश्न सोडवायचे आहेत आम्ही प्रशासन हाताळण्यात कमी पडलो का? तर तसं अजिबात नाही ,आणि तसं असतं तर कोरोनाचे पेशंट खुप दिसले असते. प्रशासन, सत्ताधारी

पक्ष,भाजप जर ॲक्टीव्ह नसतं तर कोरोनाचे किती पेशंट दिसले असते. जे की पुण्यामध्ये पेशंट दिसतात आजुबाजुच्या महानगरपालिकेमध्ये किती तरी पेशंट दिसतात. औरंगाबाद,मुंबई मध्ये काय परिस्थिती आहे. वेगवेगळया भागामध्ये वेगवेगळी परिस्थिती आहे. परंतु आम्ही प्रशासनाबरोबर आम्ही दोस्ती म्हणुन काम करायला शिकलेलो आहोत आणि त्यामुळे आम्ही कोरोनावरती विजय मिळवलेला आहे. काल मी आनंदनगर येथील कोरोनाच्या संदर्भात फोन केलेला होता आनंदननगरमध्ये पेशंटची संख्या वाढत आहे त्यांच्यासाठी काय करता येईल त्याच बरोबर घरी जे लोक ठेवलेले आहेत तुम्ही त्यांना बाहेर निघु देत नाही त्यांची खाण्याची आबाळ होत आहे त्यांच्यासाठी आपण काही तरी निर्णय घेतला पाहिजे. तुम्हांला त्या लोकांपर्यंत जे काही पोहचवायचं असेल ते पोहचवावं. परंतु मा.आयुक्तांवर टिका करण्याऐवजी आपण चांगल काय करु शकतो हे पाहिले पाहिजे. पाण्याच्या विषयावरती आपले लोक बोलले लडकत साहेब काम करीत नाहीत हे ऐकायला बरं वाटलं कारण गेल्या १०/१५ वर्षापासून मी सातत्याने सांगत होते की, स्काडा योजना ही फेल आहे. आणि तुम्ही एखादया अधिका-याला वारंवार तेच,तेच डिपार्टमेंट देता तर त्याची कार्यक्षमता कमी होते. त्यांना शिफ्ट करा तुमच्याकडे पण आम्ही विनंती केली होती. काही लोकांची मोनोपोली आहे आणि यांच्या मोनोपोलीमुळे त्यातनं जे काही घडतयं त्याचा कोणाला भुर्दंड आहे सत्ताधारी पक्ष म्हणुन आम्हांलाच आज तुम्ही एक दिवसाआड पाणी देताय खरंतर या उन्हाळयात आम्हांला ज्या संकटाला सामोरे जायचं होतं,ज्या टिकेला आम्ही सामोरे जाणार होतो ती टिका झाली नाही याच कारण आहे की, कोरोनामुळे अनेक कंपन्या बंद होत्या,सगळया बांधकामावरती बंदी होती,त्याच प्रमाणे लोक पण त्यांच्या गावी गेलेले आहेत. त्यामुळे पाण्याची कमतरता जाणवली नाही. परंतु आता जे होत आहे त्यासाठी मी तांबे साहेबांना फोन केला त्यांना सांगितलं की, माझ्याकडे बुधवारी पाणी येणार नव्हत पण माझ्याकडे आज पाणी आलं उद्या गुरुवारी शटडाऊन घेणार म्हणल्यानंतर शुक्रवारी पाणी येणार का नाही आणि शनिवारी माझ्याकडे पाण्याचा दिवसच नाही मग मी काय करायचं रविवारी पाणी घ्यायचं साहेब, हा जो पाण्याचा विषय आहे सेक्टर २३ ला ज्याठिकाणी पाणी उपसाकेंद्र आहे तिथं तुम्हांला एखादं विज उपकेंद्र निर्माण करता आलं तर बघा ही आमची खुप दिवसाची मागणी आहे. आणि याशिवाय मोठे जनरेटर घेता येईल का ते बघा आम्ही त्यातले तज्ञ नाहीत आम्ही विरोधी पक्षात होतो तेंव्हाही आम्ही तेच बोललो होतो आणि आजही तेच बोलत आहोत

जर का तुम्हांला तिथं चांगलं काही करता येत असेल तर तिथे विदयुत मध्ये वारंवार बिघाड होत असेल तर त्याची दुरुस्तीची जबाबदारी कोणाची आहे. ज्या भागात आज पाणी आहे तिथं उद्या येणार नाही, आणि जिथं उद्या पाणी येणार होतं तिथं उद्या येणार नाही म्हणजे त्यांना ४/५ दिवस पाणी येणार नाही. आणि त्यासाठी सत्ताधारी पक्ष म्हणुन आम्ही नागरीकांच्या शिव्या खायच्या आणि इथे ब-याच सदस्यांनी तुमच्यावर टिका केलेली आहे. का, करु नये त्यांनी तुमच्यावरती टिका आमच्याकडे पर्याय नाही. आणि मग आम्हांलाही तुमच्यावरती टिका करावी लागते. रस्त्यामध्ये जी खड्डे आहेत ती बुजवण्यासाठी तुम्हांला जशी उघडीप मिळेल तसं फर्स्ट प्रायोरीटीने तुम्ही खड्डे बुजविण्यास सुरुवात केली पाहिजे. आणि तुम्ही एकदाच ठरवुन टाकायचं की,पावसाळयामध्ये खोदकाम करायचं नाही म्हणजे नाही करायचं नाही आयुक्त साहेब, आपण आपले अधिकारी वापरले पाहिजेत.महाराष्ट्र शासनामध्ये वेगळं आहे आणि महापालिकेत वेगळं आहे. आयुक्त साहेब, तुम्ही चांगल काम करता आणि चांगलं काम करीत राहणार आहात अशी मला आशा आहे. आणि माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, ज्या कमिशनरसाहेबांनी या शहराला कोरोनामध्ये सांभाळलेले आहे त्यांच्यासाठी आपण चांगले शब्द वापरु या बदल्या या काय होत राहतात राजकारण तुमचं-आमचं होत राहत पण चांगल काम करणा-या अधिका-यांच्या पाठीशी उभं राहिले पाहिजे. त्याच बरोबर मंगलाताईंनी सांगितलं की, आदित्य बिर्ला हॉस्पिटलचा विषय काढला डिलेव्हरी पेशंटसाठीच त्याठिकाणी सकाळी ८ ते रात्री ८ किंवा संध्याकाळी ८ ते सकाळी ८ पेशंट मोफत घेतात हे तुम्ही काल सांगितलं आहे. मी तुम्हांला सांगितले होते की, तुम्ही छोटया-मोठया आजारासाठी पाठवतो आपण आणि समजा तो त्यांचा पेशंट नसेल तर एकच तर केस आहे, मोफत करा ,नाही घेत पैसे लोकांनी पैसे कोठून आणायचे. कुठल्याही कंपनीने कामगारांना उपकार न करता पगार दिलेला नाही. कंपन्यांनी कामगारांची गळचेपी केलेली आहे. आपण वायसीएमएच मध्ये डायलेसीसची मशिन नाही आपल्या कर्मचा-यांनी डायलेसीस करायला कुठं जायचं डायलेसीसची मशिन घ्या नां प्रायव्हेट हॉस्पिटलचं बील एका वेळेस सुध्दा परवडत नाही. आदित्य बिर्ला हॉस्पिटल हे धर्मदाय आयुक्तांच्या अंडरमध्ये येत आहे. ज्यांच्याकडे पिवळं रेशनकार्ड आहे त्यांना तर फुकटच उपचार करावे लागतात. ३ लाखपेक्षा कमी उत्पन्न असणारी लोक काय ढिगा-यांनी येणार आहेत का, त्यांच प्रमाण किती असणार आहे. त्या लोकांना तिथं सुविधा उपलब्ध करुन देवु शकत नाही तर आपली यंत्रणा काय

कामाची  आता अजित गव्हाणेंनी सांगितलं आहे की, या पक्षनेत्यांनी सांगितलं नाही, त्या पक्षनेत्यांनी सांगितलं नाही म्हणुन विरोधी पक्ष म्हणुन त्यांच टिका करण्याचं काम आहे. कारण त्यांना माहिती नसतं म्हणुन टिका होत असते. कालच्या एका वादळामुळे सुध्दा पुरस्थिती निर्माण झालेली आहे. आमच्याकडील  झोपडपट्टीमध्ये सगळया घरामध्ये ड्रेनेजचं पाणी शिरले होते. महापालिकेचे कर्मचारी आलेले नाहीत अशातला भाग नाही. पण साहेब, ड्रेनेजची झाकणं ही झोपडपट्टीच्या आतमध्ये आहेत त्याठिकाणी मोटर लावायची आणि काम कसं करायचं सांगा आणि मग आमचे कार्यकर्ते त्याठिकाणी पाठवायचे त्याठिकाणी टिल्लू पंप घ्यायचा आणि चालू करायचा तेथून पाणी बाहेर काढायचं नाल्याचं पाणी घरात ,घरातलं पाणी परत नाल्यात ही सत्य परिस्थिती आहे. म्हणुन यावर गांर्भीयाने विचार केला पाहिजे. कारण की आजची परिस्थिती नाही. नदीमध्ये भराव  टाकला गेला किती वेळा याच्यावरती आशाताई आणि तुमचे भांडणं झालेली आहेत. नदीच्या कडेला भराव टाकतात यामुळे काय होतं पलिकडनं भराव टाकला की, अलीकडे पाणी घुसते आणि अलीकडे भराव टाकला की,पलिकडे पाणी घुसतं आज कासारवाडीमध्ये, पिंपरी,चिंचवड मध्ये   जाऊन बघा काय परिस्थिती आहे. लोकांच्या घरामध्ये पाणी घुसतय या ठिकाणी भराव भरणा-या लोकावरती आपल्या आधिका-यांनी कारवाई करायला पाहिजे होती. माणुस कोणीही असु द्या,कायदा हा सगळयासाठी आहे आणि त्या कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. आणि तुमच्याकडनं निश्चित  अपेक्षा आहे की, तुम्ही कायदयाची अंमलबजावणी करावी म्हणुन त्याचबरोबर आता सध्याचा एकच प्रश्न आहे की, एमएसईबीला आम्ही फोन केला की, तो फोन त्यांच्या कॉल सेंटरला जातो आणि कॉल सेंटरवाले म्हणतात की, मागील बील कधी भरलं होतं ते आधी सांगा आणि मग पुढची तक्रार नोंदवा एकीकडे शासनाने जाहीर केलेलं आहे की, येथून पुढे तीन महिने वीजबील भरण्याची सक्ती करु नका,हप्ते पाडून द्या, लाईटची तक्रार सहसा एमएसईबी घेत नाही माझ्या इंद्रायणीनगरच्या भागातील त्या अधिका-यांना फोन केला होता तर ते म्हणाले की,सिमाताई  तुमच्याकडची लाईट जाते म्हणुन तुमचाच फोन येतो बाकीच्या लोकांचा फोनच येत नाही. आणि मग काल वॉर्डातील जितकी लोकं होती तेवढया लोकांना व्हॉटसअप ग्रुपमधुन सांगितले आणि त्या अधिका-यांचा नंबर टाकुन दिला. आणि त्यांना सांगितलं की, जे एमएसईबीचे अधिकारी आहेत  या अधिका-यांना तुम्ही फोन करा किती बेजबाबदारपणे उत्तरे दिली जातात आणि त्याच्यासाठी तुम्ही एक मिटींग

घ्या, त्या मिटींगला पालकमंत्र्यांना बोलवा आणि त्या अधिका-यांना सांगावे की, लोकांना २/३ दिवसापासून लाईट आलेली नाही,त्यामुळे सोसायटयांमध्ये पाणी आलेले नाही. पाण्याची दुष्काळासारखी असदृष्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याला सुध्दा एमएसईबी जबाबदार आहे त्यांच्यावर आपण कारवाई केली पाहिजे. ड्रेनेजलाईन,नाला साफसफाई ब-यापैकी झालेली आहे परंतु काही ठिकाणी साफसफाई होण्याचं बाकी आहे. त्याठिकाणच्या नाल्याची साफसफाई झाली पाहिजे.स्टँडींग चेअरमन आणि मा.महापौरांना विनंती करते की, आपण एक स्पेशल मिटींग बोलवावी सोशल डिस्टींग पाळून प्रत्येक प्रभागवाईज स्थायी समितीमध्ये मिंटींग आयोजित करणेत यावी. आणि तिथल्या नगरसेवकांना बोलवून घेवुन त्यांचे काय प्रश्न आहेत हे विचारुन घ्या आपण संवाद ठेवला तर आपल्याला खुप चांगलं काम करता येईल त्याचबरोबर अनेक लोकांनी आरोप केले की, महापालिका विकुन खाल्ली काय केले त्यांच्याकडे फार काही लक्ष देण्याची आवश्यकता नाही ज्यांनी विकुन खालली म्हणता ते कधी काळी हे तुमचेच नेते होते तुम्ही त्यांच्या सोबत होते त्यामुळे तुमचे आरोप तुम्हांला लखलाब पाण्याच्या बाबतीत म्हणले तर तुमचे नेते यांनी निर्णय घेतला नाही म्हणुन आम्ही हे भोगतोय कच-याची समस्या तुमच्याचमुळे, अनाधिकृत बांधकामे तुमच्याच मुळे झाली आणि म्हणता आम्ही महापालिका विकुन खाल्ली असती तर आज कोरोनाचा प्रकोप घडला नसता म्हणजे सगळयांनी वाटून घेतलेले आहे हिस्सेदार,पोटहिस्सेदार आणि प्रभागातील हिस्सेदार यांची एकदा यादी वाचायला मला खुप आवडेल. विषय भांडणाचा नाही म्हणुन आम्ही बोलत नाही परंतु तुम्ही आरोपच करणार असाल तर आमचे पण ऐकुण घ्या आम्ही सुध्दा आरोप करु शकतो आणि ते ही कागदोपत्री सिध्द केलेलं आहे आमचं काहीच म्हणणं नाही आपण आरोप करताना कागदोपत्री सिध्द करावेत हायकोर्टात जावं, माहिती अधिकारात महापालिकेकडुन माहिती घ्यावी, त्याची सुनावणी घ्यावी,सुनावणी झाल्यानंतर अपिलात जावं आणि अपिलात नाही ऐकलं तर हायकोर्टात नाही झालं तर सुप्रीम कोर्टात जावं या सगळया प्रोसेस फॉलो कराव्यात आणि मग आरोप करावेत. रोजच हे आरोप करणार याला काय अर्थ आहे. आरोप करताना खुलेआम करा, तुम्हांला त्यातलं काय गांभीर्य आहे. तुमचा मुद्या काय आहे. कुठल्या मुद्यावरती तुम्ही भारतीय जनता पार्टीने मनपा विकुन खाल्ली तो मुद्या पटवून द्या. तुम्ही एक बातमी येण्यापुरतं तुम्ही काम करीत आहात या टेंडरमध्ये ही चुक होती याची बातमी उद्या या अधिका-याचं या कॉन्ट्रॅक्टरचं या नगरसेवकाचं या आमदाराचं या

गटाचा हा पुरावा आहे. आणि मग याच्यावर सुनावणी आणि नाही झालं तर कोर्टात दावा दाखल करा  आणि मग आम्ही म्हणुन की खरचं आम्ही दोषी आहोत. तुम्ही कोणतीच प्रोसेस फॉलो करीत नाही.आपल्याला लोकांनी सत्ता दिलेली आहे आणि आपण सत्ता खुप चांगली राबवतोय त्याच बरोबर या सत्तेचा  ख-या अर्थानं  या नागरीकांसाठी उपयोग झाला पाहिजे.  आणि नागरीकांसाठी ज्यावेळेस उपयोग करायचा असेल त्यावेळेस विरोधी पक्षाचे, सत्ताधारी पक्षाचे  ज्यांनी मोठी पदे उपभोगलेली आहेत. यामध्ये मंगलाताई असतील,योगेश बहल असतील ,अजित गव्हाणे असतील,भाऊसाहेब भोईर असतील, नाना काटे तर आता विरोधी पक्षच असतील या सगळया लोकांना तुम्ही तिथं बोलवा ज्यांच या शहराच्या विकासामध्ये योगदान आहे या सगळया लोकांना बोलवून आपण यांची मतं विचारात घेतली तर मला वाटतं जास्तीत जास्त चांगली कामे आपल्याला करता येईल सत्ताधारी म्हणुन आपल्यावर आरोप होतात आणि ते आरोप सहन करण्याचं काम आपलं आहे. तसंच त्याला उत्तर देण्याचं सुध्दा काम आपलंच आहे. याठिकाणी ज्या ज्या लोकांना आपल्या समस्या मांडलेल्या आहेत या समस्या आपण आपल्या कागदांवरती लिहून घेतांना मी आपल्याला पाहिलेलं आहे. आपण या समस्यांच्या बाबतीत आपण ज्या त्या भागातील नगरसेवकांना बोलवावं आणि मिटींग घ्यावी आणि हे चक्रीवादळ किती दिवस राहणार आहे आणि काय होणार आहे. मागच्या वर्षी संपुर्ण वर्षभर पाऊस होता याही वर्षी पाऊस राहण्याची दाट शक्यता राहणार आहे. पाणीपुरवठयासाठी आपण जाणीवपुर्वक लक्ष दिलं पाहिजे. ज्या नगरसदस्यांनी म्हणजे या सभागृहात सगळयात जास्त लडकतची बाजु कोण घेतली असेल तर मंगलाताईनी ते चांगल काम करतात म्हणुन बोलायचं आहे. पण त्यांनीच अशी तक्रार केली असेल तर म्हणजेच काही तरी  खरं आहे.  तर तुम्ही निश्चितपणे त्यांची खांदेपालट करा नां आणि खांदेपालट करुन बघा आणि बरेच अधिकारी रिटायर्ड होणार आहेत. आपण काय करतो जो बसतो तिथंच ठेवतो. ही सगळी माणसं तिथंच राहून,राहून  काम होत नाही या सगळयांना बदलावं फार फार तर काय होईल आता काय उन्हाळा आहे का आम्ही पण पाण्यासाठी  राष्ट्रवादीच्या काळात खुप मोर्चे काढली आहेत. पण आता सत्ताधारी आहोत आता जबाबदारीनं काम केले पाहिजे. आणि कमिशनर साहेब, तुमचं कुठं चुकतयं तुम्हांला यांच्या आरोपांना तोंड द्याव लागतयं ना तर या लोकांना विश्वासात घ्या आणि यांना बोलवा, तुम्ही बोलताय आल्यानंतर यांचा मान सन्मान करताय हा अजिबात विषय नाही. परंतु तुम्ही काय करताय ते या

लोकांना विश्वासात घेवुन करा. आयुक्त साहेब, या लोकांनी खुप मोठ,मोठी पदं उपभोगलेली आहेत तुम्ही यांना मान तरी द्या परंतु तुम्ही यांना विश्वासात घेणारचं नसाल आणि मग त्यांच्याकडनं तुमच्यावर आरोप होत असतील तर ते आपल्याला ऐकावंच लागेल. धन्यवाद .

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरंतर आपत्ती व्यवस्थापनाच्या विषयावरती आपण गेली ३ तास चर्चा करीत आहोत. मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. परंतु ज्या नगरसेवकांनी आपलं म्हणणं सांगितलं की, माझ्या प्रभागामध्ये या चक्रीवादळांमुळे झाडं पडलेली आहेत ती उचलण्यासाठी आपण कमी पडतो आहोत खरंतर काल ३ वाजेपर्यंत अशी परिस्थिती होती की, या शहरामध्ये एवढी मोठी पडझड होईल म्हणुन हे अचानक झालेलं चक्रीवादळ आहे एवढया मोठया प्रमाणामध्ये झालेली पडझड ही अचानक आहे. मी असं म्हणणार नाही की, ज्या वृक्ष प्राधिकरणाच्या अधिका-याची १०० टक्के चुक नाही. त्यांनी सन्मा.सदस्यांचे फोन हे घेतलेच पाहिजेत. विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली पाहिजेत. ज्या त्या प्रभागामध्ये एक वृक्षसंवर्धनासाठी एक अधिकारी आहे. कर्मचारी आहेत त्यांनी खरंतर हे काम केलं पाहिजे. यासंदर्भात थोडीशी चुकही झाली असेल कदाचित आपण डी.एन. गायकवाड यांना प्रमोशन दिलेलं आहे पी.एम.ला आपण चांगला अधिकारी करतोय माझी खरंतर या सभागृहाच्या वतीने त्यांना विनंती आहे की, त्यांनी या पुढच्या काळामध्ये कालचा दिवस झाला पण पुढच्या काळामध्ये अशा प्रकारची घटना घडणार नाही आणि त्याच्यासाठी आपण काय खबरदारी घ्यावी लागेल अशा पध्दतीच्या सूचना मा.आयुक्त साहेब आपण यांना देण्यात याव्यात. मी मा.महापौरांच मी मनापासून अभिनंदन करतो की,त्यांनी गेली ३ तास सन्मा.सदस्यांच्या मनामध्ये काय आहे त्यांनी त्यांच्या प्रभागामध्ये खरंच चांगल काम केलेलं आहे त्यांनी आपल्या प्रभागामध्ये पडलेली झाडं,फांदया तुटलेली आहेत ती काढण्याचं काम आजही करीत आहेत. पण कधी,कधी मी एखादया विषयाला सुरुवात केली आणि मी किती चांगला आहे आणि मी कसा आरोप करु शकतो खरं तर यासाठी या सभेचा विषय नव्हता. आणि भाऊसाहेब इथं आहेत आणि या विषयावर भाऊसाहेब चांगल्या रितीचं ते भाषण करु शकतात आणि माजी सन्मा.पदाधिका-यांनी सांगितलं की, पाणीपट्टीमध्ये भारतीय जनता पार्टीने वाढ केली. मला असं वाटत की, सन्मा.यांनी मोठया पदाधिका-यांनी आपण जे

बोलतोय, ते खरंच खरं आहे का ? की फक्त आपण एखादया गोष्टीचा आरोप करायचा म्हणजे वर्तमानपत्रामध्ये कुठे तरी बातमी छापून आली म्हणजे झालं. खरंतर काल-परवाच्या मिटींगमध्ये आलेला हा विषय फेटाळून लावला आपण काय आरोप करतोय, कुठल्या विषयावर कसं बोलतोय आणि पाण्याच्या विषयावर ते ही सांगतोय की, धरणांत एवढ पाणी आहे आणि तुम्ही का पाणी देत नाही. खरंतर सीमाताईंनी त्याच उत्तरही दिलेलं आहे. खरंतर आपण ५/१० वर्षापुर्वी या शहराला मुबलक पाणी देण्याचं केल असतं तर ही वेळच आली नसती. आणि खरंतर आम्हांला इथं येऊन ३ वर्ष झालेली आहेत आणि तुम्ही म्हणत असाल की, आम्हांला २४ तास पाणी द्यावं खरंतर अजित गव्हाणेंनी सांगितलं आहे की, महापौरांनी सर्वांना बोलू दिलं पाहिजे. याठिकाणी मा.महापौर सगळयांना बोलू देण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण बोलत असताना या सभागृहाचं पावित्र्य राखून चांगल्या पध्दतीनं बोला नां ३ तास काय १० तास चर्चा करु. दत्ता काका तुम्ही आरोप केल्यानंतर त्याला आम्ही उत्तर देवु नां. आम्ही आमच्या पध्दतीने एखादया प्रश्नाच स्पष्टीकरण देवु. समजा आमच्या स्पष्टीकरणानंतर आपलं समाधान नाहीच झालं तर सीमाताईंनी सांगितल्याप्रमाणे ही लोकशाही आहे यामध्ये तुम्ही बोलले किंवा आम्ही बोलले परवाच्या दिवशी कोणी तरी सांगितलं की, धन्वंतरीच्या विषयामध्ये हे झालं,ते झालं आमचीही मानसिकता होती नां, आयुक्तांनी धन्वंतरीच्या विषयाच्या संदर्भात काही तरी वक्तव्य केलं असतं, सादरीकरण केलं असतं माझी या सभागृहाला विनंती आहे की, सभागृहात एखादया विषयावर आरोप करीत असताना त्याचा विचार केला पाहिजे की, खरंच हा विषय झाला आहे का? नाही झाला ,खरंच या विषयामध्ये आणखी काही लोक आहेत मी असं म्हणणार नाही की, कालच्या विषयामध्ये भारतीय जनता पार्टी जबाबदार आहे असं म्हणायचं सुध्दा कारण नाही. चक्रीवादळामुळं झाडं पडली म्हणजे त्याला भारतीय जनता पार्टी जबाबदार आहे का, एमएसईबीची लाईट प्रत्येक प्रभागामध्ये गेली दोन दिवसापासून नाही म्हणुन आम्ही म्हणत नाही की,राज्य शासन काहीच करीत नाही. अशी तर परिस्थिती नाही नां. आज इथं आम्ही सत्तेत आहोत राज्यात तुम्ही सत्तेत आहोत आणि माझी सन्मा.सदस्यांना विनंती आहे की, आपण खुप चांगले वक्ते आहात, खुप चांगली भाषणं करता बाकीच्या लोकांनी ऐकावे असे वाटते पण आपण बोलत असताना खरं बोलावं खोटं बोलून रेटून बोलायची सवय बंद करा. आपण काय बोललो हे आपण दोन दिवसानंतर सुध्दा सांगु शकत नाही. लोकांची एवढी स्मरणशक्तीही नाही. लोक त्यावेळेस विचार करतात की,

तुम्ही कशा पध्दतीने काम करताय की नाही, चांगल दिसतंय की नाही यावर खरंतर लोक आपण केलेल्या कामाचं मुल्यांकन करतात आणि आम्हांला खात्री आहे की, या महापालिकेच्या माध्यमातुन जे प्रामाणिकपणाने प्रयत्न करतात त्यावेळेस तुम्ही म्हणजे ज्यावेळेस हे सभागृह चांगल्या पध्दतीने चाललं पाहिजे. आमची मानसिकता आहे सगळयांना १ तास,२ तास बोलू दिलेलं आहे नां. मला वाटतं अशा पध्दतीचं कामकाज या पुढच्या काळामध्ये झालं तर याच सभागृहाचा सन्मान राखला तर चांगल्या पध्दतीचं काम होईल एवढंच मी याठिकाणी सांगतो आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह आता आपण गेल्या २/३ तासापासून काल जे चक्रीवादळ आपल्या शहरामध्ये आलं आणि त्यामुळे प्रत्येक प्रभागामध्ये मिळून जवळपास २०० ते ३०० झाडं पडली आहेत. परंतु काल रात्री काही ठिकाणी चांगल काम झालं काही ठिकाणी झालं नाही. जो तो नगरसेवक आपआपल्या परीने अधिका-यांना मदत करण्याचा प्रयत्न करतो आहे. प्रशासनही आपआपल्या पध्दतीने मदत करीत आहे. काल रात्री नाशिक फाटा ते बीआरटी रस्त्यावर झाड पडलं. झाड पडल्यानंतर मी ही तिथं होतो गायकवाड साहेबही रात्री १०.३० वाजता तिथं होते आणि हे अचानक सगळं झालं. एकच अधिकारी सगळीकडे फिरुन काम करत होते म्हणजे कुठे तरी हे अधिकारी काम करताना दिसतात. प्रत्येक नगरसेवक याठिकाणी पोटतिडकीने तक्रारी करीत आहे. का करीत आहे तर प्रत्येक नगरसेवक हा आपआपल्या प्रभागातील समस्या डोळयासमोर ठेवुन बोलत आहे. कारण नागरीकच सदस्यांना फोन करतात ना इथं झाड पडलं आहे तिथं लाईट नाही. आता काल एमएसईबीने पहिल्यांदाच नियोजन केलेलं आहे की, वादळ येण्यापुर्वीच लाईट बंद करतात आणि वादळ गेल्यानंतर लाईट चालू करतात आणि जशी,जशी ज्या,ज्याठिकाणी अडचण येईल आणि नंतर एक झाड एमएसईबीच्या याच्यावर पडलं. टीव्हीवर पण बातमी आलेली होती की, चक्रीवादळ येत आहे योगायोग असा आहे की, तो मुंबईला आला नाही आणि आला असता तर त्याठिकाणी काय परिस्थिती झाली असती हे आपल्याला माहिती आहे. परंतु तो ज्या वेगाने कोकणात आला त्या वेगाने जर तो आपल्याकडं आला असता तर काय झालं असतं म्हणजे आयुक्त साहेबांनी देखील नागरीकांना याची पुर्वकल्पना दिलेली होती. त्यामुळे लोकं घराच्या बाहेर पडलीच नाही. त्यामुळे जिवीतहानी झालेली नाही. आयुक्त साहेब, आपल्याला माहिती होतं की,

हे चक्रीवादळ येत आहे असं असताना आपण आपली यंत्रणा सज्ज ठेवायला पाहिजे होती. आणि यामध्ये झाडाच्या फांदया कुठे वाढलेल्या आहेत का त्याची छाटणी करतो, धोकादायक झाडं आहेत ती काढतो किंवा आपण नाले स्वच्छ करतो. परंतु मगाशी सांगितले की, सर्वांना विश्वासात घ्या सांगा नां महापालिकेची मागच्या तीन वर्षाची हिस्ट्री सांगा म्हणजे आम्ही उदघाटनाची पत्रं दिली काही नाही,आम्ही या सभागृहात परवा जो प्रकार झाला त्या महाशयांनी त्या पत्राचा फॉर्म्युला बदलला त्याच्यावर मी कोरोनाबद्दल दिलं त्याच्यावर तुम्ही जी.बी.घ्या काही नाही. म्हणजे कुठं तरी दुस-याला ज्ञान शिकवत असताना आपण मागच्या २/३ वर्षापासून कसे वागलो हे बघा आणि मागच्या १०/१५ वर्षाचं काय बघताय तेच तर तुमचे नेते आहेत.म्हणजे एका बाजुला म्हणायचे राजकारण बाजुला ठेवा आणि दुस-या बाजुला आपण त्याच्यावरच री ओढायची म्हणजे कुठे तरी आपण आपली जबाबदारी झटकायची सगळे नगरसेवक पोटतिडकीने बोलले आहेत प्रत्येकाला वाटतं की, माझ्या प्रभागात या,या सुविधा झाल्या पाहिजेत. माझ्या प्रभागात घटना घडली वाकड ब्रीजच्या खाली पाणी साचलं ते काम एनएच-४ कडे आहे. त्याठिकाणचं पाणी जवळच्या सगळया झोपडपट्टीत आलं आणि एक १८ वर्षाचा मयुर बाळु पवार हा मुलगा गेला. आता ही जबाबदारी कोणाची आहे. केंद्र सरकारकडे करायची का एमएसईबीकडे करायची या मुलाच्या घरची काय अवस्था झाली असेल म्हणजे आपले अधिकारी त्यांच्या पध्दतीने काम करतात आणि आपणही आपल्या पध्दतीने काम करतोय. परंतु हे करीत असताना नुकसान हे कसं कमीत कमी होईल हे बघण्याची जबाबदारी सगळयांची आहे. आयुक्त साहेब, मला आठवत नाही की, कुठल्याही गटनेत्यांना चांगल्या विषयासाठी बोलावलं असेल. मगाशी कोणीतरी सांगितलं की, सर्व गटनेत्यांना बोलवा,सगळयांना विश्वासात घ्या ते सगळं सुचवतील. मग आपण घेतो ना मिटींग जी.बी.ला सोशल डिस्टन्सिंग ठेवा ही मिटींग पण चांगल्या विषयावर कधी मिटींग झाली असेल असं मला मागच्या तीन वर्षामध्ये कधी आठवत नाही. तेंव्हा मागच्या १०/१५ वर्षापुर्वीचा नेता कोणी असेल तर त्याबद्दल बोलण्याचा तुम्हांला काहीही अधिकार नाही. आज भारतीय जनता पार्टीचे लोक हे उद्या कोणत्या पक्षाचे असतील माहिती आहे का, उद्या महापौरांनी पक्षांतर केलं तर काहीही घडू शकतं म्हणजे इथे असलेले नगरसेवक हे आपआपल्या भागामध्ये ताकद ठेवुन आहेत. का ताकद ठेवुन आहे तर कोरोना असेल, प्रत्येकजण फिल्डवर उतरतोय नां नागरीकांची कामं करण्यासाठी उतरतोय. निवडुन येणा-या माणसांची मोळी बांधली की बरोबर होतं.

तसं या जगाचं आहे. काही नगरसेवक असे आहेत की, ते कुठूनही उभे राहीले तर ते निवडुन येणार आहेत प्रत्येक जण आपआपल्या भागात काम करीत आहेत. परंतु आपण काय करतो की, राजकारण करु नका,करु नका म्हणायचे आणि त्याच मार्गांनी चालायचं या सगळया गोष्टी चालूच राहतील मला एकच सांगायचं आहे की, आयुक्त साहेब, आपली सुध्दा मागची ३ वर्षाची कारकीर्द पाहिली तर आता कुठं आयुक्त ऐकायला लागलेत. परंतु कुठेही काम करताना परिस्थितीत बदल व्हायला वेळ लागतो. आयुक्त साहेब, याठिकाणी सर्व नगरसेवकांनी त्यांच्या समस्या मांडलेल्या आहेत त्या आपण ऐकाव्यात उदयान विभागाचे साळुंकेच्या जागी डी एन गायकवाड आहेत हे सभागृहाला समजलं पाहिजे होतं. याठिकाणी सभागृह चालवताना फ्लोअर मॅनेजमेंट म्हणजे याठिकाणी आपण सगळे बसतोय याठिकाणी महापौर, उपमहापौर, पक्षनेते,गटनेते याठिकाणी काय चाललंय इथं सगळयांना विश्वासात कसं घ्यायचं तेंव्हा माझी तुम्हांला विनंती आहे की, पक्षनेत्यांना पण आहे, माईंना पण आहे पुढची बातमी राहूल जाधवांची आहे चिंचवडला जाऊन आले, पण चिंचवडला मला अडचण आहे. त्यानंतर मला विचारावं लागेल अध्यक्षांना माझ्या प्रभागातील पाण्याच्या टाकीच्या कामांची उदघाटन करायची राहीली आहेत शेवटी मी वैतागून कामे पण चालू केलेली आहेत. आम्ही उद्घाटन न करताच कामं चालू केली आहेत. मी परवा पण आयुक्तांसमोर नामदेवरावांना म्हणलं की, आयुक्त साहेब, सभा कशी चालवतात. नाही तर नगरसचिव आहेतच पारंपारीक उदघाटन करण्याचा अधिकार मा.महापौरांना आहे. लेखी पत्र आहे. आणि आता तुम्ही शिकवताय का परंपरा चालू आहे म्हणुन पाळा ना परंपरा तुम्ही काही ठिकाणी ज्यांनी चांगली कामे केली आहेत त्यांना चांगल म्हणा शहरातील लोकसंख्या ज्या पध्दतीने वाढलेली आहे त्याप्रमाणे पाणी नाही. सध्या लोक घरी आहेत म्हणजे पाण्याचा लोड आला ना पंपींग स्टेशनमधली घाण अशीच सोडून द्यायची फेडरेशन नंतर होईल. म्हणजे असे प्रकार आम्ही डोळयांनी पाहिलेली आहेत त्याचे आमच्याकडे फोटो पण आहेत. पुर्वीचं १०/१२ वर्षापुर्वीच वाकड आणि आताचं वाकड यामध्ये फरक आहे नां. आम्ही काय काम सांगितलं तर ते आपण पण निष्पक्षपातीपणाने केलं पाहिजे. यांच काम केलं तर ते काय म्हणतील त्यांच काम केलं तर हे काय म्हणतील यामधनं तुम्ही बाजुला व्हा. कुठं तरी राजकारण सोडून त्याच्या पुढचा विचार करावा. हे शहर आपण १० वर्ष कोणालं दिलं, ३ वर्ष कोणाल दिलं आपलं काम काय आहे नागरीकांनी आपल्याला त्यांची कामे करण्यासाठी निवडून दिलेलं आहे.

प्रशासन आणि नागरीक यांच योग्य समन्वय करणे आणि ते काम तडीस नेणे हे होय. पाण्याचा प्रश्न प्रत्येक प्रभागात आहे आज आमच्या प्रभागातील सोसायटीचा प्रश्न आहे त्यांनी पत्र दिलेलं आहे. त्या सोसायटीच्या चेअरमन यांनी काय केलं सोसायटीच्या नांवाने पाण्याचे टँकर घेतले आणि त्याचे बील ४ लाख रु.दिले. म्हणजे ज्या ज्याठिकाणी टँकर जातात तिथं आपण डीप मध्ये जातो का , खरंच तिथले नैसर्गीक प्रवाह बंद आहेत का चालू आहेत हे आपण पाहतो का आज लोक गावाला गेलेली आहेत नाही तर काय झालं असतं या उन्हाळयातच लोकांचा मोर्चा आला असता ब-याचशा सोसायटयामध्ये १०० लोक असतील तर तिथं ५० च लोक आहेत बाकीची गावाला गेली आहेत. पुढे पावसाळा येईल त्यानंतर आपण दररोज पाणी देणार की नाही यावर चर्चा केली पाहिजे. कोरोनाच्या याच्यामध्ये आपण सगळे बीझी आहात त्याच्यावर आपण परवा ३ तास चर्चा पण केली आहे. प्रभागात काम करीत असताना प्रशासनाचा प्रमुख म्हणुन येणा-या पुढच्या आपत्तीला कसं सामोरं जायच आहे यासंबंधी आपण कोणाशी चर्चा केली का तेंव्हा सर्व नगरसेवकांनी आपआपल्या भागातील जी कामे सांगितलेली आहेत त्याकडे लक्ष द्या. उपमहापौर म्हणतात की, अधिकारी आमचं ऐकत नाहीत बाकीच्यांनी काय करायचं उपमहापौरांना त्यांच्या प्रभागातील समस्या आहेत म्हणुन ते बोलतात माई माझी आपल्याला विनंती आहे की, आपण प्रशासनाला आदेश द्यावे आणि आयुक्त साहेब आपण येणा-या पावसाळा आणि आता आपण कोरोनातुन आपण उठलोय आणि आता वादळात अडकलोय कोरोनाचं संकट खुप मोठं आहे आजही पेशंटची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे,पिंपरी चिंचवड कोणाच्या ताब्यात आहे यामधनं पहिल्यांदा आपण बाहेर पडू आणि खरं काम करु. धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह या शहराचं दुर्दैव किती आहे हे पाहिलं आहे का? आणि त्यातुन भारतीय जनता पार्टीतील ठराविक पदाधिकारी सोडल्यानंतर त्या सगळया नगरसेवकांच पण दुर्दैव आहे. या शहराचा उपमहापौर म्हणतो मला धन्वंतरी योजना म्हणजे काय ते सांगा मला माहित नाही. सभागृहात सांगा म्हणलं तर तुमची बेल बजावली जाते. त्यादिवशी मी तुम्हांला ओरडून,ओरडून सांगत होतो की, महापौर धन्वंतरी या विषयावर बोलू द्या म्हणलं तर तुम्हांलाच काय घाई झालेली होती हे तुम्हांलाच माहिती आहे. तुम्हांला कोणाचे आदेश

होते हे माहित नाही. विषय मांडला, अनुमोदन दिलं की, विषय मंजुर महापौर साहेब, तुम्हांला सभागृह चालविण्याचा अनुभव आहे. तुम्ही स्थायी समितीचे चेअरमन होता अनेक वर्ष नगरसेवक राहिलेल्या आहात ज्यादिवशी आपण महापौर झालात त्यादिवशी आम्हांला आनंद झाला आम्ही म्हणलं आता माई सर्वांना बोलू देणार गडबड करणार नाही पण इथं ज्या कामगारांची मागणी आहे आणि प्रत्येक प्रभागातील कर्मचारी हे आपले कर्मचारी नसतात ते आपले मतदार आहेत आणि ही योजना या कर्मचा-यांसाठी आहे. आणि कर्मचा-यांनी लिहुन दिलेलं आहे की, आम्हांला धन्वंतरी योजनेमध्येच रहायचे आहे. आम्हांला विमा कंपन्याबरोबर जॉईन व्हायचं नाही त्यामुळे आम्हांला भरपुर त्रास होणार आहे. त्यांनी तुम्हांला पत्र पण दिलेल आहे दरवर्षाला १७ कोटी रु.खर्च होत आहेत आणि आपण विमा कंपनीचं २८ कोटी रु. देणार आहोत शिवाय ५ कोटीचं बफर आहे तस त्यांना नको आहे नां. शिवाय ते म्हणतात की, ४ कोटी ८० लाख रु. त्यांचा स्वहिस्सा होता त्यानंतर त्यांना ७ वा वेतन आयोग लागु झाला त्यावेळेस ते म्हणले की, आमचे जास्त पैसे गेले तरी चालेल यामध्ये कामगारांच हित बघायचं का स्थायी समितीचं हित बघायचं कामगारांना आपण नेहमी मदत करीत असतो त्यामध्ये पक्षपात करीत नाही मग आपण का चुकीचं काम करायचं हीच आमची मागणी होती. आणि आम्ही सांगत होतो की, हा विषय मंजुर करु नका तरतुद वर्गीकरणाचा विषय होता तिथंपर्यंत ठिक आहे पण खाली पुर्ण पण लिहिलं नाही अजेंडयावर चर्चा करायला मिळाली असती तर मग आयुक्तांनी खुलासा केला असता ना आता एकनाथराव म्हणले की, आयुक्तांनी सांगितलं असतं तर गैरसमज दूर झाले असते. महापौर तुम्ही पण बोलला असता, त्यावर चर्चा झाली असती आणि त्यावर आयुक्तांनी खुलासा केला असता तर आपणा सर्वांना योग्य वाटलं असतं आणि आम्ही कधी विरोध करीत नाही. कामगारांना पण योग्य वाटलं पाहिजे नां, का आपल्याकडे सत्ता आहे म्हणुन लादायचं का महापौर साहेब, मला तर याठिकाणी २९ वर्ष होतील नगरसेवक म्हणुन पण आम्ही कधी चुकीचं वागलो नाही. चुकीच्या पध्दतीनं बोललो पण नाही नेहमी आम्ही चांगल्याला चांगलचं म्हणलेलं आहे आणि चांगल्या कामाला दाद दिलेली आहे. तर माझीही तुमच्याकडनं हीच अपेक्षा आहे की, आम्ही आमच्या टाईमाला जसं सिमाताईनी हात वर केला की, आम्हांला माहिती आहे की, त्या बोलणार आहेत, मारुती भापकरांनी हात वर केला की त्यांना बोलू द्यायचं, सुलभाताईंनी हात वर केला की त्यांना बोलू द्यायचं हे सगळे लोक बोलणार असतील तर त्यांना बोलू

द्यायचं नाही का ठिक आहे आम्ही त्यावेळेस उपसूचना खुप मांडल्या पण त्याला कोणाचा विरोध आहे का ? असं म्हणुन ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवुन घेवुन विषय मंजुर केले जात होते. परंतु तुमच्याकडे वेगळीच पध्दत आहे एखादया नगरसेवकाला उपसूचना मांडायची असेल तर ती मांडण्यासाठी सुध्दा तुमची दादागिरी आहे. आपण नियमाप्रमाणे सभेचे कामकाज चालवावे. आणि नगरसचिवावर आपला प्रचंड दबाव आहे. त्यांना तुम्ही हा म्हणले की, त्यांना हाच म्हणावं लागतय. पण हे असं चालणार नाही. सगळयांना बोलू द्या कोटयावधी रुपयांचे विषय असतात त्यावर आपण चर्चा करु देत नाही. या शहराच्या विकास कामासाठीचे एवढं मोठं बजेट असताना त्यावर चर्चा न करता ५ मिनिटांत मंजुर करता बाकीच्या सदस्यांना तुम्ही काहीच कळू देत नाही,त्यांना चर्चा करु देत नाही. पुणे महापालिकेचं बघा, विचारा सिमाताईंना, भाऊसाहेबांना बजेटवर ३/३ दिवस चर्चा चालू असते. आपण या बजेटवर तर कधीच चर्चा करु देत नाही. आज तुम्हांला सत्तेत येऊन ३ वर्ष झालेली आहेत त्यातुन काही तरी शिका जे आमच्यासारखे अनुभवी सदस्य असतील त्यांना त्या विषयावर बोलू द्या. इकडं विषय वाचला नाही तोपर्यंत तर तिकडं विषय धाडकनं मंजुर करता असे चालत नाही. इथं पत्रकार बसलेले असतात. मी या सभागृहात यायचं कमी केलं, बोलायचं कमी केलं. का? कमी केलं कारण तुम्ही कोणाला बोलूच देत नाही आणि उलट तुमची दादागीरी आणि चुकीच्या पध्दतीनं काम करणं ही जी पध्दत आहे ती बिल्कुल चांगली नाही आणि नागरीकांमध्ये हा मेसेज चांगला जात नाही. तुम्ही ज्या पध्दतीने सभागृह चालवता त्या पध्दतीनं नागरीक, पत्रकार लिहीतात. इथं पत्रकार बसतात परवाच्या मिटींगमध्ये आम्ही सांगितलं की, सभागृहामध्ये कोरम नाही, आम्ही कोरमची मागणी केली पण आपण ऐकलं नाही. या सभागृहाचं कामकाज चुकीच्या पध्दतीनं करायचं नाही,शहराचा विकास करायचा आहे. शहरातील नागरीकांचे प्रश्न सोडवायचे आहेत पण तुमच्याबरोबर आहोत नां, ठिक आहे आम्ही विरोधी पक्षाचे आहोत . अहो, एकेकाळी या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टीचे फक्त तीन नगरसेवक निवडुन यायचे मग त्यावेळी आम्ही काय तीन लोकांना बोलू द्यायचे नव्हते का, आम्ही त्यांना प्रत्येक विषयावर बोलू देत होतो. आणि तुम्ही यापुढे असेच वागणार असाल तर एकही विरोधक याठिकाणी बसणार नाही. तर या पध्दतीनं सभागृह पुन्हा चालवू नका. मा.महापौर, माझी आपल्याला दुसरी विनंती आहे की, जसं आपल्या उपमहापौरांना वाईट अनुभव आला तसाच मला सुध्दा वाईट अनुभव आलेला आहे.

माजी शिक्षण मंडळ सभापती सोपान लोंढे हे वारले आहेत ते वायसीएमएच ला आले होते तेथुन त्यांची मिसेस यांनी त्यांना घेवुन माझ्याकडे आली मी त्यांना घेवुन डी.वाय.पाटील हॉस्पिलला गेलो तिथं त्या ४/५ तास विनंती करीत होती परंतु त्यांनी त्यांना ॲडमिट करुन घेतलं नाही. मी शेवटी त्यांना फोन करून ठासुन सांगितल्यानंतर त्यांनी ॲडमिट केलं. तिथं ॲडमिट केल्यानंतर ते म्हणाले की, पहिलं पैसे ठेवा म्हणुन सांगितले म्हणजे इतकी वाईट परिस्थिती होती. मी त्यांना स्वत:पैसे खर्च करुन त्यांना ॲडमिट केलं. पण त्यांचा उपचार झाला नाही त्यांना डिस्चार्ज घ्यायला लावला आणि त्याच्या दुस-याच दिवशी त्यांच निधन झालं. मला असं कळलं की, सिमाताईंनी सांगितलं की, बिर्ला हॉस्पिटलचं असंच झालं. माझी आयुक्तांना विनंती आहे की, आपण कोरोनामध्ये सर्वांनी चांगल काम केलेले आहे, त्याबद्दल आपलं आणि मा.महापौराचं कौतुक केलेलं आहे. कोणत्याही नगरसेवकानं त्यांच्या प्रभागातील कोणी पेशंट असेल आणि त्यांनी डॉ.ना फोन केला तरी त्याठिकाणी ताबडतोब उपचार व्हायला पाहिजेत. परंतु तसं याठिकाणी होत नाही. तेंव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, आपण कोणकोणत्या हॉस्पिटलला अटॅच आहोत किंवा आदेश दिलेले आहेत आणि कुठे, कुठे आपल्याला सर्व्हीस मिळणार आहे ते सुध्दा आपल्याला कळलं पाहिजे. जेणेकरुन आम्हांला पण नागरीकांना सांगता येईल.धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह खरं म्हणजे गेल्या ३ तासापासून सर्व नगरसेवकांनी आपआपल्या भागामध्ये काल जे वादळांमुळे नुकसान झालं आणि झाडं रस्त्यावर पडल्यामुळे रस्ते बंद झाले. याठिकाणी प्रत्येकांनी आपआपली समस्या मांडली. अनेक सदस्यांनी सांगितले की, आपण सभागृहामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये काही निर्णय घ्यायला पाहिजे होते. अनेक सदस्यांनी काल-परवाच्या मिटींगमधील विषय काढले.सन्मा.आयुक्त साहेब, आपण मला वाटतं चेअरमनसाहेबांच्या वॉर्डामध्ये आणि ब-याच ठिकाणी आपण गेल्या महिनाभरापासून व्हीजीट करीत आहात माझ्याही वॉर्डामध्ये आज परिस्थिती बघीतली तर माझ्या वॉर्डामध्ये स्ट्रॉमवॉटरची साफसफाई झालेली आहे. नाले साफसफाई झालेली आहे. आमच्या माहितीनुसार, आपल्या विभागातील सर्व लोकांना नाले सफाईच्या संदर्भात आपण सूचना दिलेल्या आहेत. आणि तशा संदर्भात कामे चालू झालेली आहेत भोसरीच्या नाल्याच्या संदर्भात आपण स्वत: त्याठिकाणी दोन वेळा गेलेले आहात.

अशी परिस्थिती असताना जर तुम्ही त्याठिकाणी मिटींग करता, नाले सफाईची कामे चालू आहेत आणि प्रत्यक्षात त्याठिकाणी कामे होत नसतील असा काहींचा आरोप आहे. परंतु माझ्या माहितीनुसार, आयुक्तांनी नाले सफाईचे आदेश गेल्या महिन्याभरापासून दिलेले आहेत. आणि काल जी वादळामुळे घटना झालेली आहे खरं म्हणजे दुपारी ३ वाजेपर्यंत वादळ येण्याची काही परिस्थिती नव्हती. सारथीवर आपण तशा प्रकारचे निर्देश दिलेले होते. आणि गेल्या बुधवारी आम्हांला मिळालेल्या माहितीनुसार, आपण गेल्या बुधवारी आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात निर्देश दिलेले होते आणि तशा प्रकारे नियोजन करण्याचे आदेश दिलेले होते. पण याठिकाणी वृक्ष प्राधिकरण समितीच्या वतीने उल्लेख केला गेला की, आपआपल्या भागामध्ये त्यांच्याकडे मनुष्यबळ कमी असेल, मशिन कमी असेल तर त्याची मागणी आपल्याकडे करावी असे निर्देश तुमचे असताना त्या अधिका-यांनी ते निर्देशाची अंमलबजावणी केली नाही. मा.आयुक्त साहेब,आपण एक ८ दिवसापुर्वी जर आपण या आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात एक मिटींग घेऊन आम्हांला सूचना दिल्या असत्या आणि संबंधित अधिकारी हे त्याठिकाणी तशा प्रकारचे काम करत नसतील तर त्यांना ताबडतोब त्यांना बोलवून समज देण्यात यावी. काल काही नगरसदस्यांनी सांगितले आहे की, संबंधित अधिका-यांनी त्यांच्याकडे असलेला मोबाईल जाणुन-बुजून जर का बंद करण्याचा प्रयत्न केला असेल एवढया मोठया प्रमाणावर नागरीकांचे नगरसेवकांना फोन येत असतील किंवा त्याठिकाणच्या समस्या असतील किंबहुना नगरसेवकांनी त्यांच्या कार्यकर्त्याच्या माध्यमातुन रस्त्यावरची झाडं बाजुला केली असतील आणि मग आपला अधिकारी त्याठिकाणी पोहचत नसेल तर मग आपण जी मिटींग घेतली त्याला काय अर्थ आहे. अशी वेळ आपल्या सर्व सदस्यांवरती येत असेल तर अधिका-यांना आपण जे निर्देश दिलेले होते त्याचे पालन करीत नसेल तर त्यांच्यावर ताबडतोब प्रशासकीय कारवाई करावी. मगाशी ब-याच सदस्यांच्या माध्यमातून सांगितलं गेलं की, याठिकाणी सत्ताधारी पक्षाचं कोणी ऐकतच नाही. खरं म्हणजे या सभागृहामध्ये याठिकाणी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या वतीने मा.आयुक्त साहेब आणि त्यांच्या संपुर्ण टिमचा कोरोनाच्या संदर्भात जी काही कार्यवाही केलेली आहे त्याबाबतीत आपण त्यांच आणि त्यांच्या टिमचं आपण अभिनंदन केलेलं आहे. आणि आज त्याच आयुक्तांना आपण मिटींग मध्ये सांगतोय. मला वाटते की, आयुक्त साहेब तुम्ही आणि मी निर्देश दिल्यानंतर संबंधित अधिकारी काम करीत नसतील किंवा कामचुकार

असतील तर, नगरसेवकांचे फोन घेत नसतील किंवा फोन बंद करत असतील तर त्या अधिका-याची तातडीने चौकशी करावी आणि त्यामध्ये जर का ते दोषी आढळत असतील तर त्यांच्यावर कारवाई  करावी. अशी सूचना मी मांडतो. आणि तशा स्वरुपाचे आदेश मा.आयुक्त यांनी याठिकाणी द्यावेत. खरं म्हणजे याठिकाणी मगाशी उल्लेख झाला आणि मंगलाताईंनी त्यांच्या बोलण्यातून सांगितल की, पाणीपट्टी दरवाढीचा विषय आपण फेटाळलेला आहे. पाणीपट्टीत वाढ केलेली आहे परंतु आज त्यांच्याकडुन त्यांनी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला परंतु एक राजकीय उल्लेख याठिकाणी केला जातो  परंतु तिथेच एक राजकीय उल्लेख केला जातो की, हे खरं म्हणजे आमच्या सारख्या लोकाचं दुर्देव आहे. आणि ही परिस्थिती जर का आपण बघीतली  ३ वर्षापुर्वी भारतीय जनता पार्टीची सत्ता याठिकाणी आलेली आहे आणि हे खरं आहे की, २०१५ च्या आपल्याच  काळामध्ये  टेंडर काढलं आणि त्याची अंमलबजावणी आमच्या काळामध्ये चालू केलं. त्यानंतर आंध्रा धरण असेल, भामा-आसखेड धरण असेल या कामांना आपण गती देण्याचं काम आम्ही करतोय. खरं म्हणजे शहराची लोकसंख्या विचारात घेता येत्या काळामध्ये त्या त्या योजना अंमलात आणणं कसं गरजेचं होतं आणि ते आलं नसल्यामुळे आणि या लोकसंख्यावाढीमुळे पाण्याचं नियोजन आहे त्यामध्ये विस्कळीतपणा येत आहे. या कोरोनाच्या पार्श्वभुमीमध्ये अनेक कंपन्या/मॉल बंद आहेत आणि काही लोक या शहरातून दुस-या राज्यामध्ये गेल्यामुळे  पाण्याची कदाचित आपल्याला थोडीसी झळ पोहचत नसेल परंतु आजही बघीतले तर आपली रावेत बंधा-याची किंवा जलशुध्दीकरण केंद्र याठिकाणी पाणी उचलण्याची जी कॅपॅसिटी आहे ख-या अर्थानं त्या पंपामध्ये  बदल करण्याची गरज होती.आणि आपण आंध्र धरणाच्या माध्यमातून करतोय येणा-या काळामध्ये आपण ही समस्या लवकरच दूर करणार आहोत. परंतु याठिकाणी असं भासवलयं जातयं की, सत्ताधारी मंडळीच त्यामध्ये अपयशी आहे. याठिकाणी मी आवर्जुन उल्लेख करीन की, या जर का योजना मागच्या १०/१५ वर्षाच्या कालखंडामध्ये जशी लोकसंख्या वाढत आहे त्या अनुषंगाने तशा योजना या कालखंडामध्ये आणणे गरजेचं होत असं मला वाटते. खरं म्हणजे मगाशी योगेश बहल यांनी उल्लेख केली की, मला वाटत ते सगळयापेक्षा सिनियर नगरसेवक आहेत आणि त्यांनी सांगितले की, धन्वंतरी योजना किंवा विमा योजनेच्या संदर्भात याठिकाणी फक्त विमा योजनेच्यावर तरतुद वर्गीकरणाचा विषय होता. २०१९ ला या विमा योजनेला मान्यता मिळाली होती आणि

कालचा विषय हा विमा योजना या लेखाशिर्षावर ७ कोटी रु. तरतुद वर्गीकरणाचा विषय होता. मी स्वत: टाटा मोटर्स मध्ये कामगार म्हणुन काम करतो आणि कामगारांना या विम्यापासून कुठल्याही प्रकारचा धोका होणार नाही अशा पध्दतीचं काम आमच्याकडनं होणार नाही. अशा प्रकारची सूचना आम्ही आयुक्तांना दिलेली आहे. आणि मा.आयुक्तांनी कामगार संघटनांना याबाबतीत वेळोवेळी माहिती दिलेली आहे. परंतु आम्ही त्या खोलात जात नाही. परंतु कुठल्याही प्रकारे काहीही नसताना ७ कोटीचा भ्रष्टाचार झाला म्हणुन आरोप करतात. खरं म्हणजे अशा सिनियर सदस्यांनी अशा प्रकारे बेजबाबदारपणे बोललं जात आहे. मगाशी सिमाताईंनी सांगितलं की, जेंव्हा आपण आरोप करतो ते आपण सिध्द करुन दाखवू शकतो का? ही भूमिका आपण तपासली पाहिजे. आणि या सभागृहाची दिशाभूल करण्याचं काम आपल्या माध्यमातून होत असेल तर  त्याचा देखील मी तिव्र निषेध करतो. आणि ख-या अर्थानं सन्मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, धन्वंतरी योजना किंवा विमा योजना मा.आयुक्तांच्या माध्यमातून आणलेली आहे यामध्ये विमा योजनेच्या संदर्भातील अधिकची माहिती याठिकाणी  कामगार संघटनेला दिलेली आहे. परंतु आमच्या नगरसदस्यांना जर त्याबाबतीत काही माहित नसेल तर विमा योजनेच्या संदर्भातील नेमकी काय भूमिका आहे हे आपण सांगावी त्या भूमिकेतून जर का कामगारांच जर का त्यातुन नुकसान होत असेल तर आमचं तर म्हणणं असं आहे की, धन्वंतरी योजना आणल्यानंतर याठिकाणी महानगरपालिकेचे ३० ते ४० कोटी रु.खर्च होत होते. मला तर असे वाटते की, काही लोकांची दुकानदारी या धन्वंतरी योजनेच्या माध्यमातुन बंद होत असेल त्यामुळे त्यांचे पोटसुळ उठलेलं असेल असे मला वाटते. आणि मा.महापौर साहेब आपण मा.आयुक्त साहेबांना आदेश देण्यात यावे की, धन्वंतरी योजनेच्या माध्यमातून होणारा खर्च आणि  विमा योजनेच्या माध्यमातून होणारा खर्च याची माहिती देण्यात यावी. या दोन्ही योजनेच्या माध्यमातून महापालिकेची नेमकी किती बचत होते की नाही आणि कामगारांना सुध्दा धन्वंतरी मध्ये जो फायदा होता तोच फायदा विमा योजनेच्या माध्यमातून मिळतो की नाही याची माहिती देणेत यावी. अन्यथा आमच्यावर चिखलफेक करण्याचं काम ही मंडळी आमच्यावर करीत आहेत असं मला याठिकाणी वाटतं. विमा योजनेच्या माध्यमातून आपण वायसीएमएच वर २०० कोटी रु.खर्च करतो तर माझ्या सारख्या कार्यकर्त्याला वाटतं की, विमा योजना किंवा धन्वंतरी योजनेपेक्षा जर का आपण वायसीएमएच वर एवढा मोठा खर्च करीत

असाल तर या वायसीएमएच मध्ये जर का आपल्या कर्मचा-यांना चांगली सुविधा देता आली आणि त्या व्यतिरिक्त जर का बाहेर  काही उपचार करावे लागले तर करावे अशी आमची भूमिका आहे. आमचा हट्ट नाही की, याठिकाणी विमा योजना आणली पाहिजे. परंतु दुर्दैवाने याठिकाणी सांगितलं जात्त आहे आणि आमच्यावरती आरोप केले जात आहेत ते फार चुकीचे आरोप आहेत. आणि मा.महापौर साहेब, या विमा योजनेच्या संदर्भात माहिती देण्याचे आदेश देणेत यावेत. आणि जर का विमा योजनेमध्ये जर का चुकीचं काही असेल तर या विमा योजनेपेक्षा आपल्या वायसीएम हॉस्पिटलमध्ये चांगल्या पध्दतीची ट्रिटमेंट देण्यात यावी अशा प्रकारची भूमिका याठिकाणी मांडत आहोत. या सभागृहामध्ये आपण प्रत्येक विषयावर चर्चा केलेली आहे परंतु प्रत्येक वेळेला याठिकाणी  राजकारणाच्या  भूमिकेतून  विरोधाच्या माध्यमातून याठिकाणी आरोप केले जात आहेत. परंतु सातत्याने गेल्या ३ वर्षामध्ये जर का आपण बघीतलं तर या महापालिकेच्या भ्रष्टाचाराचा विषय काढला तर  दरवर्षीचा जर का उल्लेख केला तर दरवर्षी आपण किती सेव्हींग करु शकतो याचाही उल्लेख करा आणि गेल्या १५ वर्षापासून जी कामे झालेली आहेत त्याची तपासणी करावी. आणि मा.महापौर आणि मा.आयुक्तांना विनंती करतो की, धन्वंतरी योजना आणि विमा योजनेच्या संदर्भात कामगार संघटनांना जी  माहिती दिलेली आहे त्यासंदर्भात खुलासा करावा अशी विनंती करतो. आणि मा.आयुक्त साहेबांनी अधिकारी / कर्मचारी यांना आदेश दिल्यानंतर जे अधिकारी कामकाजामध्ये कामचुकारपणा करतात, टाळाटाळ करतात, नगरसदस्यांच ऐकत नाहीत त्यांना सूचना देण्यात याव्यात आणि त्यांच्यावर कारवाई करणेत यावी. अशी विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य. आता अनेक विषयांवरती सविस्तर चर्चा झालेली आहे. अनेक मुद्दे समोर आलेले आहेत एक एक मुद्दयांचा मी थोडक्यात खुलासा करीन. सर्वात महत्वाचा जो मुद्दा आहे तो निसर्ग चक्रवादळ आपल्या शहरात धडकलं आणि त्याच्याने जी हानी झालेली आहे ती निश्चितपणे गंभीर बाबी आपल्या निदर्शनास आलेल्या आहेत. प्रशासनान त्याची गंभीर दखल घेतलेली आहे. त्या अनुषंगाने आपत्ती व्यावस्थापन आपल्याकडे सध्या आहे का ? आपत्ती व्यावस्थापनाचा आराखडा केला आहे का? त्याची बैठक झाली आहे का ? त्याच्या अनुषंगाने  कारवाई  काय  केली  आणि अडचणी ज्या आल्या त्याच्या अनुषंगाने

पहील्या प्रथम मी खुलासा करतो. आपल्या येथे दरवर्षी आपत्ती व्यावस्थपनाचा आराखडा तयार करण्याची कारवाई प्रशासनाच्या वतीने होत असते. पुरनियंत्रण करण्यासाठी ही जी महत्वाची आपत्ती आपल्या शहरात येते त्याच्या अंतर्गत पुर नियंत्रण आराखडा महानगरपालिकेनी तयार केलेला आहे. महानगरपालिकेचा आराखडा तयार झाल्यानंतर महानगरपालिका स्तरावरती त्याचा आढावा झालेला आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी जे की जिल्हयाचे जिल्हा आपत्ती व्यावस्थापक आहेत त्यांच्या स्तरावरती आणि विभागीय स्तरावरती देखील त्याचा आढावा झालेला आहे. त्यांनतर राज्यस्तरावरती सन्मा.मुख्यमंत्री यांनी देखील आपल्या आपत्ती व्यावस्थापनाचा विभागवार आढावा घेतलेला आहे. परत एकदा २७ मे २०२० रोजी सर्व अधिका-यांची बैठक घेवून पुरनियंत्रणाच्या संदर्भातल्या करावयाच्या कारवाईचा पुनरनियोजन आणि त्यांना देण्यात आलेला आढावा घेवून तशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार ज्या ज्या गोष्टी आता सन्माननीयांनी मांडल्या त्याच्या अनुषंगाने पुर्वतयारी करण्यात आलेली होती. निसर्ग चक्रीवादळाची पुर्व सूचना प्राप्त होताच आपत्ती व्यावस्थापन आराखडयाच्या गरजेनुसार आपण नागरीकांना पुर्वसूचना देण्याची कार्यवाही संपुर्ण शहरामध्ये विवीध माध्यमाच्या माध्यमातून पुर्ण केलेली आहे. त्याच्या अनुषंगाने शहरामध्ये सर्व नागरीकांना पुर्वसूचना असल्याने आपल्या शहरामध्ये कुठल्याही प्रकारची मनुष्यहानी या कारवाईमध्ये झालेली नाही. निश्चितपणे चक्रीवादळ जे आपल्याकडे आलं त्याची इन्टेन्सिटी किती असणार आहे, ते कुठल्या दिशेनी वळणार आहे याची एक्झॅक्ट आपल्याला निश्चित माहिती नसते. त्याची इन्टेन्सिटी आपल्याकडे येत असताना किती असणार आहे, त्याचा इम्पॅक्ट नक्की कुठल्या प्रमाणात आपल्या येथे जाणवणार आहे याची देखील आपल्याला माहिती नसल्याने संपुर्ण शहरामध्ये सतर्कता बाळगण्याचे निर्देश आपण संपुर्ण शहरातल्या आपत्ती व्यावस्थापन यंत्रणेला देण्यात आलेले होते. सन्मा.स्थायी समिती सभापती यांच्याशी देखील या संदर्भामध्ये स्थायी समिती मिटींग त्या दिवशी होती त्यांच्याशी चर्चा झालेली होती की संपुर्ण प्रभाग अधिकारी, विभागाचे अधिकारी हे आता वादळ येणार असल्यामुळे आपल्या प्रभागात आम्ही त्यांना ठेवलेलं आहे. त्यांची तशी अनुमती घेवूनच त्यांना अनुपस्थित राहण्याच्या सूचना देवूनच आम्ही पुर्ण बैठक त्यावेळेला घेणेत आलेली होती. जे महत्वाचे अधिकारी जसं की, गार्डन असेल, अग्निशमन असेल, प्रभाग अधिकारी असतील, स्थापत्य, बांधकाम परवाना विभाग असेल, संबंधित अधिकारी असतील यांना

सूचना देण्यात आलेल्या होत्या. आपल्या इकडे महत्वाचा घटक त्याची आज कुठेही हानी झालेली नाही. त्याची देखील पाहणी सकाळपासून आपल्या विभागाकडन सुरु होत होती ते म्हणजे विवीध ठिकाणी असलेले होर्डीग्ज आणि टॉवर्स. जर होर्डीग्ज किंवा टॉवर्स यांची जर कुठेतरी पडझड झाली असती, त्याच्यामध्ये कुठेतरी अडचण झाली असती, काही खराब झालेल्या भिंती असतील त्याची कुठे पडझड झालेली असतीतर या संदर्भामध्ये बांधकाम परवाना विभागाला सूचना देण्यात आलेल्या होत्या व बीट निरीक्षकाच्या माध्यमातून कुठल्याही ठिकाणी होर्डीग्ज किंवा अन्य गोष्टींची पडझड होणार नाही याची दक्षता घेतली आहे की नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचना सकाळपासून देण्यात आलेल्या होत्या आणि आमची यंत्रणा फिल्डवरती लक्ष ठेवून होती. महत्वाचा जो मुद्दा आहे की ज्यावेळेला ऍक्च्यूअल आपत्ती आली, आपत्ती कालावधीमध्ये साधारणतः दुपारी चार ते पाच या कालावधीमध्ये वा-याचा वेग सर्वाधिक होता. त्या कालावधीमध्ये आपल्याकडे मोठया प्रमाणात वृक्ष पडझड झालेली आहे. काही ठिकाणी पत्रे उडून जाण्याचे प्रकार देखील निदर्शनास आलेले आहेत. त्या अनुषंगाने आपल्या विवीध मार्गातून मोठया संख्येनी कॉल्स प्राप्त झाले. एकूण २२४ तक्रारी या उदयान विभागाला प्राप्त झाल्या आणि साधारणतः १०७ तक्रारी या फायर विभागाला प्राप्त झाल्या. याच्या व्यतिरीक्त अन्य मौखिक स्वरुपाच्या तक्रारी विवीध अधिका-यांकडे विवीध फोन्सद्वारे, नगरसदस्यांमार्फत देखील होत होत्या. कारण अनेक नगरसदस्यांकडे देखील मोठया प्रमाणामध्ये नागरीकांकडन तक्रारी प्राप्त होत होत्या. जरी आमच्याकडे या २२४ + १०७ इतक्या तक्रारी प्राप्त असतील तरी एकएका तक्रारीच्या मागे त्या त्या परिसरामध्ये अनेक झाडे पडलेली असल्याने त्यामुळे तक्रार जरी एक असलीतरी त्या ठिकाणी तीन ते दहा इतकी संख्या झाड पडले असल्याची किंवा फांदया पडल्या असल्याची ही त्याच्यामध्ये व्याप्ती आहे. या व्याप्तीला विचारात घेता आपल्याकडे जेवढी उपलब्ध मॅन पॉवर आहे त्याच्यासाठी जी अतिरीक्त आपण मॅनपॉवर उपलब्ध करुन दिलेली होती या सगळयांचा एकत्रीत आढावा घेता पुढील ४८ तास आपल्याला अजूनही या सगळया तक्रारी पुर्णपणे क्लिअर करण्यासाठी लागणार असणार आहेत असा आमचा अंदाज आहे. याकरिता आपल्याकडे जी मॅनपॉवर सध्या उपलब्ध आहे त्यामध्ये उदयान विभागाकडे दोन पथक आहेत. चार चार वॉर्डमधले एक एक पथक त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. त्याच्या माध्यमातून काम करत असताना त्याना देखील अतिरीक्त मॅनपॉवर देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या आणि

अतिरीक्त दहा दहा मजूर त्यांच्याकडून उपलब्ध करुन घेणेत आलेले होते. स्थापत्य विभागाच्या माध्यमातून दोन जेसीबी उपलब्ध करुन देण्यात आलेले होते व तीन क्रेन देखील उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. मात्र एखादया ठिकाणी ज्यावेळेला कॉल येतात त्यावेळेला त्या कॉलच्या सोबत मग तीकडच्या मागणीनुसार नागरीकांच्या अपेक्षानुसार त्याठिकाणी एखाद पथक गेल्यानंतर त्याठिकाणच्या अन्य छोटयामोठया ज्या काही तक्रारी असतात त्यादेखील तात्काळ पुर्तता कराव्यात असा रोख ज्या ज्या ठिकाणी आमची पथक गेली त्यांच्याकडे पाहण्यात आला. त्यामुळे जी मेन तक्रार समोर होती ती दुर करत असताना त्या भागातील इतरही तक्रारी सॉल्व्ह करताना एक एक भागात जास्त कालावधी लागत होता, त्यामुळे अशा सुचना फायर विभागाला देण्यात आल्या. आपल्याकडे असलेल्या फायरच्या गाडया, आपल्याकडे उपलब्ध असलेले देवदूत व्हेईकल्स की ज्याच्यामध्ये  प्रखरता आहे या व्यतिरीक्त आपल्याकडे उदयान विभागाच्या ज्या गाडया आहेत आणि जिथे जेसीबी पटकन उपलब्ध होवू शकतात त्याठिकाणी आपण रस्ता अधि उगळून घेणं याच्यासाठी आपली मॅनपॉवर पाठवावी. मोठया प्रमाणात आपण जरी कॉल्स पुर्ण करु शकलेलो नसलोतरी काल पर्यंत आपण साधारणतः उदयान विभागाकडन २२४ कॉल्स पैकी १२७ कॉल्स आणि अग्निशमन विभागाकडन १०७ तक्रारी पैकी ७४ कॉल्स ॲड्रेस केले गेलेले आहेत. निश्चितपणे काही भागातल्या तक्रारी अदयापपर्यंत निरस्त होणे बाकी आहे. की जे काम आज दिवसभरामध्ये आणि आवश्यकतेप्रमाणे उदया किंवा त्याच्या पुढील कालावधीमध्ये देखील सुरु राहणार आहे. मी आता जीबी झाल्यानंतर अतिरीक्त मॅनपॉवर जी काही आपल्याला बांधकाम परवाना विभागाकडन किंवा अन्य कुठल्याही विभागाकडून उपलब्ध करुन घेता येईल ते उपलब्ध करुन जास्तीत जास्त काम उदयाच्या संध्याकाळपर्यंत पुर्ण करुन घेण्याचे निर्देश मी आज आपत्ती व्यावस्थापन विभागाला देतो आहे. या व्यतिरीक्त मी सदर विभागाचे सध्याचे इन्चार्ज डी.एन.गायकवाड यांना असेही निर्देश देतो आहे की आपत्ती व्यावस्थापनाच्या अनुषंगाने ज्यावेळेला आपल्याकडे आपत्ती येते त्यावेळेला आपल्याकडे मोठया प्रमाणात नगरसदस्य फोन करतात. त्या प्रत्येकाला आपल्याला रिस्पॉ ड करणं तात्काळ जरी शक्य नसलतरी कॉलबॅग करण ही त्यांची जबाबदारी आहे, त्यांनी याची तात्काळ खबरदारी घ्यावी भविष्यामध्ये अशा स्वरुपाच्या तकारी कुठल्याही तक्रारी कुठल्याही अधिका-याकडन येणार नाहीत याची नोंद आणि दक्षता देखील त्यांनी घ्यावी आणि तशी लेखी समज देण्याच्या सूचना मी

प्रशासन विभागाला देतो आहे. आपल्याकडे जो पुर व्यावस्थापना आराखडा जो आहे तो आपल्याकडे तयार झालेला आहे या अनुषंगाने मी खुलासा करु इच्छितो की कोरोनाची जी साथ आपल्या येथे सुरु झाली ती साधारणतः ११ मार्च नंतर आपल्या शहरामध्ये लागू झाली. तेव्हापासून अन्य गोष्टी ज्या आपण नियमीतपणे या कालावधीमध्ये करतो या टप्याटप्यान लॉकडावून नंतर बंद करण्यात आल्या. लॉकडावून तीनच्यानंतर म्हणजे साधारणतः मे महीन्यापासून आपल्याला पावसाळापुर्व काम करण्याची अनुमती मिळाली आणि त्याच्या अनुषंगाने नियोजन आपण एप्रिल महीन्यापासून आपल्या स्तरावरती आरोग्य विभागाच्या मदतीन आपण सुरु केलेलं होतं. तथापि मजूरांची उपलब्धतता, मशिनरीची उपलब्धतता आणि कोरोनाच भयावह वाटणार असं वातावरण या गोष्टीमुळे या वर्षी थोडयाफार प्रमाणामध्ये आपला जो कामाचा वेग असतो तो कमी राहीलेला आहे ती बाब देखील तीतकीच मान्य करावी लागेल. मात्र त्याही परिस्थितीमध्ये आपल्या यंत्रणेनं अनेक महत्वाचे जे नाले आहेत ते साफ करुन घेतलेले आहेत यासाठी विशेष यंत्रणा देखील आपण यावेळेला लावलेली होती. जो विशेष प्रकारचा जेसीबी आहे तो अडचणीच्या नाल्यामध्ये उतरु शकतो. त्याची देखील मदत घेवून आपण अनेक ठिकाणी या नाले सफाईच काम केलेल आहे. मात्र पुढील सात दिवसामध्ये जे काही पाच ते दहा टक्के काम उर्वरीत असण्याची शक्यता आहे ते पुर्ण करण्यात येणार आहे तशा स्वरुपाच्या सुचना मी विभागाला देत आहे. त्याच्यासाठी काही अतिरीक्त मशिनरी जर आवश्यक असेलतर ती तात्काळ उपलब्ध करुन घेवून ते देखील काम पुर्ण करुन घेण्यात येणार आहे. महत्वाची जी बाब आहे ती अनेक स्लम्समध्ये आपल्या येथे स्ट्रॉर्म्स, वॉटर सिव्हेज लाईन्स या दोन्ही एकत्र झालेल्या आहेत अणि त्याचा परिणाम असा होतो की लो-लाईन्स ऐरीयामध्ये जर पाण्याची पातळी वाढलीतर त्याठिकाणी अनेक घरामध्ये बॅक मारण्यात येतं आणि त्यामुळे घरामध्ये पाणी साचल्याने किंवा टॉयलेटमध्ये पाणी बॅक आल्याने मोठया प्रमाणात तक्रारी येतात. माई काटेंनी जो विषय मांडलेला होता त्यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेवून ३० मे रोजी रामदास तांबे, जॉईट सिटी ईंजिनीअर्स व पर्यावरण, पाणीपुरवठा आणि सिव्हेज जलनिस्सारण आहे त्यांना मी सुचना दिलेली होती त्यांनी पाहणी करुन अतिरीक्त मॅनपॉवर त्या भागामध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे. अशाचप्रकारे जवळपास ज्या ज्या महत्वाच्या स्लम्समध्ये आपल्या इथे वॉटर लॉकींग चर्चा होते जसं की महात्मा फुलेनगर असेल, लांडेवाडी असेल किंवा दापोडीतल्या ज्या चार महत्वाच्या स्लम्स आहेत, अन्य अनेक

स्लम्स आहेत की ज्याठिकाणी ड्रेनेज शिरण्याच किंवा जास्त पाऊस पडला तर आपल्या कडे पाणी शिरण्याच्या ज्या अडचणी होतात त्याठिकाणचे सगळे जे ड्रेनेज चेंबर्स आहेत ते साफ करण्यासाठी अतिरीक्त मॅनपॉवर लावण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. काही भागामध्ये मात्र सध्या कन्टेन्मेंट झोन असल्याने त्याठिकाणच थोडस काम जरी स्लो झालेल असलतरी स्थानिक कामगार उपलब्ध करुन ते देखील काम पुढील सात ते आठ दिवसामध्ये पुर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात येत आहेत. यासोबतच ड्रेनेज लाईनचे जे रुटीन मेन्टेनंन्स आहे जी आपल्याकडे मोठी रिसायकलर मशिन्स आहेत त्या मशिनसच्या द्वारे मेन ड्रेनेज लाईन्सची तीकडन अडचण होवू शकते त्या क्लिन करण्याच्या सूचना यापुर्वी दिलेल्या आहेत. बराच भाग आपण क्लिन करत आणलेला आहे जसं की दोन वर्षापुर्वी धनगरबाबा मंदीराचा भाग असेल की ज्या ठिकाणी मोठया प्रमाणामध्ये वॉटरलॉकींग झाल होत किंवा खराळवाडीचा भाग असेल की त्याठिकाणी वॉटर लॉकींग झालेलं होतं. अशा वेगवेगळया भागामध्ये आपल्याकडे जे काही वॉटर लॉकींग होतं त्याची नोंद घेवून त्याठिकाणी विशेष उपाययोजना करण्यात येत आहे. मोशी-जाधववाडी येथे गेल्यावर्षी मोठया प्रमाणात वॉटर लॉकींग झालेल होतं त्याठिकाणी नाला जो काही बुजवण्यात आलेला होता तो उघडा करुन पाण्याला वाट करुन देण्यासाठी जी काही व्यवस्था करावी लागत आहे ती स्थापत्य विभागामार्फत करण्यात येत आहे. अदिनाथनगर भोसरी याठिकाणीही गेल्या वर्षी मोठया प्रमाणात पाणी साठलेलं होतं आणि त्याच्या अनुषंगाने तीथे अडचण झालेली होती त्याची मी स्वतः पाहणी केलेली आहे. त्याठिकाणी संपुर्ण नाल्यावरचा रस्ता तोडून नाला जो चोकअप झालेला आहे तो पुर्ण क्लीन करण्याची प्रक्रीया सुरु आहे. पुढील सात दिवसामध्ये  वॉल फुटींगवरती हे काम पुर्णपणे नाला मोकळा करुन पुढील ती कारवाई आपल्याला रस्ता दुरुस्ती कराण्याची आहे. ते करण्याच आपत्तकालीन परिस्थिती मध्ये नियोजन करण्यात येत आहे. चिखलीमध्ये देखील गेल्या वर्षी काही भागामध्ये जस की साने चौकाच्या परिसरामध्ये पाणी साठलेल होतं त्याठिकाणी देखील अदयापपर्यंत काम सुरु आहे. पुढील सात दिवसामध्ये उर्वरीत तीकडच काम पुर्ण करुन घेण्यात येणार आहे. ज्या काही जागा आपल्या इकडे वेळोवेळी वॉटरलॉकींग होतात त्या आयडेन्टीफाईड आहेत आणि त्याठिकाणी स्थापत्य विभाग आणि जलनिस्सारण विभाग यांच्या माध्यमातून ते सगळे भाग पुढील सात दिवसामध्ये पुर्ण करुन घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. एक महत्वाचा जो भाग आहे तो

म्हणजे आपल्या इकडे अनेक काम आपण शहरामध्ये सुरु केलेली होती. त्याच्यामध्ये महत्वाच म्हणजे रस्त्याची डागडूजी, रस्त्याची दुरुस्ती असेल किंवा रस्त्याची पुर्नबांधणी असेल किंवा नवीन रस्त्याच काम असेल किंवा एखादया ब्रीजच किंवा अंडरपासच काम असेल ही काम आपण मोठया प्रमाणात सुरु केलेली होती आणि आपली अपेक्षा अशी होती की पावसाळयापुर्वी मोठया प्रमाणामध्ये आपला जो मेजर काम करण्याचा पिरीएड असतो ते काम संपवण्याचा मनोदय आपल्या प्रशासनाचा होता. अनफॉरच्यूनेटली मार्च महीन्यापासून कोरोना आपल्या शहरामध्ये आल्यामुळे हा सगळा जो महत्वाचा आपला काम संपवण्याचा पिरीएड असतो तो आपल्या हातून गेलेला आहे. त्यामुळे अत्यंत आवश्यक असणारी रिस्टोरेशनची जर काम असतीलतर ती देखील आपण साधारणत: मे महीन्यामध्ये करतोत ही आपल्याला पुर्ण करता आलेली नाहीत. यासोबतच आपल्या इकडे मे महीन्याच्या सुरवातीला आपल्याला काही अत्यंत पावसाळयाच्या पुर्व तयारी साठीची काम जे अनुज्ञेय करण्यात आली त्याच्यात ज्या कामामध्ये मोठया प्रमाणात खोदकाम करुन ठेवलेल होतं जस की बेसमेंटसाठी खोदून ठेवलेलं आहे आणि तो आता भराव करणं किंवा तीथे बांधकाम करुन प्लिन्थ पर्यंत काम आणण गरजेच आहे. अशा स्वरुपाची सुमारे १०५ काम आणि अतिरीक्त इतर महत्वाची इतर विभागाची अशी काही काम असे साधारणत: १२५ च्या आसपास कामानाच आपण फक्त मंजूरी देवू शकलेलो आहोत. आता पुढील काही दिवसामध्ये लॉकडावून अजून  शिथील झालेल आहे, उर्वरीत ज्याठिकाणी रस्ते किंवा सिमेंट रस्ते करण्यासाठी खोदकाम करुन ठेवलेलं आहे त्याठिकाणी तात्पुरती डागडूजी करुन देण्याच्या सूचना आजच सकाळी विभागाला मी दिलेल्या आहेत. त्यांच्या मार्फत पुढील पंधरा दिवसामध्ये याठिकाणी वॉटरलॉकींग होणार नाही याची दक्षता संबंधित स्थापत्य विभागाकडन घेण्यात येणार आहे. या वर्षी काही काम करण्यासाठी आपल्याला निश्चित अडसर झालेला आहे. याच्यासाठी कोरोनामधील लॉकडाऊनची स्थिती हा महत्वपुर्ण अडसर आपल्याला राहीलेला आहे. मात्र सध्या तस लॉकडाऊन उघडलेल आहे त्याप्रमाणामध्ये आपल्याकडे मॅनपॉवर जशी मिळेल तशी उपलब्ध करुन पुढील पंधरा दिवसामध्ये प्रत्येक्ष मोठया प्रमाणामध्ये मान्सूनचा प्रादूर्भाव होण्याच्या पुर्वी ही काम पुर्ण करुन घेण्याचा प्रयत्न प्रशासनाचा राहणार आहे. त्यासाठी जो काही  निधी लागेल तो या अडचणीच्या स्थितीत देखील पुर्णपणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. दिघीमधील सन्मा.नगरसदस्य विकास डोळस यांनी जो मुद्दा मांडलेला आहे की

उपअभियंत्यांना तांत्रिक ज्ञान त्यांच्याकडे दिसून आलेल नाही. मी अप्पर आयुक्त संतोष पाटील यांना सुचित करतो आहे की त्यांनी संबंधित उपअभियंत्यांच्या तांत्रिक ज्ञानाची तांत्रिक जॉईट सिटी ईंजिनीअरच्या माध्यमातून चौकशी करुन घ्यावी व पर्याप्त तांत्रिक ज्ञान त्यांच्याकडे उपलब्ध नसेलतर त्यांची योग्य पध्दतीची विभागीय चौकशी सुरु करावी. अशाचप्रकारे ज्याठिकाणी कोणत्याही विभागाकडन जर रिस्पॉन्ड करण्यामध्ये दिरंगाई होत असेलतर त्या दिरंगाईला जो कोणी कर्मचारी अधिकारी जबाबदार असेल त्याच्यावरती वेळीच कारवाई करण्याचे प्रयोजन याठिकाणी ठेवत आहे. कोरोनाच्या संदर्भात आपण परवाच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वच सदस्यांनी प्रशासनाच कौतूक केलेलं आहे आणि त्या बद्दल मी पहील्याप्रथम संपुर्ण सभागृह, सर्व सन्मा.सदस्य, सर्व सन्मा.पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनीधी या सर्वांच आभार मानत आहे. कारण आपल्या सर्वांच्या आणि पर्यायान या शहरातील सर्व नागरीकांच्या, पत्रकारांच्या, वैदयकीय आणि आरोग्य विभागाच्या, पोलीसांच्या मदतीशिवाय आपण एवढ चांगल काम करु शकलो नसतो. मात्र मला याच पार्श्वभूमीवर एक महत्वाची गोष्ट देखील आपल्याला सर्वाच्या निदर्शनास आणून दयायची आहे ती म्हणजे आपण केवळ या पुर्ण कोरोना महामारीच्या केवळ सुरवातीच्या टप्प्यावरती आहोत. ही केवळ सुरवात आहे आपली सुरवात जरी चांगली झालेली असलीतरी ख-या अर्थाने जो काही या महामारीचा प्रसार आहे तो आता आपण लॉकडावूनच्या बाहेर पडत असताना मोठया प्रमाणामध्ये आपल्याला सामोर जाव लागणार आहे. त्यामुळे असं समजण्याच कारण नाही की पहील्या टप्प्यामध्ये आपल्याकडे कमी संख्या राहीली, केसेस कमी राहील्या याचा अर्थ आपण सुरक्षीत झालो आणि आता आपण पुर्वपदावरती जीवनमान घेवून जाउ शकतो तर ही गोष्ट निश्चितपणे सर्वांनी मनातून काढून टाकली पाहीजे. त्याकरिता आपण वेळोवेळी महानगरपालिकेच्या माध्यमातून वेगवेगळया माध्यमाचा त्यासाठी वापर करतो आहोत. नागरीकांना कोरोना सोबत जगणं, हे काय आहे, कशा पध्दतीन आपल्याला कोरोनाला सामोर जायच आहे याच्या संबंधामध्ये आपल्या सर्वाच्या माध्यमातून प्रचार आणि प्रसिध्दी होण्याची आवश्यकता आहे. कारण जसजसे आपण लॉकडावून उघडलेल आहे तस मोठया प्रमाणामध्ये आपल्या येथे केसेसला पुनश्चपणे यायला सुरवात झालेली आहे. दुसरी महत्वाची गोष्ट जी आहे ते आपल्या इकडचे जे डेन्स ऐरीया जे आहेत, विशेषत्वान स्लम ऐरीया आहेत किंवा जुनी गावठण आहेत किंवा त्या भागामध्ये मोठया प्रमाणात डेन्ससिटी आहे त्या भागामध्ये प्रसार वाढताना

दिसत आहे. अशा परिस्थितीमध्ये जे काही बाधित नागरीक आहेत त्यांच तात्काळ कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करणं, कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करुन त्यातील जे पॉझिटीव्ह नागरीक आहेत त्यांना वेळीच आयसोलेट करणं आणि उर्वरीत नागरीकांना होम क्वॉरंटाईन करनं किंवा ज्यांना होम क्वॉरंटाईन करनं शक्य नसेल जे की स्लम मध्ये राहत असतील की ज्यांना होम क्वॉरंटाईन करनं शक्य नाही त्यांना तात्काळ इन्सिटीटयूशनल क्वॉरंटाईन करनं हे मोठ काम आपल्याला यापुढे देखील मोठया संख्येनी करत रहाव लागणार आहे. याकरिता सर्व प्रभागातील सन्मा.सदस्यांची आम्हांला मोठया प्रमाणामध्ये मदत लागणार आहे. कारण अनेकवेळेला आपण जानताच की कोरोनामध्ये साधारणतः ८० टक्के नागरीक पॉझिटीव्ह जरी असलेतरी कुठल्याही प्रकारची लक्षण त्यांच्यात दिसून येत नाहीत. त्यामुळे एकप्रकारच डिनायल असतं की आम्हांला काहीच होत नसताना तुम्ही आम्हांला का बाहेर काढत आहात किंवा तपासणी का करु इच्छित आहात आणि या प्रकारच डिनायल अनेक नागरीकांमध्ये असल्यामुळे किंवा त्यांना त्या प्रकारची माहिती योग्य प्रकारची नसल्याने आपल्या नजीकचा विश्वासू आपला जो लोकप्रतिनीधी आहे त्यांनी विनंती केल्यानंतरच अनेकवेळेला नागरीक ऐकत आहेत त्यांच सहकार्य घेवूनच आपण अनेकवेळेला घरातन तपासणीसाठी बाहेर काढू शकत आहोत. त्यामुळे मला या सर्वसाधारण सभे समोर सांगायच आहे की आपणा सर्वांची आतापर्यंत जशी मदत मिळालेली आहे याच्यापेक्षा जास्त मदत भविष्यातील कालावधीमध्ये लागणार आहे. कारण आतापर्यंत आपल्याकडे कोरोना बांधितांची संख्या मर्यादीत होती पण ही यापुढे वाढत जाणार आहे. सध्याचा जर कोरोनाचा डबलींगचा रेट गृहीत धरलातर साधारण तो दहा ते बारा दिवस इतका आहे. याचा अर्थ महीन्याच्या कालावधीमध्ये पाच ते सहा पट इतकी आपली संख्या याच वेगाने जर आपली कोरोनाची स्थिती वाढत राहीलीतर ती महीना अखेरीपर्यंत आज आपल्याकडे जेवढे आहेत त्याच्या पाच ते सहा पट आपली रुग्ण संख्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पर्यायाने आपल्याकडे आडीच ते तीन हजार इतके रुग्ण असू शकतील असा आपला अंदाज आहे. ज्यावेळेला दोन ते तीन हजार रुग्ण आपल्याकडे येतात, साधारणतः दोन हजार इतकी रुग्णसंख्या आपण गृहीत धरलीतर त्यापैकी सिन्टोमॅटीक म्हणजे ज्यांच्या मध्ये कुठल्याही प्रकारची लक्षण आहेत की त्यांच्यावर ट्रिटमेंट देण्याची आवश्यकता पडते अशा रुग्णांची संख्या दोन हजारच्या पंधरा टक्के इतकी असते म्हणजे साधारणतः तीनशे त्यामुळे आपण आपल जे कोव्हीड हॉस्पिटल यशवंतराव चव्हाण मेमोरीअल हॉस्पिटल जे आहे

ते आपण पुर्णतः कोव्हीड रुग्णालय म्हणून घोषीत केलेलं आहे. आतापर्यंत आपण खाजगी क्षेत्रातील आठ रुग्णालय फायनल केलेली असलीतरी काही अंशी आदित्य बिर्ला रुग्णालयामधले दाखल झालेले रुग्ण वगळता आतापर्यंतचा सगळा भार हा महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण मेमोरीअल हॉस्पिटल यांनी ट्रिट करण्याचे सिन्टोमॅटीक पेशंट आहेत या सगळयांचा भार आपल्या रुग्णालयानी घेतलेला आहे. यापुढे देखील जसजशी सिन्टोमॅटीक पेशंटची संख्या वाढत जाणार आहे तसतस पुर्णार्थानं वायसीएम रुग्णालय आपल्या कामाला येणार आहे. वायसीएममध्ये एकूण रुग्णसंख्येच्या साधारणतः पाच टक्के रुग्ण हे आयसीयूमध्ये जावू शकतात. कारण त्यांना विशेष अशा अतिदक्षतेची गरज पडते. त्यामुळे आपल्याकडे एकाचवेळेला दोन हजार रुग्ण जर पॉझिटीव्ह जर झालेतर त्याच्या साधारणतः पाच टक्के म्हणजे साधारणतः शंभर रुग्णांना आपल्याला त्यावेळेला आयसीयूमध्ये ठेवण्याची गरज भासू शकते. एवढया संख्येच्या रुग्णांना आपल्याला जर आयसीयूमध्ये ठेवायची वेळ आली तर तेवढी मोठया प्रमाणामध्ये आपल्या इकडे आयसीयूची उपलब्धतता शहरामध्ये करुण घेणं हे आपल्या सगळयाच कर्तव्य आहे. या अनुषंगाने सध्या आपल्याकडे वायसीएममध्ये ब्यानव बेडसची उपलब्धतता करुन घेतलेली आहे. हे ब्यानव बेडस करण्यासाठी आपल्याकडे स्वतःच्या ताब्यात असलेले काही बेडस उपलब्ध होते. रुबी एलकेअर संस्थेचा मगाशी विषय निघाला होता, त्यांच्याकडे हार्टचे जे काही रुग्ण आपल्या शहरामधले ट्रिटमेंट करण्यासाठी येत होते. इकडे ३२ बेडसची उपलब्धता होती त्यांच्याशी आपण ऍटकॉस्ट बेसीसवरती करारनामा करुन त्यांना आपण पुर्णपणे अपल्या कोव्हीड कामासाठी आपण तो पुर्ण आयसीयू ताब्यात घेतलेला आहे. मात्र सध्याच्या स्थितीमध्ये अनेक शहरातील रुग्णालयामध्ये ज्यावेळेला श्वसनसंस्थेचा गंभीर आजार असलेले रुग्ण जातात, अनेकाकडे आतापर्यंत पीपीई कीटची उपलब्धतता अथवा टेस्टींगची कमतरता या गोष्टीमुळे अनेकवेळेला पॉझिटीव्ह नसलेले रुग्ण किंवा ज्यांचे डिटेक्शन झालेले नाही असे अनेक रुग्ण अनेक हॉस्पिटलमध्ये दाखल होवू शकत नव्हते. त्यांची देखील सोय आपण आतापर्यंत नॉन कोव्हीड निगेटीव्ह केसेस जे की श्वसनसंस्थेचे गंभीर रुग्ण आहेत त्यांची देखील सोय आपण आतापर्यंत वायसीएममध्ये करत आलेलो आहोत. या ३२ बेडस पैकी रिऑर्गनाईज करुन साधारणतः मॅग्झीमम चोवीस बेड तीकडे आपण आयसीयूचे उपलब्ध करुन देत आहोत. याव्यतिरीक्त शहरामध्ये आता गरोदर महीलामध्ये देखील कोरोनाच्या लक्षणाचा प्रादुर्भाव व्हायला

लागलेला आहे. त्यामुळे या पॉझिटीव्ह केसेस गरोदर महीला असतील त्यांची डिलेव्हरी करण्यासाठी आपण वायसीएममधला पुर्णपणे ८० बेडसचा गायनीक वॉर्ड जो आहे तो पुर्णपणे आरक्षीत ठेवलेला आहे. त्यामुळे ज्या लहान मुलांच्या ज्या केसेस आहेत त्यांच्यामध्ये देखील आपल्याला पॉझिटीव्ह केसेस सापडत आहेत. त्यांच्यासाठी वायसीएममधला लहान मुलांचा वॉर्ड आपण सुसज्ज ठेवलेला आहे. याव्यतिरीक्त माईल्ड सिन्टोमॅटीक केसेस करीता नवीन भोसरी रुग्णालय आपण सज्ज ठेवलेल आहे. याव्यतिरीक्त ईजीएसआय हॉस्पिटल देखील आपण तयार ठेवलेल आहे, अदयापपर्यंत त्याची गरज पडलेली नाही. पण भविष्यात त्याची देखील गरज पडण्याची आवश्यकता पडल्यास आपण तीथे देखील सुरवात करणार आहोत. या व्यतिरीक्त जिजामाता रुग्णालय आपल्याकडे तयार झालेल आहे ते देखील आपण सुसज्ज करुन ठेवलेल असून १२० बेडस त्याठिकाणी देखील आपण तयार करुन ठेवलेले आहेत. कोरोनामध्ये एक महत्वाची गोष्ट जी लागते आहे ती म्हणजे सगळयांना आयसीयू जरी लागत नसलातरी सुध्दा ऑक्सिजन सप्लाय अनेक ठिकाणी लागतो आहे. त्यामुळे आपल्या इकडे असलेले दोन जे रुग्णालय आहेत भोसरी आणि जिजामाता याठिकाणी ऑक्सिजन सप्लायची देखील व्यवस्था आपण पुढील महीनाभरामध्ये करुण घेण्यासाठी प्रयत्नशील आहोत. भोसरी हॉस्पिटल आणि जिजामाता हॉस्पिटल या दोन्ही ठिकाणी आपण २२ बेडसची आयसीयूची व्यवस्था देखील केलेली आहे. या व्यतिरीक्त आपल्या इकडे अति.वैदयकीय अधिकारी, अति.नर्सेस, अति.वॉर्डबॉईज यांची देखील खबरदारी आपण घेत आहोत. सन्मा. सदस्यां मंगलाताई यांनी जो विषय मांडला होता त्यासंदर्भामध्ये मी सांगू इच्छितो की ज्यावेळेला आपण वायसीएमला कोव्हीड रुग्णालय म्हणून घोषीत केलं त्यावेळेला शहरातील नॉन कोव्हीड पेशंटसचा देखील आपण विचार केलेला आहे. पहील्या प्रथम वायसीएम रुग्णालयाच्या शेजारीच असलेल आणि १२०० बेडसनी सुसज्ज असलेल डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल जे आहे त्यांना आपण विनंती केली होती की ते आपल्याशी करारनामा करु इच्छितात का? त्यांच्या सूचनेनुसार आपण त्यांच्याशी एमओयु करुन घेतलेल आहे. त्या एमओयुचा आपल्या कडे नियमीतपणे वायसीएमला येणारे जे रुग्ण आहेत ते रुग्ण आपण ज्या पेमेंट टर्मवरती त्यांना ट्रिटमेंट करतो त्याच पेमेंटस टर्मसवरती डी.वाय.पाटील देखील त्यांना दाखल करील अशा स्वरुपाचा करारनामा आपण त्यांच्यासोबत केलेला आहे. त्याच्या अनुषंगाने काही अडचणी निश्चितपणे येत होत्या. कारण लोकांना कळल की डी.वाय.पाटील हे आता नॉन कोव्हीड

रुग्णालय आहे. लोकांनी परस्पर तीथे केसेस पाठवायला सुरवात केली. मात्र त्यांच्याकडे परस्पर येणारा एक वेगळा समाज, वेगळी लोक त्यांच्याकडचा रेग्यूलर पेशंट बेस होता त्यांना जे जे चार्जेस करत होते ते त्यांच्याकडन डायरेक्ट आकारले जायला लागले होते त्यामुळे आपण रेफर केलेल्या केसेस योग्य पध्दतीने त्यांच्याकडे अकौंट व्हाव्यात याकरिता आपण वायसीएमच्या एका विंडोकडन रेफरचीट घेण्याची सूचना त्याच्यामध्ये केली. काही दिवसात लोकांना इकडेतीकडे जाव लागत असल्यामुळे आता आपण वायसीएमला अशी देखील सूचना केलेली आहे की डी.वाय.पाटील रुग्णालयामध्ये आपले काही लोक, कायमस्वरुपी त्याठिकाणी आपला एक टेबल राहील. जेणेकरुन आपल्या हॉस्पिटल्स मधून रेफर झालेल्या केसेस त्याठिकाणी त्यांनी घेवून त्यांच्या मार्फत तीथे ट्रिटमेंट करता येवू शकेल. यासोबतच ज्या काही अडचणी डी.वाय.पाटील संस्थे बरोबर आपल्याला येत आहेत मी डॉ.वाबळे आणि डॉ. साळवे यांना सूचित करतो आहे की या ज्या समन्वयातल्या काही अडचणी आहेत की अनेकवेळेला रात्री-अपरात्री पेशंटस डी.वाय.पाटीलला जातात, आयत्यावेळेला त्यांना रेफरचीट उपलब्ध होवू शकत नाही त्या अधिक चांगल्या रितीने हॅण्डल करण्यासाठी आपला चोवीस तास नियंत्रण कक्ष डी.वाय.पाटील हॉस्पिटलमध्ये आपण निर्माण करावा आणि लवकरात लवकर या प्रकारची कुठलीही अडचण त्याठिकाणी राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना मी डॉ.साळवे आणि डॉ.वाबळे यांना देत आहे. यासोबतच आदित्य बिर्ला मेमोरीअल हॉस्पिटलमध्ये आपण केवळ गायनॅकलॉजीच्या तीस बेडसाठी रेफर करण्याचा करारनामा आदित्य बिर्ला मेमोरीअल हॉस्पिटल बरोबर केलेला आहे. आदित्य बिर्ला हॉस्पिटलने आपल्याकडे येणा-या ज्या गायनॅक केसेस आहेत त्यांची फ्रि ऑफ कॉस्ट करण्याची अनुमती दिलेली असून त्याच्या अनुषंगाने केसेस आपल्या इकडन वायसीएममध्ये येणा-या असतील किंवा भोसरी किंवा अन्य कुठल्याही आपल्या ज्या मॅटर्निटी हॉस्पिटल्स आहेत त्याठिकाणावरुन येणा-या आणि रेफर कराव्या लागणा-या जोखमीच्या ज्या डिलेव्हरी केसेस आहेत त्या आपण ३० तारखेपर्यंत आदित्य बिर्ला मेमोरीअल हॉस्पिटलमध्ये रेफर करतो आहोत. अन्य ज्या केसेस असतील जसं की डी.वाय.पाटील मध्ये आपण कुठलीही केस करु शकतो पण अन्य जर केसेस ज्या डी.वाय.पाटीलमध्ये करु शकतो त्याच आपल्या आपण आदित्य बिर्ला सोबत अजूनही करारनामा करण्यात आलेला नाही. याबाबतीमध्ये मी आपणा सर्वांच्या निदर्शनास एक गोष्ट अणू इच्छितो की गेल्या महीन्यातच राज्यशासनान एक आदेश

जारी केलेला आहे. याच्या अंतर्गत शहरात असणा-या सर्व खाजगी रुग्णालयामधील ८० टक्के बेडस हे नियंत्रीत बेडस करण्यात आलेले आहेत. या ८० टक्के बेडसला त्या रुग्णालयान काय रक्कम आकारायची याच्यावरती राज्यशासनान नियंत्रण आणलेल आहे. हे नियंत्रीत केले गेलेले रेटस आपण सर्व हॉस्पिटलला आदेश केलेले आहेत, त्यांच्या बोर्डावर देखील त्यांना डिस्प्ले करण्याच्या सूचना आहेत आणि तशा आशयाच परिपत्रक सर्व सन्मा.नगरसदस्यांना वितरीत करण्याच्या सूचना मी डॉ.साळवे यांना करतो आहे. यापुढे गरजेनुसार आपण अधिक नॉन कोव्हीड केसेससाठीही आपल्याइकडे महात्मा फुले जीवनदायी योजनेअंतर्गत जी नोंदणीकृत होणारे आहेत या सर्व रुग्णालयाशी करारनामा करुन या सर्व हॉस्पिटल्स बरोबर आपण देखील नॉन कोव्हीड केसेस जे गरीब रुग्ण आपल्या शहरात आहेत त्यांना तेथे पाठवण्याची तजवीज ठेवलेली आहे आणि तशी कार्यवाही वैदयकीय विभागामार्फत आपण सुरु केलेली आहे. धन्वंतरी हा जो विषय आहे, या धन्वंतरी विषयाच्या संदर्भामध्ये देखील चर्चा केली गेली. त्याअनुषंगाने परवाच्या जनरल बॉडी समोर जो विषय होता तो केवळ गेल्या वर्षीच्या विमा योजनेच्या पेमेंट करिता आपल्याकडे पैसे कमी उपलब्ध होते त्या पेमेंट करीता आपण मार्चच्या जनरल बॉडीसमोर आणलेला तो विषय होता. केवळ मार्च संपल्यानंतर आपल त्यावेळेसच तत्कालीन बजेट संपल्यामुळे, असं पण त्या विषयामध्ये कुठल्याही प्रकारची इम्प्लीमेंटेशनची गरज राहीलेली नव्हती. कारण १ एप्रिल पासून आपल नवीन बजेट सुरु झालेल आहे त्यामुळ कुठलही वर्गीकरण जर करावयाच असेलतर १ एप्रिलनंतर वर्गीकरणासाठी नव्याने विषय आणणच अभिप्रेत होतं. मात्र धन्वंतरी विषयाच्या बाबतीमध्ये वेळोवेळी या सभागृहामध्ये जी चर्चा झालेली आहे, २२/२/२०१९ च्या सभागृहान मान्यता दिल्यानुसार आपण धन्वंतरीच्या आरएफटी काढून त्याच्यावरती कर्मचारी महासंघाशी आपण वेळोवेळी चर्चा करुन टर्मस ऍण्ड कंडीशन्स ठरवून आपण निवीदा प्रक्रीया केली. त्याच्या अनुषंगाने आपण स्थायी समितीसमोर विषय आणला होता. स्थायी समितीने त्याला अंतीम मान्यता चर्चेअंती दिली होती. दरम्यानच्या कालावधीमध्ये कर्मचारी महासंघामध्ये झालेल्या परिवर्तनानंतर त्यांनी देखील त्याच्यामध्ये काही अडचणी ठेवलेल्या आहेत. मात्र यापुर्वी देखील धन्वंतरी समिती असेल किंवा तत्कालीन कर्मचारी महासंघ असेल किंवा हे सभागृह असेल संपुर्ण चर्चेअंती आपण हा विषय पुढे घेतलेला होता. आज देखील कर्मचा-यांच्या हिताचा संपुर्ण निर्णय घेतल्या शिवाय आपण विमा योजना करणार नाही

या मताचच प्रशासन देखील आहे. ज्या काही त्यांच्या अडचणी असतील त्या समजून उमजून योग्य पध्दतीने त्याच्यावर मार्ग काढून आपण एकंदरीत महापालिका हिताचा देखील विचार एकत्रीतपणे करण्याच्या अनुषंगाने आपण विमा योजना आणलेली होती. त्यावरती पुर्ण सादकबाधक चर्चा या सभागृहाने करुनच ती मंजुर करण्याचा निर्णय यापुर्वी घेतलेला होता. त्यामुळे यापुढेही कुठल्याही अडचणी असतीलतर कर्मचारी महासंघाची वेळोवेळी चर्चा प्रशासनाच्या वतीने केली जात आहे आणि योग्य तो तोडगा त्यांच्या संमतीने आपण काढत आहोत. पाणीपुरवठा वेळोवेळी चर्चीला गेलेला विषय आहे. पाणीपुरवठयाच्या अनुषंगाने आता मला जी अडचण शहरामध्ये होताना दिसलेली आहे त्याचे मुळ कारण हे आपल्याकडे विदयूत प्रवाह खंडीत होनं हेच राहीलेल आहे. २९ तारखेला आपण शटडावून घेतलेला होता की पावसाळापुर्व कामाचाच भाग म्हणून आपल्या ज्या इलेक्ट्रीकल मेन्टेनन्सच्या ज्या ईसेन्शिअल गोष्टी असतात त्या दरवर्षी आपण मे महीन्यामध्ये करत असतो. त्याच्यासाठी हा मेन्टेनन्सचा शटडावून घेतलेला होता. ही दुरुस्ती केल्यानंतर निसर्ग चक्रवादळ आल्यामुळे मात्र कालच्या दिवसामध्ये देखील लागोपाठ दोन दिवस आपल्याला अनशेडयूल्ड एन्टायर शटडावूनला सामोर जाव लागलं. परवाच्या दिवशी साधारणत: आडीच तास आणि कालच्या दिवशी साधारणत: पाच तास इतक्या कालावधीसाठी आपल्याकडील दोन्ही एक्सप्रेस फिडर एकाच वेळेला खंडीत झाल्यामुळे आपल्याला पाणीपुरवठयाच्या रोषाला सामोर जाव लागलेल आहे, ही निश्चितपणे अडचणीची बाब आहे. याच्यावरती तोडगा काढण्याचा देखील सन्मा.सदस्यांच्या, सभागृहाच्या इच्छेनुसार आपण प्रयत्न करतो आहोत. या अनुषंगाने मी ही बाब निदर्शनास आणून देतो की आपण जनरेटरचा वापर करण्याच्या सूचना वेळोवेळी नगरसदस्यां कडन झालेल्या आहेत मात्र आतापर्यंत तांत्रिकदृष्टया जनरेटरच कुठलही योग्य सोल्यूशन आपल्याकडे प्राप्त झालेल नाही. त्याच्या बदल्यात एक अल्टरनेटीव्ह टेक्नॉलॉजीच सोल्यूशन आपल्याकडे मिळालेल आहे हे एक्सप्लोअर करण्यासाठी एक अमेरीकन कंपनी आहे त्यांच आपण एक्सप्लोअर करत आहोत त्यांना आपण कॉन्ट्रॅक्ट केलेला आहे. मात्र त्यांच्याकडन काही कालावधीमध्ये आपल्याला टेक्नॉलॉजीच इन्टरमेन्शन प्राप्त झालेल नाही त्याचा आपण पाठपुरावा करतो आहोत. दरम्यानच्या कालावधीमध्ये आता सन्मा.सदस्यां सिमाताई सावळे यांनी जी सूचना मांडली की आपण स्वत:च सबस्टेशन करु शकतो का. त्याचा देखील पर्याय आपण पडताळणी करुन निश्चितपणे घेवू शकतो आणि तशा सूचना मी विदयूत विभागाला देतो

आहे की त्यांनी या अनुषंगाने विशेष पडताळणी करावी. पारेषाण विभागाकडन परवानगी घेवून त्या अनुषंगाने जर आपल्याला पुढील काही कारवाई करणं शक्य असेलतर त्याचा देखील आपण विचार करावा. मात्र जे काही विषय आपण वेळोवेळी सभागृहासमोर मांडलेले आहेत त्याच्यामध्ये जी काही भूमीका प्रशासनान मांडलेली आहे जस की गेल्या सभागृहासमोर आणलेला जो विषय दरवाढीचा होता हा दरवाढीचा विषय देखील याच सभागृहामध्ये झालेला आहे. एका दिवसभराच्या चर्चेअंती, सगळयाच्या चर्चेमधन किंवा त्याच्या वरती मांडलेल्या प्रशासनाच्या भूमीकेतनच आणलेला हा विषय होता की समसमान पाणी वाटपासाठी जे नागरीक शहरामध्ये जास्त प्रमाणामध्ये पाणी वापर करतात त्यांच्यावरती नियंत्रण आणण्यासाठी आपण वाढीव पाणी वापरावरती निर्बंध कसे आणता येतील याकरिता तो प्रस्ताव आणलेला होता. त्याच्या मागे केवळ पाच टक्के दरवाढ करणे हा हेतू त्याच्या मधला नव्हता. जो की आपण निश्चितपणे या वर्षी रोखू शकलो असतो किंवा त्याच्यावरती योग्य निर्णय घेवू शकलो असतो. त्यामुळे वेळोवेळी आपल्या सभागृहातील चर्चेला अनुसरुनच प्रशासनाच्या वतीने वेगवेगळे इन्टरमेन्शन केले जात आहेत आणि त्याच्या अनुषंगानेच आपण हा ठश्रज्ञव् आणलेला होता. आदि झालेल्या पाणीपुरवठयाच्या चर्चेनुसार आपण आपल्या सेक्टर २३ येथील आणि रावेत येथील पंपींग मशनरीच्या कपॅसिटी एनासमेंटची निवीदा काढलेली होती. मात्र लॉकडावूनच्या कालावधीमध्ये या निवीदा आडकलेल्या आहेत. आपण त्याची पुन्हा कारवाई सुरु केलेली आहे. त्या लवकरात लवकर कार्यान्वित करण्याची तजवीज आपण ठेवलेली आहे. यासोबतच आंद्रा, भामा-आसखेड असेल किंवा देहू येथील बंधा-यातून पाणी उचलण्याची योजना असेल या देखील निवीदा प्रक्रीया आता प्रगतीपथावर आहेत. मात्र या सगळया कोरोनाच्या संकटामध्ये शासनाकडन जो जीआर प्राप्त आहे त्याच्यामध्ये एकूण भांडवली खर्च हा केवळ ३३ टक्क्याला कंट्रोल करण्याच्या सूचना प्राप्त आहेत. यासोबतच हा खर्च किंवा कुठल्याही निवीदा या केवळ आरोग्य आणि वैदयकीय क्षेत्र किंवा मदत व पुनर्वसन क्षेत्रासाठी कंट्रोल करण्याच्या सूचना आहेत. त्याच्या अनुषंगाने शासनाची विशेष परवानगी घेवून केवळ ज्या अत्यंत आवश्यक अशा पाणीपुरवठयाच्या बाबी आहेत किंवा पाण्याच्या पुनर्रवापराच्या बाबी आहेत त्याच्यासाठी आपण शासनाशी पाठपुरावा करण्याची तजवीज ठेवत आहोत. त्याच्या अनुषंगाने जितक्या लवकरात लवकर आपण पाणीपुरवठयाच्या योजना कार्यान्वित करु शकू तेवढया लवकर या शहरातील पाण्याचा प्रश्न आपण सोडवणार आहोत. सन्मा.राहूल

कलाटे यांनी सांगीतल्या प्रमाणे शहरातील लोकसंख्या कमी झालेली आहे मात्र शहरातील लोकसंख्या किती कमी झाली याचा कुठलाही स्पेसिफीक अंदाज बांधणे आज आपल्याला शक्य नाही. आपल्याकडे जरी अंदाजीय अस कळत असेल की आपल्याकडील काही मजूर स्थलांतरीत झाले, आज ऑफिशिअल फिगर जरी बघीतलीतर आपल्या शहरातून अदयापपर्यंत काही ट्रेन्समधुन आपण जे मजूर पाठवले त्यांची संख्या साधारणत: ३० हजाराच्या घरात असेल त्याच्यापेक्षा जास्त काही मजूर यापुर्वीच आपल्या शहरातून गेलेले असतील. मात्र आज शहरामध्ये नक्की किती लोक आहेत हा अंदाज आजतरी आपल्याला निश्चितपणे बांधणे शक्य नसल्याने आपण दिवसागणीक पाणीपुरवठा करण्याचा निर्णय या स्थितीमध्ये घेवू शकलेलो नाही. मात्र गेल्या दोन दिवसामध्ये झालेला विदयूतपुरवठा खंडीत झाला त्याच्यामुळे काय तात्काळ उपाययोजना करण्यात येईल याच्या अनुषंगाने या भागामध्ये किमान पन्नास पन्नास टक्के तरी पाणीपुरवठा तात्काळ करण्याच्या सूचना मी पाणीपुरवठा विभागाला करतो आहे. जेणेकरुन पुढील दोन ते तीन दिवसामध्ये जो काही पाण्याचा बॅकलॉग असेल तो योग्य पध्दतीने भरुन निघेल. सर्व सन्मा.सदस्यांना माझी विनंती आहे की थोडीशी अडचण एखादा दिवस आपल्याला या चक्रवादळामुळे होणार आहे. त्याच्यासाठी आपल्याला जी काही स्थानिक पातळीवरती मदत करावी लागेल, काही ठिकाणी टँकर पुरवावे लागतील तसे देखील निर्देश मी पाणीपुरवठा विभागाला देतो आहे. ज्या काही अधिका-यांच्या बाबतीमध्ये स्पेसिफीक तक्रारी आहेत त्याच्या बाबतीमध्ये मी सविस्तर निर्णय प्रशासकीय लेव्हलवरती घेईल. तरी सर्व सन्मा.सदस्यांना एक विनंती आहे की या आपत्तीच्या कालावधीमध्ये आपल्याकडे डबल आपत्ती यावेळेला आहे. कोरोना पुढील सहा महीने तरी किमान आपल्या येथे राहणार आहे. त्यामुळे आपल्याला संपूर्ण पाऊस कालावधी, मान्सून कालावधी हा आपल्याला कोरोना सोबत लढायच आहे. त्यामुळे कोरोना कशा पध्दतीने बीव्हेव करतो, आर्द्रता वाढल्यानंतर, पाऊस सुरु झाल्यानंतर आपल्या इथ जनरल इतर आजार देखील बळावतात या सर्व आजाराच्या अनुषंगाने आपण सर्व प्रभाग अधिकारी आणि वैदयकीय अधिकारी यांची एकत्रीत बैठक घेतलेली आहे. डेंगी असेल, चिकनगुनीया असेल किंवा अन्य व्हायरल असतील, स्वाईन फ्ल्यू असेल याप्रकारचे कुठलेही आजार आपल्याकडे बळावू नयेत किंवा त्यांचा एकत्रीत संसर्ग कोरोनासोबत आपल्याइकडे दिसू नये आणि कोरोनाला देखील आपण योग्य पध्दतीने नियंत्रणीत करता याव याचा देखील विचार आपण यासंबंधीत संपुर्ण बैठक

घेवून केलेला आहे. एक विशेष बाब म्हणजे आपण ज्यावेळेला दरवर्षी पुरनियंत्रण आराखडा करतो आणि जर पाणी एखादया लो-लाईन ऐरीयामध्ये शिरलं आपल्याला इरॅक्टेशन कराव लागत. यावेळेला इरॅक्टेशन करताना त्या झोपडपट्टीमध्ये जर समजा कन्टेन्मेंट झोन असेलतर आपल्याला विशेष काळजी त्याठिकाणी लोकांना स्थलांतरीत करताना घ्यावी लागणार आहे. तरी याचा देखील अंतर्भाव आपल्या संपुर्ण आपत्ती व्यावस्थापन पुरनियंत्रण आराखडयामध्ये करण्याच्या सूचना मी विभागाला दिलेल्या आहेत. सदर बाबीची अंमलबजावणी पुढील दोन आठवडयाच्या कालावधीमध्ये आपण करुन घेणार आहोत. निश्चितपणे आपण सर्वाच्या सोबत पुनश्च एकदा सगळया विभागस्तरावरती आम्ही बैठका घेवून या तयारीचा आढावा पुढील पंधरा दिवसामध्ये आपणा सर्वाच्या मदतीन, उपस्थितीमध्ये करुन घेण्याच मी इकडे सभागृहाला सांगत आहे. तरी जो काही मी खुलासा केलेला आहे याच्या मध्ये काही बाबी राहील्या असतीलतर त्याच्यामध्ये निश्चितपणे नंतर अंतर्भाव आपल्या सर्वाच्या सूचनेनुसार मी करीन असा मी खुलासा करतो, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एकदा आयुक्त बोलल्यानंतर समाधान करुन घेण्याची परंपरा या सभागृहाची आहे. त्यामुळ आम्ही आपल्या या सर्व गोष्टीवर समाधान मानतो. मी सभागृहाचा मुळीच वेळ घेणार नाही कारण खुप वेळ झालेला आहे परंतु पाणी या एका विषयाच्या संदर्भात आपण सर्व भूमीकेना स्पर्श केला आहे. आंद्रा, भामा-आसखेड किंवा देहूचा बंधारा असेल. मी दहा वर्षापुर्वी या सभागृहात बोललो होतो की बंद योजनेच्या संदर्भात योजना चांगली आहे नियोजन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत निवीदा प्रक्रीया राबवू नका. नाहीतर हा साडेतीनशे कोटीचा प्रकल्प भविष्यामध्ये बाराशे ते तेराशे कोटीला जाईल. त्यावेळेस ती दखल न घेतल्यान आज त्याची परिणामता काय झालेली आहे या संदर्भात देखील खुलासा करावा. त्याच कारण १२० कोटी रुपये आपण त्या ठेकेदाराला दिलेले आहेत. तो एक्सलेशन मागेल तो काय म्हणणार मी काम करायला तयार होतो तुम्ही मला जागा दिलेली नाही म्हणजे त्या १२० कोटीवरच व्याज आणि आठशे नऊशे कोटीचे वेगळे म्हणजे कमीत कमी सगळया महाराष्ट्राच्या महापालिकेच बजेट हे त्याला एकटयाला दयावा लागेल आणि तो पैसा आपल्या जनतेचा आहे. पाणीपुरवठया

बाबतचा तुम्ही खुलासा केला तेवढया एका गोष्टीचा उल्लेख, त्याच नेमक काय झाल आणि काय परिस्थिती आहे. त्याचा एकदा खुलासा केला म्हणजे सभागृह निश्चिंत.

**मा.महापौर-** या विषयासंदर्भात लवकरच आपण सगळे पदाधिकारी एकत्र बसू. हे काम कशा कशा पध्दतीने झाले, कोणाला किती किती रक्कम दिली, जागा ताब्यात आहे का नाही, त्या जागेच भाड किती झालं या सगळया विचार विनीमयासाठी आपण एकत्रीत बसू. आता आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. आता विषयावर बोलावे विषय क्रमांक १ वाचावा.

**मा.तुषार हिंगे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - १

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१०६/२०२०, दि.०६/०५/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७०७८ दि.१३/०५/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे ह्रदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदुचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडितांना अर्थ सहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८/१२/२००७ अन्वये दरवर्षी २५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. सन २०२०-२०२१ पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी यांना र.रू २५,००,०००/- (अक्षरी र.रू पंचवीस लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेत यावी ही विनंती.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो. तसेच मी या विषयासंदर्भात बोलू इच्छितो की, आयुक्त साहेबांनी अनेक विषयावर खुलासा दिलेला आहे आणि समाधानकारक उत्तर दिलेले आहेत.

**मा.महापौर-** तुम्ही अनुमोदन दिलेले आहे, तुम्हाला बोलायचे असेलतर नंतर बोला.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा महापौर निधीचा विषय आहे या महापौर निधीमध्ये थोडे थोडे जसे खर्च वाढतात त्या पध्दतीनं आपण पहील्यांदा तीन हजार देत होतो नंतर पाच हजार देत होतो नंतर आता दहा हजार. मा.महापौर तुमच्याकडे एखादा पेशंट किंवा एखादा नातेवाईक ज्याची परिस्थिती नाही तो येतो ज्याची परिस्थिती चांगली आहे तो कधी येणार नाही तुमच्याकडे. वॉर्डातील जे नागरीक गरीब आहेत तेच तुमच्याकडे अर्ज करणार आहेत. मागे सुध्दा महापौर निधीचा विषय आलेला होता. त्यावेळेस वैदयकीय अधिकारी यांच्याशी मी बोलले होते. पुणे महानगरपालिकेमध्ये शहरी गरीब म्हणायच, एक लाखाच्या आत ज्यांच उत्पन्न आहे असे लोक. आता उदा. दयायच झालतर आता वायसीएम आपल्याला उपलब्ध करता येत नाही. पुण्यामध्ये सुध्दा देतात त्यांनी शहरी गरीब असा शब्द वापरलेला आहे. मी आपल्या वैदयकीय अधिका-यांना पण त्यावेळेला सांगीतल होतं की ही योजना पुणे महानगरपालिका कशी राबविते याची तुम्ही माहिती घेतली आहे का. पुणे महानगरपालिकेमध्ये एक लाख रुपये एका व्यक्तीला मिळू शकतात. कोणत्याही हॉस्पिटलमध्ये पेशंट जाऊ देत त्यांनी त्याचा लेखी पुरावा दयायचा आणि ज्याच एक लाखाच्या आत उत्पन्न आहे त्यांना ते मिळतात. आपण पाच हजार रुपये देतो एखादयाला च-होलीमधुन यायच म्हणलतर एकदा अर्ज दयायला यायला लागत, दुस-यावेळेस चेकसाठी यायला लागतं. म्हणजे त्याचे पेट्रोलसाठी तीनशे ते चारशे रुपये जातात. डुडूळगाव, मामुर्डी, किवळे वरुन यायच म्हणलतरी तोच खर्च येणार. म्हणजे त्या येणा-या व्यक्तीला असं वाटायला लागत की या पाच हजारासाठी आपण किती वेळा यायच. आजच्या घडीला एक एक ईंजेक्शन दहा ते पंधरा हजाराची आहेत. म्हणून महापौर निधी हा वाढला गेला पाहीजे. आपण नेहमी तुलना पुणे महानगरपालिकेची करत असतो. पुण्यानी असं केल मग आपण काय करतो. आपण काय केलतर पुणे काय करतं. आपण त्यांच्याशी तुलना करत नाही पण जर कुणाच एकमेकांच जर चांगल असेलतर आपण शंभर टक्के या महापौर निधीसाठी किंवा शहरी गरीब जी लोक आहेत त्यांच्यासाठी हे केल पाहीजे. मागे डॉ.साळवे उभे आहेत त्यांना बोलवा मी त्यांना सहा महीन्यापुर्वी सांगीतल होतं. तुम्ही ही माहिती घ्या आणि तुम्ही आपल्या पदाधिका-यांना सांगा की आपण अशी अशी योजना राबवू शकतो. मग महापौर निधी कुठूनही आपण गोळा करु. आजच्या परिस्थितीमध्ये कॅन्सर सारखे पेशंट शहरामध्ये ८० टक्के पेशंट कॅन्सरसारखे असतात आणि त्यांना पाच हजार

रुपयानी काहीच होत नाही. तरी महापालिकेला जास्तीत जास्त त्या पेशंटसाठी कशी मदत करता येईल हे बघीतल गेल पाहीजे. आपण नागरीकांना चांगल्या पध्दतीने कशी मदत करु शकतो हे बघीतले गेले पाहीजे. मी सहा महीन्यापुर्वी वैदयकीय अधिकारी यांना सांगीतलेल होतं. हा विषय मंजूर केल्यानंतर पुण्याप्रमाणे करता येणार आहे का नाहीतर हा विषय पुढच्या मिटींगला मंजूर करु. सीएसआर फंडस मधुन गरीब लोकांना एक लाख रुपये जर देता येत असतीलतर बघावे. पुणे महापालिकेनी मग शहरी नागरीक फंड कसा उपलब्ध केला आहे. तेथील जे डॉक्टर आहेत त्यांच्याशी मी बोलले ते म्हणाले तुमच्याकडच कोणीही पाठवा तो निधी आमच्याकडे कसा वापरला जातो त्याच तुम्हांला सगळ डिटेल्स देतो, एक लाख रुपये गरीब लोकांना आम्ही कसे देतो त्याचे डिटेल्स देतो. त्या पध्दतीने आपल्याकडे देता आलतर चांगल आहे. कायदयाच्या चौकटीत बसून आपल्याला गरीब लोकांना कशी मदत करता येईल हे बघीतल पाहीजे. महापौर हे तुमच्या कारकीर्दीमध्ये झालतर शेवटी आणखी एक मानाचा तुरा खोवला जाईल. मतीमंद मुलांना पिंपरी चिंचवडमध्ये तीन हजार देतात कुठेही दुसरीकडे देत नाहीत. म्हणजे आपल्याला एक स्वाभीमान आहे, अशा पध्दतीची जर योजना झालीतर तुमच्या कारकीर्दीमध्ये झालातर तुमच्यासाठी तो प्लस पॉईंट असणार आहे. तो विषय आता होवू दयात नाहीतर पुढच्या जीबीला घेतला तर काय फरक पडतो. आपण पण माहिती घ्यावी. नगरसचिव यांच्याकडे महीला व बालकल्याणचा चार्ज आहे ते कित्येक भागात फिरुन आलेत. ते खुप मोठमोठया चांगल्या चांगल्या योजना बाहेरुन बघून आलेत. पण आपल्या शहराला त्या गोष्टीचा फायदा झाला का नाही झाला. त्यांनी बघीतलेल्या खुप चांगल्या योजना आहेत. मग आपण त्या योजना का नको लागू करायला. मा.महापौर तुम्ही आढावा घ्यावा की कुठले अधिकारी कुठल्या देशामध्ये अभ्यास दौ-यासाठी गेले. आता जाणार नाहीत सहा महीने. परंतु मागे कोण कोण जाऊन आले त्यांच्याकडन चांगल्या योजना जर येत असतीलतर आपण त्या घ्यायला पाहीजेत. शेजारी नगरसचिव बसले आहेत, हाळूच कानात सांगतात, माझ्याही काळात नगरसचिव सांगायचे की ताई असं नाही असं. मग हे ते जर सांगतात तर त्यांनी सुध्दा खुप चांगल्या चांगल्या योजना बघीतलेल्या आहेत. महिला व बालकल्याणच बजेट तसच पडून राहत. या योजना आपल्याला राबवता येणार नाहीत का. म्हणून पुणे महापालिकेची माहिती घ्या व महापौर निधीमधुन एक लाख रुपये कसे देता येईल हे बघा. पुणे महापालिका देते मग आपण का देवू शकत नाहीत. तरी याचा खुलासा

करावा मगच तुमचा विषय मंजूर करावा आम्हांला आडवायचा नाही. मगाशी पाण्याचा विषय होता मा.महापौर तुम्ही का बोलू देत नाहीत, बोलू दयायच होतं. इकडे विषय वाचला की महापौर मंजूर का ना मंजूर म्हणतात.

**मा.वैशाली घोडेकर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मंगलाताईनी अतीशय चांगला विषय याठिकाणी मांडलेला आहे. पाच लाख बील आलतरी आपण पाच हजार देतो आणि पन्नास हजार बील आलतरी आपण पाच हजार देतो. याच्यामध्ये कुठेतरी डिफरन्शिएट झाल पाहीजे. आताच मंगलाताईनी सांगीतल की एक लाख तुम्ही देवू शकता. महापौर निधीत २५ लाख दिलेतर तुम्ही फक्त एक लाखाप्रमाणे २५ लोकांना देवू शकाल. तरी याठिकाणी २५ लाखा ऐवजी पाच ते दहा कोटीतरी महापौर निधीला मान्य झाले पाहीजेत तरच आपण जास्तीत जास्त मदत शहरवासीयांना देवू शकू. मी मागे सुध्दा सुचवल होतं की बजेटमधुन महापौर निधीला दयानां, आपल्याला कुणाच्या परवानगीची गरज नाही. तुम्ही महापौर निधीमध्ये दयानां पाच कोटी. तुम्ही शासनाकडून एकदा त्याची नियमावली मागवा की पाच हजार देणंच बंधनकारक आहे का. मी एकदा विचारलतर सांगीतल की शासनाने काहीतरी निर्बंध टाकून दिलेले आहेत की महापौर निधीमधुन पाच हजाराच्या वर तुम्ही देवू शकत नाहीत. तरी हा निर्बंध आहे का. याच्यामध्ये जर आपल्याला पाच हजारापेक्षा जास्त दयायचे असतीलतर आपल्याला जीबीचा ठराव करावा लागणार आहे का. तो शासनाला पाठवावा लागणार आहे का. याची सुध्दा माहिती आपण घेतली पाहीजे. आताच मंगलाताईनी सांगीतल सीएसआर फंडस देखील महापौर निधीत आपण घेवू शकतो. मी म्हणते आपण दहा कोटी घेवू पण पाच हजाराच बंधन शासनान टाकल असेलतर त्याठिकाणी आपल्याला नक्की अडचण येणार आहे. तरी ते बंधन आहे की नाही याची माहीती याठिकाणी सांगीतली पाहीजे. मंगलाताईनी जस सांगीतल सीएसआर फंडस असेल, पुण्यामध्ये कशा पध्दतीने दिले जातात हे पहा. पण जोपर्यंत फंडस वाढवत नाहीत तोपर्यंत आपण वाढवून रक्कम देवू शकत नाहीत. तरी ही रक्कम पाच ते दहा कोटी कशी करता येईल हे पहावे. आता नवीन स्टॅण्डींग चेअरमन आलेले आहेत त्यांना पण मी विनंती करेन की महापौर निधीमध्ये आपल्याला पाच कोटी कसे घेता येईल याबाबतीतही त्यांनी नियोजन कराव, एवढी मी विनंती करीन आणि थांबेल, धन्यवाद.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज जो मंगलाताई कदम यांनी शहरी गरीब योजनेचा विषय मांडला खरे पाहता या विषयाचा पाठपुरावा गेल्या दोन वर्षापासून मी करतो. मी निवडून आल्यापासून आयुक्तांकडे शहरी गरीब योजनाची अंमलबजावणी करा म्हणून तुमच्याकडे पाठपुरावा करतो. तस माझ्याकडे तुम्हांला इन्वर्ड केलेल पत्र पण आहे. मी ज्यावेळेस स्थायी समितीमध्ये होतो तीथे १९/६/२०१८ ला ठराव केलेला आहे की आपल्या महापालिकेतही शहरी गरीब योजना राबवण्यात यावी. पुणे महानगरपालिकेमध्ये या योजनेअंतर्गत ज्या ज्या नागरीकांकडे एलो रेशनकार्ड आहे त्यांना एक लाखापर्यंत जे आता आपण हजार पकडलेले आहेत. कुठल्याही प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये गेलतर तीथ त्यांना एक कार्ड भेटतं त्याची फिस ते शंभर रुपये घेतात. गेल्या महीन्यात आपण मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या माध्यमातून या विषयाला तरतूद ठेवावी म्हणून आपण बजेटला पाच कोटी तरतूद ठेवली होती पण आता डॉ.साळवी यांच्याशी बोलताना ते म्हणाले की आम्ही कोरोनामुळे या विषयाला बजेट ठेवू शकलो नाही.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट पिंपरी यांना र.रु. ५ कोटीचे अनुदान देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देतो.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता मंगलाताईनी जस सांगीतल आणि सागर भाऊने सांगीतल शहरी गरीब योजना ही पुणे महापालिकेमध्ये चालू आहे आणि खरतर २०१८ मध्ये आम्ही ज्यावेळेला स्थायी समितीला होतो त्यावेळेला सागरनी हा प्रस्ताव आपल्या स्थायी समितीमध्ये मांडला होता तो मंजूर पण केला होता. पण त्याच्यावर पुढ काही झाल नाही. आज विषय निघालाच आहेतर आपल्या पालीकेच्या वतीने जसे पुणे पालीकेमध्ये शहरी गरीब योजना राबवली जाते. नागरीकांकडून शंभर रुपये घेतले जातात आणि त्यांना कार्ड दिलं जातं. त्याच पध्दतीने जे केशरी रेशनकार्ड धारक आहेत किंवा व्हाईट रेशनकार्ड धारक आहेत त्यांना बीलामध्ये पंचवीस टक्के, पन्नास टक्के, पंच्याहत्तर टक्के अशा त्यांच्या कॅटेगरी आहेत या योजनाचा आपण अभ्यास करायला पाहीजे. आज आपण

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये जे आपले तळागाळातील नागरीक आहेत यांना दोन गोष्टी प्रामुख्याने आपण पुरवल्या पाहीजेत आणि ती आपली जबाबदारी आहे. एक म्हणजे आरोग्य सेवा आणि दुसर म्हणजे शिक्षण. माझी मा.महापौरांना विनंती आहे की आपण हा विषय या उपसूचनेसह नक्की करावा. आपले जे प्रायव्हेट हॉस्पिटल्स आहेत त्याच्यावरती आपल्याला काही निर्बंध घालता येतील का याच्यावरती लक्ष ठेवाव. परवाच एक मला उदाहरण दयायच आहे. आमच्या दिघीमध्ये एक कोरोनाचा पेशंट होता आणि तो रुबी हॉल क्लिनीकला ऍडमीड होता. दहा दिवस ऍडमीट झाल्यानंतर त्यांचा रिपोर्ट निगेटीव्ह निघाला आणि त्यांच्या डिस्चार्जची वेळ आली. मुळात त्या पेशंटला डायलेसिससाठी रुबी हॉलला नेल होतं आणि डायलेसिस करायच्या अगोदर त्यांनी कोरोनाची टेस्ट केली आणि दोन दिवसानंतर त्यांच्या मुलाला सांगीतल की तुझ्या वडीलाना कोरोना पॉझिटीव्ह आहे त्यांना ऍडमीट कराव लागेल. त्या मुलाची परिस्थिती नसल्यामुळे त्या मुलांनी त्या हॉस्पिटलला सांगीतल की माझ्या वडीलांना मी येथे ठेवू शकत नाही मी सरकारी हॉस्पिटलमध्ये घेवून जातो. त्यावेळेस तेथील डॉक्टर प्रशासनाने त्यांना सांगीतल की आम्हांला जे निर्देश आहेत त्यामुळे यांना इथेच फेस कराव लागेल आणि बीलाची काळजी करु नका आणि आठ दिवसानंतर डायरेक्ट २ लाख ९७ हजाराच बील त्याच्या हातात दिलं, एवढे तुम्हांला भरावे लागतील. त्या मुलांने ते पैसे भरले पण आणि वडीलांना घेवून आला. आल्यानंतर ती गोष्ट त्याने मला सांगीतली ती पोस्ट मी सोशल मिडीयावर टाकली त्याच्यानंतर ३० तारखेला मला एक फोन आला कर्वेनगर वरुन की मी तुमची सोशल मिडीयाची पोस्ट बघीतली आणि माझी सासू सहयाद्री हॉस्पिटल येथे कोव्हिडसाठी ऍडमीट आहे आणि ३ लाख ९७ हजार दहा दिवसासाठीच बील दिलेलं आहे. त्यांना व्हेन्टीलेटरवरती ठेवलेल नव्हत किंवा कोणती लाईफ सपोर्ट सिस्टीम लावली नव्हती तरी ३ लाख ९७ हजार बील दिल होतं. मुळात अशा काळात प्रायव्हेट हॉस्पिटलनी सामान्य नागरीकांना आधार देनं गरजेच आहे. जर सरकारी हॉस्पिटलमध्ये जागा नसतील, बेडस नसतील किंवा त्या नागरीकांना ते हॉस्पिटल जवळच वाटल असेल म्हणून तेथे घेवून गेले असतील. अशा पध्दतीने नागरीकांना पिळायच काम प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये चालू आहे. त्यानंतर त्या हॉस्पिटलच्या मॅनेजमेंटला मी फोन केला आणि आपल्या भाषेत सांगीतल्यानंतर त्याने लगेचच निर्णय घेतला की बील माफ आणि त्या पेशंटला सोडून दिलं. म्हणजे या परिस्थितीमध्ये प्रायव्हेट हॉस्पिटलकडून सामान्य माणसाची पिळवणूक होते. किंबहूना

कोणाच्या घरात जर मेडीकल ईमर्जन्सी असेल, त्याची आर्थीक परिस्थिती असेल किंवा नसेल पण हे व्यावसायीक दृष्टिकोनातून हे हॉस्पिटल चालवतात त्या लोकांनी धंदा केलेला आहे. ते काही बघत नाहीत गरीब आहे का श्रीमंत आहे, आतमध्ये आला की त्या माणसाच्या खिशाला कात्री लावल्या शिवाय राहत नाहीत. आज कोरोनासारख्या रोगावरती कोणती लस नाही. तीथ जे पेशंट आहेत त्यांनाच फक्त व्हेंटीलेटर वापरतात. फक्त रोगप्रतीकारशक्तीच्या गोळया, तीन वेळेसच जेवण आणि तीथ रहाण्याचे जर चार चार लाख बील घेत असेलतर त्याची आपण दखल घेतली पाहीजे. ही पुणे महापालिकेच्या क्षेत्रातील घटना आहे. असे जे हॉस्पिटल्स आपल्याकडे असतीलतर अशा हॉस्पिटलवरती आपण काही निर्बंध लादू शकतो का हा माझा प्रश्न आहे. मला प्रत्येक हॉस्पिटलला आपल्या पालीकेच्या वतीने सांगायच की कृपया या काळामध्ये नागरीकांना आपली गरज आहे आपण धंदयाच्या दृष्टिकोनातून नागरीकांकडे बघू नका. आपली जी सेवाभावी वृत्ती आहे ती यावेळेस दाखवा. हे देशावरच संकट आहे आणि या देशावरच्या संकटामध्ये तुम्ही तुमचे हात धुवून नका घेवू. मा.महापौर मॅडम, ही शहरी गरीब योजना आणि पुणे महापालिकेच्या ज्या योजना आहेत त्यांचा अभ्यास करुन या मंजुर करुन कृपया त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर कशी होईल हे बघावे. म्हणजे आज मंजूर झाला आणि त्याला अंमलबजावणी होण्यासाठी वर्षभर जर लागत असतीलतर उपयोग नाही. कमीत कमी कालावधीमध्ये त्याची अंमलबजावणी झाली पाहीजे याकडे लक्ष दयाव, धन्यवाद.

**मा.अजीत गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण दरवर्षीच अशाप्रकारे महापौर निधीला बजेट वर्ग करुन महापौर निधीतून आपल्या परिसरातील नागरीकांना पाच हजाराची मदत करत असतो. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की सर्वांनीच त्या विषयाचा उल्लेख केला. जसा कोरोना आपल्याकड आल्यामुळे मोठया प्रमाणात या सर्व गोष्टीवरती आर्थिक ताण महापालिकेवर येऊ शकतो परंतु भविष्यकाळामध्ये आपल्याला वैदयकीय सेवा, आरोग्य सेवा याच्यावरती जास्त बजेट खर्च कराव लागणार आहे आणि शहरी गरीबसाठी जे काही बजेट ठेवल ते मुळात बजेट ब-यापैकी शिल्लक रहात असतं. मागच्यावेळेला पण मी सभागृहात या विषयावर बोललो होतो की आपल्या शहरात राहणा-या सर्वच नागरीकांना जर आपण अशी फॅसिलीटी देवू शकलो, मेडिक्लेम सारखी

किंवा इन्शूरन्स पॉलीसी म्हणता तर तशा पध्दतीची काही फॅसिलीटी देवू शकलोतर आपण लोकांकडन घरपट्टी वसूल करतो किंवा इतर कशामध्ये नागरीकांचा हिस्साजर त्यात ऍड केलातर आणि आपला हिस्सा टाकलातर मला वाटत शहरामध्ये सगळयाच लोकांना सरसकट ही मेडिक्लेम फॅसिलीटी मिळावी. आपल्या सगळयांना अनुभव आहे की प्रत्येकाकडे वॉर्डातील लोक येत असतात. लोकांना मोठे आजार झाल्यानंतर त्यांच्याकड पैसे नसतात. अशावेळेस त्या आजारावरती ट्रिटमेंट सुध्दा करता येत नाही. त्याच्यामुळ हा जर विषय आपण करु शकलो की आपण आपल्या पिंपरी चिंचवड मधील सगळया नागरीकांना ही फॅसिलीटी देवू शकलोतर आणि याच्यासाठी काही बजेट खर्च केलतर मला वाटत ते निश्चितपणे खुप चांगल होईल. इतर देशामध्ये पुर्ण मेडीकल ट्रिटमेंट फ्रि असते, ब-याच देशामध्ये मेडीकल ट्रिटमेंट फ्रि असते. आपल केंद्रशासन, स्टेट गव्हर्मेंट तशा पध्दतीचा विचार करत आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनी याच्यामध्ये पुढाकार घेतला आणि संपुर्ण देशाला दिशा दिलीतर मला वाटत हे खुप चांगल पुण्यांच काम होईल. आपल्या शहरामध्ये अनेक लोक अशा मोठया आजारावर ट्रिटमेंट घेत नाहीत त्यातून त्यांच निधन होत, त्याच्यामुळे आपण हे केलतर भविष्य काळासाठी खूप चांगल काम होईल. त्याच्यामुळे मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की आपल्याला अशाप्रकारच काही करता आलतर याचा आपण अभ्यास करावा आणि तशाप्रकारचा प्रस्ताव करुन सगळयांची त्याला मंजूरी घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यासंदर्भात आता नगरसदस्यांनी शहरी गरीब योजनेबाबत पुणे महापालिकेत जी योजना आहे त्याबाबत सांगीतले आहे. मला असे वाटते की आपण याबाबतीत सर्व गटनेत्यांची बैठक घेवू आणि त्या बैठकीमध्ये निर्णय घेवून तो विषय आणू. जर याची माहिती आता देणार असालतर ती देण्यात यावी. जर माहिती नसेलतर अर्धवट माहीतीच्या आधारावर आपण निर्णय घेता कामा नये अशी माझी सूचना आहे.

**मा.महापौर-** आता सागर अंगोळकरनी सूचना मांडलेली आहे त्याप्रमाणे आपण बजेट वाढवून घेवू म्हणजे आहे ते रुटीन चालू राहील. कोणी गरीब आलातर त्याला माघारी आपल्याला पाठवायचे नाही. शासनाकड आपण ती माहीती पाठवू.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता सागर अंगोळकरनीं बजेट वाढविण्यासाठी जी पाच कोटीची उपसूचना दिली त्याला अनुमोदन देतो आणि सविस्तर खुलासा करता आलातर करा नाहीतर आपण त्याबाबत सविस्तर बैठक घेऊ हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. डॉ.साळवी यांना पुण्याची माहिती असेलतर ती माहीती सविस्तर दयावी, त्याचा खुलासा दयावा. जर ती योग्य असेलतर ठिक आहे नाहीतर नंतर तुम्ही बैठक घ्या पण चालू वर्षासाठी आता सर्व नगरसदस्यांच्या मागणीनुसार या पाच हजारामध्ये आपण वाढ करु यात.

**मा.संदिप खोत (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ नाव संदिप खोत, माझ्याकडे सहा.आयुक्त क्रिडा आणि ह प्रभाग आहे. सदरचा विषय हा क्रिडा विभागाकडून आलेला आहे. महाराष्ट्र शासन निर्णय २००७ याद्वारे दरवर्षी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये २५ लाख एवढे अनुदान या दुर्धर आजारासाठी आहे. दुर्धर आजार म्हणजे हृदयरोग, कॅन्सर, किडनी आणि मेंदूचे आजार याच्यासाठी पिंपरी चिंचवड माहनगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी हा शासनाला २००७ साली उपक्रम केलेला आहे. त्याद्वारे शासन दरवर्षी २५ लाख हे आपण चॅरिटेबल ट्रस्टला मा.महापौरांच्या नावे रक्कम अदा करतो. २०१८ चा शासन निर्णय आहे त्याच्यामध्ये पाच हजार रु. परपेशंट रक्कम दयावी असं शासनान सुचित केलेलं आहे.

**मा.महापौर-** आयुक्त साहेब खुलासा करतील.

**मा.राजू मिसाळ –** मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की आताच आमच्या नेत्यांनी सांगीतल की साळवे साहेब त्याची माहिती घेवून आलेत. आयुक्त साहेब त्यांना खुलासा करु दयाना. तुम्हांला विनंती आहे की डॉ.साळवे यांना खुलासा करायला लावा. मा.महापौर आम्ही तुमचा सन्मान ठेवू पण जो व्यक्ती तीथे जावुन माहिती घेवून आलेला आहे त्यांच्याकडूनच आम्हांला काहीतरी कळू दया एवढीच विनंती होती.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. आता जो विषय चालू आहे त्याच्यामध्ये दोन बाब आहेत. पहीला जो भाग आहे त्याच्यामध्ये नियतकालीन

पध्दतीप्रमाणे २००७ ला जी आपल्याकडे ट्रस्ट स्थापन झाली त्याचे मा.महापौर अध्यक्ष आहेत. वैदयकीय मदत तीथे थोडयाफार प्रमाणामध्ये २५ लाख आहे ट्रस्टच्यामार्फत प्रति केस पाच हजार प्रमाणे आपण देतो. २०१८ मध्ये तो ५ हजार रुपयाला निश्चित केलेल आहे. त्याच्यामध्ये सुधारणा करायची झालीतर आपल्याला पुनश्च सभागृहाचा ठराव घेवून शासनाला पाठवावा लागेल. शासनाकडन पाच हजार ऐवजी दहा हजार, पंचवीस हजार दयायचे असतील जो काही निर्देश घ्यायचा असेल तो आपल्याला शासनाकडन घ्यावा लागेल. तशी सूधारणा करुन आपण परत सभागृहाकडे येवू शकतो हा एक पर्याय झाला. दुसरा पर्याय तुम्ही म्हणता की पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर अंशदान योजना करणे. अंशदान योजनेची मागे आपण सविस्तर माहिती घेतलेली आहे. पण या बाबतीमध्ये माझ सभागृहाला एक निवेदन आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही एक प्रगतीशील महानगरपालिका राहीली आहे आणि या महानगरपालिकेन एक वेगळ धोरण या पुर्वीपासून स्विकारलेल आहे आणि ते दाखवत आलेलो आहोत. पुणे महानगरपालिकेची जर आपण तुलना केलीतर आपल्या महानगरपालिकेमध्ये आज स्वतःच्या मालकीच ७५० बेडच हॉस्पिटल आपण वासीएममध्ये तयार केलेल आहे. तीथे नुसत वायसीएम हॉस्पिटल नाहीतर तीथे पीजी इन्स्टिटयूट स्थापन करुन चांगल्या राष्ट्रीय दर्जाचे वैदयकीय प्राध्यापक, सहा.प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आपण आज तीथे उपलब्ध केलेले आहेत. त्यामुळे आज पुणे महापालिकेची जर स्थिती बघीतलीतर डिस्ट्रीक्ट कोव्हीड हॉस्पिटल स्थापन करण्यासाठी त्यांना प्रायव्हेट रुग्णालयाची किंवा ससूणची मदत घ्यावी लागते जे की आपण पुर्णपणे स्वतःच्या संस्थेवरती  लक्ष कैंद्रीत केलेलं आहे. दुसरी बाब म्हणजे गेल्या पाच वर्षामध्ये या महानगरपालिकेनी पाच नवीन हॉस्पिटल बांधण्यावरती खर्च केलेला आहे जो की आपण अंतीम टप्प्यामध्ये येवून पोहचलेलो आहोत. त्याच्या मागील पुर्णतः भूमीका ही शहरातील गरीब नागरीकांना चांगली आरोग्य सुविधा मिळावी, वैदयकीय सुविधा मिळावी या हेतूने हे पाच हॉस्पिटल आपण बांधलेले आहेत. त्याच्यामध्ये नवीन भोसरी रुग्णालय बांधुन पुर्ण तयार आहे, नवीन जीजामाता रुग्णालय १२० बेडस बांधुन तयार आहे, बारा बेडचा त्याच्यामध्ये आयसीयू आहे व बारा बेडचा शटडावून आयसीयू आहे. हे देखील आज कोव्हीड संपल्यानंतर नागरीकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे. याव्यतिरीक्त तालेरा रुग्णालयाच बांधकाम चालू आहे. थेरगाव रुग्णालयाच २०० बेडसच बांधकाम सुरु आहे. आकुर्डीच नवीन रुग्णालयाच बांधकाम सुरु आहे. एकंदरीत विचार

केलातर साधारणतः आपण ७०० नवीन बेडस  शहरामध्ये निर्माण करतो आहोत, महानगरपालिकेच्या इन्व्हेसमेंटमधुन. त्यामुळे ही महानगरपालिका ऑलरेडी वैदयकीय क्षेत्रामध्ये जास्त खर्च करत आलेली आहे. ज्यावेळेला ही पाचही रुग्णालय कार्यान्वित होतील त्यावेळेला ऍडीशनल सातशे बेडस कार्यान्वित करण्यासाठी जी काही मेडीकल मॅनपॉवर लागेल, जी काही पॅरामेडीकल मॅनपॉवर लागेल, जे काही इक्विपमेंट लागेल ते सुध्दा आपल्याला उपलब्ध करुन देता येवू शकेल. मात्र ती कशी चालवायची कारण आतापर्यंत आपल्याला ज्या काही अडचणी आहेत या अडचणी पाहता पी.जी.इन्स्टिटयूट स्थापन करण्याच्या पुर्वीची वायसीएमची स्थिती जर पाहीलीतर आपल्याला डॉक्टर्स केवळ आपल्या एमबीबीएस, एमडीच्या पगारावरती उपलब्ध होत नव्हती. ज्यावेळेला आपण पी.जी.इन्स्टिटयूट म्हणून केल त्यावेळेला डॉक्टर्स उपलब्ध व्हायला सुरवात झाली. तशाच पध्दतीचा डीएमबीचा काहीतरी उपक्रम आणून आपल्याला ही हॉस्पिटल कार्यान्वित करता येवू शकतील. अथवा पीपीपी तत्वावरती या विषयावरती सुध्दा या पुर्वी सर्वसाधारण सभेपुढे चर्चेला हा विषय आपण आणलेला होता. पण याच्यावरती खरोखर चांगला निर्णय या सभागृहाला घ्यावा लागला कारण आपण एकदा तत्व ठरवल की नागरीकांना आकोर्डेबल पण बेस्ट सुविधा आपण आपल्या वैदयकीय दयायची म्हणली तर आपण त्या पध्दतीच स्वयंसंचलीत किंवा पीपीपी संचलीत आपण रुग्णालय व्यवस्था निश्चितपणे निर्माण करु शकतो. मात्र त्यासाठी जो काही देय निधी असेल तो आपल्याला दयावा लागेल. आपण केवळ तत्व ठरवण्याची आवश्यकता आहे, तत्व ठरल्यानंतर दोन्ही अधिक चांगल्या पध्दतीनं पुणे शहराच्या तुलनेन आपण चांगल्या रितीने हॉस्पिटल बांधुन ठेवलेले आहेत. मग एखाद त्यातल हॉस्पिटल आपण पुर्णपणे कॅन्सरसाठी डेडीकेट करु शकतो. एखाद रुग्णालय आपण पुर्णपणे हार्ट पेशंटसाठी डेडीकेट करु शकतो आणि बाकीचे हॉस्पिटल आपण जनरल हॉस्पिटल ठेवू शकतो. या पध्दतीने देखील आपल्याला करणं शक्य आहे. मात्र आता ही सगळी रुग्णालय सध्यातरी कोव्हीडसाठी दोन रुग्णालय आपण घेतलेली आहेत. प्यारलल तीन रुग्णालय बनत आहेत. नेत्र रुग्णालय आपल बांधुन तयार आहे ते देखील वापरता येण्यासारख आहे. आम्ही वैदयकीय विभागामार्फत एक चांगल्यारुपी पॉलीसी तत्व आम्ही तयार करतो त्याच्यामध्ये आम्ही पुण्याची योजना देखील कम्पेअर करुन त्या दोन्ही योजनासकट आम्ही रितसर प्रस्ताव पुढील दोन महीन्यामध्ये सभागृहासमोर

घेवून येतो. एकदा पॉलीसी निर्णय झाला की त्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करुन आपण योग्य तो मार्ग भविष्यामध्ये ठरवावा असं माझ सभागृहाला निवेदन आहे.

**मा.तुषार हिंगे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर-** वि.क्र.१ उपसूचनेसह मंजूर.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ५४९ विषय क्रमांक –१

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१०६/२०२०, दि.०६/०५/२०२०

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७०७८ दि.१३/०५/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे ह्रदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदुचे आजार, दुर्धर आजार, गंभीर अपघातग्रस्त आणि दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रूग्णांना तसेच नैसर्गिक आपत्ती पिडितांना अर्थ सहाय्य केले जाते. शासन निर्णय क्र.पीसीसी ३००६/१९९७ प्र.क्र.३९७/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.१८/१२/२००७ अन्वये दरवर्षी २५,००,०००/- एवढे अनुदान देण्यास मान्यता दिलेली आहे. सन २०२०-२०२१ पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी यांना र.रू २५,००,०००/- (अक्षरी र.रू पंचवीस लाख फक्त) अदा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरीक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट पिंपरी यांना र.रु. ५ कोटीचे अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.संतोष लोंढे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- २

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.शशिकांत कदम व मा. शितल शिंदे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७१२५ दि.२७/०५/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहरात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. स्त्री शिक्षणाची जननी म्हणून सावित्रीबाईचे कार्य अनमोल आहे. पिंपरी चिंचवड शहरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारल्यास विशेषतः महिला वर्गास सतत प्रेरणादायी ठरेल व शहराच्या नावलौकीकात भर पडेल. तसेच समाज बांधवांना प्रेरणादायी ठरेल. तरी सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन त्याकरिता तरतूद करणे व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष / कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | २०२०-२१ चे अंदाजपत्रकातील तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रुग्णालये प्रसुतीगृहे व औषधालये – प्रभाग क्र.१० मधील मनपा व दवाखाना इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | प–अंदाज पत्रक | ६०४ (२)१ | ७०,००,००० | २५,००,००० | ० | १०,००,००० |
| २ | प्रभाग क्र.१० मधील महात्मा ज्योतीराव फुले पुतळयाशेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व त्याकामी वास्तुविशारद नेमणे व स्मारकाचे सुशोभिकरण करणे करिता | -- | नविन काम | १०,००,००,००० | -- | १०,००,००० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | | | |

वरील कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यता व तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर स्टॅण्डींगचे चेअरमन संतोष लोंढे यांच्यामुळे आमच्या विषयाला चालना मिळणार आहे. आयुक्त साहेब तुम्हांला अनेकदा पत्रव्यवहार केलेला आहे की आता आपल्या महानगरपालिकेच्या एन्ट्रन्स गेटला पुण्श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा त्याठिकाणी आहे. तीथ खरतर दर रविवारी पुजा करण्याची प्रथा आमच्या समाज बांधवानी त्याठिकाणी केलेली आहे. परंतु मेट्रोच काम चालू असल्यामुळे आणि अगदी पिलर अहिल्यादेवीच्या चेह-या समोर की ज्याठिकाणी अहिल्यादेवीचा पुतळा आहे जो की अपल्या सगळयासाठीच वंदनीय आहे. निश्चितपणे यामुळे चांगल्या प्रकारची प्रेरणा आपल्याला मिळते अशा अहिल्यादेवीच्या पुतळया समोर पिलर येतात. मी परवा देखील आपल्या आयुक्तांना फोन केला आणि सांगीतल्यानंतर मेट्रो काम करतात किमान त्या पुतळयाच्या तेथे वरचा जो स्लॅब होता त्याच्यावर दोन विटा पडलेल्या मला दिसल्या. चुकूनजरी अनुचीत प्रकार घडलातर अत्यंत वाईट असं काहीतरी उदभवू शकतं, त्यदृष्टिकोनातून आपण पाऊल उचलली पाहीजेत हा पहीला भाग. दुसरा भाग त्यावेळेला पण पत्र दिलं होतं की त्याच ठिकाणी जी काही मागची जागा आहे तीथली आपण थोडीफार जागा घेवून तो पुतळा तेथे विकसीत केला पाहीजे आणि हे काम आपण मेट्रोकडन करतो. मेट्रोची जी लोक होती राम यांच्याशी चर्चा पण झालेली होती त्यांनी सांगीतल होत की आम्ही आमच्या खर्चानी तो पुतळा डेव्हलप करुन देवू. सन्मा.महापौर साहेब, मला विनंती आहे की फक्त तिथ जागा अव्हेलेबल करनं एवढा एकच विषय होता आपल्याकडे आणि मेट्रोला आपण आपल्या पालिकेच्या अत्यंत प्राईम जागा देतो. आज सुजाताताईच्या वॉर्डातली एसटी स्टॅण्डची तीथली जागा त्यांना देतो. ठिक आहे मेट्रो आपल्या शहरासाठी असली तरी आपले प्राईम लोकेशन त्यांना देत असताना या अत्यंत प्राचिन म्हणजे अत्यंत पुर्वीपासून आपल्या शहरात असलेले

भूषण आहेत हे पुतळे तरी त्यांची अवहेलना होती ती होवू नये कारण त्यांच्याच प्रेरणेने, त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आपण पुढे चालतो, या विषयला मी उपसूचना मांडते.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पिंपरी चौक मध्ये पुतळा आहे. सध्या शहरामध्ये मेट्रोचे काम जोरात चालू आहे. मेट्रोच्या कामामुळे त्यातील काही पिलर्स हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयाच्या अगदी समोर आहेत. त्यामुळे पुतळयाचे पाविञ्य, प्रेरणा यांपासून नागरीक वंचित होत आहेत. तरी सदर ठिकाणी १० गुंठे जागा उपलब्ध करुन त्वरीत मेट्रोला कळवावे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळयाचे सुशोभीकरण मेट्रो मार्फत पुर्वी झालेल्या चर्चे प्रमाणे करुन घेणेस मान्यता देणेत यावी मेट्रोकडून न झाल्यास किंवा समस्या आल्यास पिं.चिं.मनपाने १० गुंठे जागेसह पुतळयाचे सुशोभिकरण देखील करावे त्यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझा एक प्रश्न आहे की आपण पिंपरी चिंचवड मधील जेवढे पुतळे बांधले त्या पुतळयांकड आपल लक्ष आहे का. मी एक ते दिड वर्षापासून लेटर दिल आहे. माझ्या वल्लभनगरमध्ये आतमध्ये शिरताना यशवंतराव चव्हाणांचा पुर्णाकृती पुतळा आहे. पण आतापर्यंत किती जणांना तो पुतळा कळतो. मी त्यावेळेला तुम्हांला निवेदन दिलं होतं निदान तो पुतळा यशवंतराव चव्हाण रुग्णालया मध्ये तरी तुम्ही तो स्थापित करा किंवा वल्लभनगर एसटी स्टॅण्डची जागा जी मेट्रोला आपण दिली त्यामध्ये एक साईडला एक कॉर्नर आहे की तेथे एक ते दोन गुंठयाची जागा आपण त्यांच्याकडून डेव्हलप करुन घेवू शकतो. माझी नम्र विनंती असेल की यशवंराव चव्हाणांचा पुर्णाकृती जो पुतळा आहे त्याच्याखाली रिक्षा स्टॅण्ड आहे त्याला बॅनर लावतात आणि तेथे पत्ते खेळले जातात. तेथे कुठलीही लाईट नाही. तरी माझी याला एक उपसूचना आहे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- महाराष्ट्राचे शिल्पकार श्री.यशवंतराव चव्हाण यांचा वल्लभनगर एस.टी.स्टँड जवळील पुतळा त्याची व्यवस्थीत

देखभाल होत नाही तसेच सदर पुतळा दर्शनी भागात नसल्यामळे त्याचे स्थलांतर १) वल्लभनगर ए.टी.स्टँड मध्ये किंवा २) यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलमध्ये करुन योग्य ते सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.शैलजा मोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता पुतळयाचा विषय झाला त्याविषयी मी पण बोलते आहे. जेव्हा आम्ही निवडून आलो त्या काळापासून टिळकांचा पुतळा, हार्डीकरजी आपल्याला सगळ माहिती आहे. त्यांच सुध्दा कार्य बघता तो जेवढया जागेत आहे आणि जेवढया उंचीचा आहे तेवढी त्यांची उंची नाही. त्यांची उंची म्हणजे आपण आज जे काही सुरक्षीत बसलेलो आहोत. सावरकर आहेत, टिळक आहेत, आगरकर आहेत, सावित्रीबाई फुले आहेत, रमाई अंबेडकर आहेत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत त्यांच्यामुळे आपण सुरक्षीत बसलेलो आहोत. त्यांची उंची पाहता खरतर त्यांचा पुतळा तसा नाही. जेव्हा मी १९८५ पासून प्राधिकरणात राहायला आलोत तेव्हापासून वाटायच "जबतक सिस्टीम में आते नही, तबतक कुछ भी नही कर सकते, बदलही नही कर सकते इनको" आता मी सिस्टीममध्ये आलेले आहेतर मला बदलायच आहे. तीन वर्षे झाले, हार्डीकरजी, आपणही ब-याचशा बैठका घेतल्या सगळ आपल झालेल आहे. टिळकांना आपण बोलवलं, त्यांचे आर्किटेक्ट बघीतले. त्यांच्या आर्किटेक्टनी जे सांगीतल ते आपल्याला जमत नव्हत तेवढे आपण पैसे देवू शकत नव्हतो. हे सगळ झाल्यानंतर मागची जागा घ्यायची आहे त्याच काय झाल. हे पुतळे नक्की होणार आहेत कारण त्यांच्यामुळे आम्ही आज आहोत. रमाबाईंचा पुतळा आहे, आहील्याबाई होळकरांचा आहे, जिजाऊ आहे त्यांच्यामुळे आम्ही महीला आज येथे आहोत, हा आम्हांला अभिमान आहे. समिती गठीत झाली पुढे काय झाले त्याचा खुलासा करावा. टिळकांचा पुतळा लवकरात लवकर आहे त्या जागेत व्हावा. आम्ही चारही नगरसेवक आहोत, सर्वांच सहकार्य मिळत तेव्हाच आपण काम करतो. आयुक्त आणि प्रशासन आणि माई आहेत म्हणून महापौर आहेत म्हणून आपण म्हणतो की एकाच नान्याच्या दोन बाजू आहोत. राजूच कायम म्हणण असंत, आम्ही दोघ, आम्ही दोघ, आम्ही दोघ. कोव्हीडच पण झाल आनुप आणि चौघेजण होते. तरी आम्ही दोघ, आम्ही दोघ असं न करता प्रभागाचा

विचार करायचा असेलतर आम्ही सगळेजण असं म्हणलतर चांगल होईल. मागेही मी सांगीतलेल आहे की चौघ नगरसेवकांच्या माध्यमातून आम्ही हे हलवणार आहेत. चौघ नगरसेवकांच्या माध्यमातून आम्ही हे करणार आहेत. जर राजू आणि अमित असं म्हणत असतील आम्ही दोघ, आम्ही दोघ, आम्ही दोघतर आज पासून तुमच्या दोघांची आणि आमच्या दोघींची लढाई करु यात. आमची सभागृहाला विनंती राहील, हार्डीकरजी आपल्याला पुर्ण विषय माहीत आहे तरी टिळकांचा पुतळा लवकरात लवकर करावा ही विनंती मी पुढील उपसूचना देते-

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- निगडी प्राधिकरण येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा सुमारे २० वर्षे पुर्वीचा अर्धाकृती पुतळा आहे. सदर पुतळयांचा आकार चौकाचे आकारमान लक्षात घेता खुपच छोटा आहे. त्यामुळे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौक येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकांचा पुतळा पिं.चिं. महानगरपालिकेच्या 'फ' क्षेत्रीय कार्यालय इमारतीच्या आवारात स्थलांतरीत करुन लोकामान्य बाळ गंगाधर टिळक यांचा नव्याने सुधारीत मोठया आकाराचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.शर्मिला बाबर –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.सागर आंगोळकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या ऑक्टोबर महीन्यामध्ये आठवले साहेब आले होते त्यावेळेस सर्व सन्माननीय होते आपणही होतात. त्यावेळेस आपण घाईघाईने रमाई पुतळयाचे भूमीपुजन केलं होतं. या विषयाच्या माध्यमातून त्या पुतळयाचही काम लवकरात व्हाव अशी मी विनंती करतो.

**मा.संतोष लोंढे -** सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

**मा.वैशाला घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी ख-या अर्थान मी स्थायी समिती चेअरमनच मनापासून अभिनंदन करीन आणि आभार पण मानेल की ब-याच दिवसापासून मागणी असलेला हा प्रश्न आहे तो त्यांनी मार्गी लावला आहे. फक्त मी अभिनंदनासाठीच उभी आहे त्यामुळ मी मनापासून त्यांच अभिनंदन करते आणि आभारही मानते.

**मा.महापौर-** हा विषय उपसूचनेसहीत मंजूर.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ५५० विषय क्रमांक- २
दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.शशिकांत कदम व मा. शितल शिंदे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.७१२५ दि.२७/०५/२०२० अन्वये.

पिंपरी चिंचवड शहरात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा सद्यस्थितीत अस्तित्वात नाही. स्त्री शिक्षणाची जननी म्हणून सावित्रीबाईचे कार्य अनमोल आहे. पिंपरी चिंचवड शहरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारल्यास विशेषतः महिला वर्गास सतत प्रेरणादायी ठरेल व शहराच्या नावलौकीकात भर पडेल. तसेच समाज बांधवांना प्रेरणादायी ठरेल. तरी सदरच्या कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन त्याकरिता तरतूद करणे व प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष / कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | २०२०-२१ चे अंदाजपत्रकातील तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रुग्णालये प्रसुतीगृहे व औषधालये – प्रभाग क्र.१० मधील मनपा व दवाखाना इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | प–अंदाज पत्रक | ६०४ (२)१ | ७०,००,००० | २५,००,००० | ० | १०,००,००० |
| २ | प्रभाग क्र.१० मधील महात्मा ज्योतीराव फुले पुतळयाशेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व त्याकामी वास्तुविशारद नेमणे व स्मारकाचे सुशोभिकरण करणे करिता | -- | नविन काम | १०,००,००,००० | -- | १०,००,००० | ० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थापत्य विषयक कामे करणे. | | | | | | |

वरील कामाचा सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन प्रशासकीय मान्यता व तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पिंपरी चौक मध्ये पुतळा आहे. सध्या शहरामध्ये मेट्रोचे काम जोरात चालू आहे. मेट्रोच्या कामामुळे त्यातील काही पिलर्स हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयाच्या अगदी समोर आहेत. त्यामुळे पुतळयाचे पाविञ्य, प्रेरणा यांपासून नागरीक वंचित होत आहेत. तरी सदर ठिकाणी  १० गुंठे जागाउपलब्ध करुन त्वरीत मेट्रोला कळवावे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळयाचे सुशोभीकरण मेट्रो मार्फत पुर्वी झालेल्या चर्चेप्रमाणे करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे मेट्रोकडून न झाल्यास किंवा समस्या आल्यास पिं.चिं.मनपाने १० गुंठे जागेसह पुतळयाचे सुशोभिकरण देखील करावे त्यास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्राचे शिल्पकार श्री.यशवंतराव चव्हाण यांचा वल्लभनगर एस.टी.स्टँड जवळील पुतळा त्याची व्यवस्थीत देखभाल होत नाही तसेच सदर पुतळा दर्शनी भागात नसल्यामळे त्याचे स्थलांतर १) वल्लभनगर ए.टी.स्टँड मध्ये किंवा २) यशवंतराव चव्हाण हॉस्पिटलमध्ये करुन योग्य ते सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच निगडी प्राधिकरण येथील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा सुमारे २० वर्षे पुर्वीचा अर्धाकृती पुतळा आहे. सदर पुतळयांचा आकार चौकाचे आकारमान लक्षात घेता खुपच छोटा आहे. त्यामुळे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक चौक येथील लोकमान्य बाळगंगाधर टिळकांचा पुतळा पिं.चिं. महानगरपालिकेच्या ‘फ’ क्षेत्रीय कार्यालय इमारतीच्या आवारात स्थलांतरीत करुन लोकामान्य बाळ गंगाधर टिळक यांचा नव्याने सुधारीत मोठया आकाराचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१                                        प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ३

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.भूजि/०६/कावि/४२४/२०१९ दि.१८/११/२०१९

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (PMPML) च्या ताफयात सध्या २१०० बसेस आहेत. तसेच ताफयामध्ये पुढील वर्षभरात इलेक्ट्रीक व सीएनजी मिळून १००० नवीन बसेस दाखल होणार आहेत. या सर्व बसेसच्या पार्कींगसाठी महामंडळास जागा कमी पडत आहे. त्यामुळे शेकडो बसेसची पार्कींग महामंडळास रस्त्यावर करावी लागत आहे. या बसेसच्या पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची आवश्यकता आहे. मौजे वाकड येथील स.नं. १०/१ पै., १०/२ पै., १०/३ पै., ११ पै. व १६०/४ पै. जागा मनपाच्या ताब्यात आहे. सदर जागा मंडळास मिळणेबाबत विनंती केलेली आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळास (PMPML) जागा कमी पडत आहे. मौजे वाकड येथील स.नं. १०/१ पै., १०/२ पै., १०/३ पै., ११ पै. व १६०/४ पै. मधील आरक्षण क्र. ४/११ जकात नाक्यासाठी असलेली ४१८९.८० चौ.मी. व १२ मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे १३७९.०० चौ.मी.क्षेत्र असे एकूण ५५६८.८० चौ.मी. क्षेत्र जागा मनपाच्या ताब्यात अहे. सदर जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) यांना ०३ वर्षाच्या कालावधी करिता देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.करुणा चिंचवडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब, दोन ते आडीच वर्षापुर्वी या विषयावर आपल्याला एक पत्र दिलं होतं. संबंधित ही जकात नाक्याची जागा आहे त्याठिकाणी मल्टीमोडल हब कराव. जेणे करुन त्याठिकाणी होणारी वाहतूक मग ते मेट्रो स्टेशन असेल किंवा मुंबईला जाणा-या सहयाद्रीच्या गाडया असतील आणि पीएमपीएमएलच्या गाडया असतील हे सगळे एका ठिकाणी बसवून त्याचा कमर्शिअल युज होऊन आपल्या महापालिकेला चांगल उत्पन्न होईल. आणि आता सध्या जी जकात नाक्याची जागा आहे ती संपुर्ण ताब्यात नाही त्याठिकाणी जवळ जवळ साडेचार एक्करच रिझर्व्हेशन आहे. हा सर्व्हे नं. १० आहे त्याच्या शेजारी १२ आणि १५

आहे. ती आमच्या कस्पटे परिवाराची जागा आहे रिझर्व्हेशनमध्ये आहे. मल्टीमोडल हब होणार असेलतर ती जागा महापालिकेला पण दयायला आम्ही सर्वजण तयार आहोत.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सदर जागा PMPML ला ३ वर्षासाठी भाडयाने न देता Metro Station PMPML व मुंबईला जाणा-या सहयाद्रीच्या गाडया यांच्यासाठी मल्टीमोड हब करण्यास मान्यता देणेत यावी, जेणेकरुन महापालिकेला उत्पन्नात वाढ होईल व ट्रॅफीकचा प्रॉब्लेम सुटण्यास मदत होऊन शहराच्या वैभवात भर पडेल.

**मा.सागर अंगोळकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे सादर करणेत आला होता. महापालिका ठराव क्र. ४७२ दि.२०/१०/२०१९ अन्वये यापुर्वी ठराव क्र. ११०२ दि. १८/०२/२०११ अन्वये मौजे बो-हाडेवाडी येथील जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करण्याच्या फेरबदलाच्या प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता दिली आहे. तथापि बो-हाडेवाडी येथील जमिनीस असलेली विकसनक्षमता व नगररचना योजना करण्यास लागणारा कालावधी पाहता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता नाही तसेच जमिनी रहिवास विभागात समाविष्ठ केल्यास नगररचना योजना करण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे यापुर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये पाठविलेला मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठीचा फेरबदल प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता नसुन सदर प्रस्ताव त्वरीत मंजुर करण्याबाबत शासनास कळविण्यास मान्यता देणेत यावी. तसेच यापुर्वी सदर प्रस्तावातील H.S.466 C हे आरक्षण अंशतः स.नं. ३१ या जमिनीचे धारकांनी त्यांचे जागेत विकसीत करण्याची तयारी दर्शविलेले त्यानुसार बदल करणेस मान्यता देणेत यावी. तसेच ग. नं. ६९ पै. व ग.नं.६७ पै. मधुन १८.०० मी. रस्त्यापासून ग.नं.७२० पर्यंत १२.०० मी. पुर्व-पश्चिम रस्ता या जमिनीचे धारकांनी त्यांचे जागेत विकसीत करण्याची तयारी दर्शविल्याने त्यानुसार बदल करणेस मान्यता देणेत यावी. तसेच मौजे च-होली ता. हवेली येथील स.न. १०९/२/३, ११५/१, ११६/२, १२२/२ येथुन पाझर तलाव

हद्दीतुन ३० मी. डी.पी. रस्ता जात असुन सदर रस्त्याचे काम करणेची मागणी स्थानिक शेतकरी व नागरिक करीत आहेत. सदरच्या रस्त्यामुळे च-होली व लोहगाव रहदारीस फायदा होणार आहे. त्यामुळे मनपा हद्दीतील पाझर तलावातुन नियोजित ३० मी. रस्ता असुन पाझर तलावातील पाण्यास अडथळा न होता सदरचा रस्ता करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब या विषयावर आपली दोन तीन वेळा चर्चा झाली. आपल स्वतःच १११,११२ हे रिझर्व्हेशन तुमच्या ताब्यात आहे. मी तुम्हांला पहील्या दिवसापासून सांगतो की एवढया प्राईम लोकेशनची जागा आहे. त्याठिकाणी मेट्रो स्टेशन प्रस्तावित आहे. पुर्वी नाक्याच रिझर्व्हेशन आहे. ट्रोन्सपोर्ट हब त्याठिकाणी करता येईल. तुम्ही तुमची मालकी पीएमपीएमएलला देवू नका. मी कितीतरी वेळा सांगीतल आहे तरी का अग्रह करता याचा काही अंदाज येत नाही. कारण की तुम्ही पण दोन तीन वर्ष तीथे आहात. अशी काय पीएमपीएमएलनी तुमच्यावर जादू केली हे मला पण माहीत नाही. पब्लिक ट्रान्सपोर्ट पाहीजे ते आपल्याला गरजेच आहे. तुम्ही त्यांना दुसरी पर्यायी जागा दयाना. ही जागा एकदम प्राईम लोकेशनची आहे. ती जागा दिलीतर त्याठिकाणी सकाळ संध्याकाळ एवढी ट्रॅफिक होती. एकदा सर्व्हिसरोड चालू झालेतर नको नको होईल आपल्याला, त्या बस आत बाहेर करता येणार नाही. माझी आपल्याला विनंती आहे की तुम्ही अल्टरनेटीव्ह इंदिरा कॉलेजच्या तीथली ट्रान्सपोर्टरची जागा आहेना ती दयावी. तुम्हांला सीएनजीचा पंपच बसवायचा आहेतर तीथही बसवानां. अस नाही की तीच जागा दिली पाहीजे. तुम्ही परत विचार करावा एवढया चांगल्या लोकेशनची जागा तुम्ही पीएमपीएमएलला देवू नका. चांगल ट्रान्सपोर्ट हब होईल, मेट्रो स्टेशन आहे. आता शेंडगेताईनी सांगीतल की बाहेर अहिल्याबाई होळकरांचा पुतळा आहे तीथ मेट्रो स्टेशन होणार आहे. लोकमान्य टिळकांचा पुतळा निगडीलाही मेट्रो स्टेशन होणार आहे. अशा ठिकाणी जर हे नेलेतर ज्या ठिकाणी लोकांची रोजची ये-जा आहे. ज्यावेळेस हे प्लॅनिंग करता त्याचवेळेस हे सुध्दा प्लॅनिंग करानां. पुतळे फक्त जयंती, पुण्यतीथीला जायच आणि हार घालायचे याच्यापेक्षा तो नागरीकांना रोज दिसलेतर त्यांचे आदर्श घेता येईल, त्यांची माहिती मिळेल. हा तर शहरातील विषय आहे पण तीकड साहेब, पाच एक्कर जागा आहे चांगल ट्रान्सपोर्ट हब होईल. तुम्ही आता ती जागा पीएमपीएमएएलला देवू नका अशी माझी विंनती आहे.

त्याच्याऐवजी इंदिरा कॉलेजच्या तीथ जी सात गुंठे जागा तुमच्या ताब्यात आहे तीथं तुम्ही तो सीएनजी, पेट्रोल पंप बसवा. पर्यायी भरपूर जागा आहेत. पण ही जागा पीएमपीएमएलला देवू नये अशी आपल्याला विनंती करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पीएमपीएमएलचा विषय आहे आणि त्याठिकाणची तीन वर्षासाठी जागा पार्कींगसाठी देतो. तीन वर्षासाठी कसे काय देतो आपण. आपण कायमस्वरुपी देणार का फक्त तीन वर्षासाठी देणार. त्याठिकाणी जसं पुणे महानगरपालिकेनी केलेलं आहे तस कमर्शिअल कॉम्प्लेक्स बांधण्याचा आपण प्रस्ताव का नाही ठेवत. तसा प्रस्ताव ठेवलातर त्या जागेचा जो युज आहे तो सुध्दा चांगल्याप्रकारे होईल, उत्पन्न पण मिळेल आणि पीएमपीएमएलला पार्कींग स्पेस जे देणार आहोत त्याचा पण आपल्याला फायदा होईल. त्याहीपेक्षा महत्वाच म्हणजे पीएमपीएमएलच्या बदली कामगारांना अजून पर्यंत आपण पगार दिलेला नाही. आपण त्या संदर्भात काय केल मी त्या संदर्भात आपल्याला निवेदन दिलेल आहे. सीएमडी मॅडमला सुध्दा दिलेलं आहे. त्याच्यावरती अजूनपर्यंत हालचाल झाली नाही. आपण वाट बघतो का काही एखादी दुर्घटना घडायची. आपण निर्णय घ्या. आपण त्यादिवशी मला सांगीतल की कोव्हीडसाठी आपल्याला अनेक कामगार लागणार आहेत. तसे आपण पत्र दयावे. जे कामगार इकडचे असतील दोनशे, पाचशे, सातशे, आठशे जे काही असतील ते आपल्याकडे घ्या. आपल्याकडे त्यांना पहीला पगार तरी करुन टाका. शेवटी त्यांच्या पगाराची जबाबदारीतर आपलीच आहेनां. किती दिवस त्या लोकांना उपाशी ठेवणार आहेत. आपण एवढ जर करतो तर त्यांच्या बाबतीत आपण तेवढ संवेदनशील असणं गरजेचं आहे. मा.महापौर साहेब, आता जो विषय आलेला आहे त्या विषयाच्या मध्ये आपण कमर्शिअल कॉम्प्लेक्स कराव. तीनच वर्षासाठी असं इथ स्पेशीफिक लिहील आहे. तरी तीन वर्षासाठी न करता कायमस्वरुपी करायच असेलतर कमर्शिअल कॉम्प्लेक्स कराव आणि ते डेव्हलप करुन जर तुम्ही दिलंतर जास्त चांगल होईल. आपलाही फायदा होईल व जागेवरती मालकी हाक्क पण आपलाच राहील, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पीएमपीएमएलचा विषय आल्यानंतर खरतर सगळेजण चांगल्या पध्दतीचा विचार करुन आपल्याला किती त्रास होतो हे सभागृहात नेह्मी मांडत असतात. जस सिमाताईनी सांगीतल तस मी सुध्दा आपल्याला फोन केलेला होता की त्या लोकांचा पगार झालेला नाही. कोरोनाच्या

परिस्थितीमध्ये जाता जाता मी एका ठिकाणी उभी होते आपल्याकडे सिल करणा-या ऐरीयामध्ये. एक मुलगा आला आणि तो म्हणाला की ताई काहीतरी मदत करता का, तर मी म्हणाले करते, तुझ नाव देवून जा तुझ्या घर पोहच मदत येईल. मग तो म्हणाला तशी मदत नको मला. म्हणजे माणस स्वाभिमानी पण असतात. त्याला म्हणाले मग काय पाहीजे तुला तो म्हणाला आम्हांला पगारच नाही. मी लगेच तीथूनच तुम्हांला फोन केलेला होता साहेब, की असं असं झालेल आहे पीएमपीएमएलमध्ये सध्या पगार चालू नाही. एवढया लोकेशनला आपला हा प्लॉट आहे तो आपण पीएमपीएमएलला देणं उचित अजीबात नाही. याच कारण असं सांगते की आज जर तुम्ही पुण्याला जायच ठरवलतर त्या वाकडेवाडीच्या तीथे चौकामध्ये आताच आपल्याला सिग्नल पास करायला कितीवेळ लागतो ते बघा, गर्दीच्यावेळेला. सगळया एसटी ब-याचशा तीथ स्टॅण्डला उभ्या असतात. परत आपण हा प्लॉट जर दिलातर तसेच होईल. मग ते सांगतात तो प्लॉट दया. त्या प्लॉटवर चांगल कॉलेज किंवा इन्स्टिटयूट आपल्याला उभे करता येईल. आपण नेहमी म्हणतो सत्तेत असतील त्यांनी विचार करावा, कमर्शिअल कॉम्प्लेक्स बनवा आणि तो सात गुंठयाचा प्लॉट त्यांना दया. पुर्वी विषय होता की जकात नाक्याचे जे प्लॉट आहेत ते त्यांनी मागीतले होते. परंतु साहेब, आज पीएमपीएमएलचे कुठलेही काम चांगल आजही नाही. आपल्या लोकांना बिलकूल चांगली वागणूक देत नाहीत. काही लोक रिटायर्मेंटला आलेली आहेत त्यांच वय वर्षे ५२ ते ५५ झालेले आहेत अशा लोकांना त्यांनी पास केंद्रातील लोक होती त्या लोकांना सांगीतल तुम्ही एमएस-सीआयटी करुन या नाहीतर तुम्ही ज्याठिकाणी होता तीथे जा. आता कोरोनाच्या काळामध्ये हे सांगीतल ही सुध्दा गोष्ट आयुक्त साहेब तुमच्या कानावर टाकली आहे मी. आता ५२ वर्षे, ५५ वर्षाच्या माणसाने एमएस-सीआयटी करायची का. आता लॉकडावूनच्या काळामध्ये त्यांना एमएस-सीआयटी कुठे मिळणार. मी स्वतः वाघमारे साहेबांशी बोलले आहे. मी म्हणाले ठिक आहे पण एमएस-सीआयटी करायला सांगीतल त्याला काळ वेळ तरी आहे का नाही. लॉकडावूनमध्ये एकतरी एमएस-सीआयटीची इन्स्टिटयूट चालू आहे का. मग हे लोक पिंपरी चिंचवडचे आहेतना मग त्यांच काहीतरी काढायच. त्यांचा काहीतरी विकपॉईंट काढायचा आणि त्यांना कुठेतरी नेऊन गप्प बसवायच. साहेब, तुम्ही तीकड मिटींगला जाता या गोष्टी आम्ही तुम्हांला सांगतोना त्या तुम्ही तीथ मांडा. ५२ आणि ५५ वर्षाच्या कर्मचा-याला आता कोरोना आहे, लॉकडावून आहे तो कुठे एमएस-सीआयटीचा कोर्स करणार आहे. चेअरमन तुम्ही तीकडे मिटींगला जातात तीथे गेल्यानंतर तुम्ही हे लक्षात

घ्यावे. मला वाटत तुमची अटॅचमेंट पीएमपीएमएलला जास्त आहे, तुमच्या घरातील सगळेच आहेत पीएमपीएमएलमध्ये. ५२ ते ५५ वर्षाच्या कर्मचा-याला सांगतात आता एमएस-सीआयटी करुन ये नाहीतर पास केंद्रातून काढून टाकण्यात येईल. मग ही परिस्थिती पिंपरी चिंचवडमध्ये आहे, आपण त्यांना जे जे मागीतले ते देतो. आज सुध्दा वाकडचा प्लॉट असु देत किंवा जकात नाक्याचा प्लॉट असू देत आपण त्यांना दयायला तयार असतो, पैसे मागीतलेतर दयायला तयार होतो. मग ही परिस्थिती जे लोक वयाने मोठे झालेली आहेत आता रिटायरमेंटला लोक आलेली आहेत त्यांना सांगतात की तुम्ही एमएस-सीआयटी करुन या नाहीतर तुम्ही ज्या वर्कशॉपला होतात, कुठल्या कुठल्या पोस्टला होतात तीथ तुम्ही जा. नवीन काहीतरी त्यांनी तीथ आता भरलय. हे चेअरमनच्या सुध्दा कानावर आलय मग हे सभागृहाला पण माहिती व्हायला पाहीजे. ५२ ते ५५ वर्षाच्या कर्मचा-यांना एमएस-सीआयटी करायला सांगतात ती पण पिंपरी चिंचवड मधील कर्मचा-यांना याचा अर्थ किती सावत्रपणा करावा आणि कुठल्या काळामध्ये हा लॉकडावूनचा काळ चालू आहे. म्हणून साहेब तुम्ही यामध्ये लक्ष घातल पाहीजे. वाकडचे लोक आहेत त्यांना जो संबंधित प्लॉट दयायचा तो त्यांना दया. आपल्याला जे कम्फरटेबल आहे तेच आपण केल पाहीजे. मी स्वतः वाघमारेशी तीनदा बोलले त्यावेळेला हो म्हणाले आणि परत पंधरा दिवसानी त्या लोकांना बोलायच ते बोलले. चेअरमन तुम्ही पण मिटींगला जातात म्हणून पीसीएमटीला थोड झुकत माफ ठेवा आणि घरातून समजून घ्या की पीसीएमटीच्या लोकांना काय काय त्रास आहे आणि त्या पध्दतीन तीथ भांडा एवढीच विनंती करते.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. PMPML कशा पध्दतीने मागते हे आपल्या सगळयांना माहिती आहे. मंगलाताईनी आताच तो विषय सांगीतला. महापौरताई त्याबाबतीत मी एवढ बोलणार नाही. परंतु आयुक्त साहेब मी आपल्याला एक सांगू इच्छिते की आताच सिमाताईनी मुद्दा मांडला की आपल्याकडे जागा आहेत त्याबद्दल आपण कमर्शिअलच्या बाबतीत विचार करायला सुरवात केली पाहीजे. जेणेकरुन महापालिकेच्या उत्पन्नामध्ये भर पडेल. आयुक्त साहेब, माझ्या वॉर्डाच्या शेजारी सुध्दा हॉकी स्टेडीअमला लागून एक डेपो आहे, अतीशय दयनीय अवस्था आहे त्याची. त्याठिकाणी जर काही औदयोगीक गाळे झालेतर तीथल्या लोकांना तीथे रोजगार मिळेल आणि आपल्या महापालिकेला उत्पन्न देखील मिळेल. माझी एवढीच विनंती होती की आपल्या जागा या डायरेक्ट ताब्यात न देता भाडे तत्वावर जर दिल्या म्हणजे PMPML चे

बोलत नाही पण तुम्ही मेट्रोला पण देणार आहेत. मेट्रोमध्ये जेवढ कमर्शिअल होणार आहे तेवढे कुठेही होणार नाही. तरी ते ताब्यात त्यांच्या न देता आपल्या महापालिकेला उत्पन्न कस होईल याद्दष्टिने आपण त्याठिकाणी विचार केला पाहीजे. मी सुजाताताईना पण विनंती करीन की त्यांच्या वॉर्डातला तो डेपो आहे त्याठिकाणी जर आम्हांला काही औदयोगीक गाळे मिळालेतर आमच्या भागातील पोरांचे उदयोग सुरु होतील. हॉकर्स झोन कमी होतील, टप-यातर आहेतच त्याच्यामुळे तोही त्रास आहे. तोही विषय आयुक्त साहेबांनी घ्यावा. आपण एकदा त्यांना ताब्यात दिलीतर आपला अधिकार रहात नाही. पण ऍटलीस्ट जे कमर्शिअल होणार आहे तो तरी अधिकार आपण आपल्याकडे घेतला पाहीजे. आतादोन तीन जागा दयायच्या आहेत तर तीथले नगरसदस्य आणि आयुक्त यांचा प्रश्न आहे. त्याबाबतीत आम्ही एवढ बोलणार नाहीत. माझ असे म्हणणे आहे की हा प्लॉट डायरेक्ट ताब्यात न देता भाडे तत्वावर देवून त्याच कमर्शिअल पॉईंट ऑफ व्हिव तो आपल्याकडे ठेवावा जेणेकरुन पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. येथून पुढे वॉर्डातील काम करायला पण खूप अडचण येणार आहे. वरतून व्यवस्थित पैसे आले नाहीतर वॉर्डातील काम करायला सुध्दा आपल्याला अडचण येणार आहे. त्याद्दष्टिने उत्पन्नात कशी भर पडेल याचा विचार आपण केला पाहीजे. आणि या द्दष्टिने लवकरच पावल उचलायला सुरवात केली पाहीजे, धन्यवाद.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आता जो ताईनी मेट्रोचा विषय सांगीतला आहे. खरच पिंपरी चिंचवड मधुन सगळया भागातून आपल्याच जागा आपण मेट्रोला दिलेल्या आहेत. सगळयात जास्त प्र.क्र. २० ची जागा गेलेली आहे. माझ एकच म्हणण आहे की त्यांचे जे मेट्रो स्टेशन आहेत की जिथे ते व्यावसाय चालू करणार आहेत ते व्यावसाय पिंपरी चिंचवडमध्ये कमीत कमी पाच वर्षे ज्याच वास्तव्य आहे त्याच लोकांना दयाव. नाहीतर मेट्रोचे सगळे विषय मुंबईवरुन होतात. माझी विंनती आहे की हे सगळे व्यावसायधारक आपल्या इथले असावे जेणेकरुन पिंपरी चिंचवडचे भूमिपुत्र किंवा स्थानिक लोक आहेत जे रहीवासी आहेत कमीत कमी तो इथे पाच वर्षे वास्तव्याला आहे अशानाच ते देण्यात यावे अशी माझी विनंती आहे. आमच्या ताईनी पुतळयाचा जो विषय घेतला तो सुध्दा यशवंतरावचा पुतळा हा फ्रंट बाजूला पाहीजे आणि ते त्यांच्याकडूनच करुन घ्यावे ही विनंती.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. इतक्या उपसूचना आल्या परंतु उपसूचना आपण घेत असताना ज्यावेळेस प्रशासनाकडून हा विषय

येतो त्यावेळेस आयुक्तांनी त्याची पुर्ण शहानिशा त्याची पुर्ण पडताळणी, जागा ताब्यात असणं त्याचा संपुर्ण लेआऊट, सिटी सर्व्हे या सर्व गोष्टीचा अभ्यास केल्या शिवाय आयुक्त हे आपल्या समोर ठेवत नाहीत. यांनी दिलेल्या उपसूचना या अतीशय योग्य आहेत त्याच्याबद्दल काही नाही. मग आता या उपसूचना घेवून या विषयाच नेमक काय करणार. एकतर हा विषय तुम्हांला तहकूब ठेवावा लागेल व आलेल्या उपसूचना सारासर विचार करुन ती जागा ताब्यात आहे का नाही याचा विचार करुन म्हणजे हा विषय साधारणतः अत्यंत गरजेचा असेलतर तीन महीन्यावर तरी जाईल. तरी याचा विचार करावा कारण की अत्यावश्यक गरज आहे का. हा विषय तीन वर्षासाठी आहे माझ्या माहीती प्रमाणे पीएमपीएमएलच्या संदर्भात हा दुसरा पार्ट झाला पण पहीला पार्ट हा जागेचा आहे. कारण की आयुक्त ज्यावेळेस विषय आणतात त्याची संपुर्ण प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतरच आणतात. त्यामुळे याविषयाला जर उपसूचना स्विकारायची असेलतर परत त्याची शहानिशा करुन त्याचा कालखंड लांबलातर तुमच्या मागणीवर काही परिणाम होईल का याचा विचार करुन निर्णय घ्यावा ही विनंती.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याविषयी मला असं वाटत की शहरामध्ये आपण मोठयाप्रमाणात बीआरटीएस रुट पुर्ण केलेले आहेत. या शहरामध्ये पीएमपीएमएलच्या माध्यमातून नव्याने बसेस येणार आहेत. या बसेस शहरामध्ये आल्यानंतर त्यांच्या पार्कींगची व्यवस्था करणेकामी आयुक्तांनी हा विषय तीन वर्षाचा पीएमपीएमएलच्यासाठी आणलेला आहे. मला अस वाटत की मगाशी राहूल आणि मंगलाताईनी सांगीतल की एवढी मोठी चांगली जागा आपण पीएमपीएमएलच्या माध्यमातून त्यांना तीन वर्षाच्या कालावधीसाठी ॲग्रीमेंट त्यांना करुन देणार आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये वाहतूकीच्या संदर्भात आज बीआरटीचे रुट आपण पुर्णपणे चालू करतो. बीआरटीचे रुट ज्यावेळेला चालू करणार, नवीन बसेस शहरामध्ये येतील त्यांच्या पार्कींगची व्यवस्था या मोठया पटांगणामध्ये करण्याच्या संदर्भामध्ये आपण हा विषय याठिकाणी आणलेला आहे. पीएमपीएमएलला आपण तीन वर्षाच्या कालावधीसाठी हा भूखंड दयायचा असं याठिकाणी सांगीतलेल आहे. पीएमपीएमएलला आपण तीन वर्षासाठी देणार आणि त्याच्याही अगोदर जर का आपण एकदा त्यांना देवून झाल आणि आपल्याला जर का मगाशी सांगीतल्याप्रमाणे ट्रान्स्पोर्ट हब करायचा विचार केला आणि त्यांना एकदा का ती जागा दिलीतर त्यांना पुन्हा आपल्याला काढता येईल का. अशा संदर्भात त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये आपल्याला काही नमुद करता येईल का यासंदर्भात आपण

विचार करावा. आपण मगाशी उल्लेख केला की पिंपरी चिंचवड शहरामध्ये बरेचसे आरक्षण आहेत अशा जागा आपल्याकडे खुप मोठया प्रमाणात ताब्यात आहेत. ज्या जागा विकसीत झालेल्या नाहीत परंतु वर्षानुवर्ष त्याठिकाणी आपण त्याचा टिडीआर किंवा पुर्ण मोबदला देवून त्या जागा आपल्याकडे ८० टक्के, ९० टक्के किंवा पुर्णपणे त्या जागा आपल्याकडे आरक्षीत झालेल्या आहेत. या विषयाला अनुसरून मी एक विंनती करतो की महापालिका क्षेत्रामध्ये ज्या ज्या अविकसीत असलेल्या परंतु आपल्या ताब्यामध्ये आलेल्या जागा असतील, मगाशी वैशालीताईनी जो विषय केला की या ज्या मोठया प्रामणात जागा आहेत त्याठिकाणी कोणीतरी व्यक्तीगत पार्कींगला गाडया लावतो आणि तो त्याठिकाणी काहीतरी पेमंट आकारतो अशा स्वरुपांच्या सुध्दा अनेक जागांवरती आपल्या निदर्शनास येतं की त्याठिकाणी कोणीतरी खाजगी पार्कींग व्यवस्था चालू करतो. तो त्याठिकाणी त्याचे पैसे घेतो त्यापेक्षा जर महानगरपालिकेच्या माध्यमातून त्याच टेंडर काढून भाडेपट्टयावरती जर का देता आल्यातर महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भूमि आणि जिंदगीच्या माध्यमातून हा सुध्दा आपल्याला प्रयत्न करता येईल. आता राहूल आणि मंगलाताईनी सांगीतल की ही मोठी जागा आहे जवळपास पाच ते सहा एकर जागा आहे वाकडच्या तीथ. ही जागा आपण ज्यावेळेला तीन वर्षासाठी देवू परंतु याठिकाणी आपण ट्रान्सपोर्ट हब हा प्रोजेक्ट करायच म्हणलतर तरी त्यासाठी आपल्याला वर्षे ते दोन वर्षे कदाचित जाऊ शकतील. आताच्या या वर्षीचा कालावधी जर बघीतलातर शासनाकडून आपल्याला निर्देश आहेत ३३ टक्के आपल्या बजेटला कात्री लागणार आहे म्हणजे हे वर्ष आपल असंच जाणार आहे आणि पुढच एक वर्ष असे दोन वर्ष निघून जात असतीलतर त्याठिकाणी आपल्याला तीन वर्षाच्या ऐवजी दोन वर्ष करता येईल का किंवा त्याच्यामध्ये आपल्याला ॲग्रीमेंटमध्ये तस करता येईल का की सहा महीन्याच्यानंतर दुसरा भूखंड आपण उपलब्ध केल्याच्या नंतर हा आमचा प्रोजेक्ट याठिकाणी असणार आहे. अशा स्वरुपाच करुन जर आपल्याला पीएमपीएमएलला देता येत असेलतर हे करा. आपल्या शहरामध्ये ज्या काही आरक्षीत झालेल्या जागा आपल्या ताब्यामध्ये आहेत त्या संदर्भामध्ये सुध्दा आपण लवकर भूमी जिंदगीच्या माध्यमातून आपल उत्पन्न वाढवण्याच्या संदर्भात अशा जागा आपल्या ताब्यात जर असतीलतर त्या त्वरीत आपल्याकडे घेवून त्याच्यावरती आपण टेंडर कराव. पे ॲण्ड पार्क त्याठिकाणी कराव. ज्या आपल्या जागा पाच पाच वर्षे विकसीत होवू शकणार नाहीत अशा जागा आपल्या ताब्यामध्ये घ्याव्यात अशी मी विनंती करतो आणि हा विषय आयुक्तांच्या खुलाशानंतर

उपसूचनेसह मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचनां स्विकारल्या आहेत.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा. सभागृह. आताचा जो विषय सभागृहामध्ये आलेला आहे त्याचा मी खुलासा करतो. सन्मा.राहूल कलाटे यांनी जो विषय मांडलेला आहे तो अत्यंत बरोबर आहे की आपल्या वाकडमध्ये ४/३८ हे जे आरक्षण आहे ट्रक टर्मीनस आणि पीएमपीएमएल डेपो हे सुमारे ६.३० हेक्टर आर इतक मोठ आरक्षण आपल्याकडे आहे. मात्र सध्याच्या स्थितीमध्ये त्यातल केवळ .६ हेक्टर म्हणजे साधारणतः दिड एक्करच आरक्षण आपल्या ताब्यात आलेलं आहे. सभागृहाच्या समोर मी हाच खुलासा करु इच्छितो की जस सन्मा.सदस्य कलाटे यांनी सांगीतल की ही जी जागा आहे ती अत्यंत मोक्याची जागा आहे. त्याठिकाणी आपला मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब होऊ शकतो. सन्मा.सदस्य कस्पटे साहेबांनी देखील हाच विषय मांडलेला आहे. अनेक सदस्यांच तेच मत आहे आणि टेक्निकल फिजीटीटी ज्यावेळेला मेट्रो प्रोजेक्ट बरोबर केलेली आहे त्यावेळेला देखील वाकड मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब तयार करण्यासाठी सध्याची जकातनाक्याची जागा ही अत्यंत आयडीअल आहे आणि हे माझ देखील मत आहे आणि तसाच प्रस्ताव प्रशासनाचा भविष्यात राहणार आहे. तेथे आपल्याला कमर्शिअल मल्टीमोडल हब बांधता येवू शकेल. मात्र त्यामध्ये ज्या काही तांत्रिक अडचणी आहेत सध्याच त्या जागेवरती जे आरक्षण आहे ते जकात नाका आहे. आपल जे आरक्षण आहे ते ट्रकटर्मिनस आणि पीएमपीएमएल डेपो. याठिकाणची डेव्हलपमेंट होण्यासाठी थोडीच जागा सध्या ताब्यात आहे अजून मोठया प्रमाणात जागा आपल्या ताब्यात येणं बाकी आहे. त्यामुळे ही जी प्रक्रीया नगररचना माध्यमातून आपल्याला आरक्षण बदलून घेणं, आरक्षण बदलल्यानंतर मेट्रोच बांधकाम सुरु झाल्यानंतर त्या ठिकाणी ॲक्च्यूअल आपल्याला मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब बांधण्यासाठीची निवीदा प्रक्रीया सुरु करणं त्या प्रक्रीयेतून कमर्शिअल तत्वावरती मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब बांधणं आणि ४/३८ हे जे आरक्षण आहे ते पुर्णतः ताब्यात घेवून ते विकसीत करुन ते पीएमपीएमएलला वाहतूक करण्यासाठी हस्तांतरीत करणं या प्रक्रीयेला साधारणतः दिड ते दोन वर्षाचा कालावधी तरी किमान लागणार आहे. म्हणून दरम्यानच्या कालावधीमध्ये पीएमपीएमएलची अत्यंत निकड लक्षात घेता केवळ आपण मॅक्सिमम तीन वर्षासाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे. आपण त्यांच्याकडे हे परमनंन्ट हस्तांतरीत करणं अजीबात अभिप्रेत नाही. ही केवळ आपल्या ताफ्यात बस दाखल ज्या होत आहेत त्यासाठी त्यांना तात्काळ वापर करता

यावा आणि अगदी योग्य पध्दतीची संचलनाची जागा म्हणून त्या जागेकडे आपण पाहत असल्यामुळे, जसं की मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब झाल्यानंतर देखील हीच जागा आपल्याला याच ॲक्टीव्हीटीसाठी वापरायची आहे. म्हणून केवळ तात्पुरत्या कालावधीसाठी, जर हा कालावधी आपण एक वर्षात पुर्ण करु शकलोतर एक वर्षात त्यांच्याकडन ही जागा ताब्यात घेऊ. पीएमपीएमएलची दुसरी जागा जी डेपोची आहे त्याठिकाणी त्यांना हस्तांतरीत करुन देवू शकतो. म्हणून केवळ आता आपल्या ताब्यात असलेल्या अतिरीक्त गाडया तेथे ठेवता येतील याकरिता आपण ही जागा प्रस्तावित केलेली आहे तरी उचित निर्णय सभागृहाने घ्यावा ही विनंती.

**मा.महापौर-** विषय क्रमांक ३ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेसह दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ५५१ विषय क्रमांक- ३
दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.भूजि/०६/कावि/४२४/२०१९ दि.१८/११/२०१९

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. (PMPML) च्या ताफयात सध्या २१०० बसेस आहेत. तसेच ताफयामध्ये पुढील वर्षभरात इलेक्ट्रीक व सीएनजी मिळून १००० नवीन बसेस दाखल होणार आहेत. या सर्व बसेसच्या पार्कींगसाठी महामंडळास जागा कमी पडत आहे. त्यामुळे शेकडो बसेसची पार्कींग महामंडळास रस्त्यावर करावी लागत आहे. या बसेसच्या पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची आवश्यकता आहे. मौजे वाकड येथील स.नं. १०/१ पै., १०/२ पै., १०/३ पै., ११ पै. व १६०/४ पै. जागा मनपाच्या ताब्यात आहे. सदर जागा मंडळास मिळणेबाबत विनंती केलेली आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळास (PMPML) जागा कमी पडत आहे. मौजे वाकड येथील स.नं. १०/१ पै., १०/२ पै., १०/३ पै., ११ पै. व १६०/४ पै. मधील आरक्षण क्र. ४/११ जकात नाक्यासाठी असलेली ४१८९.८० चौ.मी. व १२ मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे १३७९.०० चौ.मी.क्षेत्र असे एकूण ५५६८.८० चौ.मी. क्षेत्र जागा मनपाच्या ताब्यात अहे. सदर जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) यांना ०३ वर्षाच्या कालावधी करिता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर जागा

PMPML ला ३ वर्षासाठी भाडयाने न देता Metro Station PMPML व मुंबईला जाणा-या सहयाद्रीच्या गाडया यांच्यासाठी मल्टीमोड हब करण्यास मान्यता देणेत येत आहे, जेणेकरुन महापालिकेला उत्पन्नात वाढ होईल व ट्रॅफीकचा प्रॉब्लेम सुटण्यास मदत होऊन शहराच्या वैभवात भर पडेल. तसेच मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे सादर करणेत आला होता. महापालिका ठराव क्र. ४७२ दि.२०/१०/२०१९ अन्वये यापुर्वी ठराव क्र. ११०२ दि. १८/०२/२०११ अन्वये मौजे बो-हाडेवाडी येथील जमिनी शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करण्याच्या फेरबदलाच्या प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता दिली आहे. तथापि बो-हाडेवाडी येथील जमिनीस असलेली विकसनक्षमता व नगररचना योजना करण्यास लागणारा कालावधी पाहता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता नाही तसेच जमिनी रहिवास विभागात समाविष्ठ केल्यास नगररचना योजना करण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे यापुर्वी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये पाठविलेला मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठीचा फेरबदल प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता नसुन सदर प्रस्ताव त्वरीत मंजुर करण्याबाबत शासनास कळविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच यापुर्वी सदर प्रस्तावातील H.S.466 C हे आरक्षण अंशतः स.नं. ३१ या जमिनीचे धारकांनी त्यांचे जागेत विकसीत करण्याची तयारी दर्शविलेले त्यानुसार बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच ग. नं. ६९ पै. व ग.नं.६७ पै. मधुन १८.०० मी. रस्त्यापासून ग.नं.७२० पर्यंत १२.०० मी. पुर्व-पश्चिम रस्ता या जमिनीचे धारकांनी त्यांचे जागेत विकसीत करण्याची तयारी दर्शविल्याने त्यानुसार बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे च-होली ता. हवेली येथील स.न. १०९/२/३, ११५/१, ११६/२, १२२/२ येथुन पाझर तलाव हद्दीतुन ३० मी. डी.पी. रस्ता जात असुन सदर रस्त्याचे काम करणेची मागणी स्थानिक शेतकरी व नागरिक करीत आहेत. सदरच्या रस्त्यामुळे च-होली व लोहगाव रहदारीस फायदा होणार आहे. त्यामुळे मनपा हद्दीतील पाझर तलावातुन नियोजित ३० मी. रस्ता असुन पाझर तलावातील पाण्यास अडथळा न होता सदरचा रस्ता करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.ज्ञानदेव थोरात-** मा.महापौर साहेब, विषय क्रमाक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ५५२ विषय क्रमांक- ४

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.मभां/०४/कावि/४१९/२०२० दि.१३/०५/२०२०

मा.आमदार श्री.सुनिल शेळके मावळ विधानसभा सदस्य यांनी दि.02/05/2020 च्या पत्रान्वयें देहुरोड येथे कोरोना रूग्ण आढळलेला असुन मा.नामदार अजितदादा पवार (उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा) यांचे अध्यक्षतेखाली विधानभवन पुणे येथे कोरोना प्रादुर्भाव निमुर्लन आढावा बैठकित श्री.क्षेत्र देहु, देहुरोड, किन्हई, चिंचोली या भागातील नागरीकांना अत्यावश्यक सेवा महापालिकेमार्फत पुरवण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे. देहुरोड भागात कोरोना विषाणुमुळे रुग्णाच्या संपर्कात आलेल्या 53 नागरीकांमधील 23 नागरीकांचे स्वॅब सॅम्पल तपासणीसाठी पाठविले असुन 35 नागरीकांना नेहरू मंगल कार्यालय देहुरोड येथे कॉरंटाईन केलेले आहे. सदर श्री क्षेत्र देहु, देहुरोड, किन्हई, चिंचोली या भागातील नागरीकांना प्रत्येकी 2 नग याप्रमाणे साधारणपणे 2 लाख कापडी मास्क उपलब्ध करून देण्याबाबत कळविले आहे.त्यासाठी महापालिकेस र.रू.20,00,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 89 नुसार महापालिका हददी बाहेर खर्च करण्यासाठी पालिका सदस्यापैकी निम्याहुन कमी नसतील इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेला ठराव मा.महापालिका सभेने पारित करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.आमदार श्री.सुनिल शेळके मावळ विधानसभा यांनी मागणी केलेप्रमाणे श्री.क्षेत्र देहु, देहुरोड, किन्हई, चिंचोली या भागातील नागरीकांना कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी 2 लाख कापडी मास्क (अंदाजित किंमत र.रू.20 लाख खरेदी करून) उपलब्ध करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्हांला असं वाटत असेल राष्ट्रवादीचे आमदार आहेत, पुण्यामध्ये मिटींग झाली म्हणजे आम्ही बोलणार नाही, असं होणार नाही. आपण नेहमी आळंदी असेल, देहू असेल येथील लोकांना वारीच्या वेळेला पाणी देणं, शेजार धर्म म्हणून लाईटचे पोल देणं हे आपण सगळ करतो. करण्याबद्दलच माझ दुमत नाही. परंतु आयुक्त साहेब मागच्यावेळेला तुम्ही जे हे मास्क वाटप केलेले आहेत, आता मी तुम्हांला दाखवणार आहे, मी तुम्हांला पहीले सॅंपल पाठविले. त्या सॅंपलनंतरचा जो बदल झाला तो पण मी सभागृहाला आता दाखवते. मी तर असे म्हणेन की आमदार सुनिल शेळके हे दर महीन्याला २५ लाख रुपये लोकांवर खर्च करतात. आपण हे २० लाखाचे मास्क त्यांना देणार आहोत तुम्ही इथे आकडयासकट लिहीलेल आहे आणि पुढे शब्द लिहीला आहे कापडी. आपल्याकडन तसा पुरवठा होतो का. पिंपरी चिंचवड शहरामध्ये आज आपण जेवढा पुरवठा केला तुम्ही त्याच्यावर परत कमिटी नेमायची आहे. मग आपला जो भांडार विभाग असेल किंवा त्याच्या संबंधीत अधिकारी असतील, मी आयुक्त साहेबांना विचारल, पेपरमध्ये बातमी आली होती की राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या पक्षनेत्या मग मी आयुक्तांना म्हणल की नावाचा खुलासा करा. मी आयुक्त साहेबांना पत्र दिलं. मग ते म्हणाले आम्ही काही कुठल्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे किंवा भाजपचे किंवा दुस-या पक्षाच्या लोकांना नाही दिलेल बचत गटाना दिलं आहे. मग इथ सभागृहामध्ये सगळे नगरसेवक बसलेले आहेत त्यांनी सांगाव तुमच्या बचतगटाना मिळाल का हे काम. मग आयुक्त साहेबांना म्हणाले तुम्ही फक्त दहाच संस्थेला दिले. सिमाताईना वाटल मंगलाताई आज पर्स घेवून कशाकाय आल्या. महापालिकेमध्ये यायला मला आजपर्यंत पर्स लागली नाही आणि जातानाही लागली नाही. सभागृहाला, आयुक्तांना दाखवण्यासाठी याच्यामध्ये हे मास्क आणलेले आहेत. मध्ये जो सॅंपल दिला तो हा सॅंपल दिला (मास्कचे सॅंपल दाखवले) त्याच्यानंतर या मास्कचा सॅंपल आला. प्रत्येक्षात हे मास्क दिलेले आहेत. आयुक्तांनी ज्या अटी, नियम, शर्ती घालून दिल्या त्याप्रमाणे हे मास्क असे चालणार आहेत का. मी आमच्या डॉक्टरांना विचारल हा मास्क चालणार का. ते म्हणाले मास्कमधुन टयूबलाईट दिसली नाही पाहीजे. मग मी म्हणाले असे मास्क तुम्ही का वाटता. तर ते म्हणाले आमचा काही संबंध नाही मी लोकांकडन घेतले. म्हणजे याच्यामध्ये डॉक्टर लोक येत नाही जो स्टाफ वाटायला जातो त्या वाटणा-या लोकांकडन मी हे गोळा केले.

मी डॉक्टरांना हे सांगीतल, नाहीतर त्या बीचा-यांच्या हिशोबामध्ये चुक येईल आणि म्हणणार इतके मास्क नेले होते आणि इतके आणले कसे आणि किती लोकांना दिले. डॉक्टर लोक हिशोबतर ठेवणारच. आयुक्त साहेब तुम्ही मला सांगावे हे सॅंपल योग्य आहेत का. हे बचत गटानी बनवलेले आहेत का. याची शिलाई बघा, कापड बघा. आता सुध्दा याच्यामध्ये तेच आहे. आपण जर असले मास्क दिलेतर ते काय म्हणणार. आहो, विठ्ठल रुक्मिणीच्या मुर्त्या दिल्या टेंडर नव्हतं काही नव्हतं नंतर सगळा पडदाफास झाला. आणि असे मास्क पाठवल्यानंतर परत काय म्हणणार. पहीली ऑर्डर आहे पंधरा लाख मास्कची, पंधरा लाख मास्कची ऑर्डर पहीली केलेली आहे. मी आयुक्त साहेबांना विचारल या ऑर्डर तुम्ही बचत गटाला दिल्या का कुणाला दिल्या तर ते म्हणाले बचत गटाला दिल्या. आयुक्तांना डायरेक्ट ऑर्डर दयायची परमीशन आहे, त्यांना आपण अधिकार दिलेले आहेत. बाकीच्या किती नगरसेवकांना विचारल तुमच्या बचत गटाला किंवा तुमच्या प्रभागामध्ये दिले का. कारण मध्यंतरी मी एकदा महापालिकेत आले होते त्यावेळेला असं समजल की प्रत्येक प्रभागामध्ये पाच लाख रुपये खर्च करायचा. मी म्हणाले असल्या भानगडीतच पडायला नको. मला तुम्ही सांगा की हे नागरीक तुमच्याकडे मागायला आलेत का हो. एका घरामध्ये आठ मास्क. अर्ध्या अर्ध्या सॅनिटायझरच्या बॉटल मग अर्ध्या काढल्या आणि आर्ध्या ठेवल्या असं काही झाल का. तुम्ही मास्क देणार तर दयाना तुम्ही असे कॉटनचे मास्क. तिथ लिहील आहेना कॉटनचा कपडयाचे म्हणून मग तुमच्या लोकांनी का बघायला नको होतं की तुम्हांला कॉटनचेच आले का. का इकडून विकत घेतले आणि तीकडे दिले, तीकडून विकत घेतले आणि ईकडे दिले असं काही केल का त्याच्यामध्ये. हे बघायला नको का. हे का बघीतल गेलं नाही. प्रत्येक हॉस्पिटलमध्ये हा असाच स्टॉक आहे आणि हा स्टॉक कुणाच्या नावाचा आहे हे मला पण माहिती आहे. कुठल्या कुठल्या ऐरीयामध्ये मास्क आलेना त्याच मटेरिअल कुणाच आहे ते पण मला माहिती आहे. मला नाव घ्यायची इच्छा नाही. या माजी उपमहापौर आहेत, या प्रभागाच्या अध्यक्षा आहेत त्यांच्याकड बचतगट नाहीत का. मी विचारल त्यांच्या मिस्टरांना तर ते म्हणाले आम्हांलातर काहीच माहीत नाही. म्हणजे याठिकाणी इतके नगरसेवक बसलेत त्यांच्याकडे कुणाकडे बचतगट नाही आणि फक्त तुमच्या जवळ जेवढे लोक आहेत तेवढयानाच तुम्ही ते दिलं आणि याच्यामध्ये ही अशी पेपरला बातमी झाली. मग ही जर अशी बातमी लागणार असेलतर मी शेळकेनां सांगेल की आम्ही कॉन्ट्रीब्यूशन

काढून त्यांना मास्क देवू, नको आपल्याला कार्पोशनचे मास्क. अशी जर बातमी लागणार असेलतर आम्हांला हे शोभनीय नाही. आम्हांला मास्क देवू नका मी स्वतः बोलते शेळकेंशी. काय बातमी आहे कोरोनाच्या संकाटतही भाजप, राष्ट्रवादीला मास्कच्या माध्यमातून दिड कोटीची खिरापत. मग आम्हांला अशी खिरापत नको. त्यांना तुम्ही देऊ नका मास्क, मी त्यांना सांगेन. त्याला इलॅस्टीक आहे का बघा ताई, तुम्ही कुठल्या कुठल्या भाषेमध्ये बोलला असताना सभागृहामध्ये तुम्ही स्वतःच आत्मपरिक्षण करा. मी तर सांगीतल बाबा मी माझ आता वय जास्त झालय त्यामुळ मी जास्त कुठल्या भाषेतन बोलत नाही अगदी साधी साधीच बोलते. पण तुम्ही कुठल्या कुठल्या भाषेतन बोलला असता विचार करा. तुम्ही काय काय बोलला असता ते विचार करा. आयुक्त साहेब तुम्हांला अधिकार दिलेला आहे. एका माणसाचा दिवसभराचा खर्च ४८०/- रुपये. चिंचवड गावामधले कोण नगरसेवक आता येथे आहेत त्यांनी बघा. मी आयुक्तांना त्या माणसाचा मोबाईल नंबर पाठवला, मुकेश नावाचा माणुस होता. त्या माणसानी मला फोन केला आणि तीथल्या सगळया पेशंटशी मला बोलणं करुन दिलं. ते म्हणाले चहा येतो, आम्हांला तो बाहेर खीडकीत ठेवला जातो आम्हांला तो माहितही पडत नाही की चहा आलेला आहे म्हणून. गार चहा प्यायला घाण लागतो, काळा चहा दिलातरी चालेल. आज आम्ही हाऊस म्हणून पॉझिटीव्ह नाही झालेलो. आम्ही दवाखान्यात ऍडमीट आहोत, वायसीएममध्ये ऍडमीट व्हायची आम्हांला काही हाऊस नाही. पण जे काही आम्हांला दयाल ते नीटनेटक मिळाव एवढीच अपेक्षा आहे. त्या माणसाने मला दिवसातून दहा ते पंधरावेळा फोन केला मी शेवटी आयुक्तांना त्या माणसाचा नंबर पाठवला. मी शेवटी त्यांना म्हणले की तुमच्या वॉर्डातील नगरसेवाकांना तुम्ही का नाही सांगत. ते म्हणाले मला माहिती आहे तुम्ही या गोष्टीवर बोलू शकता म्हणून मी तुम्हांला सांगतो. याच्यात काहीतरी बदल होईल मी तर चार दिवसानी दुसरीकडे जाणार आहे. मला आता त्यांनी सांगीतल की तुला आता आम्ही बालेवाडीला टाकणार आहे. तो म्हणाला ठिक आहे, मी तर पेशंटच आहे मला इकडून उचलून बालेवाडीला टाकलतरी काय माझा कोरोना जोपर्यंत बरा होत नाही तोपर्यंत मी जिथे सांगाल तीथे जाणार. आपण ताटाप्रमाणे एका माणसाचे दिवसभरात ४८० रुपये देणार आहेत. शेवटी घरातूनही डबा तीथे आणू देत नाहीत. घरातला डबा आणताना तुम्ही बालेवाडीची क्लिप बघीतली असेल. तीथे कोणालाही जाण्याची तीथे परमीशन नाही. साहेब, तुम्ही म्हणालात मी तीथ खावुन पण बघीतल आहे. ते पण मी तुम्हांला

सॉफ्टली सांगीतल, ठिक आहे साहेब, कधीतरी एकोणीस-वीस होवू शकत त्याच्यामुळे मी तक्रार नाही केली. पण सभागृहाला हे पण समजल पाहीजे की तीथे कधीही घटना घडू शकते. अशा तक्रारी येवू शकतात. त्याच्यानंतरही त्यांचा फोन मला आला, तुमचाही फोन त्यांना गेला. मला त्यांनी फोन करुन सांगीतल, ताई मी अर्धा बरा झालो मला आयुक्तांनी फोन करुन विचारलं की जेवणाबद्दलच काय आहे. शेवटी असं असत की डॉक्टरनीं पेशंटला विचारल की पेशंट अर्धा तीथेच बरा होतो. मला दहा वेळा फोन केला, मी दहा वेळा बोललेतर त्याला काही फरक नाही वाटला. पण तुम्ही एकदा बोललात, दखल घेतली.  चांगल्या घरातल्या माणसाला शंभर टक्के असें वाटणार मी तक्रार केलीनां तर माझ्या मागच्या लोकांना तरी चांगल मिळेल. साहेब, तुम्ही दखल घेतली असेल, तुम्ही खालच्यांना सांगीतल असेल परंतु हे होणं गरजेच आहे. प्रत्येक जण आपआपल्या घरात चटणीभाकरी खावून सुखी असतो पण हे होणं गरजेच आहे. याच्यावर तुम्ही विचार करावा. मी आता सुध्दा सांगते हा विषय टाका तुम्ही फेटाळून. यानी जर बदनामी आम्हांला मिळणार असेलतर आम्हांला अजीबात विषय नको. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष या माझ्या मताशी सहमत असेल. आम्ही आमचे कॉन्ट्रीब्यूशन काढून मास्क घेऊ. कारण या जर वस्तु अशा आपण देणार असूतर काय परिस्थिती होणार हे तुम्हांलाच माहीती असेल. तुम्हांला हा जो सॅंपल पाठवलेला आहेना त्याचे सहा हजार मास्क वाटले आणि हा मोठा पदाधिकारी आहे त्यांच्याकडचे आलेले मास्क. आता काय करायच, नागरीक आम्हांला परत पाठवतात. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्याच्यामध्ये एक ओळ न्यूज राष्ट्रवादी पक्षाची आली होती म्हणून आम्हांला दाखवल. तुम्ही दयांना कॉटनचे मास्क दया. मग आमच कशाला त्याच्यात मिक्सिंग करायच. दाखवताना कॉटनच दाखवायच, ऍग्रीमेंटमध्ये कॉटन लिहायच आणि मग परत सगळ उलटसुलट करायच, हे चुकीच आहे त्याला तुम्ही आळा घाला. त्याच्याबरोबर आमची पक्षाची अजीबात बदनामी नको. हा विषय तुम्ही फेटाळा, नको आम्ही अजीतदादांना सांगू त्या मिटींगमध्ये जर विषय झाला असेलतर. कारण ते पत्र मी त्यांच्या कडे जावुन दिलेलं आहे. त्याच्यामध्ये ही बातमी आणि कागदासकट त्यांना मी दिलेलं आहे. त्यांनीच सॅंपल घेवून मला बोलवल होतं. तुम्हांलाही ते दिलं पण याच्यामध्ये हे असं कुठही होता कामा नये. मगाशी सांगीतल सिमाताईनी तुम्हांला जर कोरोनामध्ये अधिकार आहेत, निसर्ग चक्रवादळ आलं, त्याच्यामध्ये तुम्ही लेबर वाढवला असता, लोकांना हजार रुपये, पाचशे रुपये पेमेंट दिलं असततर लाख रुपये पेमेंट लोकांना गेलं

असतं काय फरक पडला असता. पाच लाख रुपये गेल असत पण नागरीक तर सगळे समाधानी झाले असतेनां. सगळे नगरसेवकही समाधानी झाले असते. परत तुमच एका गोष्टीच कौतूक करते त्यादिवशी आपल सभागृहामध्ये ठरलं, आम्ही मांडलेली सूचना की ज्यावेळेला कोरोना बाधीत पेशंट त्या बिल्डींगमध्ये असेल, आता येथून पुढे खुप होणार आहेत. काल एका बिल्डींगमध्ये एक पेशंट निघाला तुम्ही सगळी बिल्डींग सिल केली ते आम्हांला मान्य आहे. कारण ती एकच बिल्डींग सिल झाली. परंतु जो आनंदनगरमधला मेडीकलवाला पेशंट होता तो घरी येवून सहा दिवस झाले. मी पवार साहेबांना फोन केला होता अजूनही तीथले पत्रे काढले नाहीत. तो घरी येवून सहा दिवस झाले. कितीवेळा फोन करायचा पवार साहेबांना. अर्धे पत्रेतर परवाच्या वादळानी हाललेत, निखळले आणि ते पत्रे गंजले. वा-यानी उडून जर कोणाला लागला असतातर केवढयात आपल्याला पडणार. तो माणुस घरी आलतर तुम्ही ते काढून टाकानां. नाही अजून निरस्तची ऑर्डरच आली नाही. मी आमच्या येथील डॉक्टरांना विचारलतर ते म्हणाले आहो,  निरस्तची ऑर्डर आलीतर आम्ही पोलीसांना नाही बोलू शकत आम्हांला कमीशनरची निरस्तची ऑर्डर आलीतरच आम्ही काढणार. मग आता पेशंट घरी येवून सहा दिवस झाले आहेत. या छोटया छोटया गोष्टी आहेत मी लगेच फोन करते पेशंट घरी आलेला आहे तुम्ही पत्रे उदया काढायला सांगा. त्याला सुध्दा आपल्याला काही कमी खर्च नाही. आपण चार चार, पाच पाच ठिकाणी पत्रे सिल करतो, मांडववाल्याचा खर्च काढलातर तुमच्या लक्षात येईल की तुमचा खर्च तो किती झाला म्हणून. कोरोनाच्या नंतर आपल्याला सगळे हिशोबच आहेत. माझ परखड मत सभागृहामध्ये मांडलेले आहे. तुम्ही असं म्हणत असालतर आमचा याला विरोध आहे. कुणी कमीटमेंट केली आम्हांला माहीत नाही, दयायचतर दया नाहीतर नको, आम्ही काही म्हणणार नाही परंतु आमची बदनामी नको. आणि असले मास्कतर देवूच नका. एवढच मी बोलते आणि थांबते, याची सगळी चौकशी झाली पाहीजे, धन्यवाद.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कोरोना विरुध्द आपण याठिकाणी लढतो. ख-या अर्थाने मी मंगलाताईंच अभिनंदन करेल की त्यांनी हा विषय सभागृहापुढे मांडला. याठिकाणी अतीशय लाजीरवाणी गोष्ट ही जर अशी परिस्थिती या सभागृहामध्ये घडत असेल आणि अशाप्रकारचा भ्रष्टाचार चालत असेलतर ख-या अर्थाने दयनीय अवस्था या पिंपरी चिंचवडमध्ये झालेली आहे. आयुक्त साहेब माझी मागणी आहे की हे जे ज्यांनी पुरवलेले आहे त्यांच्यावर कडक कारवाई

व्हावी, त्यांना ब्लॅकलीस्टमध्ये टाकाव फक्त त्या संस्थेला नाहीतर त्यांचे जे कमिटी मेंबर्स असेल त्यांना पण ब्लॅकलीस्टमध्ये टाकाव नाहीतर उदया दुसरी संस्था काढतील आणि परत एकदा घेतील. त्यामुळे त्यांचे मेंबर्स व ती संस्था या सगळयाना ब्लॅकलीस्ट झाली पाहीजे. आणि हे चुकीच्या पध्दतीने असेलतर याची वसूली करावी. वसुलीचे पण अधिकार आपण केले पाहीजे. अशा पध्दतीने आपण कोरोनाच्या लढाईत सगळेजण एकत्र मिळून लढतोय आणि अशा पध्दतीने जर होत असेलतर अतीशय लाजीरवाणी गोष्ट ही आपल्या समोर आलेली आहे. मी मागणी करते की ज्यांनी अशा पध्दतीचे मास्क पुरवले, चुकीच्या पध्दतीचे मास्क पुरवलेत त्यांना ब्लॅकलीस्टमध्ये टाकाव आणि त्यांची वसुली करावी. आताच मंगलाताई म्हणाल्या आम्ही सगळेजण त्यांच्या पाठीशी आहोत की हा विषय खरच करु नका. अशा पध्दतीने जर भ्रष्टाचार होत असेलतर इतक्या खालच्या स्तराचे जर तुम्ही मास्क देत असालतर आमची इज्जत त्याठिकाणी घालू नका. हा विषय फेटाळून टाका आणि आम्हांला असल्या मास्कची तुमच्याकडन गरज नाही. आम्ही आमचे मंगलाताईनी जसे सांगीतले त्याप्रमाणे कॉन्ट्रीब्युशन काढून देवून टाकू एवढेच मी याठिकाणी सांगते, आयुक्त साहेब आम्ही तुम्हांला खरच विचारणार की याच्यावर कारवाई झाली की नाही हे आम्ही तुम्हांला परत विचारणार आहेत.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर ताई म्हणाल्या मास्कची सुनिल शेळके राष्ट्रवादीचे आहेत म्हणून त्यांच्यावर उपकार करतो की काय अशी त्यांनीही मागणी करु नये. सुनिलराव जेवढे तुमच्या पार्टीमध्ये विधानसभेच्या आगोदर आले. पंचवीस लाख नाहीतर पन्नास लाख दर महीन्याला समाजासाठी ते खर्च करतात हे गेले पंचवीस वर्षे मला माहिती आहे. सुनिल शेळके आता राष्ट्रवादीत आले वर्षानुवर्षे भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून गरीबांसाठी सेवा करणारे सुनिल शेळके कार्य करीत आहेत. आज आमदार राष्ट्रवादीतून झाले आणि आम्ही तिकीट दिल असतंतर कदाचित ही परिस्थिती आली नसती. सुनिल शेळके राष्ट्रवादीचे आहेत खरतर आपण तस सांगीतल की आळंदीला पाणी देतोत, देहूला देतोत, देहू रोड आहे. ज्यावेळेस ज्या ज्या पध्दतीची परिस्थिती आली त्यावेळेस खरतर अजीतदादांनी सांगीतले म्हणून ते खरतर सुनिल शेळकेना दिले गेले त्यांनी काही मागीतले नव्हते आणि त्यावेळेस त्यांनी वाटून पण टाकले. आणि खरतर या विषयामध्ये मागच्या आठवडयामध्ये मा.आयुक्तांबरोबर आम्ही ज्यावेळेस चर्चा करत

होतो. अशा पध्दतीचे कोरोनाच्या संकटाच्या काळामध्ये कुठल्याही विषयाच्या खरेदीमध्ये जे जे कोण भ्रष्टाचार करतील अशा सगळया संस्थेचा जाहीरपणे निषेधच केला पाहीजे. याच समर्थन आम्ही करतच नाही. मुळात अशा पध्दतीचे मास्क कुठल्या कुठल्या महीला बचत गटानी दिले, निकृष्ठ दर्जाचे मास्क ज्या ज्या बचत गटाने दिले, खरतर मी आपल्या सगळयांना एवढच सांगेन की अशा पध्दतीचे ज्यांनी महापालिकेच्या माध्यमातून गरीबाला जे चांगले मास्क दयायचे होते ते दिले नाहीत अशा सगळया बचत गटातून, ज्यांनी ज्यांनी अशा पध्दतीने निकृष्ठ मास्क दिले आहेत त्यांच्याकडून वसुली केली पाहीजे. आणि या पुढच्या काळामध्ये अशा पध्दतीचे जे बचत गट या महापालिकेच्या माध्यमातून काम करतात, लोकांना फसवणं महापालिकेला फसवणं त्यांच्या टाळूवरच लोणी ज्यांनी ज्यांनी खाल्ल असेल अशा बचत गटाला यापुढच्या काळामध्ये कुठल्याही पध्दतीच महापालिकेच्या माध्यमातून अनुदान असेल, फॅसिलीटीज असेल, काम असेल देणार नाही आणि मा.महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो की हे मास्क वाटलेले आहेत, आता याबद्दलची कारवाई झालेली आहे. मा.महापौर साहेब, आपण आयुक्तांना अशा पध्दतीचे आदेश दयावेत की ज्या ज्या बचत गटानी कोणीही असूदयात कुठला पदाधिकारी असू दयात कुठला अधिकारी असू दयात ज्यांनी चुकीच्या पध्दतीने टाळूवरच लोणी खाण्याच काम केलेलं आहे त्याच्याकडून वसुली करावी. अशा पध्दतीच्या बचतगटावर फौजदारी पध्दतीची कारवाई करावी. मा.आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो ज्यांनी चुकीच्या पध्दतीने मास्क दिलेले आहेत मग ते कोणीही असो, खरतर सत्ताधारी पार्टीच्या पदाधिका-यांना मी याठिकाणी विनंती करतो की अशा सगळया चुकीच्या बचत गटावर फौजदारी पध्दतीचा गुन्हा दाखल करावा एवढी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर मी आपले माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ दादा पवार यांच सभागृहाच्या वतीने मनपुर्वक स्वागत करतो. एक चांगला निर्णय त्यांनी त्यांच्या भाषणातून सांगण्याचा प्रयत्न केला. मी पण मास्क वगैरे सर्व घेवून आलो होतो. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की माझ्याकडे जो मास्क आहे उल्हास जगताप असतील, नाना काटे, भाऊसाहेब भोईर आम्ही पाच ते सहा जणांनी हे मास्क २० तारखेच्या जनरल बॉडीत इथे ठेवलेले मास्क

होते त्यातला एक मास्क त्यांच्याकडून घेवून फोटो काढून घेतला आहे. या मास्क मधुन साहेब तुम्ही मला क्लिअर दिसतात. तुमच्या पलीकडच सुध्दा या मास्क मधुन दिसतं. हा कपडा कुठला आहे हे मी माझ्या बायकोला विचारल तर ती मला म्हणाली साडीला पिको फॉल करतोना आपण त्याचा हा कपडा आहे. दहा रुपयाला मास्क असे दिड कोटीचे मास्क पंधरा लाख मास्क या पिंपरी चिंचवड शहरासाठी आपण खरेदी केले. हे मास्क कुठ गेले, कोणाला वाटले, कोणापर्यंत पोहचले, गेले की नाही माहीत नाही. मी माझ्या प्रभागामध्ये स्लम असताना सुध्दा माझ्या प्रभागात एक सुध्दा मास्क आला नाही. माझ्या झोपडपट्टीमध्ये जे लोक कोरोनाबाधीत झाले तीथ मास्क वाटला गेलेला नाही. चौदा दिवस झाले आज, कुठलाही मास्क नाही, सॅनिटायझर नाही, साबण नाही. हे जेवढया लोकांना मास्कच टेंडर दिलय आता हे कुलस्वामीनी महिला बचत गट, पिंपळेगुरव यांच्याकडून काहीतरी दिड लाखाचे मास्क खरेदी केलेत. मातोश्री महीला गट चिंचवड २० हजार, कृष्णाई महीला बचत गट २० हजार, मे.महावीर कॉर्पोरेशन एकुण २० हजार असे वेगवेगळया ऐरीयातील वेगवेगळया बचत गटाना असे तेरा जणांना मास्कचे टेंडर दिलेले आहेत. अशा पध्दतीन हे दिड कोटीच टेंडर या महापालिकेच्या माध्यमातून आयुक्तांच्या अधिकारामध्ये म्हणजे ज्यावेळेस एखाद संकट येतं, खरतर हे महामारीच संकट आहे. या संकटामध्ये मी स्वतः आयुक्तांना फोन केला होता की साहेब आम्ही आपल्या पाठीशी आहोत जी काही चांगली वाईट तुम्हांला वेळ येईल आम्ही कोणीही विरोधक आपल्याला कधीही कुठले वाईट, चांगले आरोप करणार नाही पण चांगल्या कामाला शंभर टक्के तुम्हांला मदत करु. तुम्हांला जे जे काही करायच आहे त्या त्या उपाययोजना ताबडतोब करा जेणेकरुन आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये जो काही पुण्याला प्रसंग आला तो आपल्याकडे येऊ नये. आता ही थेट पध्दतीने जी खरेदी केली आदरनीय आयुक्त त्यांच्या पाठीमागे कोण टिम आहे मला माहीत नाही. फक्त आयुक्ताची सही आहे. पैसे देवू नका म्हणून मी आयुक्त साहेब आपल्याला एक पत्र पण दिलं आहे. या विषयाच कुठलही बीलींग काढू नका. तुम्हांला वीस तारखेला पत्र लीहील आहे की कोरोनामध्ये जेवढे जेवढे आपण खरेदी केलेले आहे त्याच्यात जोपर्यंत आम्हांला शहा-निशाह होत नाही तोपर्यंत त्यांचे बील काढू नका हे मी वीस तारखेला पत्र दिलं आहे. त्याच्यानंतर मला असंही समजल आहे की या बीलाच सगळ स्वाह करुन टाकलेल आहे. ब-यापैकी लोकांची बील काढून दिले आहेत. जर या क्वालीटीचे मास्क, दोन रुपये, तीन रुपयाला माझ्या प्रभागात सुध्दा बचत गट

आहेत, माझ्या प्रभागात मी साडेपाच ते सहा रुपयाला मास्क घेतले आहेत आणि ते माझ्या प्रभागात वाटलेले आहेत. ब्लॅक कलरचे व चांगल्या क्वालीटीचे मास्क हे मी साडेपाच ते सहा रुपयाला माझ्या प्रभागातून महीला बचत गटाकडून घेवून मी वाटले आहेत. इथ दहा रुपयाचा मास्क घेतला आणि थर्ड क्वॉलीटीचे मास्क घेतले, हे मास्क बघीतलेना तर या मास्कला काय म्हणाव. असे मास्क जर तुम्ही घेतले असतीलतर मग तुम्ही आपल्याकड ज्यांना हे घेण्याचे अधिकार दिले, ज्यांना तुम्ही क्वॉन्टीटी मोजून घेण्याचे अधिकार दिले त्या लोकांनी डोळयाला पट्टी बांधली होती का ते कुठल्या धुंदीत होते का त्यामध्ये तुमचा कोणाचा इन्टररोल होता. एकतर कोणाचातरी यात हे असणार आहे की दत्ता सानेचे मास्क आहेत वरुन फोन आलेला आहे आणि हे घे असंही तुम्हांला कुणाला प्रेशर आहे, शंभर टक्के मला वाटत असं काहीतरी घडलेलं असेल. तुमच्या सारखा अधिकारी करप्टेटला प्रेशर करणार नाही असे मला वाटत होतं. यामध्ये मेलेल्या माणसाच्या टाळूवरच लोणी खायच काम या कोरोनाच्या मध्येतरी कोणी करणार नाही असं आमच स्वतःच मत होतं. कारण इथ अख्ख्या शहराचा विषय होता प्रत्येक माणसाचा विषय होता. कुठला एखादा गरीब व्यक्ती, कुठला स्लम मधला व्यक्ती, एखादया झोपडपट्टीत शंभर लोकांनी म्हणलय की आम्हांला मास्क दया. आपण हे करताना कुठल्या विचारात होता, हे काय चालल आहे. आपला कर्मचारी काय करत होता. याच पध्दतीने मी साबणाची स्टोरी सांगतो हे चार साबण मी आणलेले आहेत. सीएसआर मधला हा तुमचा दहा ग्रामचा साबण आहे आणि हा १२५ ग्रामचा साबण आहे मी किरकोळ मार्केट मधुन आणला त्याच बील सुध्दा माझ्याकडे आहे. हा मला ८० रुपयाला दिला. ८० रुपयाला हा साबण मला चार मिळाले आहेत. तुम्ही ज्या साबणाची किमंत दिली ती एका साबणाचे २० रु. १७ पै. याच्यामध्ये काय इन्ट्रेस्ट होता आपला. हा कंपनीकडून घेतला असतातर अजूल कमी किमंतीमध्ये पडला असता. हे तर आपल्याला कोणी मागायला आलेलं नव्हत. प्रत्येकाच्या घरात साबण आहे आणि लाईफबॉय साबण लावल्यानंतरच कोरोना जातो असं शास्त्रात कुठेही लिहीलेलं नव्हतं. मग ही खरेदी ८० रुपयाला चार आणि तुम्ही खरेदी केली २० रु. १७ पै. एक साबण. यात सुध्दा मोठा गोंधळ आहे. ३२ लाखाची साबण खरेदी आहे. १६ हजार नग घेतलेले आहेत याची मागणी आपल्याकड कोणी केली होती. मला हाच साबण मार्केटमध्ये २० ला मिळतो साबणाची साईज पण बघानां. या साबणा कुठल्या कुठल्या वॉर्डात वाटल्या हे मला माहीत नाही. कोणाला दिले हे माहीत नाही. माझ्या

प्रभागामध्ये एकही साबण आलेला नाही आणि एकही मास्क आलेला नाही. ही मास्कची खरेदी केली कोणी ? याच्या पाठीमागचा गॉडफादर कोण ? याचा रिंगमास्टर कोण ? कोणी याची रिंग फिरवली ? मग ते आपल्या पर्यंत आल त्याचा हेडमास्तर कोण आहे ? याची पण शहानिशा होणे गरजेच आहे. ही कल्पना का आली तुमच्या डोक्यात. औषध खरेदी ठिक आहे, त्याच्यावर एक शब्द पण आम्ही बोलणार नाहीत. या औषधामध्ये सुध्दा आपण खरेदी करतो चार रुपयानी आणि आपल्याकडन नऊ रुपयानी घेतो. याच्यामध्ये सुध्दा गोंधळ आहे. आपला आर्थीक निधी तुमच्या हातात दिलेला असताना, आर्थीक चावी तुमच्या ताब्यात दिलेली असताना त्याचा जो काही योग्य उपाय करायचा होता तो आपल्याकडन झालेला नाही. शंभर टक्के सगळयाच खरेदीमध्ये औषधासकट मी सांगतो पण औषधावर बोलणार नाही पण साबण आणि मास्क मध्ये शंभर टक्के खुप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे मग ही सगळी कॉन्टेटी आलेली आहे का नाही याची सुध्दा खात्री नाही. यांनी मटेरीअल कुठून घेतल आहे याची कुठ खातरजमा नाही. हे मटेरीअल असं का वापरल यासाठी तुमच्या क्वॉलीटी मेन्टेन करणारा किंवा घेणारा कोण नाही. कोणाचा अशिर्वाद होता, कुणी तुमच्या मागे हे धुपटन लावलं. याच्या मागच्या रिंगमास्टरची आम्हांला माहीती पाहीजे. मी तुम्हांला पत्र यासाठी दिलेलं आहे की जोपर्यंत आमची शहानिशा होत नाही, जोपर्यंत आम्हांला याची माहीती मिळत नाही तोपर्यंत आपण त्याचे बील काढायचे नाही. मला वाटत या तीन वर्षामध्ये जेवढया काही विषयाची कॉन्ट्रॅक्टर असतील मला त्याच काही घेणंदेणं नाही पण ब-याच जणांची बील आडकलेली आहेत. मग ही बील मास्कची, साबणची एवढी फास्ट काढायचे कारण काय. हे मास्क शंभर दिले असतीलतर ते शंभर मास्क मोजून घेतलेत का. ते वाटप करताना कोणाकोणाला वाटप केले आहेत. हे ज्यांच्यासाठी घेतले आहेत त्यांच्यापर्यंत गेले आहेत का. जे मास्क आहेत त्याची खरी किमंत किती आहे याची आपण शहानिशा केली का. अजीबात केलेली नाही. आमचा जरी राष्ट्रवादीचा कोण असेलतर त्याचा सुध्दा पडदा फास केल्याशिवाय रहायच नाही. पेपरमध्ये नाव आलेल आहे. ही जी वेळ आहे ती वेळ वाईट आहे.

**मा.महापौर-** काका हे खुप अत्यावश्यक होतं. त्या टाईमाला मी इथेच होते, स्लम ऐरीयामध्ये मास्क लवकर वाटायचे होते. मास्क शिवून मिळत नव्हते, सगळीकड पाहील. लॉकडावून असल्यामुळ कुठ कापड मिळत नव्हतं. जस जस पध्दतीन घडल तस तस बचत गटानी दिलं असेल.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, पण हे रेट, ही क्वॉलीटी याच काय. कापडाच काय. साबणाच काय. लॉकडावून झाल्यानंतर कंपनी बंद झाली असेल पण त्यांच्याकड मटेरीअलतरी असेलना. लाईफबॉयच साबण का ठरला, लाइफबॉयची कंपनी कुठून आली. जस सांगीतल की आम्हांला काही कारणानी घरी बसाव लागल किंवा आमची सत्ता गेली त्याच पध्दतीने हा सुध्दा घोटाळा आहे. या मास्कला किंवा त्या खरेदीला कोणी सपोर्ट केला आहे म्हणजे कोणी पत्र दिल, कोणी शिफारस केली त्याची माहीती आम्हांला मिळालेली नाही. त्या लोकांना बील दिलेल आहे का नाही हे पण आम्हांला सांगाव मिळाल असेल आणि हे मटेरीअल घेतल असेलतर त्याच्यावर आपण काय करणार आहेत. यावर कायदेशिर कारवाई झाल्या शिवाय आम्ही शांत बसणार नाहीत. उदयाच्या येणा-या २० तारखेच्या जनरल बॉडीला परत हाच वाद आम्ही घालू आम्हांला येत्या २० तारखेच्या जनरल बॉडीला या सगळया विषयाचे क्लेअर दाखवावे, क्लेअर सांगाव याच्यामध्ये कोण कोण आहेत आणि त्यावर कारवाई काय केली त्याची माहीती आम्हांला मिळावी. जर आपण कारवाई केली नाहीतर आम्ही योग्य त्या दिशेनी कारवाई करु, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेला बराच वेळ झाल आपण मास्क या विषयावर बोलतो. काका बोलले, मंगलाताई बोलल्या, मी तोच तो विषय बोलणार नाही. मला अजून एक गोष्ट निदर्शनास आणायची होती की ज्यावेळेस ही सगळी प्रक्रीया सुरु झाली, तुम्ही म्हणाले आता झोपडपट्टीवासीयांना मास्क दयायचे त्यावेळेस आपण सांगीतल की आपण बचत गटाकडून घेवू. त्यावेळेस तुमचेच एक अधिकारी मला भेटले ते म्हणाले एक्स, वाय, झेड व्यक्ती शोधली त्याच्याकडून आम्ही कापड घेवू. त्यानंतर मी आपल्याकड आलो, आपण म्हणाले बचत गटांच्या महीलांना काम मिळेल त्यांना देवू. सुरवातीला आपण कापड घेवून शिवायला दिलं. नंतर आम्हांला समजल की तुम्ही डायरेक्ट दहा रुपयानी दिले. हे मास्क ज्यावेळेस बाहेर आम्ही इकड तीकड विचारतो तर सहा रुपये, सात रुपये असे रेटस समोर आले. जर एखादा रुपया जास्त गेला तर त्याची क्वॉलीटी चांगली असेल पण तसंही नाही. विशेष महापालिकेचे जे ठेकेदार की ज्यांची आपण एका बाजूला केस लढतो, थेट खरेदी करण्याचा तुम्हांला अधिकार होता. तुम्ही याच्यात सरळ ठेकेदारांना दिले, मग तुम्ही ठेकेदारांना का दिले. मग तुम्ही सगळयाच महीला बचत गटाला का नाही दिले. म्हणजे कुठेतरी शंकेला वाव आहे. काका साबण दाखवतात, आम्हांला जे

बारीक बारीक नगरसेवकांना साबण दिल्या त्या सांगीतल्या की सीएसआर मधल्या होत्या. खरेदीतले कुठे पाहीलेही नाही आणि कुठे काहीच नाही. म्हणजे तुम्ही सांगताना की आतापर्यंत आम्ही एवढे लोक तपासले, आतातर तुमचे तीस लाखावर गेले शिक्षक लोक तपासतात. आमच्या घरात विचारायला आले नाहीत की टेम्परेचर काय आहे ते. शहराची लोकसंख्या वीस ते बावीस लाख असेलना तर तुमचा आकडा तीस लाखाच्या पुढे गेला आहे. म्हणजे कुठेतरी पब्लिसीटी, लोकांकडून पाठ थोपटायची असे काम न करता कोरोना सारख्या कठीण काळात आपल्याला हे असे उदयोग सुचत असतीलतर काल परवा आदरनीय खासदार किरीट सोमय्या यांनी टिका केली पण मला वाटत आपला आणि मुंबईचा रेट जवळ जवळ सुरवातीचा एकच आहे. मी परवा आपल्या इथेही चौकशी केली सुरवातीला जेवणाचा रेट ४८० होता नंतर तो कमी कमी होत गेला. आता टेंडर फ्लोट करता. आमच्या कडे किराणा मालाच्या दुकानदारानी, भाजीवाल्यांनी लोकांकडन जास्त पैसे घेतलेतर आम्ही त्यांच्या दुकानात गेलो त्यांना सांगीतल लोकांच्या तक्रारी आल्या आहेत जास्त रेट लोकांकडून घ्यायचे नाहीत लोकांना ब्लॅकमेल करायच नाही. आणि इकडे आपण काय केलं, साहेब आमच्याकडे एक अरुणकुमार म्हणून आहेत मी तुम्हांला त्यावेळेस म्हणलो होतो आजही सांगतो. त्या अरुणकुमारांची स्वतःची टेक्सटाईल्स आहे, फर्म आहे. त्यांचा स्वतःचा कापडाचा कारखाना आहे. त्यांनी त्यावेळेसही हे मास्क लोकांना दिले किंवा काय, तुम्हांला एक साध उदाहरण देतो मी. कॉन्टेटी-५०० रेट ११ रु. कॉन्टेटी- १००० रेट ११.९५ व ११.५०, कॉन्टेटी-२००० रेट-१०.५०, कॉन्टेटी-३००० रेट-९.९०, कॉन्टेटी-५००० रेट-९.५५, कॉन्टेटी-८००० रेट-८.९५, कॉन्टेटी-१०००० रेट-८.००, शिवाय त्याची क्वॉलीटी बघा तुम्ही पिवर कॉटन मायक्रोसॉफ्ट म्हणजे याची जर तुम्ही क्वॉलीटी पाहीलीतर चांगली आहे. मी तुम्हांला म्हणल होतो की याची माहीती घ्या लोक तुम्हांला तयार करुन देतील. मग तुमच इन्टेन्शन असच होतं का. याच्या संबंधित लोकांना पैसे मिळावेत. साहेब कोरोनाच्या काळात आम्हांला म्हणायच नाही तुम्ही पण कोरोनायोध्दा म्हणून काम करताय. तुम्ही पण हायरिस्क कॉन्टॅक्टमध्ये सर्वजण आहात. पण अशावेळेस जर आपल्या हाताखालचा स्टाफ काही उदयोग करत असेलतर निश्चित तुम्ही त्यांना धडा शिकवला पाहीजे. शाळेतले शिक्षकांना मास्क नाहीत. तुम्ही एक एका झोपडीत २५-२५ मास्क देता. शहरातील प्रत्येक माणसाला जर तुम्हांला मास्क दयायचे असतील आणि घरात जर दोन आणि चार लोक असतीलतर मास्क किती देणार. शहराची लोकसंख्या

२५ लाख आहे मग तुम्ही ५० लाख मास्क देणार का. काही काही ठिकाणी २५-२५ मास्क दिले आहेत आणि जिथ नाही तीथ काहीच दिलेले नाहीत. आपले आरोग्य कर्मचारी असेच फिरतात. तुमचे पण कामगार आता कामाला आलेले आहेत त्यांच्याकड कुठले मास्क आहेत, असेच घरी शिवलेले मास्क दिसतात. त्यांची पण आपण एवढी काळजी घेत नाहीत, आपण थेट खरेदी करण्याला पण प्राधान्य दयायला पाहीजे होतं. आहेत का तुमच्या झाडूवाल्यांकड, आरोग्य कर्मचा-यांकड कुठले साधने. तुम्ही ते जेल वाटतात कशाला दयायचना साध आपल. तुम्हांला सॅनिटायझर दयायच तर जेलचच दया असं काही नाही. तुम्ही सुरवातीला एकदम चांगला निर्णय घेतला होता की मी काही करणार नाही आरोप होतील म्हणून साहेबांनी ब-यापैकी सीएसआर मधुन सगळया गोष्टी आणि जेवढ करता येईल तेवढ केलं. परंतु या मास्क वरुन मी त्यावेळेस पण रोजच्या रोज सांगत होतो याच्यापेक्षा चांगल्या क्वॉलीटीचे मास्क घ्या. अरुणकुमार यांच्या मास्कची क्वॉलीटी माझ्याकडे आज आहे, त्याचे फोटो आज आहेत. दहा हजार क्वॉन्टेटी घेतली तर ८/- रु. मास्क देतात. तुमच्यातर लाखात क्वॉन्टॅटया आहेत अजून रेट कमी झाले असते. परंतु तुम्ही पहील्यांदा काय सांगीतल यामुळे महीलांना रोजगार मिळेल त्यावेळेस पण मी तुम्हांला म्हणालो होतो महीलांना जवळ जवळ आणल्यावर गर्दी होईल. तरी पण तुम्हांला माहीत नाही की काय नक्की झालं. हे जर तेरा पाहीलेतर बचतगट कमी आणि ठेकेदारच जास्त आहेत. आनंद एन्टरप्राईजेस चिंचवडचा, साई एन्टरप्राइजेस. बरं याची क्वॉलीटीतरी बघाना साहेब, आता काकानी जो मास्क दाखवला त्याची काय क्वॉलीटी आहे. म्हणजे मी हे तुम्हांला फायबरचे मास्क दाखवतो याच्यावर त्यांनी म्हणलय दोन आठवडयाची गॅरंटी, मायक्रोफायबरची. म्हणजे तुम्ही या लोकांना जो मास्क दिलाय त्याची एक ते दोन दिवसाची पण गॅरंटी असेल असं मला वाटत नाही. तुम्हांला गोरगरीबांना दयायच तर चांगलतरी दयानां. असा मास्क दिल्यानंतर त्याची सुरक्षा होणार का अजून तो धोक्यात येणार. परवा साहेबांच कौतूक केल, साहेब तुम्ही सगळे हायरिस्क मध्ये काम करता त्याच्याबद्दल मला आजही काही म्हणायच नाही पण आपण हायरिस्क मध्ये काम करत असताना आपल्या खालचे काय दिवे लावतात याच्यावर पण आपण लक्ष ठेवल पाहीजेनां. म्हणजे आपण एका बाजूला चांगल काम करायच आणि कुणीतरी खाली असं करायच हे कशासाठी. म्हणजे नागरीकांचा एका बाजूला जीव वाचवायचा आणि दुस-या बाजूला तोच जीव धोक्यात घालायचा. का तर त्याच्यात कुणालातरी

इन्ट्रेस्ट आहे. वर्तमानपत्रात बातम्या येतात, ते मास्क पाहील्यानंतर साहेब, ते दिसतय. मला वाटत याला कुठली इन्क्वॉयरी कमिटी लावायची गरज आहे. तुम्ही स्वतः त्याची सुनावणी घ्या ते मास्क तुमच्या समोर घ्या. खरच जर असं कोणी केल असेलतर त्याच्यावर एफआयआर दाखल करा. ही फसवणूक आहे, ही चिटींग आहे, ही महापालिकेची आणि या शहरातील नागरीकांची पण आहे. दुस-या बाजुला आपण धिंदोडा पेटवायचा, तुमची पण तेवढीच जबाबदारी होती. मी तर म्हणतो जर मापात पण पाप केल असेल. केल असेलना या लोकांनी जर कापडात पाप करतात तर मापात का नाही करायचे. त्याच्यामुळे साहेब, माझी एकच विनंती आहे की याची व्यवस्थित चौकशी करा आणि याच्यात जो दोषी असेल त्याला सोडू नका त्याची एफआयआर दाखल करा, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच ज्या विषयावरती एवढी चर्चा रंगतेय, रंगलीय. राष्ट्रवादीच्या माजी पक्षनेत्या त्यांनी विरोध केला की सुनिल शेळकेनां मास्क दयायची गरज नाही, वैशालीताईनी केला. सगळयांच्याच तोडूंन एकच आहे. परंतु आपली पण भाषा तीथ लिहीताना चुकली आहे. त्यांचा गैरसमज होणं आणि आपला जो विषय आहे तो कार्योत्तर मान्यतेसाठी येतो तर आपण तस लिहायला पाहीजे होतं की कार्योत्तर मान्यतेसाठी येत आहे. दुसर असं की आमदारांना खरच आपण काही दयायची गरज नाही. आख्ख्या महाराष्ट्रातल्या आमदारांना एक रुपया दयायची गरज नाही. ५० लाख रुपयाचा निधी राज्यशासनाने त्या त्या आमदारांना कोरोनाच्या खरेदीसाठी किंवा त्यासाठी लागणा-या मदतीसाठी राज्यशासनाने तो ऑलरेडी दिलेला आहे, मग आपण का दिला. आपण मा.पालकमंत्र्याना का नाही सांगीतल. मा.पालकमंत्र्याच्या एखादयावेळेस लक्षात नसेल आपण का नाही सांगीतल की ५० लाखाचा निधी मा.आमदारांना दिलेला आहे. त्या त्या आमदारांची ही खरतर त्यांची जबाबदारी आहे. मग सत्ताधारी पक्षातील असतील, विरोधी पक्षातील असतील सगळया आमदारांनी त्याचा लेखाजोखा मांडला पाहीजे, ज्यांनी त्यांनी त्यांच्या मतदारसंघामध्ये ५० लाखाचे काय केले. कशाला आपण हे पाप घेता. आम्ही जितक्यावेळा त्या कोरोनाच्या लॉकडाऊनमध्ये तुमच्याकडे आलो तेवढयांदा एकच तुम्हांला सांगीतल साहेब, जे काही कराल आम्ही तुमच्या बरोबर आहोत. प्रामाणिकपणे आणि मीच नाहीतर या सभागृहात बसलेला प्रत्येक नगरसेवक हा तुमच्या बरोबर होता, आहे. आता जे काही मास्क दाखवले ते दाखवताना ताईनी

उल्लेख केला की सिमाताई तुम्ही असतातर तुम्ही काय बोलला असता. निश्चितपणे विठ्ठल  रुक्मिणीची मुर्ती देताना त्यामध्ये आम्ही सांगत होतो की एकाच माणसानी तीन लोकांच्या वेगवेगळया नावानी टेंडर भरलं. ऐकल नाही, सेम आयपी ॲड्रेस होता. मग आम्ही त्यात पत्र दिलं, आम्ही माहीतीच्या अधिकारात तुमच्याकडे आलो, तुम्ही आमची सुनावणी लावली, चौकशी समिती बसली. चौकशी समिती बसल्यानंतर त्याच्यामध्ये सिध्द झाल आणि मग कुठे आपण कारवाई केली, तेव्हा तो रिझल्ट आला. दुसर होतं शवदाहीनीच, एक शवदाहीनी आपण घेतली १ कोटी ८० लाखाला मग ती वाढत वाढत आडीच कोटी, तीन कोटी, सहा कोटी, सात कोटी काय वाट्टेल त्या रक्कमा झाल्या. त्याच्यामध्ये सुध्दा परत तीच प्रोसेस. माहीती अधिकारात जायच, माहीती घ्यायची, एक महीन्यानंतर माहीती दयायची त्याच्यावरती सुनावणी दयायची मग आम्ही अपिलात जायच, अपिलात गेल्यावर तुम्ही सुनावणी घ्यायची मग ते सिध्द झाल आणि मग आता कुठे त्याच्यावरती कारवाई झाली. मी तर म्हणेन की याच्यामध्ये जर का तुम्हांला असे वाटत असेल, नव्हेतर तुम्हांला अस वाटतचतर चौकशी समिती बसवा. पण हे सुध्दा तीतकच खर आहे की त्यामध्ये जसे भाजपचे लोक होते किंवा सत्ताधारी पक्षाचे लोक सामील आहेत तसे राष्ट्रवादीचे सुध्दा आहेत, छातीठोकपणे सांगतो. दोन महीलाबचत गट राष्ट्रवादीचे आहेत. आमच्या अधिका-यांची सुध्दा उलटतपासणी झाली पाहीजे. तुमच अभिनंदन ताई की तुम्ही त्याच्यामध्ये सामिल नाहीत तुम्ही सांगता की ही चौकशी झाली पाहीजे. तसे आम्ही सुध्दा तीतक्याच ख-या मनाने सांगतो. आम्ही सगळयांची चौकशी करा म्हणतो. आम्ही काय सांगीतल आम्ही दोषीतर तुम्ही पण दोषी. आणि ज्यांनी ज्यांनी कोरोनामध्ये टाळूवरच लोणी खाण्याचा प्रयत्न केला मग तो कितीही मोठा असूदयात समोर आला पाहीजे या मताची मी पण आहे. पण त्याच्यामध्ये तुम्हांला सगळयांना प्रोसेसनी जाव लागेल. आज मंगलाताईच अभिनंदन. मी आज त्यांच्याकडे पर्स पाहील, मी त्यांना तेरा वर्षे झाले या सभागृहात बघते, त्यांच्या हातात कागद त्यांचा मोबाईल आणि पेन या पलीकड मी काही पाहील नाही. आज जशी मी त्यांच्या हातात पर्स पाहीली मी आशाताईना सांगीतल, आशाताई आज कुछ तो हैं. मंगलाताई पर्स घेवून आल्या मी त्यांना टोकलपण. विषयाची मांडणी सुंदर आहे. मागच्या जीबीच्या वेळेस आम्ही सुध्दा तुम्हांला सांगीतल की पंचवीस एक मास्क येथे ठेवलेले होते, त्याची क्वॉलीटी चांगली नव्हती. आम्ही सुध्दा टोकल क्वॉलीटी चांगली नव्हती म्हणून. आम्ही सुध्दा

तुमच्याकडे त्यावेळेस डायरेक्ट तक्रार करायला आलो. ज्या ज्या गोष्टी मला पटलेल्या नाहीत त्या त्या गोष्टीची मी तुमच्याकडे तक्रार केलेली आहे. मी जरी सत्ताधारी पक्षात असलेतरी सुध्दा मी कुठली गोष्टी कानानि-हाळी टाकत नाही आणि कुठलीही गोष्ट मी लपवून ठेवत नाही, माझा स्वभाव नाही त्यामुळे मी त्याबाबतीत खूप स्पोष्टोक्ती आहे. आणि म्हणून जर का अशा ठिकाणी अशाप्रकारच हे झाल असेलतर मग ते कसे आलेत, बचत गटाला कस बोलवल्या गेलं त्याच्यावर सुध्दा आक्षेप असले पाहीजे, का नसावा. आम्ही सगळे १३३ नगरसेवक या सभागृहाचे सदस्य आहोत. मला असे वाटते की या सभागृहात बसलेल्या कुठल्याही नगरसेवकाला जर तुम्ही असे सांगीतल की पाच हजार मास्क तुमच्या कडून दया तर आमच्यात चढाओढ लागली असती तु भारी का मी भारी. आम्ही फुकट दिले असते, नाही म्हणत नाही. आमच्यात चढाओढ लागली असती. मग माझा कोण प्रतीस्पर्धी आहे. मग तो राष्ट्रवादीचा आहे का शिवसेनेचा आहे, मग तो कसा बारीक आहे तो कसा नालायक आहे हे ठरवण्यासाठी आमची चढाओढ लागली असती आणि तुम्हांला मास्क मोजून मोजून दिले असते आणि कॉन्टेटी मोजतानी आम्ही तुमच्या जवळ थांबलो असतो. की बघा साहेब माझे एवढे आले, मी कशी भारी, हे पण आम्ही केलं असतं. त्यावेळेस गरज होती, दयायला पाहीजे होते, दिले, जे करु नये ते केलं पण आवश्यक होतं आणि आवश्यक असल्यामुळे केलं. पण याच्यात जर का तुम्ही अनेक लोकांना विश्वासात घेतल असतंतर मला वाटत हे मास्क फुकट मिळाले असते, फुकट मिळाले असते. जेवण्याच्या संदर्भातील विषय आला, तीकडे किरीट सोमय्यानी म्हणले म्हणून इथे याच्यावरती पण कुणीतरी म्हणले त्याच्याकडे पाहीले पाहीजे, साबण आहे काही तुम्ही सीएसआरमध्ये घेतले, काही घेतले त्यामध्ये वजनाला कमी आहेत. आता मा.दत्ता काका साने यांनी सांगीतल की ते वजनाला कमी आहेत तुम्ही कसे घेतले, कुठल्या कंपनीकडन घेतले. मग सीएसआरमध्ये पण ज्यांनी ज्यांनी कंपन्या टाकल्या असतील, उघड पाडानां साहेब त्यांना आम्ही तुमच्या बरोबर आहोत, चौकशी लावा, चौकशी समिती बसवा. कुठले मास्क कुणाकडून आले, ते टेक्निकली व्यवस्थित आहेत का नाहीत. त्यातन जर का माणुस दिसत असेल म्हणजे विषाणूचा माझ्यावरती प्रभाव होवू शकतो. मग असे ज्यांनी दिले असतीलतर त्याच्यावर कारवाई नको का व्हायला. एकीकडे आपण कोरोनाचे युध्द इतक्या मोठया प्रमाणावरती लढत असूतर हे पण झालच पाहीजेनां आणि ज्यांनी कमी दर्जाचे दिले असतीलतर त्याच्यावर कारवाई करा. आणि जे अजीत

पवार साहेबांच्या केबीनला घुसून घुसून बसतात, खास करुन राष्ट्रवादीचे, मी त्या दिवशी तुम्हांल बोलले साहेब. कितीवेळा अधिका-याच्या ॲण्टीचेंबरला बसाव याची मर्यादा मला असली पाहीजे साहेब, मला असली पाहीजे. उगीच आरोप करत नाही. आणि रोज उठून काय काम करतो, आज हा कॉन्ट्रॅक्टर, उदया तो कॉन्ट्रॅक्टर बाई तुम्ही पहील्यांदाच निवडून आलात आपल्याला माहीती का. रोज उठून कॉन्ट्रॅक्टरला कशाला घेवून जाता तीकडे. आमचे डोळे आंधळे नाहीत, आम्ही बोलत नाही हा विषय नि-हाळा आहे. आज तुम्हीच मला बोलायला भाग पाडल मी बोलले नसते हे. याच्यामध्ये आपण खबरदारी घेतली पाहीजे. पक्षनेते तुम्हांला पण तंबी आहे माझी जर येथून पुढे खरेदी होतांना जर का तुम्हांला माहीती असेलतर त्या त्या लोकांचे नाव उघड करा. आम्ही कशाला तुमच्या पापात भागीदार व्हायचं. ज्यांनी केल तो भोगेल आम्ही भोगायला मोकळे नाहीत आणि तुम्हांला माहीती आहे कोण आहे ते. आयुक्त साहेब यामध्ये कुठल्याही परिस्थितीत चौकशी समिती नेमा. ख-याच खर आणि खोटयाच खोट झाल पाहीजे. लॉकडाऊनमध्ये ज्या प्रकारच काम तुम्ही केलं ते उत्कृष्ठ काम केलं. मी चितळे साहेबांना सुध्दा वारंवार सांगत होते की तुमची वेळ येणार आहे, तुमची वेळ येणार आहे आणि तुमच्यावरती खुप आरोप होणार आहेत. तुम्ही ज्यांच्या दबावात काम केल असेल, वेळप्रसंग पडलातर तुम्हांला या सगळया चौकशीला सामोर जाव लागेल. अधिका-याची बाजू घेवून मी ठामपणे सांगते की  कारण की मला माहीती आहे की त्यावेळेस तुम्हांला जे योग्य वाटल, लोकांचा जीव वाचविण्यासाठी तुम्हांला जे जे वाटल  ते ते तुम्ही सगळ केलं आणि आम्ही सगळयांनी सांगीतल की तुम्ही ते करा. परंतु त्यामध्येही जर अस काही घडल असेलतर निश्चितपणे ते पाठीशी घालण्याच्या योग्य नाही. त्याच्यावरती कुठेतरी अंकुश बसला पाहीजे. चौकशी समिती नेमा ज्या दिवशी त्याचा निकाल येईल त्यादिवशी सिमा सावळेचा शब्द आहे मी नावानिशी बोलणार. मला विनाकारण कोणाची बदनामी करायला आवडत नाही. मी काही गोष्टी पाळते पण माझी सगळया अधिका-यांना याठिकाणी विनंती आहे तुमच्याकडे मी येत असेलतर माझ नाव सांगा. जे कोण असेल त्याच नाव सांगून मोकळ व्हायच. आपण कशाला धुनं धुवायच. एकीकडे कोरोनायोध्दा म्हणून आख्ख्या सभागृहात आम्ही टाळया वाजवून तुमच स्वागत केलं आणि दुसरीकड आज परत तुमच मनोबल आम्ही खच्ची करतो. मला वाटत जर का आपण पुढच्या वीस तारखेपर्यंत सगळयांनी थांबला असता ज्यांचा अभिमान वाटतो असे तुषार यांचा आजही

अभिमान आहे कारण की तुम्ही भ्रष्टाचाराच्या विरोधात बोललात म्हणून तुमचा अभिमान आहे, म्हणून तुमच अभिनंदन. फक्त त्याच्यासाठी जी प्रोसेस आहे जी मेथड आहे ती तुम्ही आज योग्य पध्दतीने वापरली याबद्दल पण तुमच अभिनंदन. देव करो, याच्यात सापडो. ज्यांनी कोणी निकृष्ठ दर्जाचे मास्क पुरवले असतील त्यांच्यावरती कारवाई होओ. तुम्ही ज्यांची ज्यांची बील दिलेली आहेत, आता काहीतरी तीनच लोकांची बील देणं आपण बाकी आहेत. आम्ही बोललो तुम्हांला वाईट वाटल असेलतर एका काना ऐकल दुस-या कानांनी साडून दया. पण आमची त्याच्या मागची तळमळ आहे. आम्हांला तुमच आजून असच मनोधैर्य वाढवायच आहे. तुमच्याकडन चांगल काम झाल पाहीजे म्हणून आम्हांला तुमच्या बरोबर थांबायच आहे. या संदर्भात मा.महापौर साहेब, आपण सुध्दा लक्ष घालून ज्या ज्या कुठल्या बचत गटाकडून ही चुक झाली त्यांना पनीशमेंट झाली पाहीजे. जस वैशालीताईनी सांगीतल तस ब्लॅकलीस्टमध्ये टाका. मीतर म्हणेन त्याच्या पाठीमागे पडदयामागचे कलाकार असतील, त्यांच्या कुठल्या संस्था असतील याही शोधा त्याही टाका. आमच काहीही म्हणण नाही. सदस्य असेल त्याचही नाव उघड करा काही फरक पडत नाही. जो करेल तो भरेल, जो नाही करणार तो कशाला भिणार आहे त्यामुळ ते पण करा. चौकशी समिती नेमा फक्त आता तुम्हांला त्या संदर्भात वेळ नाही एवढीच मंगलाताई तुम्हांला हात जोडून विनंती आहे. तुम्ही ज्येष्ठ नगरसेवक आहेत काका, तुम्ही, वैशालीताई तुम्हीतर महापौर राहीलेल्या आहेत. मंगलाताई महापौर राहीलेल्या आहेत, पक्षनेत्या राहीलेल्या आहेत. त्यानी केलेल्या आरोपांवरती मी आक्षेप घेत नाही. फक्त मंगलाताई एकच विनंती आहे मी स्वतः आपल्या बरोबर मागणी केली चौकशी समिती नेमण्याची फक्त कोरोनाचा हा जो पिरीएड आहे एवढयासाठी आपण सगळया अधिका-यांच्या बरोबर थांबून पुढील काळात आपल्याला जी काही कारवाई करता येईल ती निश्चितपणे मा.महापौर साहेब करावी, एवढीच आपल्याला विनंती आहे. पुढच्या जीबीला कोरोना लगेच जाणार नाही वैशालीताई, तुम्ही डॉक्टर आहात. अधिका-यांकडून आपल्याला काम करुन घ्यायच आहे, असं करु नका विनंती आहे तुम्हांला. मा.महापौर साहेब, जो काही विषय आहे तो आपल्याला मंजूर करायचा असेलतर मंजूर करावा आणि जर फेटाळायचा असेलतर फेटाळावा एवढीच विनंती याठिकाणी करते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.अभिषेक बारणे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर अशा पध्दतीच्या विषयावरती चर्चा होणं दु:ख आहे, खर दु:ख. मी पहील जसा कोरोना वाढू लागला त्या काळामध्ये हातावर मोजण्या इतके नगरसेवक आयुक्तांपशी असायचे म्हणजे हातावर मोजण्याइतके नगरसेवक त्याठिकाणी यायचे त्यांच्याशी बोलायचे की आपण काय उपाययोजना केल्या पाहीजेत काय नाही केल्या पाहीजे.

**मा.महापौर-** अभिषेक दोन मिनीटात बोलावे व मुद्दयावर बोलावे.

**मा.अभिषेक बारणे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता काकनी सांगीतल २० रुपयाचाचा साबण घेतला २०.१७ पै.ला. म्हणजे लाख ते सव्वा लाखाच्या साबणाचे मी आता बघीतलतर काहीतरी वीस ते पंचवीस हजाराचा फरक काकांच्या सांगण्यात आणि घेतलेल्या साबणामध्ये येतो. अजून एखादा रुपया कमी झाला असतातर चाळीस एक हजार कमी झाले असते परंतु त्या लॉकडावूनच्या काळामध्ये ब-याचशा गोष्टींचे भाव वाढले होते. चौकशी अवश्य करा पण त्यावेळेस काही काही गोष्टी अव्हेलेबल नव्हत्या, ट्रान्सपोर्ट अव्हेलेबल नव्हतं. ट्रान्सपोर्टच्या गाडया येत नव्हत्या आणि अशा काळामध्ये जर पाच पचंवीस हजाराचा, लाख रुपयाचा फरक येत असेल साबणाच्या विषयामध्येतर आणि त्या विषयामध्ये आपण अर्धा अर्धा, पाऊण पाऊण तास जर आपण चर्चा करणार असूतर निश्चितपणे चौकशी करा त्याबद्दल माझ दुमत बिलकुल नाही. परंतु या गोष्टीचा भ्रष्टाचार झाला असा जर आपण आव आणला आणि तो जर आपल्या बातमीवाल्यांनी बाहेर प्रसिध्द केला शहरामध्ये तर आपण नगरसेवक लोक करतो म्हणजे काम करुन सुध्दा तो आरोप आपल्यावरती पण येतो. आरोप तुम्हांला करायचे आहेतना तर तुम्ही तुमच्या लेटरहेडवरती पहीले आरोप करा. त्यांना पत्र दया की या या विषयाची चौकशी करा म्हणून. गटनेत्यांना सांगा. म्हणजे प्रत्येकानी या विषयावर एवढा मोठा आव करायचा आणि सगळया बातमीवाल्यांनी ती बातमी लावायची. मास्क मध्ये भ्रष्टाचार झाला, साबणामध्ये भ्रष्टाचार झाला. जर हिशोब लावला साबणामध्ये पन्नास हजार, लाखाचा फरक येतो आणि त्याचा जर आपण एवढा मोठा इश्यू केलातर आणि सामाजामध्ये त्या गोष्टीचा तेढ निर्माण झालातर, आज अजून पन्नास रुग्ण पॉझिटीव्ह आढळून आलेले आहेत. उदया प्रशासनामधली ही लोक जर घाबरलीतर की बाबा उदया कसंकाय हे आपण करायचं. आता मगाशी मी म्हणालो की निसर्ग आपत्ती आली त्यावेळेस तुम्ही का नाही थेट पध्दतीने माणस वाढवली. याच्यावर जर आताच आपण एवढा सगळा गाजावाजा

करुन आरोप केलेतर हे कशाला पुढच्यावेळेस थेट पध्दतीने माणस आणतील. माझ म्हणण एवढच आहे की आरोप करताना ठरावीक पक्षाच्या गटनेत्याकडे नगरसेवकांनी पत्र दिलं व त्यांनी जावुन ते आयुक्तांकडे दिलं  का तर हा काळ खराब चाललेला आहे. आरोप करु नका असं नाही ज्यांना जशी शंका वाटते ती शंका निश्चितपणे विचारली पाहीजे. पण वैयक्तिक एखादयाबद्दल बोलायचं, वैयक्तिक एखादया वरती टिका करायची, नाव न घेता एखादयावरती टिका करायचीतर त्यात काही अर्थ नाही. म्हणजे तो समज-गैरसमज तयार करण्यात काहीच मजा नाही. विषय जसा नावानी आला तसा विषय विषयपत्रीकेवरती घेतला आहे. विषयपत्रीका बनवताना त्याच्यात कार्योत्तर पण लिहायच राहून गेल आहे. माझ एवढच म्हणण आहे की याच्यामध्ये जास्त काही फाटे फोडू नका.

**मा.महापौर-**  आयुक्त साहेब याची सर्व माहीती सांगतील.

**मा. आयुक्त –** सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सभागृह. आता मास्क खरेदी आणि साबण खरेदी किंवा कोरोनामध्ये त्या त्या वेळची थेट पध्दतीने केलेली खरेदी या संदर्भामध्ये विवीध मत आणि आरोप करण्यात आलेली आहेत. त्या संबंधामध्ये पहील्या प्रथम मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की थेट खरेदीचे अधिकार आपत्ती समोर आलेली असताना आयुक्तांना प्राप्त झालेले होते. त्याच्या मागे भूमीका अशीच होती की ही आपत्ती आहे, काही निर्णय हे तात्काळ घ्यावे लागतात. त्यावेळेला जी आवश्यक प्रक्रीया करायला लागते ती करण्यासाठी पुरेसा वेळ नसतो आणि ती प्रक्रीया पुर्ण करण्यासाठी तेवढा वेळ नसल्या कारणाने किंवा काही नर्बंध त्यावेळेला समाजात प्रचलीत असल्यामुळे जीकडन जी गोष्ट उपलब्ध होते ती तात्काळ खरेदी केली जावी. त्यावेळेला जीव वाचविणं ही बाब सर्वात महत्वाची असते आणि त्या गोष्टीला समोर ठेवून काही निर्णय हे तात्काळ घेतले जातात. प्रत्येक गोष्टीच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये जीव वाचविणं आणि तात्काळ आपत्तीला सामोर जाणं ही भूमीका समोर असते. निश्चितपणे खरेदी प्रक्रीया ही पारदर्शी पध्दतीने व्हावी हीच अपेक्षा आहे आणि ती तशीच असली पाहीजे आणि म्हणूनच आपत्ती काळ हा याच्यासाठी अपवाद असतो. दुसरी महत्वाची गोष्ट पण तीतकीच महत्वाची आहे की माझ्यासाठी देखील तीतकीच महत्वाची आहे की कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार कुठल्याही स्थितीमध्ये होऊ नये, विशेषत्वाने तो आपत्तीत होवू नये ही माझी देखील अपेक्षा होती ती आजही आहे आणि भविष्यात मी जोपर्यंत कार्यरत राहणार आहे तोपर्यंत ती राहणार आहे. त्यामुळे या

मताचा मी असल्यामुळे पहील्यावेळा मी या सभागृहाला आश्वस्त करतो की आपत्तीकालाचा फायदा घेवून जर कुठल्याही व्यक्तीनी, कुठल्याही संस्थेनी जर त्या काळात भ्रष्टाचार केला असेलतर त्याला कुठल्याही प्रकारच अभय प्रशासनाकडून देण्यात येणार नाही. मात्र जे काही आरोप आज होत आहेत की त्याच्यामध्ये असं का केल गेलं ही भूमीका देखील विचारात घेणं तीतकेच गरजेच आहे. ज्यावेळेला मार्च अखेरीस कोरोना वाढत होता एक वेळ अशी होती की आपण देशामध्ये क्रमांक एक वरती जाऊन पोहचलो होतो. मग पुन्हा काही काळ असा गेला की आपण तो कंट्रोलमध्ये आणला. पण त्यानंतर शहरामध्ये कोरोना वाढीच्या दुस-या टप्प्यामध्ये ज्यावेळेला कोरोनाची सुरवात झाली  होती ती उच्चभ्रू वस्तीमधुन झालेली होती. परदेशातून येणा-या नागरीकांकडून ही सुरवात झालेली होती. परंतु दुस-या टप्प्यामध्ये ज्यावेळेला प्रादुर्भाव या शहरात सुरु झाला त्यावेळेला तो अत्यंत गरीब, स्लममध्ये राहणा-या, दाटीवाटीन राहणा-या लोकांमध्ये याचा प्रादुर्भाव खुप झाला. अन्य कोणत्याही शहरात होण्याच्या पुर्वी सगळयात पहील्यांदा ज्यावेळेला धारावी देखील वाढायला लागलेल नव्हत त्यावेळेला आपल्या शहरामध्ये खराळवाडीमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव व्हायला सुरवात झालेली होती. गांधीनगर त्याच्या काठावर होतं आणि गांधीनगर मध्ये देखील याचा प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत  नव्हती. त्यावेळेला डोळयासमोर विचार असा होता की एखादया स्लममध्ये नागरीक दाटीवाटीने राहतात,  छोटयाशा १०X१० च्या घरामध्ये पाच ते दहा माणस दाटीवाटीने राहतात त्यांच सोशल डिस्टन्सिंग फॉलो होत नाही. सामाजीक, शारीरीक अंतर ते एकमेकांमध्ये ठेवू शकत नाहीत. ते कॉमन टॉयलेट, कम्युनिटी टॉयलेट वापरतात त्यावेळेला लॉकडावून नुकताच सुरु झालेला होता. त्यामुळे अनेकांना अनेक गोष्टी उपलब्ध होतील किंवा नाही याची शाश्वती नव्हती. मास्क वापरण्याच्या संदर्भामध्ये देखील त्यावेळेला नुकत्याच पहील्या दोन आठवडयामध्ये मास्क वापरु नये अशाच स्वरुपाच्या सुचना होत्या. सगळीकडे मास्क वाटप करा अस सर्व नगरसदस्यांकडन मागणी होत असताना आम्ही भूमीका घेत होतो की मास्कची गरज नाही डब्ल्यूएचओनी मास्क वापरु नका अस सांगीतलेलं आहे. परंतु दुस-या आठवडयाच्या शेवटी हा नावीन्यपुर्ण व्हायरस आहे मास्क वापरावा असं ज्यावेळेला रिसर्च चालू झाल त्यावेळेला आपण तात्काळ त्यावेळेला निर्णय असा घेतला की मास्क हा ज्या भागामध्ये गरीब नागरीक स्लममध्ये राहत आहेत त्याठिकाणी सोशल डिस्टन्सिंग फॉलो होत नाही या कारणांनी आपण त्याठिकाणी त्याना मास्क

वापरण्यास विनंती करावी, या कालावधीमध्ये लोक बाहेर जाउ शकणार नाहीत त्यामुळे केवळ अनअफोर्टीक कम्युनिटीमध्येच फक्त आपण मास्क वाटप करण्याचा निर्णय घेतला. मास्क कुठले घ्यावेत तर केवळ लक्षण ज्यांना आहेत त्यांच्याकडन त्याचा प्रादुर्भाव होऊ नये याकरिताच सामान्य कापडी मास्क म्हणजे ज्याच्यावरती तीन कोटस केलेले आहेत, अशा स्वरुपाचे, सिंपल स्वरुपाचे मास्क, पुर्नवापर करता येतील, ते साबणाच्या पाण्यानी धुवून वाळून त्याचा पुन्हा वापर करता येईल अशा स्वरुपाचे मास्क आणि प्रती माणसी किमान दोन मास्क. घरामध्ये सात माणस असतीलतर १४ मास्क त्या घरामध्ये दयावे जेणेकरुन कन्टेन्मेंट ज्या कालावधीमध्ये आहे त्या कालावधीमध्ये त्यांना हे वापरता येतील हया चांगल्या हेतूने जीव वाचवण्याच्या आणि प्रसार रोखण्याच्या हेतूने याच्या मागची भूमीका होती. पहील्या प्रथम खरेदी करत असताना देखील सर्व जी काही काळजी करायला बाळगणं शक्य होतं ती बाळगली गेली. त्यावेळेला पहील्यांदा आम्ही येरवडा जेल असेल, कोल्हापुर जेल असेल, सातारा जेल असेल यांच्याकडन मास्क बनवुन विकण्याची प्रक्रीया सुरु होती. आम्ही म्हणल ठिक आहे त्यांच्याकडन उपलब्ध होत असतीलतर ते घ्यावेत. पण त्यावेळेला आम्हांला असं कळवण्यात आलं की हे मास्क जेल मधुन उपलब्ध होत नाहीत किंवा उपलब्ध झालेतरी पाच हजार. त्यानंतर माविम जी की सरकारी महीलांच्या सोबत काम करणारी यंत्रणा आहे त्यांच्या मार्फत आपण करुन घेण्याचा प्रयत्न केला. महीला आर्थिक विकास महामंडळाला सांगीतल की तुमच्या मार्फत महीला बचत गटाच्या मार्फत करुन दया. पण त्याच्याकडन देखील असमर्थता ज्यावेळेला आली त्यावेळेला जो मार्ग मिळेल त्या मार्गातन मास्क उपलब्ध करुन घेण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. निश्चितपणे या भूमीकेवरती मी आहे की ज्यांनी चुकीच्या गुणवत्तेचे मास्क दिलेले आहेत ते कुठल्याही परिस्थितीत अपेक्षीत नाही त्यामुळे याबाबतीमध्ये सविस्तर चौकशी लावली जाईल. तीन सदस्यीय एक वैदयकीय अधिकारी, एक प्रशासकीय वरिष्ठ अधिकारी आणि एक वित्तीय अधिकारी यांची समिती या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करेल आणि तो अहवाल मला पंधरा दिवसामध्ये सादर करतील त्यानंतर जे कोणी दोषी असतील त्यांच्यावरती निश्चितपणे यासंबंधी कारवाई केली जाईल. साबणाच्या बाबतीत मला एक सांगायच आहे की आपण जे सॅनिटरीज सोप्स आहेत त्यापैकी सगळयात प्रसिध्द आहे तो डेटॉल आणि दुसरा जो प्रसिध्द आहे ते लाईफबॉय यांचा आपण त्यावेळेला विचार केला होता. डेटॉल सोप्सची त्यावेळेला मार्केटमध्ये कुठेही उपलब्धतता नव्हती. लाईफबॉयचे

सुरवातीला काही आपल्याकडन सीएसआरमधुन साबण आलेले होते त्यातले काही साबण आपण आपल्या कर्मचा-यांना सफाई कर्मचा-यांना विशेषत्वाने ते वाटले. त्यानंतर देखील सर्व नगरसदस्यांकडे सॅनिटायजर दया, आम्हांला साबण दया अशा स्वरुपांच्या मागण्या नागरीकांकडन वेळावेळी होतहोत्या. त्याचाच परीपाक म्हणुन सुरवातीला आदिचे सीएसआरमध्ये प्राप्त झालेले ५० ग्रामचे छोटे साबण होते ते आपण काही उपलब्ध संख्या होती ते सर्व नगरसदस्यांच्याकडे वाटपास पाठवले. त्यांच्याकडे खुप नागरीक त्यावेळेला येत होते. काही ना काही आपणास त्यांच्या मार्फत देता येवू शकेल. ५० ग्रामचे सॅनिटायजर देखील त्यावेळेला आपल्याला मिळाले होते. काही आपण खरेदी केले आणि ते देखील आपण त्यावेळेला तात्काळ उपलब्ध करुन दिले. त्या काळात सॅनिटायजरचा मोठया प्रमाणात तुटवडा होता. त्यामुळे आपण त्यावेळेला डायरेक्ट हिंदुस्तान लिव्हर कंपनीलाच कॉन्टॅक्ट केला. हिंदुस्तान लिव्हर कंपनीकडनच हे खरेदी करण्याच ही नॉर्मल आपल्याकडे सिस्टीम आहे त्याच्यासाठी अकौंट कोड देखील आपल्याला मान्यता देतो आणि एमआरपी वरती काय डिस्काऊट देवून त्यांनी ती बेस प्राईज त्याकाळात आपल्याला देऊ केली. त्या दिलेल्या बेसप्राईजनीच आपण ही खरेदी केलेली आहे. निश्चितपणे त्याच्यात देखील काही चुकीच झाल असेलतर त्याची देखील चौकशी करण्यात येईल. पण सन्मा.नगरसदस्य दत्ता काकाना माझ हेच सांगण आहे की त्या कालावधीमध्ये  पुर्ण कायदेशीर निवीदा प्रक्रीया आपण राबवू शकत नसल्याने आणि अकौंट कोडमध्ये मॅन्यूअलमध्ये ते आपल्याला अलौड आहे, थेट कंपनीकडन खरेदी त्यांनी नेमून दिलेल्या दराने त्यांनी नेमून दिलेल्या एजंटच्या थ्रू आपल्याकडे हा सप्लाय झालेला आहे. त्याच्यामध्ये देखील काही चुकीच होत असल्यास त्याची देखील चौकशी करण्यात येईल. जे जेवण आपण पेशंटला देतो त्या संदर्भात देखील काही ऑब्जेक्शन घेतलेले आहेत. त्यामुळे पुनश्च ४८० रुपयाचा जो विषय आहे त्याच्या बाबतीत देखील मी खुलासा करु इच्छितो. ज्यावेळेला परेदशातन नागरीक आपल्या इकडे येत होते आणि त्यांना क्वॉरंटाईन कराव लागेल अशा स्वरुपाच्या सूचना त्यावेळेला प्राप्त झालेल्या होत्या. परदेशातन येणारे नागरीक कोण असतील याची कल्पना नव्हती आणि नुकताच लॉकडाऊन त्यावेळेला जाहीर झालेला होता आणि तुम्हांला सगळयांना आठवत असेल पहीले दोन लॉकडाऊन हे अत्यंत स्ट्रिमजन्ट लॉकडऊन होते त्यावेळेला कुठलीही गोष्ट उघडी नव्हती. त्यावेळेला भाजीपाला देखील आपण कसाबसा पोहचवण्याचा प्रयत्न करत होतो. आपल्या इकडचे होलसेल सप्लायर्स

बंद झालेले होते. कसबस वैदयकीय सप्लाय फक्त चालू होता. त्यांचे देखील सप्लाय येण्याचे प्रॉब्लेमस, आम्ही पहीले दोन आठवडे ते तीन आठवडे केवळ लॉजीस्ट्रीक सप्लायचे मॅनेजमेंट करत होतो. त्या कालावधीमध्ये आपल्याकडे पहीले नागरीक येणार होते त्यावेळेला जो दर त्यांनी देऊ केला, त्यावेळेला देखील आपण तीन चार लोकांकडन विचारल होतं. त्यावेळेला ४८०/- हा दर नॉर्मल आपल्याला देऊ केला गेलेला होता. आपण एकही खरेदी त्या दराने केलेली नाही. पण आपण ती तयारी ठेवलेली होती, जस्ट इन केस कराव लागल असतंतर. त्यानंतर जसजसे आपल्याला अधिक पर्याय उपलब्ध होत गेले, मार्केट मध्ये हाळूहाळू भाजीपाल्याचा सप्लाय सुरु व्हायला लागला, जीवनोपयोगी अन्य साहीत्याचा सप्लाय होऊ लागला, माणस देखील काही प्रमाणातामध्ये उपलब्ध होऊ लागली कारण सुरवातील कल्पना नव्हती की फ्रंट लाईन्स वर्कर मिळतील की नाही पण फ्रंट लाईन्स वर्कर्स मिळायला लागल्यावर आचारी मिळायला लागले. अनेक हॉटेल्स बंद झालेली होती, हॉटेल्सचे आचारी निघून गेलेले होते. आपल्यापैकी अनेकजण हॉटेल्स चालवतात त्यांना देखील याची कल्पना असेल. ज्यांनी राखले ते राखले पण निघून गेले ते निघून गेले होते. अशा स्थितीमध्ये आपण ईमिजीएटली जो दर वायसीएममध्ये चालू होता त्याच्यानी केवळ वाटायला सुरवात केली. वायसीएममध्ये ज्यावेळेला १००/- रुपयाचा दर चालू हा त्या दरामध्ये सुरवातीची काही थोडीच रुग्णांची आपल्याकडे संख्या होती. त्यावेळेला एक बाब निदर्शनास आली की हे रुग्ण नव्हतेच, ते सगळेच कोरोना पॉझिटीव्ह होते पण त्यांच्याच लक्षण शुन्य होती. हे धडधाकट व्यक्ती होते आणि त्यामुळे त्यांना रुग्णांना आहार आपण देतो तो देणं अपेक्षीत नव्हतं. एखादा सिरीएस पेशंट ज्यावेळेला हॉस्पिटलमध्ये असतो त्याला अन्न जातच नाही पण हे जे पॉझिटीव्ह होते ते पॉझिटीव्ह असल्याने आयसोलेट केलेले लोक होते. त्यामुळे त्यांना चांगल्या दर्जाच, रोगप्रतिकारक क्षमता वाढवणार, प्रोटीनफुड देणं आपल्याला अपेक्षीत होतं आणि म्हणून त्यावेळेला आपण चांगल्या दर्जाच जेवण कसं देता येईल याचा विचार केला. तरी संख्या मर्यादीत होती त्यामुळे आपल्याकडे उपलब्ध जे दोन कॉन्ट्रॅक्टर झाले त्यांच्याकडन २२५/- रुपयाचा दर निश्चित करुन त्याच्यामध्ये तीन ते चार चपात्या, पुरेसा भात, थोडस सलाड, एक भाजी, एक उसळ आणि एक डाळ अशा स्वरुपाचा चांगला आहार आणि योग्य पॅकींग मध्ये, कारण की पॅकींगची आवश्यकता आहे कारण ते बायोमेडीकल वेस्ट तो आपल्याला जशास तसा घेता येणार नाही आपण

त्याच्यामध्ये बुफे नाही देऊ शकत कारण बुफे जर ठेवलातर त्याच्यामध्ये प्रॉब्लेम येतो की वाटप करताना कोणीतरी त्याच्याशी संपर्कात येईल. त्यामुळे पॅकींग जे की आपण डिसपोज करुन बंद करु शकतो अशा स्वरुपाच पॅकींग या पध्दतीची व्यवस्था केली गेली. हे पॅकींग देखील त्यावेळेला १३ रुपयाला उपलब्ध होत होतं. त्याच्यापेक्षा किती कमी मध्ये उपलब्ध होऊ शकेल याची मला आज देखील कल्पना नाही. हा सगळा विचार करता आपण २२५/- रुपयाला ताठ निश्चित केले. आजा या स्टेजला आता आपल्याकडे संख्या वाढू लागलेली आहे. जवळपास ४०० ते ५०० लोक आता दररोज आपल्याकडे यायला लागलेले आहेत. त्यांच जेवण आपल्याला दयायच असेलतर निश्चितपणे आता कॉम्पिटेशन होईल आता जवळपास मार्केट ओपन झालेले आहे. त्यावेळेला मास्कची देखील खरेदी करत असताना जो मास्क आज चार रुपयाला उपलब्ध होत होता कदाचित त्यावेळेला त्या मास्कची तेरा रुपया पर्यंत किमंत जात होती. त्यावेळेला आम्ही ब-याच लोकांना विचारल त्यात देखील काटकसर करुन दहा रुपयाची किमंत ठरवलेली होती. निश्चितपणे या कुठल्याही प्रक्रीयेमध्ये कोणालाही वित्तीय फायदा, गैरफायदा करु देणेंच धोरण, ही भूमीका प्रशासनाची नाही, नव्हती आणि नसणार आहे त्यामुळे पुन्हा एकदा मी या सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो जर कुठल्याही ठिकाणी चुकीची पध्दत झालेली असेल, कोणी त्याच्यामध्ये भ्रष्टाचार केलेला असेलतर जे त्यात दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. पण आपण सगळयांनी ही भूमीका समजून घेतली पाहीजे की ती वेळ अशी असते की त्यावेळेला जर आम्ही एक्सेप्शनल डिसीजनस घेतले नाहीतर काही जणांची प्राण त्याच्यात जाऊ शकतात. कोरोना हा असा व्हायरस आहे की त्याच्यामध्ये आपल्याला नक्की माहीत नाही की काय घडतय, नक्की कोण पॉझिटीव्ह आहे आणि अशा परिस्थिती मध्ये आपल्याला काही निर्णय स्वाभाविकपणे घेणे गरजेच, बंधनकारक असतं. मी त्यावेळेला सन्मा.पत्रकारांना देखील वेळोवेळी विनंती करत होतो की जर यावेळेला आमचे हात सही करायला थरथरलेतर आम्ही कुठलीही खरेदी करु शकणार नाही. मग ती औषधाची असेल किंवा एखादया जीवनापयोगी आयसीयूच्या साहीत्याची असेल किंवा व्हेन्टीलेटरची असेल. फॉरच्युनेटली आपल्या इकडे आज व्हेन्टीलेटरवरती, आयसीयू वरती जास्त संख्येनी लोक नाहीत. पण आज जी मुंबई, पुण्याची स्थिती आहे त्याच्यामध्ये आज व्हेन्टीलेटर नाहीत अशी स्थिती जर आपल्याकडे लवकर आली असतीतर. त्यामुळे मला एवढच म्हणायच आहे की या संुपर्ण भुमीकेबाबत आपण

प्रशासनाला वेळोवेळी आश्वस्त केलेले आहे याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे. आणि यापुढे देखील प्रशासन ज्या वेळेला ज्या ज्या गरजेनुसार डिसीजन कोरोनापासून नागरीकांचे प्राण वाचवण्यासाठी घ्यावे लागतील ते घेणारच आहे आणि त्याच्यासाठी तुम्ही आमच्या पाठीशी उभे रहाल ही देखील अपेक्षा मी या निमीत्ताने व्यक्त करतो. पुनश्च आम्ही योग्य पध्दतीने लवकरात लवकर ही कारवाई पुर्ण करु, चौकशी पुर्ण करु. ज्यांचे पेमेंट झाले असतील आणि ते जर दोषी सापडलेतर ती इन्क्वॉयरी देखील करण्याची, त्यांच्यावरती कारवाई देखील करण्यात येईल आणि ज्यांच पेमेंट झाल नसेल ते जर दोषी असतीलतर ते पेमेंट रोखण्यात येईल असे मी निवेदन सभागृला करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब, तुम्ही खरेदी केले तुम्हांला अधिकार दिले याच्यामध्ये आम्हांला अजीबात दु:ख नाही. तुम्ही एवढ पोटतीडकीने सांगता, मी परत तुम्हांला सांगते तुम्ही दहा रुपयाचा पंधरा रुपयाला जरी घेतला असतातरी इथे कोणी काही म्हणले नसते. आडीच वर्षात मी कधीतरी या गोष्टी विचारायला आले का. आम्ही कधीही आडवलेल नाही. तुम्ही दहा रुपये नाहीतर तेरा रुपयाला जरी ठेकेदार मागणी करत असेलतर तुम्ही तेरा रुपये त्याला देणार असालतरी आमच काहीही म्हणण नाही. तुम्ही जो उल्लेख केला की ठेकेदार म्हणत होते की आम्हांला तेरा रुपयानी दया, आमच्या हाताला काहीतरी सुट्र देत. केव्हा पळवाट निघते ती अशीच पळवाट निघते. मग ठेकेदाराची तरी काय चुक आहे असे आम्ही पण म्हणू शकतो. जर यांना काहीच मिळणार नसेलतर, त्यांना जर त्यातून काहीच सुटणार नसेलतर मग ते एकतर मापामध्ये तुम्हांला फसवणार किंवा तुम्हांला क्वॉलीटीमध्ये फसवणार. तुम्ही जर चांगल्या दुकानात गेलाततर तुम्ही रेट चांगल्याच पध्दतीचे देणार. तुम्ही रस्त्यावरुन साध्या स्टॉल वरुन घेतलतर तुम्हांला त्याच पध्दतीचे काम मिळणार आहे. आमच म्हणण्याच उदिष्ठ असच आहे की आताचा ठराव सुध्दा नावानिशी आला, मग तुम्ही नावानिशी असा ठराव आणायला नाही पाहीजे. इथे पक्ष जोडल्या जातो. बातमीत सुध्दा तसच आल म्हणून आम्ही तुम्हांला म्हणल क्वॉलीटीत फरक पडला. तुम्ही लोकांना क्वॉलीटी दया, माझ म्हणण आहे की २००/- रुपये नाहीतर ४८०/- ला ताठ असेलतरी चालेल कारण त्या लोकांना नक्कीच चांगल खाण आपण दिलं पाहीजे. मगाशीच मी काय म्हणल तो मुकेश नावाचा व्यक्ती आहे तो साध्या घरचा नसेल म्हणून तो म्हणत होता की मला जे झाल ते झाल मी

सहन करु शकत नाही, लोकांना चांगल मिळाव. ४८०/- रुपयाच दया आम्ही कुठ तुम्हांला म्हणल की २२५/- पेक्षा कमी या. आमचा हा विषयच नाही, सभागृहाचा सुध्दा नसेल पण क्वॉलीटी दया, चांगल दया. पण कुणीही कुठेही हे बोट दाखवू नये. जर तुम्ही क्वॉलीटी चांगली दिली असतीतर कोणीही तुम्हांला विचारल नसतं. त्या माणसाने जेवणाच्या बाबतीत आम्हांला दहा वेळा फोन नसता केलातर मी तुम्हांला त्याचा नंबर दिला नसता. मला जर नुसतच बोलायच असतंतर त्या माणसाचा नंबर तुम्हांला दिला नसता. मी कधी पण काही असेलतर तुम्हांला सांगते की या या व्यक्तीने मला सांगीतल आहे, बघा साहेब कशी त्यांना मदत करता येईल ते. मगाशी सिमाताई सुध्दा म्हणाल्या की आता तुम्ही काही काढू नका. आम्हांलातर आता नाही कोरोनाच्या काळातल काहीच काढायच नाही. परंतु ज्यावेळेला नाव येतात त्यावेळेला बोलणं भाग आहे. तुम्ही विषय तसा ठेवायला पाहीजे. विषय प्रशासनाकडून येवू दया किंवा कुठल्या कमिटीकडून येऊ दया तर ती पथ्य पाळायला पाहीजेत. मग त्या पध्दतीने तुम्ही जर पथ्य पाळली असतीतर हा विषय आला नसता. मगाशी सांगीतल की प्रत्येक आमदाराना कोरोनासाठी ५०-५० लाख रुपये मिळाले. मग प्रत्येकाच्या मनामध्ये शंका येणारना आता. कोणी वैयक्तीक घेवू नये. आमच म्हणण आहे की पैसे जाऊ देत पण क्वॉलीटी मिळाली पाहीजेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमाक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- ५

दिनांक -४/६/२०२० विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.मभां/०५/कावि/५१३/२०२० दि.२०/०५/२०२०

राज्य शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, दि.१३/०३/२०२० पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (३) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू व सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. त्याकरीता महानगरपालिकेचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात मध्यवर्ती भांडार विभागाकडे शासन अनुदान जमा करणेसाठी जमा बाजुस व खर्चासाठी खर्च बाजुस “कोरोना निधी (COVID-19)” हे लेखाशिर्ष नव्याने निर्माण करण्यास व सदर लेखाशिर्षावर मध्यवर्ती भांडार विभागाकडील “उपकरणे खरेदी” या लेखाशिर्षावरील र.रु.३५ कोटी तरतूदीमधुन र.रु.८.५० कोटी व शासनाकडून प्राप्त अनुदान र.रु.१.५० कोटी याप्रमाणे एकूण र.रु.१० कोटी तरतूद वर्ग करण्यास व यापुढे शासनाकडून या संदर्भात प्राप्त होणारे अनुदान जमेस धरुन त्यानुसार त्यामधुन खर्च करण्यास महानगरपालिका अधिनियम कलम १०१ (३)(क) नुसार मान्यता देणे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.संतोष लोंढे –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने मान्यता दिलेनंतर सदर अंदाजपत्रकामधील सर्व महसुली कामे व भांडवली विकास कामे यांचे संदर्भातील कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

करोना(Covid-19) या संसर्गजन्य साथ रोगामुळे भारतीय साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ राज्यात लागू करणेत आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगर परिसरातही सदर साथरोगाचा प्रार्दुभाव झालेला आहे. त्यामुळे मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांचे खरेदी

संदर्भातील महसूली कामे व भांडवली अंदाजपत्रकातील अत्यावश्यक सेवेतील कामे तसेच विकास कामे करण्यासाठी या आर्थिक वर्षातील कमी कालावधी विचारात घेता, सदरची महसुली, अत्यावश्यक सेवेतील कामे व विकास कामे यांच्या नावासमोर नमूद अंदाजपत्रकीय रक्कमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता घेतल्यास त्या/त्या कामाची निविदा प्रक्रिया हाती घेऊन सदरची विकास कामे उपलब्ध कालावधी मध्ये करणे शक्य होईल.

सबब सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे मंजूर अंदाजपत्रकात नमुद केलेप्रमाणे अ अंदाजपत्रक सर्व विभाग, क अंदाजपत्रक पाणीपुरवठा व जलनि:सारण विभाग, सर्व प्रकारच्या विशेष योजना, स्थापत्य उद्यान, पर्यावरण अभियांत्रिकी, झोपडपट्टी निर्मुलन व पुर्नवसन विभाग, झोनिपू स्थापत्य, EWS व BSUP विभाग विद्युत विभाग, वृक्षसंवर्धन, शुध्द/अशुध्द जल उपसा केंद्र, सेक्टर २३ विद्युत, सर्व विभागाचे प अंदाजपत्रक कामे, भुयारी गटर योजना, सर्व प्रभाग मुख्यालयासह, प्रभाग स्तरावरील सर्व प्रकारची विद्युत, पाणीपुरवठा व स्थापत्य विषयक सर्व कामे, महसुली अंदाजपत्रकातील सर्व प्रकारची देखभाल व दुरूस्तीची कामे, UTF फंडातील विकास कामे, इत्यादी सर्व विकास कामांच्या समोर दर्शविलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस तसेच महसुली अंदाजपत्रकातील वस्तू व सेवांच्या खरेदी संदर्भातील लेखाशिर्षासमोर दर्शविलेल्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकिय मान्यता देण्यात यावी तसेच हि प्रशासकीय मान्यतेची रक्कम निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मंजूर निविदा रकमेइतकी राहील यास मान्यता देण्यात यावी. तसेच ग क्षेत्रिय कार्यालया अन्तर्गत प्रभाग २१,२३,२४,२७ मधील स्थापत्य विषयक चालू कामाच्या तरतुदी व नवीन कामांच्या अंदाजपत्रक सन २०२१ मध्ये समावेश करणे करिता ०८/०२/२०२० रोजी लेखा विभागाकडे mail करणेत आला होता. परंतु अंदाजपत्रक छपाई नंतर पाहिले असता 'इतर विशेष योजना' या लेखाशीर्षावरील कामांच्या तरतुदीमध्ये व या विभागाने पाठविलेला mail यामधील आकडेवारीत बदल झालेला असून ते दुरुस्त करणेस मान्यता देणेत यावी. अ.क्र.२६ चे चालू काम अंदाजपत्रकातून वगळल्यामुळे सदरचे काम अंदाजपत्रकात समावेश करणेस मान्यता देणेत यावी. सदरची यादी खालील प्रमाणे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२०-२१ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतुद) | वाढ करावयाची तरतुद रक्कम रूपये | घट करावयाची तरतुद रक्कम | २०२०-२१ ची सुधारित तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | थेरगाव येथील क्रांतीवीरनगर वर्धमान वाटिका सोसायटी समोरील रस्ता विकसित करणे | ८१ | ११२ | इतर विशेष योजना | २८०००००० | ० | १२०००००० | ० | १२०००००० |
| २ | थेरगाव गावठाण येथील स्मशानभूमी व घाट यांची सुधारणा करणे | ८१ | ११३ | इतर विशेष योजना | २०००००० | १२०००००० | ० | १०७००००० | १३००००० |
| ३ | प्रभाग क्र. २१ पिंपरी वाघेरे गावातील भैरवनाथ मंदिर येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे. | ८१ | ११४ | इतर विशेष योजना | ७००००००० | १३००००० | १८७००००० | ० | २०००००००० |
| ४ | प्रभाग क्र. २१ पिंपरी येथील जिजामाता हॉस्पिटल परिसरातील जुन्या कर्मचारी निवासस्थानाचे नुतनीकरण करणे | ८१ | ११५ | इतर विशेष योजना | ३०००००० | २००००००० | ० | २००००००० | ० |
| ५ | प्रभाग क्र. २१ पिंपरी येथील जिजामाता हॉस्पिटलची सीमाभिंत बांधणे व उर्वरीत स्थापत्यविषयक कामे करणे. | ८१ | ११६ | इतर विशेष योजना | १०८००००० | ० | ८०००००० | ० | ८०००००० |
| ६ | प्रभाग क्र. २१ पिंपरी वाघेरे येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे. | ८१ | ११७ | इतर विशेष योजना | १००००००० | ८०००००० | ० | ० | ८०००००० |
| ७ | प्रभाग क्र. २१ पिंपरी येथील त्रिलोक्य स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे. | ८१ | ११८ | इतर विशेष योजना | ५००००००० | ८०००००० | १२०००००० | ० | २००००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | प्रभाग क्र. २१ मधील पिंपरीगाव येथील स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे. | ८१ | ११९ | इतर विशेष योजना | ३०००००००० | २०००००००० | ० | १०००००००० | १०००००००० |
| ९ | प्रभाग क्र. २१ मध्ये विविध ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे. | ८१ | १२० | इतर विशेष योजना | २०००००००० | १०००००००० | ० | २००००००० | ८००००००० |
| १० | प्रभाग क्र. २१ मधील पिंपरीगाव मधील पवनेश्वर मंदिरासमोर बहुउद्देशीय सभागृह बांधणे. | ८१ | १२१ | इतर विशेष योजना | २०००००००० | ८००००००० | ० | ३००००००० | ५००००००० |
| ११ | प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील जिजामाता हॉस्पिटलच्या नविन इमारतीमध्ये फर्निचरची व इतर स्थापत्याविषयक कामे करणे. | ८१ | १२२ | इतर विशेष योजना | ७०००००००० | ५००००००० | ० | ५००००००० | ० |
| १२ | प्रभाग क्र २३ मधील पाण्याची टाकी ते बी.आर.टी.एस पर्यंतचा रस्ताचे काँक्रिटीकरण करणे.(सन २०१९-२०२० साठी) | ८१ | १२३ | इतर विशेष योजना | ५०००००००० | ० | ३९००००००० | ० | ३९००००००० |
| १३ | प्रभाग क्र २३ मधील थेरगाव गावठाण परिसरातील अंतर्गत गल्ल्यांचे काँक्रिटीकरण करणे.(सन २०१९-२०२० साठी) | ८१ | १२४ | इतर विशेष योजना | १५०००००००० | ३९००००००० | ३१००००००० | ० | ७०००००००० |
| १४ | प्रभाग क्र. २३ मधील हेगडेवार पूल ते कुणाल रेसिडेन्सी पर्यंत जाणारा १२ मी रुंद रस्ता विकसित करणे. (सन २०१९-२०२० साठी) | ८१ | १२५ | इतर विशेष योजना | ३०००००००० | ७०००००००० | ० | ६५००००००० | ५००००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | प्रभाग क्र. २३ मधील हेगडेवार पूल ते धनेश्वर पूलपर्यंतच्या रस्त्यास नदीलगत गेबीयन वॉल विकसित करणे. (सन २०१९-२०२० साठी) | ८१ | १२६ | इतर विशेष योजना | ३००००००० | ५०००००० | | ५०००००० | ० |
| १६ | प्रभाग क्र. २४ मधील खिंवसरा पाटील व्यायामशाळेच्या मागील आवारात शेड करून कुस्ती संकुल उभारणे . | ८१ | १२७ | इतर विशेष योजना | ३००००००० | १५०००००० | ० | ९०००००० | ६०००००० |
| १७ | प्रभाग क्र.२४ मधील भिंगारे कॉर्नर ते रत्नदीप कॉलनी (वाकड रोड) रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ८१ | १२८ | इतर विशेष योजना | १०००००००० | ६०००००० | १९०००००० | ० | २५०००००० |
| १८ | प्रभाग क्र.२१ पिंपरी मधील पावरहाउस चौक ते पिंपळे सौदागर पुलापर्यंतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ८१ | १२९ | इतर विशेष योजना | ३०००००००० | २५०००००० | ० | २४९००००० | १००००० |
| १९ | प्रभाग क्र.२१ पिंपरी मधील बालामल चाळ, भैरवनाथ नगर,भीमनगर व इतर परिसरातील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ८२ | १३० | इतर विशेष योजना | ७००००००० | १००००० | ० | ० | १००००० |
| २० | प्रभाग क्र.२१ पिंपरी मधील वैभवनगर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ८२ | १३१ | इतर विशेष योजना | ५००००००० | १००००० | ० | ० | १००००० |
| २१ | प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील एच. बी. ब्लॉक व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे. | ८२ | १३२ | इतर विशेष योजना | १०००००००० | १००००० | २४९००००० | ० | २५०००००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | प्रभाग क्र.२१ पिंपरी येथील शास्त्री गार्डन व इतर परिसरातील रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे. | ८२ | १३३ | इतर विशेष योजना | १०००००००० | २५००००००० | ० | ५०००००० | २००००००० |
| २३ | प्रभाग क्र.२१ पिंपरीगावठाण व परिसरातील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ८२ | १३४ | इतर विशेष योजना | ५००००००० | २००००००० | ० | ० | २००००००० |
| २४ | प्रभाग क्र २७ रहाटणी येथील आरक्षण क्र ६५५ येथे शाळा इमारत बांधणे | ८२ | १३५ | इतर विशेष योजना | २०००००००० | २००००००० | | १९९००००० | १००००० |
| २५ | थेरगाव प्रभाग क्र २३ मधील ग क्षेत्रीय कार्यालयामध्ये फर्निचर व्यवस्था व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | ८२ | १३६ | इतर विशेष योजना | ३००००००० | १००००० | ० | १००००० | ० |
| २६ | प्रभाग क्र.२४ मधील गल्ल्यांमध्ये कॉक्रीटीकरण करणे. | | | | १००००००००० | ० | १५०००००० | ० | १५०००००० |
| | | | | | १७०३८००००० | ३१७७००००० | १७९६००००० | १७९६००००० | ३१७७००००० |

तसेच स्थापत्य EWS (PMAY) प्रकल्प विभागाकडील अंदाजपत्रक सादर केले होते. या विभागाकडून शासनाच्या पंतप्रधान आवास योजना ही महत्वकांक्षी योजना राबविणेकामी आवश्यक तरतुदी करणेत आल्या होत्या. परंतू सदरच्या तरतुदी अंदाजपत्रकामध्ये कमी केल्याचे दिसून येत आहे. सदरची कामे प्रगतीपथावर असून तरतुदी अपु-या पडणार आहेत. तरी सदर बाबत खालीलप्रमाणे तरतुद उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत यावी.

| लेखाशिर्ष क्र. / अ.क्र. | पान क्र. | मा.स्थायी समिती मंजुर अंदाजपत्रकानुसार | अंदाजपत्रकात अंतर्भुत करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १२ | ६४७ | पंतप्रधान आवास योजना (इतर) | १२ (अ) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ अंतर्गत राबविणेत येणाऱ्या PCSSIHDP प्रकल्पांतर्गत सल्लागार यांचेमार्फत गुलाबनगर, जयभिम नगर, महात्मा फुले नगर, सिध्दार्थ नगर, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लिंबोरे चाळ, दापोडी प्रकल्पांचे पुनर्वसन / पुनर्निर्माण करणे.<br>**सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१७५७००००००/- व सन २०२०-२१ चा मुळ अंदाज र.रु.१,००,०००/- करणेत यावी.** |
| | | | १२ (ब) प्रकल्प सल्लागार फी अदा करणे<br>**सन २०२०-२१ चा मुळ अंदाज र.रु.५०,००,०००/- करणेत यावी.** |
| | | | १२ (क) पंतप्रधान आवास योजनेसाठी घटक क्र.१ अंतर्गत राबविणेत येणाऱ्या PCSSIHDP प्रकल्पांतर्गत सल्लागार यांचेमार्फत गांधीनगर झोपडपट्टीचे पुनर्वसन / पुनर्निर्माण करणे.<br>**सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.५००००००००००/- व सन २०२०-२१ चा मुळ अंदाज र.रु.१,००,०००/- करणेत यावी.** |
| | | | १२ (ड) प्रकल्प सल्लागार फी अदा करणे<br>**सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१००००००००/- व सन २०२०-२१ चा मुळ अंदाज र.रु.५०,००,०००/- करणेत यावी.** |
| ४ | ६५१ | केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिके मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी **वडमुखवाडी येथे** निवासी गाळे बांधणे. | केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिके मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी **डुडुळगांव येथे निवासी गाळे बांधणे.** |

तसेच पंतप्रधान आवास योजनेच्या एकत्रित तरतुदीमधून प्रकल्पाच्या प्रगतीनुसार तरतुद वापरणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक प्रसिध्द झाले असुन त्यामध्ये झोनिपु स्थापत्य विभागाच्या पान क्र. ९१७ अन्वये महसुली अंदाजपत्रक प्रसिध्द झालेले आहे. सदर अंदाजपत्रकात पान क्र. ९३८ ते ९४८ मध्ये २०२०-२१ मधील नवीन कामानां अंदाजपत्रकिय रक्कम ० (शुन्य) छापलेली असुन सदरची दुरूस्ती सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार अंदाजपत्रकिय रक्कमेची दुरूस्ती त्या-त्या कामासमोर करणेस व या कामांच्या अंदाजपत्रकिय रक्कमेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे-१८**

**झोनिपु स्थापत्य विभाग**

**महसुली अंदाजपत्रक २०२०-२१**

| अ.क्र. | अंदाज पत्रकिय पानांक | अ.क्र. | **सन २०२०-२१ मधील नविन कामे** | प्रभाग क्र. | कामाची अंदाजपत्रकिय र.रू. | २०१९-२०२० चा एकुण सुधारीत अंदाज | पुढील वर्षात (सन २०२०-२०२१ आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९३८ | २७६ | JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड पॅकेज क्र.७अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनिःसारण कामांची दुरुस्तीची कामे करणे. | १९ | १३००००००० | ० | ९००००००० |
| २ | ९३८ | २७७ | JnNURM-BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत लिंकरोड पत्राशेड पॅकेज क्र.८ अ मधील इमारतींची स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, जलनिःसारण कामांची दुरुस्तीची कामे करणे. | १९ | २०००००००० | ० | १०००००००० |
| ३ | ९३८ | २७९ | प्रभाग क्र. २ येथील संजयगांधीनगर (मोशी- बो-हाडेवाडी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामे करणे व देखभाल दुरूस्ती करणे.(सन २०२०-२१) | २ | ५०००००० | ० | २०००००० |
| ४ | ९३८ | २८० | प्रभाग क्र. २ येथील संजयगांधीनगर (मोशी- बो-हाडेवाडी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती व शौचालय** देखभाल दुरूस्ती करणे.(सन २०२०-२१) | २ | २५०००००० | ० | १०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ९३८ | २८१ | प्रभाग क्र. ७ येथील शांतीनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामे करणे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ७ | २५००००० | ० | १०००००० |
| ६ | ९३८ | २८२ | प्रभाग क्र. ७ येथील शांतीनगर झोपडपट्टीमध्ये ट्रेंचेस चे मजबुतीकरण करून रस्ते डांबरीकरण करणे. | ७ | २५००००० | ० | १०००००० |
| ७ | ९३८ | २८३ | प्रभाग क्र. ७ येथील शांतीनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दुरूस्तीकरणे.(सन २०२०-२१) | ७ | २५००००० | ० | १०००००० |
| ८ | ९३८ | २८४ | प्रभाग क्र. ७ येथील शांतीनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणीच्या रस्तेचे ट्रेचेस भरणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. (सन २०२०-२१) | ७ | २५००००० | ० | १०००००० |
| ९ | ९३९ | २८५ | प्रभाग क्र. ८ येथील गवळीमाथा, बालाजीनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामे करणे व देखभाल दुरूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ८ | ५०००००० | ० | २०००००० |
| १० | ९३९ | २८६ | प्रभाग क्र. ८ येथील गवळीमाथा, बालाजीनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ८ | २५००००० | ० | १०००००० |
| ११ | ९३९ | २८७ | प्रभाग क्र. ८ येथील खंडेवस्ती, गणेशनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ८ | ५०००००० | ० | २०००००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | ९३९ | २८८ | प्रभाग क्र. ८ येथील खंडेवस्ती, गणेशनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्तीकरणे.(सन २०२०-२१) | ८ | २५०००००० | ० | १,०००००० |
| १३ | ९३९ | २८९ | प्रभाग क्र. ९ येथील विठ्ठलनगर, आंबेडकरनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ९ | ५०००,००० | ० | २०००,००० |
| १४ | ९३९ | २९० | प्रभाग क्र. ९ येथील विठ्ठलनगर, आंबेडकरनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ९ | २५००,००० | ० | १०००,००० |
| १५ | ९३९ | २९१ | प्रभाग क्र.२० येथील महात्मा फुलेनगर(भोसरी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | २० | ५०००,००० | ० | २०००,००० |
| १६ | ९३९ | २९२ | प्रभाग क्र.२० येथील महात्मा फुलेनगर(भोसरी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | २० | २,५००,००० | ० | १०००,००० |
| १७ | ९३९ | २९३ | प्रभाग क्र.२० येथील लांडेवाडी (भोसरी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | २० | ५०००,००० | ० | २०००,००० |
| १८ | ९४० | २९४ | प्रभाग क्र.२० येथील लांडेवाडी (भोसरी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्ती करणे. (सन | २० | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२०-२१) | | | | |
| १९ | ९४० | २९५ | प्रभाग क्र.३० येथील लिंबोरेवस्ती, महात्मा फुलेनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ३० | ५०००,००० | ० | २०००,००० |
| २० | ९४० | २९६ | प्रभाग क्र.३० येथील लिंबोरेवस्ती, महात्मा फुलेनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ३० | २५००,००० | ० | १०००,००० |
| २१ | ९४० | २९७ | प्रभाग क्र.३० येथील सिध्दार्थनगर,संजयगांधीनगर (फुगेवाडी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ३० | ५,०००,००० | ० | २०००,००० |
| २२ | ९४० | २९८ | प्रभाग क्र.३० येथील सिध्दार्थनगर,संजयगांधीनगर (फुगेवाडी) झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ३० | २५००,००० | ० | १०००,००० |
| २३ | ९४० | २९९ | प्रभाग क्र. ३० येथील गुलाबनगर, जयभिमनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **स्थापत्य** विषयक कामे करणे व देखभाल दु रूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ३० | ५०००,००० | ० | २०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | ९४० | ३०० | प्रभाग क्र.३० येथील गुलाबनगर, जयभिमनगर झोपडपट्टी व इतर झोपडपट्टीमधील विविध ठिकाणी **मनपा इमारती** व शौचालय देखभाल दुरूस्ती करणे.(सन २०२०-२१) | ३० | २५००,००० | ० | १०००,००० |
| २५ | ९४० | ३०१ | ह' क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील ठिकठिकाणच्या झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे ट्रेचेस भरणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.(सन २०२०-२१) | ससा | ५०००,००० | ० | २०००,००० |
| २६ | ९४० | ३०२ | क' क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील ठिकठिकाणच्या झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे ट्रेचेस भरणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.(सन २०२०-२१) | ससा | ५०००,००० | ० | २०००,००० |
| २७ | ९४० | ३०३ | ह,क, ई' क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील ठिकठिकाणच्या झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे ट्रेचेस भरणे व हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे.(सन २०२०-२१) | ससा | ५०००,००० | ० | २०००,००० |
| २८ | ९४१ | ३०४ | प्रभाग क्र. २१ मधील संजय गांधीनगर, सुभाषनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | २१ | २५००,००० | ० | १०००,००० |
| २९ | ९४१ | ३०५ | प्रभाग क्र. २१ मधील इंदिरानगर, महात्मा गांधीनगर, कैलास व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | २१ | २,५००,००० | ० | १,०००,००० |
| ३० | ९४१ | ३०६ | प्रभाग क्र. २१ मधील शास्त्रीनगर,बलदेवनगर,गणेशनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | २१ | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | ९४१ | ३०७ | प्रभाग क्र. २१ मधील आदर्शनगर, मिलिंदनगर,रामकृष्णनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | २१ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ३२ | ९४१ | ३०८ | प्रभाग क्र. ३१ मधील पिंपळेगुरव येथील राजीवगांधीनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ३१ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ३३ | ९४१ | ३०९ | प्रभाग क्र. ९ मधील यशवंतनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | ९ | २५००,००० | ० | १,०००,००० |
| ३४ | ९४१ | ३१० | प्रभाग क्र. २७ मधील तापकिरनगर व इतर झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे व देखभाल दुरूस्ती करणे. (सन २०२०-२१) | २७ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ३५ | ९४१ | ३११ | पी.सी.एम.सी. झोपडपट्टीमध्ये भुमीपुजन उद्याटनाकरीता मंडप, स्टेज, खुर्च्या पुरविणे व बसविणे. (सन २०२०-२१) | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ३६ | ९४१ | ३१२ | ग' प्रभागातील झोपडपट्ट्यामध्ये रस्त्याचे Hot-Mix पध्दतीने डांबरीकरण करणे. (सन २०२०-२१) | ससा | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ३७ | ९४१ | ३१३ | प्रभाग क्र. १९ येथील आंबेडकरनगर, (पिंपरी), भिमनगर, सँनिटरी चाळ या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दुरूस्तीकरणे.(सन २०२०-२१) | १९ | ३७५०,००० | ० | १५००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | ९४१ | ३१४ | प्रभाग क्र. १९ येथील निराधारनगर, बौध्दनगर, रमाबाईनगर या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन२०२०-२१) | १९ | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ३९ | ९४२ | ३१५ | प्रभाग क्र. १९ येथील लिंकरोड - पत्राशेड या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन२०२०-२१) | १९ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ४० | ९४२ | ३१६ | प्रभाग क्र. १९ येथील उद्योगनगर, संतोषनगर, विजयनगर, सु दर्शनगर या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | १९ | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ४१ | ९४२ | ३१७ | प्रभाग क्र. १९ येथील आनंदनगर, साईबाबानगर या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन२०२०-२१) | १९ | ५०००,००० | ० | १०००,००० |
| ४२ | ९४२ | ३१८ | प्रभाग क्र. १० येथील लालटोपीनगर, आण्णासाहेब मगरनगर, इंदिरानगर या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | १० | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ४३ | ९४२ | ३१९ | प्रभाग क्र. १८ येथील वेताळनगर, मोरयानगर व प्रभाग क्र. १७ मधील नागसेन नगर या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | १८ | ५०००,००० | ० | १०००,००० |
| ४४ | ९४२ | ३२० | प्रभाग क्र. १६ येथील एम.बी. कॅंम्प या झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दु रूस्ती करणे.(सन २०२०-२१) | १६ | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४५ | ९४२ | ३२१ | प्रभाग क्र. १० येथील इंदिरानगर येथील मोकळ्या जागेस सिमाभींत बांधणे व इतर **स्थापत्य विषयक** कामाची देखभाल दुरूस्ती करणे.(सन २०२०-२१) | १० | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ४६ | ९४२ | ३२२ | आंनदनगर, इंदिरानगर, रमाबाईनगर इ. अ क्षेत्रीय कार्यालयातील झोपडपट्यामधील HOT MIX पध्दतीने डांबरीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. (सन २०२०-२१) | ससा | ५०००,००० | ० | २०००,००० |
| ४७ | ९४२ | ३२३ | अ क्षेत्रिय कार्यालयातील झोपडपट्यामध्ये साईन बोर्ड, बेंचेस पुरविणे व बसविणे, (सन २०२०-२१) | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ४८ | ९४२ | ३२४ | अ व ब क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील झोपडपट्टीतील जुन्या व चालु कामांची बिले अदा करणे. | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ४९ | ९४२ | ३२५ | क व ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील झोपडपट्टीतील जुन्या व चालु कामांची बिले अदा करणे. | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५० | ९४२ | ३२६ | ई व फ क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील झोपडपट्टीतील जुन्या व चालु कामांची बिले अदा करणे. | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५१ | ९४३ | ३२७ | ग व ह क्षेत्रिय कार्यक्षेत्रातील झोपडपट्टीतील जुन्या व चालु कामांची बिले अदा करणे. | ससा | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५२ | ९४३ | ३२८ | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे.(सन २०२०-२१) | ससा | १३५०,००० | ० | ५४०,००० |
| ५३ | ९४३ | ३२९ | प्रभाग क्र. ९ येथील गांधीनगर झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१) | ९ | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | ९४३ | ३३० | प्रभाग क्र. ९ येथील गांधीनगर झोपडपट्टीमध्ये पाथवे करीता कॉक्रीट पेव्हींग करणे, कॉक्रीट ब्लॉक बसविणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामेकरणे. (सन २०२०-२१) | ९ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५५ | ९४३ | ३३१ | प्रभाग क्र. ९ येथील गांधीनगर झोपडपट्टीमध्ये गटर बांधणे, स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१) | ९ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५६ | ९४३ | ३३२ | प्रभाग क्र. २० येथील वैशालीनगर, गुरूद्तनगर, भारतमातानगर झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे, कॉक्रीट ब्लॉक बसविणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१) | २० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५७ | ९४३ | ३३३ | प्रभाग क्र. २५ येथील काळाखडक झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे, कॉक्रीट ब्लॉक बसविणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१) | २५ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५८ | ९४३ | ३३४ | प्रभाग क्र. २६ येथील आण्णाभाऊ साठेनगर झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे, कॉक्रीट ब्लॉक बसविणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व देखभाल दुरूस्तीची कामेकरणे. (सन २०२०-२१) | २६ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ५९ | ९४३ | ३३५ | प्रभाग क्र. २४ येथील म्हातोबानगर झोपडपट्टीमध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे, कॉक्रीट ब्लॉक बसविणे, इतर स्थापत्य विषयक कामे करणे व | २४ | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | देखभाल दु रूस्तीची कामे करणे. (सन २०२०-२१) | | | | |
| ६० | ९४३ | ३३६ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० अंतर्गत दत्तनगर झोपडपट्टी येथे टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६१ | ९४४ | ३३७ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० अंतर्गत विद्यानगर झोपडपट्टी येथे टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६२ | ९४४ | ३३८ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० दत्तनगर  झोपडपट्टीमध्ये गटर, पाथवेची  देखभाल दु रूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे. | १० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६३ | ९४४ | ३३९ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० विद्यानगर झोपडपट्टीमध्ये गटर, पाथवेची  देखभाल दु रूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे. | १० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६४ | ९४४ | ३४० | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० दत्तनगर झोपडपट्टीमधील मनपा इमारत, शौचालय व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १० | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६५ | ९४४ | ३४१ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० विद्यानगर झोपडपट्टीमधील मनपा इमारत, शौचालय व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १० | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | ९४४ | ३४२ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १० स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १० | ३७५०,००० | ० | १५००,००० |
| ६७ | ९४४ | ३४३ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ अंजठानगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिकस्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६८ | ९४४ | ३४४ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ दुर्गानगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिकस्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ६९ | ९४४ | ३४५ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ शरदनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्यविषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ७० | ९४४ | ३४६ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ मोरेवस्ती / भिमशक्तीनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ७१ | ९४५ | ३४७ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ अंतर्गत झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७२ | ९४५ | ३४८ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. ११ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ७३ | ९४५ | ३४९ | प्रभाग क्र. ११ मधील झोपडपट्टी क्षेत्रासाठी नामनिर्देशंक दिशादर्शक फलक ,इतर आवश्यक आशयाचे फलक बनविणे व बसविणे तसेच इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | ११ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ७४ | ९४५ | ३५० | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ मिलिंद नगर,बौद्ध नगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ७५ | ९४५ | ३५१ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ इंदिरा नगर, राज नगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ७६ | ९४५ | ३५२ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ संजय नगर, दळवी नगर, राहुल नगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्यविषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ७७ | ९४५ | ३५३ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ PCMC कॉलनी, कर्मवीर नगर श्रमिक नगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७८ | ९४५ | ३५४ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ आण्णाभाऊसाठे वसाहत येथील २५६ व ५७६ गाळे परिसरातील झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दु रूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्यविषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ७९ | ९४५ | ३५५ | प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ येथील संजयनगर, राजनगर, दळवी नगर व इंदिरानगर परिसरातील समाजमंदिर व कंपाउंड वॉलची दु रूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दु रूस्ती करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ८० | ९४६ | ३५६ | प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ येथील मिलिंद नगर, विलास नगर परिसरातील समाजमंदिर व कंपाउंड वॉलची दु रूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दु रूस्ती करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ८१ | ९४६ | ३५७ | प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ येथील बौद्ध नगर, राहुल नगर, श्रमिक नगर परिसरातील समाजमंदिर व कंपाउंड वॉलची दु रूस्ती करणे व इतर स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दु रूस्ती करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ८२ | ९४६ | ३५८ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ येथे आवश्यकतेनुसार ठिकठिकाणी स्ट्रॉम वॉटर पाईप टाकणे, गटर, पाथवे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे करणे | १३ | ३२५०,००० | ० | १३००,००० |
| ८३ | ९४६ | ३५९ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ संजयनगर, राजनगर, दळवी नगर, इंदिरानगर, मिलिंद नगर झोपडपट्टीमध्ये टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दु रूस्तीची कामे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | करणे | | | | |
| ८४ | ९४६ | ३६० | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ बौद्ध नगर, राहुल नगर, श्रमिक नगर, , विलास नगर झोपडपट्टीमध्ये टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १३ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ८५ | ९४६ | ३६१ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १३ से.क्र. २२ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | १३ | ३७५०,००० | ० | १५००,००० |
| ८६ | ९४६ | ३६२ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ आंबेडकरनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिकस्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १४ | ३७५०,००० | ० | १५००,००० |
| ८७ | ९४६ | ३६३ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ रामनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्यविषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १४ | ३७५०,००० | ० | १५००,००० |
| ८८ | ९४६ | ३६४ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ महात्मा फुलेनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिकस्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १४ | ३,७५०,००० | ० | १५००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८९ | ९४७ | ३६५ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ जयमल्हारनगर झोपडपट्टीमध्ये शौचालय, गटर, पाथवेची देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिकस्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १४ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ९० | ९४७ | ३६६ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ अंतर्गत झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी टाकलेल्या जलवाहिनी व मल:निसारण नलिकेवर क्रॉक्रीट पेव्हिंग करणे व इतर स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | १४ | २५००,००० | ० | १०००,००० |
| ९१ | ९४७ | ३६७ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ झोपडपट्टीमध्ये विविध ठिकाणी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालय देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीचीकामे करणे. | १४ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ९२ | ९४७ | ३६८ | सन २०२०-२१ मध्ये प्रभाग क्र. १४ झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्ते समपातळीवर घेऊन विकसित करणे. | १४ | ३०००,००० | ० | १२००,००० |
| ९३ | ९४७ | ३६९ | सन २०२०-२१ मध्ये 'अ' प्रभागाअंतर्गत असलेल्या झोपडपट्यामध्ये आवश्यकतेनुसार हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ससा | ३५००,००० | ० | १४००,००० |
| ९४ | ९४७ | ३७० | सन २०२०-२१ मध्ये 'फ' प्रभागाअंतर्गत असलेल्या झोपडपट्यामध्ये आवश्यकतेनुसार हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. | ससा | ३७५०,००० | ० | १५००,००० |
| ९५ | ९४७ | ३७१ | सन २०२०-२१ मध्ये 'अ' प्रभागाअंतर्गत असलेल्या झोपडपट्यामधील खोदलेल्या रस्त्यावरील ट्रेंचेस जी.एस.बी व बी.बी.एम. पध्दतीने भरणे. | ससा | ३०००,००० | ० | १२००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
